१४८०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१४०

# साहित्य-चिंतामणी

अरविंद मंगरूळकर
भीमराव कुलकर्णी

REFBK-0017741

महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणे ३०.

विशेष
८५९६८
२२।३।५७
~~२०२२~~
२९४०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
निबंध
०५५६६७ दि: २२।३।६९
२१२७

# साहित्य-चिंतामणी

REFBK-0017741

अरा

भीमराव बळवंत कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५५५४
ग्रंथ शाखा

मूल्य : तीन रुपये पन्नास पैसे

प्रथमावृत्ती : ऑगस्ट, १९६४
द्वितीयावृत्ती : ऑगस्ट १९६७
तृतीयावृत्ती : जून १९७०

प्रकाशक : भीमराव कुलकर्णी
कार्यवाह, महाराष्ट्र-साहित्य-परिषद,
टिळक-रस्ता, पुणे ३०

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती', पुणे ३०

‘ साहित्य-चिंतामणी ’मध्ये समाविष्ट केलेले वेचे खालील लेखक व दिवंगत लेखकांचे हक्कदार यांच्या संमतीने संगृहीत करण्यात आलेले आहेत. साहित्य-परिषदेच्या वतीने मी या सर्वांचे मनापासून आभार मानितो. परिषदेवर त्यांनी असाच आपला लोभ निरंतर ठेवावा, अशी विनंती आहे.

काकासाहेब कालेलकर, दत्तो वामन पोतदार, श्री. ना. बनहट्टी, काकासाहेब गाडगीळ, प्र. के. अत्रे, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. ग. सहस्रबुद्धे, अरविंद मंगरूळकर, पु. ल. देशपांडे, स. गं. मालशे, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, शकुंतला परांजपे, इरावती कर्वे, भगवंत देशमुख, जयंतराव टिळक, वा. य. खरे, अनंत हरी गद्रे ( ‘ हे तात्या आणि हे तात्या ’ या वेच्यावद्दल ).

भीमराव कुलकर्णी,
कार्यवाह,
महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणे

## क्रमणी


| | | |
|---|---|---|
| १. लोकमान्य टिळक | महाभारत | १ |
| २. वासुदेवशास्त्री खरे | मातीचे भांडे | ८ |
| ३. अ. ब. कोल्हटकर | हे तात्या आणि हे तात्या | १३ |
| ४. काका कालेलकर | नर-भूषा तु दाढिका | २१ |
| ५. श्री. म. माटे | भूतकाळाच्या पारंब्या | २५ |
| ६. द. वा. पोतदार | ऐतिहासिक चरित्र-लेखन | ३५ |
| ७. श्री. ना. बनहट्टी | एकरूप होऊ सगळे | ४० |
| ८. काकासाहेब गाडगीळ | एक अपूर्व संध्या | ४५ |
| ९. आचार्य अत्रे | पस्तीस वर्षांपूर्वीचे पुणे | ५४ |
| १०. ग. त्र्यं माडखोलकर | ध्येयवादी | ६२ |
| ११. पु. ग. सहस्रबुद्धे | जीवनातील करार | ६९ |
| १२. अरविंद मंगरूळकर | दोन महान परित्याग | ७७ |
| १३. पु. ल. देशपांडे | बटाट्याची चाळ : एक चिंतन | ८९ |
| १४. स. गं. मालशे | सावरकरांचे वक्तृत्व | १०० |
| १५. ना. सी. फडके | रविवार | ११० |
| १६. वि. स. खांडेकर | चाळिशीचे घर | ११५ |
| १७. अनंत काणेकर | पुराणांतील वांगी | १२० |
| १८. शकुंतला परांजपे | मंडईची वस | १२३ |
| १९. इरावती कर्वे | एकाकी | १२८ |
| २०. भगवंत देशमुख | मांजराच्या मिशा | १३३ |
| टीपा | | १४१–१६० |

# ‘ सा हि त्य - चिं ता म णी ’ विषयी

76489

‘ सा हि त्य - चिं ता म णी ’ हा गद्यवेच्यांचा संग्रह महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार तयार केलेला आहे. यात आधुनिक मराठी वाङ्मयातील गद्यवेचे एकत्रित केलेले आहेत; आणि मराठी वाङ्मयाविषयी आणि त्याच्या आधुनिक स्वरूपाविषयी जिज्ञासू असलेल्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांची प्राथमिक दर्ज्याची तयारी व्हावी, हे उद्दिष्ट ठेवून यातील गद्यवेच्यांची निवड केलेली आहे. प्रस्तुत संग्रहामध्ये न. चिं. केळकरांसारखे काही सुविख्यात लेखक गैरहजर दिसतील, तर काही अल्पपरिचित लेखक बैठकीवर बसलेले दिसतील. असे जाणीवपूर्वक केलेले आहे. त्याचे कारण असे की, सर्वसाधारण विद्यार्थ्यालासुद्धा अशा सुविख्यात लेखकांच्या गद्याची, त्यांच्या कार्याची आणि प्रभावाची काही ओळख असते. त्यांचे वेचे, त्यांचे गद्य, हे सहजासहजी मिळविताही येते, आणि ते वाचून त्याविषयी काही अंदाजही बांधिता येतो; परंतु याव्यतिरिक्त मराठीचे इतर अनेक गद्यशिल्पकार असे आहेत की, त्यांचे वेचे सहजासहजी हाताशी येऊ शकत नाहीत, पण त्यांचे गद्यरचनेतील महत्त्व मात्र लक्षात घेण्याच्या योग्यतेचे असते. तेव्हा अशांही लेखकांचे वेचे विद्यार्थ्यांनी अभ्यासावे, आणि आधुनिक मराठी गद्याच्या नमुन्यांचे स्वरूप साकल्याने त्यांच्या मनात ठसावे, हाही हेतू दृष्टीपुढे ठेविला आहे. मात्र असे करताना संग्रहाचे प्रातिनिधिक स्वरूप लोपू नये, याहीकडे लक्ष दिलेले आहे. तात्पर्य असे की, विद्यार्थ्यांच्या बाजूने मराठी वाङ्मयाविषयी काही पूर्वसिद्धता आम्ही गृहीत केली आहे. अशा पूर्वसिद्धतेसमवेत प्रस्तुत संग्रहाचा सापेक्षपाने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला आधुनिक मराठी गद्याचे स्वरूप नीटपणे आकळेल आणि त्याच्या ठिकाणी त्याच्याविषयी एक प्रकारची रोचकता आणि आस्था वाढेल, अशी उमेद आहे.

वेच्यांचे संदर्भ योग्य प्रकारे ध्यानी यावे, म्हणून शेवटी काही आवश्यक स्पष्टीकरणात्मक टीपा दिल्या आहेत. शब्दकोशाचे साहाय्य घेतल्याने जे सहज कळेल त्याचे उपपादन करण्याचा प्रयत्न या टीपांत शक्य तो टाळला आहे.

## क्रमणी


| | | |
|---|---|---|
| १. लोकमान्य टिळक | महाभारत | १ |
| २. वासुदेवशास्त्री खरे | मातीचे भांडे | ८ |
| ३. अ. ब. कोल्हटकर | हे तात्या आणि हे तात्या | १३ |
| ४. काका कालेलकर | नर-भूषा तु दाढिका | २१ |
| ५. श्री. म. माटे | भूतकाळाच्या पारंब्या | २५ |
| ६. द. वा. पोतदार | ऐतिहासिक चरित्र-लेखन | ३५ |
| ७. श्री. ना. बनहट्टी | एकरूप होऊ सगळे | ४० |
| ८. काकासाहेब गाडगीळ | एक अपूर्व संध्या | ४५ |
| ९. आचार्य अत्रे | पस्तीस वर्षांपूर्वीचे पुणे | ५४ |
| १०. ग. त्र्यं माडखोलकर | ध्येयवादी | ६२ |
| ११. पु. ग. सहस्रबुद्धे | जीवनातील करार | ६९ |
| १२. अरविंद मंगरूळकर | दोन महान परित्याग | ७७ |
| १३. पु. ल. देशपांडे | वटाऱ्याची चाल : एक चिंतन | ८९ |
| १४. स. गं. मालशे | सावरकरांचे वक्तृत्व | १०० |
| १५. ना. सी. फडके | रविवार | ११० |
| १६. वि. स. खांडेकर | चाळिशीचे घर | ११५ |
| १७. अनंत काणेकर | पुराणांतील वांगी | १२० |
| १८. शकुंतला परांजपे | मंडईची वस | १२३ |
| १९. इरावती कर्वे | एकाकी | १२८ |
| २०. भगवंत देशमुख | मांजराच्या मिशा | १३३ |
| टीपा | | १४१–१६० |

## ‘सा हि त्य - चिं ता म णी’ विषयी

दा. क्र. 76689

‘सा हि त्य - चिं ता म णी’ हा गद्यवेच्यांचा संग्रह महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार तयार केलेला आहे. यात आधुनिक मराठी वाङ्मयातील गद्यवेचे एकत्रित केलेले आहेत; आणि मराठी वाङ्मयाविषयी आणि त्याच्या आधुनिक स्वरूपाविषयी जिज्ञासू असलेल्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांची प्राथमिक दर्ज्याची तयारी व्हावी, हे उद्दिष्ट ठेवून यातील गद्यवेच्यांची निवड केलेली आहे. प्रस्तुत संग्रहामध्ये न. चिं. केळकरांसारखे काही सुविख्यात लेखक गैरहजर दिसतील, तर काही अल्पपरिचित लेखक बैठकीवर बसलेले दिसतील. असे जाणीवपूर्वक केलेले आहे. त्याचे कारण असे की, सर्वसाधारण विद्यार्थ्यालासुद्धा अशा सुविख्यात लेखकांच्या गद्याची, त्यांच्या कार्याची आणि प्रभावाची काही ओळख असते. त्यांचे वेचे, त्यांचे गद्य, हे सहजासहजी मिळविताही येते, आणि ते वाचून त्याविषयी काही अंदाजही बांधिता येतो; परंतु याव्यतिरिक्त मराठीचे इतर अनेक गद्यशिल्पकार असे आहेत की, त्यांचे वेचे सहजासहजी हाताशी येऊ शकत नाहीत, पण त्यांचे गद्यरचनेतील महत्त्व मात्र लक्षात घेण्याच्या योग्यतेचे असते. तेव्हा अशांही लेखकांचे वेचे विद्यार्थ्यांनी अभ्यासावे, आणि आधुनिक मराठी गद्याच्या नमुन्यांचे स्वरूप साकल्याने त्यांच्या मनात ठसावे, हाही हेतू दृष्टीपुढे ठेविला आहे. मात्र असे करताना संग्रहाचे प्रातिनिधिक स्वरूप लोपू नये, याहीकडे लक्ष दिलेले आहे. तात्पर्य असे की, विद्यार्थ्याच्या बाजूने मराठी वाङ्मयाविषयी काही पूर्वसिद्धता आम्ही गृहीत केली आहे. अशा पूर्वसिद्धतेसमवेत प्रस्तुत संग्रहाचा साक्षेपाने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला आधुनिक मराठी गद्याचे स्वरूप नीटपणे आकळेल आणि त्याच्या ठिकाणी त्याच्याविषयी एक प्रकारची रोचकता आणि आस्था वाढेल, अशी उमेद आहे.

वेच्यांचे संदर्भ योग्य प्रकारे ध्यानी यावे, म्हणून शेवटी काही आवश्यक स्पष्टीकरणात्मक टीपा दिल्या आहेत. शब्दकोशाचे साहाय्य घेतल्याने जे सहज कळेल त्याचे उपपादन करण्याचा प्रयत्न या टीपांत शक्य तो टाळला आहे.

लो. टिळकांपासून आजच्या काळापर्यंत—अर्थात गेल्या साठएक वर्षांतल्या कालखंडात–मराठी गद्याचा विकास कसा झाला, त्याचे या ' साहित्य-चिंतामणी 'त धावते दर्शन आहे. यात मराठी गद्याचे बदलते स्वरूप अनेक अंगांनी पहावयास मिळते. टिळकांच्या वेळचा निबंध आणि आजचा निबंध यांत भाषेच्या आणि बंदिशीच्या दृष्टीने मोठा फरक पडला आहे, असे नाही; परंतु त्याच्या प्रेरणांचा भर काहीसा पालटला आहे, हे आपल्याला जाणवते. टिळक, वासुदेवशास्त्री खरे यांच्या निबंधांत राष्ट्रोत्कर्ष, संस्कृतीची जपणूक यांविषयीची उत्कट कळकळ लपून राहूच शकत नाही. याच्याचबरोबर तुलनेसाठी पु. ग. सहस्रबुद्धे यांचा निबंध वाचताना आपल्याला त्यांची राष्ट्राभ्युदयाची तळमळ तर जाणवतेच; पण तिच्यासह एक प्रकारच्या अलिप्त तार्किक चिकित्सेचीही भूमिका त्यात दिसते. निबंधाला एक शास्त्रीय डूब येते, आणि राष्ट्राभ्युदयासाठी नाही, तर निदान तर्कशास्त्रीय चिकित्सेला अनुसरून तरी आपल्या विचारांचा अंगीकार केलाच पाहिजे, असा एक करार त्यात प्रतिबिंबित झालेला दिसतो. अशाच तार्किक छाननीचे आणखी विशुद्ध स्वरूप माडखोलकर, बनहट्टी यांच्या निबंधांत आढळते. माडखोलकरांच्या निबंधात इतिहासादिकांची साक्ष काढून निबंध तार्किक छाननीतही रंगतदार पण व्यापक केलेला आहे. अशीच रोचकता श्री. म. माटे यांच्याही निबंधात अवतरलेली आहे. माटे यांच्या निबंधातली उदाहरणे तर जीवनाच्या किती बहुविध क्षेत्रांमधून उचललो आहेत, आणि त्यांयोगे त्यांचा सामाजिकही दृष्टिकोण कसा व्यक्त होतो, ते लक्षात घेण्यासारखे आहे.

निबंधाच्या प्रेरणांबरोबर त्याच्या विवेचनपद्धतीत, त्याच्या विषयात आणि आशयातही अनुकूल असा पालट पडलेला आहे. एवढेच नव्हे, तर भाषाही लिखित भाषेच्या गांभीर्यापासून बोलभाषेच्या खेळकरपणाकडे काही अंशी झुकलेली आहे, असे दिसेल. तीत मिस्कीलपणाचा बारीक शिडकावाही अधूनमधून टवटवी आणतो. या संदर्भात माटे यांची शैलीदार रचना पाहण्यासारखी आहे.

या मिस्कीलपणाचे विकसित स्वरूप आपल्याला अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या लेखात स्पष्ट दिसते. दोन तात्या हा विषय आणि त्या दोन तात्यांची स्वभावगत वैशिष्ट्ये हीही कोल्हटकरांच्या तुलनेला आणि मिस्किलपणाला मोठी पोषक झाली आहेत. त्यामुळे कोल्हटकरांच्या स्वैर कल्पनाविलासाला आणि चुरचुरीत भाषेला बहर येऊन सर्व गोष्टींचा कसा चांगला मेळ बसलेला आहे. कालेलकरांचा

छोटा निबंध त्याच्या मथळ्यापासून खुसखुशीत बनला आहे, तर अत्रे आणि गाडगीळ यांचे लेख म्हणजे त्यांच्या आठवणींतला खमंग खुमासदार मालमसाला आहे. अत्र्यांनी जुने पुणे ( —तेही तसे 'फार' जुने नाही— ) वर्णिले आहे, तर गाडगिळांनी प्रवासवृत्त सांगितले आहे. लेखकाचे अवलोकन म्हणजे बारीक रीतीचे आणि त्याचा अनुभव विविध दिशांनी फाकलेला असला, म्हणजे त्यांचे प्रतिबिंब लेखात कसे पडते, ते गाडगिळांच्या लेखात चांगले दिसून येईल. भरतीचे पाणी जसे समुद्राच्या कड्याकपाऱ्यांमधून घुसताना दिसते, त्याप्रमाणे विविध अनुभव त्यांच्या लेखात उदाहरणांमधून, आठवणींमधून, वर्णनामधून घुसत राहतात, आणि त्याला वाङ्मयीन दृष्ट्या मोठी मौज आणतात. अत्र्यांनी रेखाटलेले जुन्या पुण्याचे चित्र तर बहारीचे आहे. जे लोक 'त्या' जुन्या पुण्यात राहिलेले असतील, त्यांना आपलेच अनुभव बोलके झाले आहेत, असे वाटेल. हा लेख वाचताना अत्र्यांच्या भाषेचा एक धोपटपणा, मर्मभेदीपणा चांगल्या प्रकारे प्रत्ययाला येतो. पु. ल. देशपांड्यांचे बटाट्याच्या चाळीचे वर्णन आणि अत्र्यांचे जुने पुणे यांमध्ये काही नातेगोते आहे, हे जाणवल्यावाचून राहणार नाही. इतकेच की, पुण्याचे वर्णन हे वास्तवावर उभे आहे; तर बटाट्याची चाळ कल्पनेने रंगविलेल्या वास्तवाच्या भावनात्मकतेवर उभी आहे. बटाट्याच्या चाळीत पुष्कळ चित्रे दिसतील, आणि नमुने आढळतील. प्रेम, माया, मैत्री, एकोपा, दुजाभाव, तुटकपणा यांच्यामुळे लेखकाच्या मनावर जो बहुरंगी परिणाम झालेला आहे, त्याचे हृदयंगम चित्र या काल्पनिक चाळीच्या दृश्यात दिसेल. स. गं. मालशे आणि अ. गं. मंगरूळकर यांच्या लेखांची भूमिका मुख्यतः साहित्य-विषयक पृथक्करणाची आहे. सावरकरांच्या वक्तृत्वाच्या सर्व खाचाखोचा, युक्त्याप्रयुक्त्या. ध्येयधोरणे मालशांनी रंगदार रीतीने, उदाहरणांनी आणि भावनात्मकतेने फुलवून, पटवून दिली आहेत, आणि मंगरूळकरांनी रामचंद्र आणि सीता यांच्या परस्परांतल्या नात्यांचे, संबंधांचे त्यांच्या जीवनातील भव्योदात्त घटनांच्या आधारे विश्लेषण केले आहे. तसेच, राम आणि सीता यांना जवळून पाहण्याचा, त्यांच्या मनोरचनेत डोकावण्याचा, त्यांच्या कृती सहृदय-तेने 'समजून' घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तो करताना कुशलव, वाल्मीकी या सभोवारच्या व्यक्तींचादेखील शोधबोध त्यांत घेतला आहे, आणि सर्वत्र भावना-त्मक समतानता अवलंबिली आहे; शेवटी 'दोन परित्यागा'ची कल्पना चालवून

त्यागाचे कारुण्य, उदात्तत्व, दुःख, जीवनातील पेच आणि विरोधदर्शन यांचे विचारमग्न करून सोडणारे मार्मिक चित्र उभे केले आहे.

येथवर ' साहित्य-चिंतामणी 'तल्या लेखांचा जो मागोवा घेतला, त्याने मराठीत आधुनिक गद्यात किती भिन्नभिन्न प्रवाह आणि स्वरूपे आहेत, याची स्थूल कल्पना येईल. निबंधच खरा, पण त्याचे स्वरूप कालगतीने आणि बहुविध रीतींनी कसे ललित, तरल आणि सूक्ष्म होत गेले आहे, हे दिसून येईल.

अगदी अलीकडच्या काळात मराठीत लघुनिबंधाची जी वाढ होत गेली आहे तिचेही आकलन व्हावे, म्हणून फडके, खांडेकर, काणेकर, शकुंतला परांजपे, इरावती कर्वे, भगवंत देशमुख यांचे ललित स्वरूपाचे मनोवेधक निबंध अखेरीस समाविष्ट केलेले आहेत. या सर्वांचीच शैली खेळकर आणि साधीसोपी असली, तरी त्यांत कर्वे यांचा लेख आशयाच्या दृष्टीने पुष्कळच गंभीर आणि आत्मशोध घेण्याच्या भूमिकेत असल्याने फार सूक्ष्म बनला आहे. लेखिकेचे मन किती तरल आहे, किती आत्मसंशोधनपर आहे, हे त्यात स्पष्ट दिसते, आणि हे सर्व आपल्याला तिच्या अगदी साध्या-सुगम भाषेने जाणवते, हे विशेष. त्यामुळे शुद्ध विचारांचा मेळाच आपल्या प्रत्ययाला येतो. शिवाय, त्यात कोणाला काही शिकविण्याचा बिलकुल प्रयत्न नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. किंबहुना, वरील सर्वच लेखकांच्या बाबतीत हे लागू आहे, असे म्हणता येण्याजोगे आहे. या वाङ्मयप्रकारात ललितलेखक स्वतःच स्वतःच्या मनाचा धारकाईने कानोसा घेत असतो. हा कानोसा त्याचा त्यालाच कधी रंजक तर कधी उद्बोधक वाटतो आणि मग त्या-त्या स्वरूपाने आणि रीतीने तो प्रकट होतो.

' साहित्य-चिंतामणी 'च्या सर्वसाधारण स्वरूपाचे हे स्थूल दर्शन झाले. त्यातील लेख वाचताना आणखीही अनेक गोष्टी विद्यार्थ्यांच्या ध्यानी येतील, आणि त्यांची या विषयातली पूर्वसिद्धता योग्य प्रकारे होईल. मात्र हा आधुनिक मराठी गद्यवाङ्मयाचा एक लहानसा छेद आहे, समग्र स्वरूप अथवा व्यापक दर्शन नाही, आणि त्याच दृष्टीने याकडे पाहाणे इष्ट होईल.

महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणे–३० | अरविंद मंगरूळकर
दि. १ ऑगस्ट, १९६४ | भीमराव कुलकर्णी

# महाभारत

बाळ गंगाधर टिळक

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित्

देशातील थोर प्राचीन ऐतिहासिक पुरुषांचे उदात्त चरित्र लोकांस सांगून त्यांच्या वंशजांत शौर्य, अभिमान, सत्यनिष्ठा, धर्मबुद्धी वगैरे अनेक सद्गुण जागृत करणारे प्राचीन काव्य जेथे-जेथे उपलब्ध आहे, तेथे-तेथे ते राष्ट्रीयत्वाचे प्रधान अंग मानले गेले आहे. होमरचे इलियड हे एक पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये अशा प्रकारचे काव्य समजतात; परंतु खरे म्हटले म्हणजे जुन्या ग्रीस देशातील लोकांना जी त्याची किंमत होती, ती हल्लीच्या युरोपातील ख्रिस्तधर्मीय राष्ट्रांस राहिली नाही. जुन्या रोमन लोकांमध्येही इलियड हे काव्य ह्याच वर्गातले मानीत असत. राष्ट्राचा अभ्युदय होण्यास अनेक कारणे लागतात, हे निर्विवाद आहे. पण राष्ट्रातील सर्व लोकांस एकसमयावच्छेदेकरून आनंद, ज्ञान, ईर्ष्या किंवा उत्साह देणारे प्राचीन महाकाव्यासारखे दुसरे साधन मिळणे कठीण आहे. अशा काव्यास इंग्रजीत 'एपिक' काव्य असे म्हणतात. 'एपिक' या इंग्रजी शब्दाचे रसप्रधान काव्य किंवा वीरकाव्य असे कित्येक भाषांतर करतात; पण आमच्या मते हे भाषांतर बरोबर नाही. जुना संप्रदाय पाहिला असता अशा प्रकारच्या ग्रंथास 'महाकाव्य' अशीच संज्ञा दिलेली आहे आणि कालिदासादिक कवींनी केलेल्या काव्यांपासून त्याचा भेद दाखविण्याकरिता त्याच्या मागे 'आर्ष' हे विशेषण लावलेले आढळते. आर्ष महाकाव्यात कोणकोणते गुण असावेत, ह्याबद्दल पुढे विवेचन येईलच. सध्या एवढेच सांगणे आहे की, इंग्रजीत ज्यास 'एपिक' काव्य म्हणतात, त्याचा अर्थ संस्कृतात अगर मराठीत 'आर्ष महाकाव्य' या

शब्दांनीच चांगला व्यक्त होतो; इतकेच नव्हे, तर ही संज्ञा प्राचीन असल्यामुळे रामायण किंवा महाभारत ही जी आर्य लोकांची दोन मोठी 'एपिक' काव्ये आहेत, त्यांस ती अधिक अन्वर्थक रितीने लागू पडते. खुद्द महाभारतात पहिल्या अध्यायातच 'यश्चैनं शृणुयान्नित्यम् आर्षंश्रद्धासमन्वितः' असा आर्ष या पदाने महाभारताचा उल्लेख केलेला आहे व वाल्मीकीनेही अशाच रितीने आपल्या काव्यास 'आर्ष' म्हटले आहे. हरिवंशात जेथे महाभारताचे वर्णन आले आहे, तेथेही 'इदं महाकाव्यम् ऋषेर्महात्मनः' अशी पदे आहेत. यावरून आमच्या देशातील महाभारत आणि रामायण ही जी दोन राष्ट्रीय महाकाव्ये त्यांस पहिल्यापासून 'आर्ष महाकाव्य' म्हणण्याचा परिपाठ आहे, असे दिसून येते व हाच परिपाठ कायम ठेवून 'एपिक पोएम' या इंग्रजी शब्दांकरिता 'आर्ष महाकाव्य' हा शब्द आम्ही या लेखात वापरणार आहोत.

'एपिक पोएट्री' या अर्थी मराठीत किंवा संस्कृतात कोणता शब्द योजावा, हा विचार आज सुचवण्याचे कारण ग्वाल्हेर संस्थानाचे चीफ जज्ज रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य, एम. ए., एल्एल. बी. यांनी नुकतेच प्रसिद्ध केलेले 'Mahabharata, a Criticism' किंवा 'महाभारताचे परीक्षण' हे पुस्तक होय. ज्याने महाभारत ऐकले नाही, तो कितीही विद्वान असला तरी फुकट, असा खुद्द महाभारतात श्लोक आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे जे चार पुरुषार्थ आमच्या शास्त्रकर्त्यांनी सांगितले आहेत, त्या सर्वांचे विवेचन महाभारतात आहे. महाभारतात आहे, ते इतर ठिकाणी आहे; पण महाभारतात नाही, ते कोठेही नाही, अशी जी व्यासांची प्रतिज्ञा आहे, ती शिरोलेखात नमूद केलेलीच आहे. महाभारत हा ग्रंथ पुण्य आहे, पवित्र आहे, नाना प्रकारच्या प्राचीन अद्भुत कथांनी, ऐतिहासिक गोष्टींनी, शूर आणि धर्मनिष्ठ पुरुषांच्या चरित्रांनी भरलेला आहे. त्यात नीती आहे, धर्म आहे व व्यवहारात प्रत्येक मनुष्यास जे अनेक तऱ्हेचे प्रसंग येतात, त्यांचे त्यात वर्णन असून त्या प्रसंगी प्रत्येकाने आपले वर्तन कसे ठेवावे, याचाही सशास्त्र विचार त्यात केलेला आहे. प्राचीन भूगोल, प्राचीन तत्त्वज्ञान आणि धर्माचे रहस्य ही सर्व त्यात प्रसंगानुरोधाने गोविली आहेत. त्यात चातुर्वर्ण्याची हकीगत आहे, समाजव्यवस्था आहे, युद्धकला आहे; किंबहुना, 'यच्चापि सर्वगं वस्तु तच्चापि प्रतिपादितम्' असे महाभारताच्या आरंभीच या ग्रंथाचे वर्णन

दिलेले आहे. अशा प्रकारचा सर्वांगसुंदर आणि सर्वोपजीव्य झालेला दुसरा ग्रंथ संस्कृत वाङ्मयात काय, पण इतर देशांच्याही वाङ्मयात आढळत नाही. महाभारत म्हटले, म्हणजे भारतवर्षांतील लोकांचे जीवित होय. कारण आर्य-धर्मांतील आचारविचारांची सर्व मूलतत्त्वे यात ग्रथित केलेली आहेत. अशा प्रकारचा ग्रंथ हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतील सर्व लोकांस प्रिय होऊन त्याची निरनिराळ्या प्राकृत भाषांत शेकडो भाषांतरे झाली असल्यास त्यात काही नवल नाही. हिमालयापासून सेतुबंधापर्यंत निरनिराळ्या प्रांतांतील हिंदू लोकांच्या आचारात किंवा विचारात जे काही साम्य आहे, ते महाभारत किंवा रामायण या आर्ष महाकाव्यांमुळेच उत्पन्न झाले आहे व आजमितीस जागृत आहे. बंगाल्यात जा, काश्मिरात जा, किंवा मद्रासेत जा, रामायण-महाभारतातील कथा, उपकथा किंवा आख्याने ही लोकांस सारखीच आवडतात व त्यांच्या श्रवणाने एकसारखेच विचार त्यांच्या मनात उत्पन्न होऊन भरतभूमीच्या राष्ट्रीय ऐक्याची साक्ष देतात. एकछत्री इंग्रजी राज्य या देशात झाल्याने निरनिराळ्या प्रांतांतील लोकांस आपण एकाच राष्ट्राचे अवयव आहो, अशी नवीन कल्पना येऊ लागली आहे, असे कित्येकांचे म्हणणे आहे. राजकीय दृष्टीने पाहिले, तर या म्हणण्यात बराच अर्थ आहे, नाही असे नाही; पण वाल्मीकी आणि व्यास या दोन महर्षींनी आचार, नीती आणि धर्म या बाबतीत भारतवर्षांतील लोकांस आपल्या अनुपम महाकाव्यांनी जे वळण लावून दिले आहे, किंबहुना चारी पुरुषार्थी-संबंधाने या देशातील आर्यधर्मी लोकांवर जे एक प्रकारचे साम्राज्य स्थापित केले आहे, ते नसते तर इंग्रजी साम्राज्याचा वर जो परिणाम सांगितला तो घडून आला असता की नाही, याची वानवाच आहे. रामायण आणि महा-भारत यांची ही योग्यता आज आम्ही नवीन सांगतो असे नाही. व्यासांनी ब्रह्मदेवास आपल्या काव्याचे वर्णन देऊन ' परं न लेखकः कश्चिद् एतस्य भुवि विद्यते । ' अशी जेव्हा प्रार्थना केली आणि ब्रह्मदेवाने ' या काव्याचा लेखक होण्यास गणपतीस पाचारण कर, ' असे सांगितले व पुढे श्रीगजानन, ' माझी लेखणी न थांबेल अशा रितीने भारत सांगितले असता ते मी लिहीन, ' अशी अट ठेवून लेखक झाले, तेव्हापासून आतापर्यंत या ग्रंथाचे महत्त्व एकसारखेच चालू आहे. अनेक संस्कृत कवींनी हे काव्य आधारभूत घेऊन त्यातील रत्नांस

पैलू पाहून किंवा ती निराळ्या कोंदणांत बसवून स्वतः स्वतंत्र काव्यरचनेचे श्रेय संपादन केले आहे. त्याचप्रमाणे कित्येकांनी आजवर टीका करून किंवा सामान्य जनांस समजेल, अशा प्राकृत भाषेत त्याचे रूपांतर करून आपणांस कृतार्थ करून घेतले आहे; आणि पुराणिकांनी आपणांस नव्हे, तर हिंदुस्थानातील आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस त्या महाग्रंथाच्या श्रवणाने पुनीत करण्याचा क्रम हा ग्रंथ निर्माण झाल्यापासून अव्याहत चालू ठेवला आहे. हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गामध्ये या ग्रंथाच्या अध्ययनाची किंवा श्रवणाची परंपरा कमी होण्यास जर केव्हा सुरुवात झाली असली, तर ती इंग्रजी राज्यात इंग्रजी शिक्षणाने व्हावयास लागली होती किंवा होण्याचा संभव होता; परंतु ही भीती बाळगण्यास आता फारसे कारण राहिले नाही, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. इंग्रजी शिकलेल्या लोकांपैकी पुष्कळांस राष्ट्रीय महाकाव्याचे महत्त्व समजू लागले आहे. देश विपन्न स्थितीत आला असता या ग्रंथाच्या अध्ययनाने किंवा श्रवणाने कोणत्या प्रकारचे स्फुरण अधिकारी पुरुषांच्या अंगात उद्भवते, हे शिवाजीमहाराजांच्या उदाहरणावरून शाळेतील विद्यार्थ्यांसही माहीत झाले आहे. सारांश, हा राष्ट्रीय ग्रंथ आहे आणि हा आधार सुटला असता राष्ट्राच्या पुढील प्रगतीस जे एक प्रकारचे वैशिष्ट्य प्राप्त व्हावयास पाहिजे, ते प्राप्त व्हावयाचे नाही, असा चांगल्या विद्वानांचा समज झाला आहे. महाभारताची इंग्रजीत किंवा मराठीसारख्या प्राकृत भाषेतही हल्ली जी भाषांतरे होत आहेत, त्यांतील बीजही हेच होय. भगवद्गीतेचे अध्ययनही इंग्रजी शिकलेल्या लोकांत अलीकडे जे अधिक होत चालले आहे, तेही वर सांगितलेल्या विचारसरणीचेच द्योतक होय; परंतु आजपर्यंत इंग्रजी शिकलेल्या विद्वानांपैकी महाभारताचे नवीन पद्धतीने परीक्षण करून थोडक्यात त्यातील रहस्य काय, त्याचे महत्त्व कशात आहे, ते कोणी व केव्हा लिहिले, किंवा अशा प्रकारचे महाकाव्य लिहिण्यास काय कारण झाले, त्यातील कथेमधील सरस भाग कोणते, ही कथा ऐतिहासिक आहे का काल्पनिक आहे, ऐतिहासिक असल्यास या कथेतील पुरुष भरतभूमीत केव्हा अवतीर्ण झाले, इत्यादी गोष्टींचे पद्धतशीर विवेचन कोणीच केलेले नव्हते. संस्कृत वाङ्मयाचा इतिहास लिहिणारे युरोपियन ग्रंथकार, म्याक्समुलर, वेबर, म्याक्डोनेल यांनी आपल्या ग्रंथांत महाभारताचा काळ, त्याची रचना, त्यात सांगितलेली राजकीय

व सामाजिक स्थिती आणि त्यातील इतिहास यांसंबंधाने अनेक विचार नमूद केलेले आहेत; पण संस्कृत वाङ्मयातील सर्व ग्रंथांचे, म्हणजे वेदांपासून तो तहत पुराणे, शास्त्रे, काव्ये, नाटके इत्यादी सर्व ग्रंथांचे सामान्य रीत्या पर्यालोचन करण्याची या ग्रंथकारांची उमेद असल्यामुळे त्यांनी महाभारता-संबंधाने जे विचार प्रकट केले आहेत, ते भारत साग्र वाचून केलेले नसून केवळ त्याचे वरवर अवलोकन केल्याने ज्या गोष्टी नजरेस आल्या, तेवढ्यावरून केलेले आहेत. उदाहरणार्थ, कित्येकांची पहिल्याने अशी समजूत झाली होती की, महाभारत हा ग्रंथ खिस्ती शकाच्या पाचव्या-सहाव्या शतकात झाला असावा; निदान त्याला महाभारतात हे स्वरूप तरी या सुमारास मिळाले असावे; पण अलीकडे सापडलेल्या शिलालेखांमुळे आणि जावा बेटात उपलब्ध झालेल्या महाभारताच्या भाषांतरामुळे अशा प्रकारच्या स्वैर विचारांस हल्ली बराच आळा पडत चालला आहे. प्रो. ल्यासेन यांनी तर असे मत काढले होते की, ज्या अर्थी शतपथ-ब्राह्मणात किंवा तत्कालीन इतर ग्रंथांत जनमेजयाचा उल्लेख सापडतो, आणि युधिष्ठिरादिकांचा सापडत नाही, त्या अर्थी कौरवपांडव हे ऐतिहासिक पुरुष नसून यांची कथा कोणी तरी काल्पनिक रचून त्यावर महाभारत हे महाकाव्य पुढे केले असावे ! दुसरा एक विद्वान असे म्हणतो की, भारतीय युद्ध कौरव-पांडव यांच्यांत झालेले नसून कुरू आणि पांचाल देशांतील राजे यांच्यांमध्ये झाले आणि त्यात पांचाल देशातील सेनेचे नायकत्व मात्र पांडवांकडे होते. अशा प्रकारे या ग्रंथासंबंधाने एक ना-दोन अनेक कल्पना पाश्चिमात्य विद्वानांनी काढलेल्या आहेत. या खऱ्या किंवा खोट्या, खऱ्या असल्यास त्यांत सत्यांश किती, आणि खोट्या असल्यास त्या खोट्या कशा, याचे अलीकडे उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक साधनांनी सशास्त्र परीक्षण करून, आमच्या देशातील राष्ट्रीय महाग्रंथाचे खरे स्वरूप लोकांपुढे मांडणे किंवा खऱ्या स्वरूपाचा विपर्यास होत असल्यास त्याचे निरसन करून शुद्ध स्वरूप लोकांच्या निदर्शनास आणून देणे हे देशातील सुशिक्षित पुरुषांचे कर्तव्य होय. पाश्चिमात्य विद्वानांनी यासंबंधाने कितीही लिहिले, तरी आपल्या ग्रंथांचा आम्ही होऊनच स्वतंत्रपणे विचार केल्याखेरीज त्यांतील तथ्य आम्हांस समजावयाचे नाही. महाभारताचा आजपर्यंत कोणीच विचार केला नाही, असे नाही. वर सांगितलेच आहे की, हा ग्रंथ निर्माण झाल्यापासून आतापर्यंत हिंदुस्थानातील कवी

धर्मशास्त्री, विद्वान किंवा सामान्य जन या सर्वांचे या ग्रंथाकडे लक्ष लागलेले आहे. परंतु पाश्चिमात्य शिक्षणाने किंवा शोधांनी जी एक विचक्षणता प्राप्त होते, त्या विचक्षणतेने या ग्रंथाचे परीक्षण आमच्यापैकी कोणी तरी पुनः करावयास पाहिजे होते. अशा परीक्षणाने ग्रंथाच्या महत्त्वाची हानी होईल, अशी जर कोणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. जगन्नाथाच्या मूर्तीवर किंवा रणजितसिंगाच्या मुकुटात कोहिनूर हिरा जितका देदीप्यमान दिसत होता, तितकाच आज तो एडवर्ड बादशहाच्या मुकुटात शोभायमान होत आहे. महाभारताची गोष्ट अशाच प्रकारची आहे. त्यातील कथानकांचे, आख्यानांचे, विषयांचे आणि इतिहासाचे महत्त्व सदर ग्रंथ नव्या कसोटीस लावण्याने कमी होईल, अशी आम्हांला बिलकूल भीती वाटत नाही. व्यासांनी जी ही देणगी आम्हांस देऊन ठेवली आहे, ती चिरकाल टिकणारी आहे; आम्ही मात्र त्या देणगीचे स्वरूप न विसरता तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. सारांश, महाभारतासारख्या राष्ट्रीय ग्रंथावर पाश्चिमात्यांचे जे काही आक्षेप असतील किंवा शंका असतील, यांचे समाधान करून या ग्रंथाचे खरे स्वरूप आमच्या लोकांपुढे मांडणे हे काम आमचे आम्हीच केले पाहिजे. रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य यांनी हल्ली जो ग्रंथ लिहिला आहे, तो अशाच प्रकारचा आहे व म्हणूनच त्याबद्दल आम्ही यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. महाभारत ग्रंथाचे अध्ययन इंग्रजी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडून व्हावे, म्हणून ॲनी बेझंटबाईंनी हिंदू कॉलेजातील विद्यार्थ्यांकरिता भारतातील कथा संक्षिप्त रितीने इंग्रजीत प्रसिद्ध केलेली आहे; परंतु या ग्रंथात महाभारताचे काव्य या नात्याने परीक्षण किंवा ल्यासेन, वेबर वगैरे पाश्चिमात्य ग्रंथकारांचे खंडन नसून विद्यार्थ्यांकरिता केवळ कथाभागच मनोवेधक रितीने दिला आहे. रावबहादूर यांचा ग्रंथ जरी बेझंट-बाईंच्या ग्रंथाएवढा असला, तरी त्यात महाभारताचे निरनिराळ्या दृष्टींनी परीक्षण केलेले आहे. महाभारत यास ‘ आर्ष महाकाव्य ’ का म्हणावे, आर्ष महाकाव्याचे लक्षण काय, त्यात जे गुण असावयास पाहिजेत, ते महाभारतात आहेत की नाहीत, महाभारताची ग्रंथरचना कशी झाली, म्हणजे एकट्याने हा ग्रंथ लिहिला किंवा निरनिराळ्या ग्रंथकारांनी मूळच्या भारतात उपाख्याने ढकलून त्याचे महाभारत केले, ह्या गोष्टी केव्हा घडल्या, पांडव हे ऐतिहासिक पुरुष होते किंवा नाही, ग्रंथाचा काल कोणता, युद्धाचा काल कोणता वगैरे

प्रश्नांचा रावबहादूर वैद्य यांनी आपल्या ग्रंथात थोडक्यात पण व्यवस्थित विचार केलेला आहे. इतकेच नव्हे, तर आपल्या पुस्तकाच्या उत्तरार्धात त्यांनी भारतीय कथेचा जो संक्षिप्त इतिहास दिला आहे, तोही अत्यंत सरस आणि चटकदार लिहिला गेला आहे. भारतातील विस्तीर्ण कथेचा अशा सरस रितीने संक्षेप करणे हे काम काही कमी परिश्रमाचे किंवा विद्वत्तेचे आहे, असे नाही. कथेमध्ये सरस वस्तू कोणती, हे समजण्यास संक्षेपकाराच्या अंगी एक प्रकारची विशिष्ट रसज्ञता किंवा मार्मिकता लागत असते व ती रावबहादूर वैद्य यांच्या अंगी पूर्णपणे आहे, असे त्यांच्या हल्लीच्या ग्रंथावरून व त्यांनी केलेल्या संक्षिप्त भारतावरून स्पष्ट दिसून येते, व ह्याचकरिता तरुण पिढीतील विद्यार्थ्यांनी रावबहादूर वैद्य ह्यांचे हे ग्रंथ अवश्य वाचावेत, अशी आमची शिफारस आहे. लक्षपूर्वक समग्र महाभारत वाचून त्याचे नवीन पद्धतीने परीक्षण ज्यात केले आहे, असा आमच्या-कडील विद्वानांनी लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ होय. त्यातील काही गोष्टींसंबंधाने आमचा व ग्रंथकाराचा मतभेद असला, तरी अशा प्रकारचा ग्रंथ रावबहादूर वैद्य यांनी प्रसिद्ध केला, याबद्दल सर्वांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करणे जरूर आहे.

# मातीचे भांडे

**वासुदेवशास्त्री खरे**

मराठ्यांशी पहिले युद्ध सुरू झाल्यानंतरच्या वर्ष-सहा महिन्यांच्या अवधीत इंग्रजांनी जे लेख लिहिले आहेत, त्यांत मराठ्यांचे राज्य केवढे, त्यांची फौज किती, छत्रपती, पेशवे, भोसले, गायकवाड, शिंदे, होळकर यांत तारतम्याने कोणाचे महत्त्व किती, त्यांचे परस्परसंबंध कोणते, त्यांची घरगुती भांडणे कशाबद्दलची, कोणास काय मिळाले असता तो आपणांस अनुकूल होण्याचा संभव आहे, इत्यादी तपशीलवार माहिती बहुधा बिनचूक लिहिलेली आढळते; पण याचे आश्चर्य मानण्याचे काही कारण नाही; कारण यापूर्वी पुष्कळ दिवसांपासून या हिंदुस्थान देशाचे राज्य हप्त्याहप्त्याने आमच्या पदरात पडणार आहे, अशी सुखस्वप्ने इंग्रजांना पडू लागली होती! त्यांतल्या कर्त्या माणसांचे चिंतन याच विषयावर नेहमी चाललेले होते. एक पुस्तक आम्ही पाहिलेले आहे. ते एका इंग्रजाने अठराव्या शतकात लिहिलेले आहे. त्याचा विषय हिंदुस्थानचे राज्य कसे घ्यावे, हाच आहे! अर्थात या विषयावर त्या काळात दुसरी पुष्कळ पुस्तके, निबंध व टिपणे वगैरे लिहिलेली असतीलच. ह्या वेळी या देशात मिशनऱ्यांचा फैलाव नव्हता; परंतु फिरस्ते व व्यापारी इंग्रज शेकडो होते. ते प्रत्येक प्रांतात फिरत. त्यांनी लिहून ठेवलेल्या प्रवासवर्णनांत शहरे, किल्ले, मार्ग, लोकरिवाज, स्थानिक राजकारणे, सर्व काही बारीकसारीक माहिती आस्थेने लिहून ठेवलेली असे, व ती कंपनी सरकारच्या उपयोगी पडे. काही तरी निमित्त काढून लष्करी अम्मलदार प्रवास करीत, तेव्हा मिलिटरी खात्याच्या उपयोगाची माहिती गोळा करीत व मोठमोठ्या देशी राजांच्या दरबारांतून जे इंग्रज वकील होते, ते राजकारणाची सर्व माहिती मुख्याधिकाऱ्यांकडे लिहून पाठवीत. इंग्रज लोक शोधकबुद्धीचे आहेत व विद्यार्जनाचा त्यांचा

हव्यास दांडगा आहे. वेद, शास्त्रे, स्मृती, पुराणे वगैरे ग्रंथांची सर्व माहिती त्यांनी हिंदुस्थानचे अधिराज्य मिळविण्याआधीच गोळा केली होती ! पेशवाईच्या अखेरपर्यंत सर्व बाजूंचे ज्ञान संपादन करण्याचा त्यांचा उद्योग एकसारखा सुरू होता. सन १८०३ साली नॉक्स या नावाचा इंग्रज म्हैसुराहून पुण्यास जात असता मिरजेस थोडा वेळ मुक्काम करून राहिला होता; पण तितक्याही धांदलीत त्याने मिरजेच्या जहागिरदारास पत्र लिहिले की, " तुम्हांस जहागीर कधी, कोणी दिली, तिचे उत्पन्न किती, तुमच्या घराण्यातल्या लोकांनी पेशवे सरकारच्या कोणकोणत्या कामगिऱ्या केल्या, या सर्व गोष्टींची मेहरबानीने तवारीख लिहून द्याल, तर मी आभारी होईन ! "

अशा तरतरीत चौकस स्वभावाच्या इंग्रज लोकांशी लढण्याची मराठ्यांवर पाळी आली; पण त्यांस या इंग्रज लोकांविषयी काहीच माहिती नव्हती ! या लोकांचा मूळ देश कोणता, हे येथे कशाकरिता आले, त्यांची पहिली वसाहत कोठची, मागून कोणकोणत्या बंदरांत त्यांनी वसाहती केल्या, यांचा स्वभाव, गुणदोष कोणते, यांची राज्यव्यवस्था व सैन्यव्यस्था कशी, यांचे सैन्यबल व द्रव्यबल किती, इत्यादी मुद्द्यांची माहिती मराठी मुत्सद्द्यांनी व सरदारांनी अवश्य मिळवावयास पाहिजे होती.

परंतु आमच्या आळसामुळे व हलगर्जीपणामुळे आमच्या राजकारणाचे हे अंग नेहमी लुळे पडे. एकट्या नानाने मात्र इंग्रजांविषयी काही सटरफटर माहिती गोळा केली होती व तो बातमी फार चांगली राखीत होता, असे त्याच्या लेखांवरून दिसते. एरवी पाहावे, तो चोहोकडे गाढ निद्राच लागलेली होती ! हे इंग्रज लोक किती आहेत व कोठून येतात, हे ठाऊक नसल्यामुळे त्यांची दहशत मराठ्यांच्या मनांवर उगीचच्या-उगीच बसली होती ! इंग्रजांशी लढाई सुरू असता बातम्या येऊ लागल्या की, इंग्रज मुंबईकडून आले, त्यांचा गुजराथेत धुमाकूळ चालू आहे. काही मद्रासेकडून जलमार्गाने येत आहेत, काही हैदराशी लढत आहेत, काही यमुना उतरून काल्पीवर चालून येत आहेत ! अशा चोहोंकडच्या बातम्यांनी भांबावून गेलेला एक सरदार त्रासून लिहितो की, हे शिंदळीचे आहेत तरी किती ! जेथे-तेथे तेच उद्भवतात, हे काय आहे न कळे ! अशा बिकट परिस्थितीतसुद्धा नानाने इंग्रजांच्या कारस्थानावर ताण करून त्यांस हातटेकीस आणले; तह करण्याविषयी त्यांनी मराठ्यांची

आर्जवे करू लागावे, अशी स्थिती उत्पन्न केली, याबद्दल त्याची वाहवा होत असते, ते योग्यच आहे. साल्बाईच्या तहात इंग्रजांस साष्टीचा टापू मिळाला, हा काही त्यांनी पाचसात वर्षे मोठे नुकसान सोसून चालविलेल्या युद्धाचा योग्य मोबदला नव्हे !

साल्बाईच्या तहानंतर पेशवाईच्या अखेरपर्यंत इंग्रज व मराठे यांचे राजकारणाचे सामने पुष्कळ वेळा झाले व लढायाही पुष्कळ झाल्या. ह्यात जे वैगुण्य मराठ्यांस जाचत असे ते हेच की, त्यांस इंग्रजांची काही-एक बातमी कळत नसे ! घरभेद्ये हे केव्हाही कोठेही झाले तरी असायचेच; पण पेशवाईत त्यांचा सुळसुळाट फारच झाला होता ! मराठी फौजांचे बेत व हालचाली नेमक्या इंग्रजांस कळाव्या, व त्यांची बातमी मात्र यांस काहीच कळू नये, असे नेहमी होत असे ! इंग्रजांच्या जातीचा एकही घरभेद्या मराठ्यांस कधी भेटू नये, हे केवढे आश्चर्य आहे ! इंग्रजांची राहणी व भाषा निराळी, त्यांचे रिवाज व शिस्त निराळी, ते कारणाशिवाय आम्हांशी बोलतसुद्धा नाहीत, मग आम्हांशी मिळून-मिसळून वागावयाचे दूरच राहिले ! त्यांच्या अंगी जात्यभिमानाचा ताठा असल्यामुळे हिंदी लोकांशी फटकून वागणेच त्यांना आवडते. त्यामुळे त्यांचे बेत, बातम्या सर्व काही त्यांचे त्यांच्यांत राहते, बाहेर फुटत नाही. त्यांची कोणतीही बातमी मराठ्यांस न कळण्याचे मुख्य कारण हेच होय; पण याबरोबरच त्यांच्या संबंधाच्या खोट्या बातम्या पसरण्यास हा इंग्रजांचा एकलकोंडेपणा कारण होतो, हेही लक्षात ठेवले पाहिजे ! शिंदे व भोसले यांचा पराभव झाला, तरी यशवंतराव होळकरांच्या पराक्रमावर मराठ्यांचा फार विश्वास होता. त्यामुळे होळकरांचे व इंग्रजांचे युद्ध जुंपले, तेव्हा होळकरांची जागोजाग फत्ते झाल्याच्या बातम्या पुण्याच्या बाजारात नेहमी पसरत होत्या ! या बातम्यांत अतिशयोक्ती व विसंगतपणा फार असे व उत्तर हिंदुस्थानातून पत्रे येत, त्यांत त्या लिहिलेल्या असत. खुद्द पुण्यातल्या पुण्यात ज्या बातम्या उठत त्यांतल्याही काही-काही फारच विचित्र असत ! उदाहरणार्थ, पुढील मासला पहा :— “ होळकरानें गोरे लोक धरले, त्यांपैकीं तीनशें लोक कापून सोडून दिले. त्यांतले दोनशें येथें पुण्यांत आले. तेव्हां येथल्या इंग्रजांनीं त्यांस सोडून विलायतेस रवाना करण्याकरितां मुंबईस पाठविले. हे नकटे विलायतेस जातील, तर आपली इज्जत जाईल व आपणांस शिक्षा होईल या भयानें मुंबईवाल्यांनीं

त्या लोकांस गलबतात घालून समुद्रांत नेऊन बुडविले...!!"

असल्या बातम्यांवर विचारी माणसांचा विश्वास बसणे दुर्घट होते. पण सामान्य लोकांस मात्र त्या खऱ्या भासत असल्या पाहिजेत, असे वाटते. होळकराच्या लढाईत इंग्रज फार जेर झाले असून संकटात पडले आहेत, अशी बातमी पटवर्धनांचा वकील पुण्यास होता, तो नेहमी त्यांस लिहून पाठवी. एका पत्रात, "डाकेबरोबर सावकारी वर्त्तमान आलें. अश्वदल ( होळकर ) याची प्रबलता. जलचर ( इंग्रज ) पेंचांत आहे ऐसें लिहिलें आहे. यांची पत्रें छ. ९ साबातचीं आलीं त्यांत वर्त्तमान लिहिलें आहे. अति बलवत्ता अश्वदलाची लिहिली आहे. लील (Lord Lake) साहेबाचीं पलटणें बुडविलीं; दहाबारा पलटने घेऊन यमुनापार लखनौकडे जात होता. त्या सभोंवती घेरा पडला", असे लिहिले आहे. इतके लिहून सदरहू वकील इंग्रजांच्या घरी शोध घेऊन तेथील बातमी प्रत्यंतरादाखल लिहितो ती अशी : "छ. १६ रमजानी इंग्रजांकडील डाक आली. जेवावयाला जात होते. इतकियात डाक येऊन दाखल झाली. सबब तीन चार आसामी खुरशीवर बसोन डाकेचे तीन फर्द पाहिलेवर डोईची टोपी काढून भूमीवर आपटली. नेत्राश्रुपतन करूं लागले. चौकीदार वगैरे होते त्यांस दूर दूर उभे केले. सारेजण जमा होऊन खुरशांवर बसोन कौशल होऊन नंतर एक इंग्रजानें एक अधिकारियास हातीं धरून उठविले." वकिलाने कोणा बुटलेरास शेपन्नास रुपये देऊन इंग्रजांच्या घरची म्हणून विकत घेतलेली ही बातमी आपल्या धन्यास लिहून कळविली. तिने त्या धन्याचे कितपत समाधान झाले असेल, हे जाणणे आम्ही वाचकांवरच सोपवितो!

आमचा पुणे-सातारा इंग्रजांनी का घेतला आणि त्यांचा मद्रास-कलकत्ता आम्ही का घेऊ शकलो नाही, याचा संक्षेपाने येथपर्यंत विचार केला. देशाभिमानशून्यता, समूहरूपाने काम करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय इत्यादी दुर्गुण आपल्या समाजाच्या अंगी जे खिळले आहेत, तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्त्य राष्ट्राशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतले नसते, तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता त्यातले कोणते फुटावयाचे

मातीचे का लोखंडाचे, हे ठरलेलेच आहे ! हल्लीचा काळ असा आला आहे की, आम्ही पाश्चात्त्यांची बरोबरी करावी, नाही तर त्यांचे मजूर होऊन राहावे ! राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टीत हीच स्थिती आहे. जर आम्हांस पाश्चात्त्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल, तर या लेखात वर्णिलेले आमचे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होते ते या दुर्गुणांमुळे गेले, हे समजून जर आम्ही सावध झालो नाही, तर नवीन स्वराज्य मिळूनसुद्धा व्यर्थच आहे, हाच इतिहासडिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानी घुमत राहिला पाहिजे !

# हे तात्या आणि हे तात्या

अच्युत बळवंत कोल्हटकर

यंदाच्या पुणे येथील साहित्य-संमेलनास उद्यापासून सुरुवात होणार असून त्याची विशेष गोष्ट अशी आहे की, महाराष्ट्रातील दोन तात्या त्यात प्रमुखत्वे-करून चमकणार आहेत. ह्यांपैकी श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर हे साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष आहेत व श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर हे साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत.

तात्या हे नाव महाराष्ट्रात अगदीच अपरिचित नाही. स्वतःच्या मुख्य नावांपेक्षा घरगुती नावाने प्रसिद्ध असणाऱ्या पुरुषांत नाना फडणीस हे प्रमुखच म्हटले पाहिजेत! त्यांच्या घरगुती नावाने ते एवढे प्रसिद्धीला पोचले की, नाना हे त्यांचे मूळ नाव नव्हे, असे कोणाला सांगितले, तर पुष्कळ वेळा ते खरे-देखील वाटत नाही. ह्या नाना फडणिसांच्या कारकीर्दीत व त्यांना अत्यंत साहाय्यभूत असे दुसरे पुरुष म्हणजे हरिपंततात्या फडके झाले! महाराष्ट्राला, अतिशय आवडते असे हे तात्या होते.

**नानांत नाना फडणीस नाना**
**इतर नाना करिती तनाना।**

ह्याप्रमाणे खडबडीत पण व्यावहारिक कवन करून नाना फडणिसांची स्तुती गाणारा ज्या वेळी एक गुणग्राहक निघाला, त्या वेळी तात्यांचाही एक गुणग्राहक त्यांची प्रसिद्धी करायला तयार झाला. त्याने हरिपंततात्यांना उद्देशून म्हटले की

**तात्यांत तात्या हरिपंत तात्या**
**इतर तात्या करिती चपात्या**

आणि हरिपंततात्यांसंबंधाने हे जे म्हणण्यात आले, ते-ते आजतागाईत

श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांच्यासंबंधानेही खरे आहे. मराठीत आजपर्यंत अनेक नाटककार होऊन गेले व पुढेही होतील; पण ह्या सर्व नाटककारांतील श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता अजूनही इतकी अबाधित आहे की, त्यांचेपुढे इतर सर्व नाटककार 'करिती चपात्या' असे म्हटले, तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही!

कै. गडकरी ह्यांनी अलीकडे नाट्यसिंहासनावर उडी मारलेली आहे व राजकीय भाषेत बोलावयाचे, म्हणजे सध्या मराठी नाट्यकला गडकरी-राजवटीत आहे, असे म्हटले तरी चालेल! गडकऱ्यांनी नाट्यकलेत पाऊल टाकले, त्या वेळी किर्लोस्करयुग संपलेले होते. व श्रीपाद कृष्णांचे युग चालू होते. पण गडकऱ्यांनी टिचकीसरशी ते युग बंद केले आणि त्यांच्या जागी आपली शिक्केकट्यार सुरू केली. पण जरी ह्याप्रमाणे गडकऱ्यांची साम्राज्यसत्ता सुरू झाली, वा 'तात्यांच्या नाटकांचा मी सोमवार करीन,' ही गडकऱ्यांच्या तोंडी चिकटविलेली उक्ती खरी झाली, तरी त्यामुळे श्रीपाद कृष्णांच्या श्रेष्ठतेस बाध आला नाही. किंबहुना, ह्या पराभवामुळे श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता जास्तच वाढली! कारण गडकरी हे श्रीपाद कृष्णांचे शिष्य होते. गडकऱ्यांचे युग म्हणजे एक प्रकारे पेशवाईची स्थापना होती. ह्या सत्तास्थापनेमुळे नाट्यराजकारणाचे केंद्र जरी बदलले, तरी गादी कायम राहिली, मुजरा कायम राहिला.

आणि मुजरा कायम राहिल्यामुळेच श्रीपाद कृष्णांचे नाट्याधिष्ठान अजून कायम राहिलेले आहे! गडकरी-पंथाचे ते प्रणेते आहेत,—नावीन्याचे ते नायक आहेत,—विनोदाचे ते विनायक आहेत! त्यांच्याइतका स्वाभाविक परिपोष कुणालाही साधत नाही! डायऱ्या आणि टाचणे ह्यांच्या मुंडावळ्यांशिवाय लिहितालिहिता सहज सुचलेल्या साहित्यसाजाने नाट्यभाषेला सजविणारा भाषासुवर्णकार जर कोणी असेल, तर एकच श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होत!

एवढेच की, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे आज चलनी नाणे (current coin) नाहीत. आजकालचे चलनी नाणे म्हणजे खाडीलकर, वरेरकर, शुक्ल हे होत! श्रीपाद कृष्ण म्हटले, म्हणजे काही तरी जुनी मोहोर आपण वापरीत आहोत, काही तरी जुनी बातमी आपण वाचीत आहोत, असे वाटते. आबासाहेब म्हाळस, विनायक कोंडदेव, भालचंद्र कृष्ण वगैरे शब्द उच्चारल्याबरोबर जसा एकजम जुनेपणाचा भास होतो, त्याप्रमाणे श्रीपाद कृष्ण म्हटले म्हणजे मागे

उलटलेले पृष्ठ ( back page ) आहे, असे आपल्याला वाटते.

पण त्याचे कारण हेच की, तात्यासाहेब हे सध्याच्या जगाशी जितके समरस असायला पाहिजेत, तितके नाहीत! ते एल्‌एल्‌. बी. होऊन वऱ्हाडात शिरले. ते जिथे होते, तेथेच राहिले ! त्यांची सृष्टी म्हणजे तीस वर्षांपूर्वीची सृष्टी ! ह्या तीस वर्षांत जी घडामोड झाली, ती त्यांच्या अंगावरूनही गेली नाही व त्यांना जाणवलीही नाही ! निजकोषात तल्लीन असलेला भ्रमर किंवा निजानंदात निमग्न असलेले परब्रह्म ह्यांना ज्याप्रमाणे जगातील वावटळीचा काहीएक उपसर्ग पोचत नाही, त्याप्रमाणे श्री. तात्यासाहेब हे जगातल्या वावटळी-पासून अलिप्त आहेत !

एवढेच काय, अजून त्यांच्या मनाभोवती ३० वर्षांपासूनची सृष्टी आहे,— तीस वर्षांपूर्वीचेच जग आहे ! त्यांचे संभाषण ऐकले, तरीही पुराणयुगातला हा पुराणपुरुष आहे, असेच वाटते ! अजूनही विधवावपनावर बोलताना ते आपल्या अस्सल कोट्या काढतील व पुनर्विवाहाच्या प्रश्नावरून त्यांचा चेहरा जितका गोरामोरा होईल, तितका असहकारी किंवा प्रतिसहकारी या शब्दांवरून होणार नाही ! त्याबद्दलची फारशी माहितीही त्यांना असणार नाही ! कारण तात्या-साहेबांचा आणि सध्याच्या जगाचा फारसा संबंध नाही. ना. पटेल जेव्हा इकडे बादशहाची मुलाखत घेत असतील त्या वेळी जिन्याच्या पायऱ्या लक्षात राहायची सोपी युक्ती कोणती; ह्याचा विचार तात्यासाहेब करीत असतील, ज्या वेळी कॅाँग्रेसच्या वर्किंग कमिटीने आपल्याला फसविले, म्हणून ऑल इंडियातील माणसे धुसफुसत असतील, त्या वेळी दोन पिढ्यांपूर्वी बाळासाहेब नातूंनी केलेली दंगल आठवून मनात चरफडत असतील की, " हे दुरात्म्या बाळासाहेबा, विविधज्ञानविस्तारात तर चल, म्हणजे तुला दाखवतो ! "

श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब ह्यांची अशी अवस्था होण्याचे कारण म्हणजे त्यांचे खेडेगावातील राहणे ! त्यांना रहायला खेडेगावेही अशी इरसाल मिळाली की, तेथे चालू धामधुमीच्या फारशा लाटा उठूच नयेत ! वऱ्हाडातील अकोला गावी त्यांनी आपला वकिलीचा धंदा सुरू केला व ते अखेरपर्यंत अकोला येथेच असते, तर कदाचित् अप-टु-डेट राहते ! पण त्यांनी लवकरच आपले राहणे तेल्हारे गावी नेले, व पुढे खामगावचा संपर्क होतो न होतो. तोच जळगाव-जामोद येथे राहायला गेले ! अर्थात जळगाव-जामोद म्हणजे

आधुनिक जगातले टिम्बक्टूच ! ते कुठे आहे, म्हणून विचारले तर कुणाला सांगता यायचे नाही ! फक्त केव्हातरी कुठेतरी त्याचे नाव ऐकलेले असायचे !

कुग्रामवासाविषयी एका प्राचीन संस्कृत कवीने आपली नापसंती प्रदर्शित केलेली आहे. ही नापसंती किती सार्थ होती व कुग्रामवासाचे किती शोचनीय परिणाम होतात, ह्याचे ढळढळीत उदाहरण बघावयाचे असल्यास श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब होत ! ते जगाच्या मागे राहिले, ह्याचे कारण ते चालू जगात कधी राहिलेच नाहीत. ध्रुवस्थान ज्याप्रमाणे जगाच्या गाऱ्याभिंगाऱ्यांपासून अलिप्त राहून आपल्या श्रेष्ठ दर्ज्यावर गुपचुप बसलेले असते, त्याप्रमाणे श्री. श्रीपाद कृष्ण हे जनसंमर्दापासून अत्यंत दूर अशा आपल्या श्रेष्ठ स्थानावर बसलेले आहेत. जगात असूनही आपण जगात कसे नाही, ह्याची त्यांना जाणीवही नाही.

दुसरे तात्यासाहेब म्हणजे श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर. ह्यांची गोष्ट ह्याच्या अगदी उलट आहे. ते आधुनिकांतले आधुनिक आहेत. त्यांच्यात जुनेपाने असे काहीच नाही. व्यासंगाच्या अभावामुळे श्री. गंगाधरराव देशपांडे जितके मागे पडले किंवा व्यासंगाच्या एकदेशीयत्वामुळे श्री. शिवरामपंत परांजपे जितके मागे पडले, तितकेही रा. रा. केळकर मागे पडले नाहीत ! ते अगदी आधुनिकांतले आधुनिक आहेत, — "मॉडर्नां"तले "मॉडर्न" आहेत !

ह्याचे एक कारण त्यांची चवकस बुद्धी, व दुसरे कारण त्यांचा वर्तमानपत्राचा व्यवसाय ! चवकस बुद्धी नसली, तर वर्तमानपत्राचा व्यवसाय असूनही खाडील-करांसारखी माणसे जुनीपुराणी होऊ शकतात, आणि वर्तमानपत्रासारखा व्यवसाय किंवा राजकारणाची रोजची उठाठेव नसली, तर चिंतामणराव वैद्यांसारख्या चौकस माणसावरदेखील जुनेपणाची हिरवी छाया पडायला लागते ! पण तात्यासाहेब केळकरांना दोन्ही आहेत ! त्यांच्याजवळ राजकारणाचा रोजचा प्रपंचही आहे व चौकस बुद्धीही आहे, आणि एखाद्या घासलेल्या तरवारीप्रमाणे त्यांची मेंदूची तरतरी चकचक चकाकणारी आहे.

आणि म्हणूनच साहित्यसंमेलनातील दोन तात्यासाहेबांचा संयोग म्हणजे प्राचीन युग आणि अर्वाचीन युग ह्यांचा संयोग आहे ! कृतयुग जर कलियुगाला भेटायला आले, किंवा अश्वत्थामा जर ब्रिटिश पलटणीत उभा राहिला, तर

प्रकारचा संयोग दिसेल, तशा प्रकारचा संयोग ह्या दोन तात्यासाहेबांच्या योगाने साहित्यसंमेलनात दिसणार आहे! कारण श्रीपाद कृष्ण म्हणजे प्राचीन जग आणि नरसोपंत केळकर म्हणजे वर्तमानपत्राचा ताजा अंक! 'मौज' पत्राच्या पहिला पानावर वेद छापावे, किंवा वेदाच्या एखाद्या अध्यायात बालगंधर्वांचे "लेटेस्ट" पद आढळावे, त्यातीलच हा संयोग होय! यंदाच्या संमेलनाला निदान ह्या एका गोष्टीने जरी अपूर्वता आली, तरी त्यात आश्चर्य नाही!

दोघां तात्यासाहेबांत हा जसा एक मोठा फरक आहे, तसा आणखीही एक फरक आहे. दोघेही तात्यासाहेब रसिक आहेत, प्रेमळ आहेत, रंगदार आहेत, रंगेल आहेत; तथापि एकाच्या स्वभावात भयंकर लाजाळूपणा आहे आणि दुसऱ्याच्या स्वभावात तितकाच ढकलवाजपणा ( Pushingness ) आहे! एकाच्या पुढे पक्वान्नाचे ताट वाढलेले असले, तरी दुसरे काय म्हणतील ह्या भीतीने ते जपून खातील, तर दुसरे खुलेपणाने पक्वान्नावर हात मारतील, आणि पुन्हा वर असे म्हणतील की, "काय हो, जिलब्याच-जिलब्या झाल्यामुळे तोंडाला कशी मिठी बसलेली आहे! ह्या वेळी जर चार खुसखुशीत भजी असती, तर काय बहार झाली असती!"

किंबहुना, तात्यासाहेब केळकरांच्या लोकप्रियतेचे हेच बीज आहे! ते कुठेही गेले, तरी मनमोकळेपणाने घरच्यासारखे वागतील आणि लहानापासून थोरापर्यंत आवडणाऱ्या प्रत्येक विषयात लक्ष घालतील. तात्यासाहेब कोल्हटकरांचे तसे नाही! त्यांच्या भोवती नेमकी ३।४ माणसेच आहेत, तोपर्यंत ते खुलेपणाने बोलतील, पण जास्ती माणसे जमायला लागली, की तात्यासाहेबांच्या तोंडाल कुलूप बसलेच. तात्यासाहेबांच्या या संकोचीपणाचे अनेक वेळा सभाभीरुत्वात रूपांतर झालेले आहे! ते जेव्हा सभेत बोलतात, तेव्हा फारच चांगली भाषणे करतात. पण ते सभेत बोलायला येतातच कशाला? येतच नाहीत! त्यांना संकोच वाटतो! ते "अपसेट" होतात!

साहित्यसभा ही एक शकुंतला आहे, अशी जर कल्पना केली, तर तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे शकुंतलेच्या बरोबर दुष्यंत राजाच्या राजवाड्यात गेलेले दोन ऋषिकुमार आहेत, असे म्हणायला काही हरकत नाही! ह्यांपैकी एकाला सभा आणि थाट आणि गर्दी म्हणजे अगदी कंटाळा— दुसऱ्याला त्याची अतिशय हौस! त्याला उलट हाच आनंद की शकुंतलेला

पोहोचविण्याच्या डेप्युटेशनवर आपण आलो, हे सर्व लोकांना समजावे, आणि दुष्यंत-राजाशी शेकहॅण्ड करायला आपल्याला मिळाले, याच्या तारा चोहोकडे जाव्या !

ह्या दोघांच्या स्वभावातला हा जो फरक, त्याचा परिणाम दोघांच्याही आयुष्यांवर झाला ! तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे डेक्कन कॉलेजपासून एकमेकांचे मित्र—एकमेकांचे अनुबन्धी ! दोघांचे सख्य फार, आपुलकीही मोठी ! तात्यासाहेब केळकर आणि तात्यासाहेब कोल्हटकर ह्या दोघांनीही डेक्कन कॉलेजमधील संस्कृत मृच्छकटिक नाटकात काम केलेले ! तात्यासाहेब केळकर ह्यांनी मदनिकेचे काम केलेले, व तात्यासाहेब कोल्हटकर यांनी शकाराच्या विटाचे काम केलेले ! डेक्कन कॉलेजातून सुटल्यावर ' वीरतनय ' नाटक लिहून तात्यासाहेब कोल्हटकर हे केळकरांच्या अगोदर जगाच्या पुढे आले ! अभ्यासाकडे लक्ष देऊन तात्यासाहेब केळकर हे कोल्हटकरांच्या अगोदर एल्एल् बी. झाले. १८९७ साली केसरीत येऊन मिळण्याबद्दल केळकरांनी श्रीपाद कृष्णांना पत्रही लिहिलेले होते.

पण श्रीपाद कृष्णांनी अकोल्याचा मार्ग धरला आणि तेव्हापासून दोघांच्या आयुष्यक्रमात फरक पडला ! श्रीपाद कृष्णांचा जगाशी संबंध सुटत चालल्यामुळे एक-एका पावलाने ते जगाच्या मागे पडत चालले, आणि रोजच्या जगात धावण्याची आवश्यकता पडल्यामुळे एक-एका पावलाने नरसोपंत केळकर जगाच्या पुढे आले ! आज संपत्ती, कीर्ती, प्रतिष्ठा, सत्ता ह्या सर्व दृष्टींनी नरसोपंत केळकर हे श्लाघ्य व श्रेष्ठ पदावर आहेत आणि श्रीपाद कृष्णांची खाजगी किंवा सांपत्तिक स्थिती सोडून दिली, तर लढाईत दाणादाण झालेल्या एखाद्या सेनापतीप्रमाणे त्यांची स्थिती आहे ! सी. आर. दासांप्रमाणे किंवा जोशी-खापर्ड्यांप्रमाणेदेखील वकील म्हणून त्यांची कीर्ती नाही. राजकारणात ते कोणीही नाहीत. सामाजिक बाबतीत कोणतीही विशेष कृती त्यांच्या हातून झालेली नाही. ' मूकनायका ' शिवाय त्यांचे एकही नाटक आज रंगभूमीवर नाही. एकाही नाटक कंपनीवर त्यांचे वजन नाही. ते उत्तम गणिती किंवा ज्योतिषी आहेत, हेही लोक विसरून गेलेले आहेत !

तेव्हा दोघां तात्यासाहेबांकडे पाहिले, म्हणजे हे चित्र पाहा आणि हे चित्र पाहा, असे म्हणण्याची पाळी येते ! केळकरांचे आयुष्य यशस्वी दिसते;

श्रीपाद कृष्णांच्या आयुष्यावर Failure ( निष्फळ ) असा एक मोठा 'फ' कार किंवा न-कार दिसू लागतो ! आणि ह्याचे कारण काय, तर श्रीपाद कृष्णांनी चालू जगावर आपली पकड ( hold ) ठेवली नाही ! नरसोपंतांनी ह्याच्या उलट वर्तन ठेवले ! ते चालू जगात राहिले, चालू जगात पोहले, चालू जगाशी लढले व चालू जगात मिसळले ! त्यांच्या ढकलबाज स्वभावामुळे प्रत्येक परिस्थितीतून ते सहीसलामत बाहेर पडले ! त्यांना सातव्या मजल्यावर कोंडले, तरी ते पहिल्या मजल्यावरून बाहेर पडले व पहिल्या मजल्यावर कोंडले, तरी तळघरातून निसटले ! चालू जगाशी संबंध आल्यामुळे त्यांची बुद्धी अत्यंत कुशाग्र राहिली ! बुद्धिमत्तेत त्यांचा 'नंबर' पहिला लागला.

बुद्धीची कुशाग्रता, व्यापकता, सुपूर्तता व चपलता ह्या चारी गुणांनी त्यांची तुलना कै. महादेव गोविंद रानडे ह्यांच्याशीच करावी लागते. रानड्यांच्या वेळेपासून इतका बुद्धिमान पुरुष महाराष्ट्रात झालाच नाही म्हटले तरी चालेल ! अनेक प्रसंगी कै. लो. टिळकांपेक्षा केळकरांनी सरस बुद्धिमत्ता दाखविलेली आहे ! व्यासंगात तर ते कोणाहीपेक्षा खात्रीने सरस आहेत.

ह्याच्या उलट श्री. तात्यासाहेब कोल्हटकरांच्याकडे पाहिले, म्हणजे सेंट हेलेना बेटातील तुरुंगवासात एखाद्या खडकावर शून्य दृष्टीने बसलेल्या नेपोलियन बोनापार्टाच्या चित्राची आठवण होते ! त्याचे राज्य गेलेले आहे, त्याचे वैभव गेलेले आहे,, पंचवीस वर्षांपूर्वी असलेला त्याचा दरारा गेलेला आहे, आणि आता मूक भाषेत समुद्राच्या लाटांना आपले मनोगत सांगत तो एकांतवासात बसलेला आहे !

आणि इतके असूनही श्री. श्रीपाद कृष्ण हे नेपोलियन आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे ! जरी खाडीलकरांच्या पुढे त्यांचा पराभव झालेला असला, जरी गडकऱ्यांनी त्यांची नाटके सोमवारावर नेलेली असली, जरी त्यांना 'या, बसा,' म्हणायला बालगंधर्वांना वेळ नसला, किंवा नरसोपंत केळकर हे ड्यूक ऑफ वेलिंग्टनप्रमाणे यशस्वी वीर म्हणून संपत्ती, मानमरातब, कीर्ती किंवा सत्ता ह्यांनी अलंकृत असले, तरी सेंट हेलेनामधील हा आधुनिक नेपोलियन महाराष्ट्राचा नेपोलियनच ठरेल. त्यांच्यापासून हजारो तरुणांना स्फूर्ती मिळेल, हजारो रसिक त्यांच्या गुणांवर डोलतील, हजारो लेखक त्यांचे अनुकरण

करायला लागतील, व हजारो देशबांधव त्यांच्यावर पुष्पवृष्टी करायला लागतील.

आम्हीही सहस्त्रावधी सुरुचिर कल्पना प्रसविणाऱ्या त्यांच्या सहस्रशीर्षावर आज प्रेमभावाची कुसुमवृष्टी करीत आहो! श्रीपाद कृष्ण हे आमच्या प्रेरणांचे जनक नव्हेत, त्यांच्या परंपरेत आम्ही कधीही नव्हतो, आणि तरीही मराठी भाषेत नावीन्यमय कल्पनांचे किती निसर्गसुंदर कालवे त्यांनी सोडलेले आहेत, हे पाहून आम्ही सरस्वतीच्या या लाडक्या सुपुत्रास आपली प्रणती अर्पण करीत आहोत! त्यांचे अवगुण आम्हांस माहीत आहेत! त्यांचे अवगुण आम्हांला लक्षात ठेवायलाच पाहिजेत. पण त्यामुळेच त्यांचे अनुपम गुण आम्हांला जास्तच अनुपम वाटतात, आणि प्रेमभावनांच्या वरचा ताबा नाहीसा होऊन त्या सर्वच्या सर्व मराठी भाषेच्या ह्या शाहिराच्या गुणांस जाऊन भिलगतात.

आणि म्हणूनच श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब ह्यांच्यासारखा लायक अध्यक्ष निवडल्याबद्दल साहित्य-परिषदेचे आम्ही अत्यंत आभारी आहोत!

# न र-भू षा तु दा ढि का

दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

सध्याचे पुरुषयुग दाढीवर नाराज झालेले दिसते. जो पाहावा तो सकाळी उठल्याबरोबर दाढीवर शस्त्र चालवितो. कित्येक लोक तर सूर्यास्तानंतरदेखील अनार्यपणे दाढीवर शस्त्र चालवितात. प्रथम दाढी गेली, पुढे मिशी लांबीरुंदीने आखूड झाली. आता तर तीही साफ होऊ लागली आहे.

अशा संकटकाळी जर इतिहासाचे एक अद्‌भुत प्रकरण वाचकांपुढे रुजू केले, तर त्यांना ते खरेही वाटणार नाही. इजिप्तच्या काही राण्या गादीवर बसल्याबरोबर आपल्या नाजूक गालांवर आणि हनुवटीवर कृत्रिम दाढी चढवू लागल्या. का, तर म्हणे पुरुषांवर राज्य करावयाचे आहे! दाढी पाहिल्यावाचून मंत्री, सेनापती आणि पौरजन आज्ञेचे पालन कसे करतील? राज्य चालवायला राजदंडापेक्षा दाढीची आवश्यकता त्यांना अधिक भासली.

आपल्या देशाचा इतिहास पाहता, आपले प्राचीन देव दाढीमिशी वाढवीत नव्हते, आणि ऋषिलोक कधी दाढी करीत नव्हते. यामुळे दाढीवाल्या इसमाला पाहताच आपल्या लोकांना ऋषिमुनींचे स्मरण होते. सामान्य गृहस्थाश्रमी जर दाढी वाढवायला गेला, तर लोक त्याला अभद्रपणे विचारतात, " सुतक आलेले आहे की काय?"

कित्येक भटजी पुरश्चरणाला बसले, म्हणजे 'पंचकेशी' वाढवितात. व्रतस्थ असल्याचे ते एक लक्षण आहे म्हणे. दक्षिणेकडे आणखी एक प्रकारचा रिवाज दिसून येतो. बायको गरोदर आहे, असे दिसून येताच नवऱ्याला दाढी वाढवावी लागते. नवऱ्याला अशा रीतीने व्रतस्थ राहिलेले पाहून बायकोला परमसंतोष होत असला पाहिजे. नवरा प्रवासाला गेला, तर पत्नी एकवेणीधरा राहत असे. त्याचप्रमाणे पत्नी गरोदर असेतोपर्यंत पतीने दाढीधर किंवा श्मश्रूधर

राहिले पाहिजे. हा समानतेचा न्याय दक्षिणेप्रमाणे उत्तरेलाही मान्य झाला पाहिजे !

ऋषिमुनींच्या नंतर दाढीचा पुरस्कार करण्यात आपल्या देशात मुसलमान आणि शीख यांची गणना होते. हिंदूंनी दाढी काढून शेंडी ठेवली, तर मुसलमानांनी बरोबर याच्याविरुद्ध जाऊन डोके साफ करून दाढी वाढविण्याचे ठरविले. संस्कृतिभेद सर्व बाजूंनी स्पष्ट झाला पाहिजे

शीख लोक याहून अधिक तर्कनिष्ठ आहेत. संन्यासी गळ्याच्या वरचा सगळा भाग साफ करू लागले. तो इथवर की, बिचाऱ्या भुवयादेखील त्यांच्या तडाख्यातून सुटल्या नाहीत. अहिंसक जैन साधूंनी वस्तऱ्यासारखे घातक शस्त्र न वापरता चिमट्याने दाढी-मिशी-केस उपटून काढण्याचे ठरविले. हे पाहून शीख लोकांना केसांची दया आली, आणि त्यांनी ठरविले की, उत्तमांगाच्या एका केसालादेखील धक्का लावायचा नाही. दाढी-मिशी केस—सर्वांना अशा रीतीने अभयदान मिळाल्यामुळे उवांना फार आनंद झाला. त्यांनी या ‘ अभयारण्यात ’त वस्ती करण्याचे ठरविले ! पण शीख काही जैन नव्हेत की कृमिकीटांचे पालन करतील ! त्यांनी दह्यासारख्या जालीम अम्ल पदार्थाची मदत घेतली आणि अभयारण्यातदेखील उवा निर्वंश झाल्या.

शीख लोकांनी दाढीमाहात्म्य वाढविल्यानंतर दाढीच्या विस्तारात आपोआप विविधता आली. शीख लोकांत अधिकांश जाट लोक असल्याने दाढी अधोमुख न राहता हनुवटीकडे विभक्त होऊन दक्षिण आणि वाम अशा दोन्ही दिशांनी फैलावली.

दाढीचा विस्तार तर कमी करता येत नाही आणि तिला काबूत तर ठेवले पाहिजे, अशा परिस्थितीत शीख लोकांनी युरोपियन बायकांप्रमाणे जाळी वापरण्याचा रिवाज सुरू केला आहे. कित्येक लोक दाढीला हवा तसा आकार देऊन रात्री पट्ट्याने बांधून ठेवतात, आणि दिवस उगवताच दाढीला मोकळी सोडून गावात मिरवतात. बायकोला कह्यात ठेवून स्त्रीस्वातंत्र्यावर लांब-लांब व्याख्याने देण्यासारखाच हा प्रकार आहे.

येथवर झाला स्वदेशातील दाढीचा इतिहास; पण स्वराज्य झाल्यानंतर आता स्वदेशाबाहेर पाहिलेच पाहिजे. आपल्या येथे जो उठला, तो इंग्रजी पुस्तके वाचून युरोपमधील माहिती आपल्या लोकांपुढे मांडीत असतो. मला अशांचे अनुकरण करावयाचे नाही. तेव्हा युरोपातील फ्रेंच कट, रशियन कट, मार्शल मुस्टॅच, पार्शल मुस्टॅच वगैरे प्रकारांचे रसाळ वर्णन न करता मी

आफ्रिकेकडे वळू इच्छितो.

सहाराच्या दक्षिणेकडे ज्या निग्रो, वांटू वगैरे जाती राहतात, त्यांचे केस मेंढरांसारखे असतात. असे केस डोक्यावर वाढू दिले, तर त्यांचे केवढे मोठे कांतार माजते, हे मी ॲबिसीनिया किंवा एथियोपिया या देशांत पाहिले. पूर्व किंवा दक्षिण आफ्रिकेचे लोक आता दाढी वाढवू धजतच नाहीत. कारण घामाने भरली असता ती धुऊन काढणे सोपे नाही. पण दाढीचे खरे संकट मी पाहिले, ते सहाराच्या वाळवंटाच्या आसपासच्या मुसलमानाचे. धर्मप्रमाणे त्यांना दाढी तर वाढवावी लागते आणि वारा जोराने वाहू लागला म्हणजे वाळवंटातील रेती आश्रयासाठी दाढीत दडी मारून बसते. स्वच्छंद विहार करणाऱ्या उवांपेक्षा दडी मारून बसणाऱ्या या वाळूचा भार अधिक. शेवटी तिकडील लोकांनी डोक्यावरील फेट्याचे शेपूट जरा लांब ठेवून ते दाढीभोवती गुंडाळण्याचे ठरवले. कित्येक तर गळ्याभोवती उपरणे गुंडाळून त्यात आपली दाढी लपवितात.

नुकताच चीन-जपानकडे जाऊन आलो आहे. तेथे तीन आठवड्यांत जेवढे संशोधन करता आले त्यावरून सांगू शकतो की, तेथील लोकांना दाढी बेताचीच उगवत असल्यामुळे प्राचीन राजेलोकांनी तिची मोठ्या आस्थेने जोपासना केली होती. ओठांवरील मिशी अगदीच बेताची आणि ओठांच्या टोकांकडील मिशीचे केस मनसोक्त वाढणारे, असे पाहून त्यांनी दोन्ही टोकांच्या मिशा खोलवर वाढू देऊन त्यांच्या टोकाला लिंबू टांगण्याचा प्रयोग केला होता म्हणे ! मला तर हे खरे वाटत नाही. चिनी-जपानी लोकांची तुरळक दाढी पाहिली, म्हणजे देवाने यांना अधिक केस दिले असते, तर बरे झाले असते, असे वाटल्यावाचून राहत नाही. या लोकांचे डोक्यावरील केस मात्र काळे-कुळकुळीत, पण अस्वलासारखे राठ असतात; पण ते त्यांच्या चेहऱ्याला शोभतात उत्तम.

मी वर आधुनिक पार्शल मुस्टॅचचा उल्लेख केला आहे. पार्शल मुस्टॅच म्हणजे नाकाच्या रुंदीइतकीच, किंवा त्याहून कमी मिशी ठेवून बाकीची साफ करावयाची. वरच्या ओठाच्या टोकावर केसांचा लहानसा झुबका पुढे आला म्हणजे मनुष्याचा चेहरा उठावदार दिसतो, हे खरे; पण काश्मीरकडच्या मुसलमानांनी याच्या उलट प्रकार चालू करण्यात मोठी सोय पाहिली आहे. दाढी-मिशा दोन्ही यथेच्छ वाढू द्यायच्या आणि नाकाच्या रुंदीइतका मिशीचा

भाग वस्तऱ्याने किंवा कातरीने साफ करावयाचा. पाणी पिताना किंवा जेवताना ग्रास घेणे या रीतीने सोपे जाते. पुढले दात जर शोभिवंत असले, तर मिशीचा अंतराय दूर झाल्यामुळे ते उठावदार दिसतात, पण चेहऱ्याची शोभा वाढते, असे मात्र म्हणता येत नाही. मिशीच्या दोन्ही टोकांना लिंवे लटकावण्यापेक्षा मिशीला ताव देऊन त्या राठ मिशीच्या टोकांवर दोन लिंवे ठेवून देणे हे मर्दुमकीला शोभणारे आहे. तानाजी मालुसरे म्हणे या बहादुरीत पटाईत होते. कथाकलीचे सोंग काढून नाकाच्या टोकावर लिंबू बसण्यापेक्षा मिशीच्या आकड्यावर लिंबू ठेवणे केव्हाही इष्टच आहे.

इकडून-तिकडून गोळा केलेले इतिहाससंशोधन बाजूला ठेवून आता आपण थोडेसे दाढीमनन करू या — देवाच्या राज्यात, निसर्गाच्या राज्यात म्हणा हवे असल्यास — निरर्थक असे काहीच नसते. कपाळावरील घाम डोळ्यांत शिरू नये म्हणून निसर्गाने डोळ्यांवर भुवईची दोन छपरे केली. कानां-नाकांच्या सूक्ष्म इंद्रियांच्या संरक्षणासाठी दोहोंच्या तोंडी निसर्गाने केस वाढविले; पण दाढीचा उपयोग काय ? थंडीपासून संरक्षण म्हणावे, तर कपाळ आणि नाक उघडे पडून देऊन निसर्गाने पक्षपात का केला ?

कित्येक लोक म्हणतात की, ज्याप्रमाणे मोराचा पिसारा लांडोरीचे आकर्षण करण्यासाठी असतो, त्याप्रमाणे दाढीचा पसारा स्त्रियांना मोहित करण्यासाठी असतो. पण या बाबतीत स्त्रियांचाच अभिप्राय घेतलेला चांगला. दाढी-मिशी दोहोंना रजा देऊन आणि डोक्यावरील केसांचा भांग पाडून स्त्री-पुरुषांतील भेद कमी झालेला स्त्रियांना आवडतो, असा सध्याच्या मनूचा निर्णय आहे.

ते कसेही असो, ज्याप्रमाणे ईश्वराने नाक चष्मा ठेवण्याच्या सोयीसाठी केले आहे, हे सिद्ध झाले आहे, त्याचप्रमाणे दाढीही सकाळी तोंड पाहण्यासाठी आणि चेहऱ्याची मशागत करण्यासाठी आहे, असेही सिद्ध करता येईल. संस्कृतीमध्ये जसजसा पालट होत जातो, तसतसे दाढीचे प्रयोजन आणि रूप बदलत जाते, एवढे मात्र निर्विवाद सिद्ध आहे. आपल्या पूर्वजांनी पक्षपात टाळण्यासाठी आपल्या साधुपुरुषांना 'जटिलो मुण्डी लुञ्चितकेशः' असा त्रिविध मार्ग मोकळा ठेवला होता. आपली आर्यसंस्कृती सर्वांगपरिपूर्ण होती, हे यावरून सिद्ध होत नाही का ?

[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ८०५८६७.. वि: निबंध
क्रमांक ...२७०... नों: दि: ...२/६७

# भूतकाळाच्या पारंब्या

श्रीपाद महादेव माटे

भूतकाळचे वडाचे झाड गगनचुंबित असून, दृष्टी पोहोचू नये, इतके मागे लांबवर विस्तारलेले आहे, त्याच्या सहस्र पारंब्या लोंबत आहेत, आणि त्याला लोंबकळण्यात माणसाच्या जातीला आनंद, अभिमान आणि आशा वाटत आहेत. जगभर पसरलेली माणसाची जात मनःप्रकृतीने एकच आहे, हे सिद्ध करावयास जी अनेक प्रमाणे उपयोगी पडतात, त्यांत भूतकाळाचा मोह हेही एक बलवत्तर कारण आहे. कित्येक माणसे तर अशी असतात की, ती वर्तमानाकडे किंवा भविष्याकडे बघतसुद्धा नाहीत. त्यांचा मुखवटा नेहमी भूताकडेच वळलेला असतो आणि वर्तमानात राहूनही ती भूतातच खेळ खेळत असतात. भूतकाळाची घट्ट होत चाललेली जमीन हे लोक प्रयत्नाने उकरतात आणि आत कोठे काय साठले आहे, हे शोधून पाहतात. त्यांना नगरे सापडतात, स्तूप सापडतात, मंदिरे सापडतात, विहार सापडतात, वर्तमानकाळात ज्यांची गुणगुण येऊन पोहोचली आहे, अशा समाधी त्यांच्या हाती लागतात, आणि कोणी साक्षेपी माणसांनी मुद्दाम राखून ठेवलेले किंवा गैरसावध माणसांच्या हातून सहजगत्या राहून गेलेले कागदपत्रही त्यांना सापडतात. या सर्व वस्तूंचे परीक्षण करून विस्मृतीत सापडलेल्या भूतकाळाचा काही-एक नकाशा ते आखतात. एखाद्या संस्कृतीचा शोध लावतात. निंदेच्या गर्तेत पडलेल्या एखाद्या पुरुषाचा ते उद्धार करतात, आणि अशा रीतीने भूताचा आणि वर्तमानाचा संबंध जोडून देतात.

अनेक धर्मग्रंथ, काव्ये, पुराणे आणि कुलवृत्तान्त माणसांनी बहुधा मुखोगद्त करून ताडपत्रांवर किंवा उंटाच्या कातड्यावर लिहून, दगडावर कोरून, मातीच्या विटांवर भाजून, बळकट करून, वर्तमानापर्यंत आणून पोहोचविले

आहेत आणि त्यांची जपणूक सध्यासुद्धा महाप्रयासाने चालू आहे. आपण वेवारशी लोक नव्हे; आपल्याला पूर्वज आहेत, आपल्याला काही परंपरा आणि पीठिका आहेत, या जाणिवेचा विलक्षण अभिमान माणसाच्या जातीने आजवर निकराने पाळला आहे, आणि आता तर उत्खनन या विषयाला शास्त्रीय दर्जा प्राप्त झाल्यामुळे भूतकाळात शिरण्याची जी आजपर्यंत पाऊल-वाट होती, तिचा आता हमरस्ता बनेल, असे वाटू लागले आहे. मनुष्य-योनीच्या एकतेचे सातत्य अशा रीतीने अधिकाधिक सिद्ध होत चालले आहे. जे वर्तमानात रमतात किंवा भविष्यकाळाचा पतंग उडवितात, ते आजपर्यंत भूतकाळात पोहरा टाकणाऱ्या या लोकांना मनातून हसत असत; पण आता संशोधनाची साधन-संपत्ती वाढत चालल्यामुळे आणि संशोधनाला शास्त्रीयता आल्यामुळे त्यांचा हा उपहास झडत चालला आहे, व त्यांच्या ठिकाणी गांभीर्य उत्पन्न होत आहे.

भूतकाळाशी संबंध जोडणारे जे अवशेष पृथ्वीच्या पाठीवर आहेत, किंवा पृथ्वीच्या पोटात सापडतात, त्यांच्या जोडीला आपले आचारविचार, संस्कार आणि अभिमान ही शोधून पाहिली, म्हणजे दुसरीही कित्येक प्रमाणे सापडतात. माणसांची मने मोठी चिवट आहेत, अथवा चिकटही आहेत. एकीकडे सुधारणेचा डंका वाजत असताना, आचार-विचार पालटले असताना, संस्कार क्षीण झाले असताना, संस्कृतीत फरक पडले असताना आणि अभिमान निर्बळ झालेले असतानासुद्धा, त्यांची झिजलेली थोटके जपून ठेवण्याची शिकस्त माणसांनी चालविलेली असते. एकीकडे नवविचाराचा, बंधविमोचनाचा नगारा वाजत असताना, बहुतेक लोकांच्या घरांत आणि मनात जुन्या अवशेषांच्या किंकिणी हळूहळू वाजताना ऐकू येतात. काहीशा भ्रमात राहण्यात आपल्याला सुख वाटते; आत्मवंचनेतही एक तऱ्हेचा मोह असतो; नवीन वस्तूच्या बाजूची झेप टाकण्यास आपण उत्सुक असतोच, व त्याचा आपल्याला अभिमानही वाटतो; पण मागले सारेच बंद तटातट तोडून टाकण्याचे साहस सहसा कोणाच्या हातून होत नाही. हे साहस जे कोणी थोडे लोक करतात, ते समाजातून बाजूला पडतात. हे आपले कोणी नव्हत, असे बाकीचे सर्व लोक समजतात, आणि या साहसी लोकांच्या गर्जना, प्रतिज्ञा आणि वेदना केवळ स्थगित होऊन राहतात. मागे एकदा न्यायमूर्ती

रानडे यांनी डबल लाइफ् म्हणजे—दुटप्पी नव्हे, तर —दुहेरी जीवनाचे तत्त्वज्ञान विवरून सांगितले होते, आणि ते कोणत्याही काळात समर्पकच वाटेल. अगदी एकेरी जीवन फार थोड्यांना मानवते किंवा चालविता येते; पण जे दुहेरी जीवन आचरितात, ते नवजीवनाला विन्मुख असतात किंवा सुधारणेचे वैरी असतात, असे मुळीच नाही. ते नवजीवनाच्या प्रवासालाच निघालेले असतात; पण मनःस्वास्थ्यासाठी किंवा लोकसंग्रहासाठी, ते जुनी वस्त्रे पांघरून बसतात; व एकेरी जीवनवाद्यांच्या उपहासाला कदाचित पात्र बनतात; पण जगाची रीत अशीच आहे आणि अशीच राहील. जुनी थोटके अगदी झिजली, म्हणजे ती केव्हा गळावी, हे अभिमानी लोकांनासुद्धा कळत नाही; पण इतिहासाची साधने म्हणून, पूर्वजांशी नाते जोडणारे म्हणून, आपुलकीचे पाणी खेळत ठेवणारी टाकी म्हणून, ही थोटके शतकानुशतके आपल्या जीवितात टिकून राहतात आणि मग पुरेसा काळ गेला, भूतकालीन वस्तूंची कसलीही किंमत उरली नाही, म्हणजे मग या सावल्याही अंतर्धान पावतात.

असे सांगतात की, इंग्लंडच्या सिंहासनाच्या खाली एक वेडा-वाकडा दगड आहे. या रत्नखचित सिंहासनाच्या खाली हा पाषाण आज कित्येक शतके राहिलेला आहे. इंग्रज राजवंशाच्या प्राचीन पूर्वजाने एक मोठी लढाई ठोकून विजय मिळविला, आणि फत्ते झाल्याच्या आनंदात रणांगणावर पडलेल्या एका पाषाणावर बसूनच त्याने आपल्याला राज्याभिषेक करवून घेतला. तेव्हापासून इंग्लंडच्या राजांची परंपरा अखंडित राहिली आहे. अर्थातच त्या पाषाणाला मोठे शुभ किंवा शकुनाचे रूप प्राप्त झाले आहे! असा हा जुन्याशी सातत्य जोडण्याचा मोह असतो. इंग्रज लोक खचित इतके सुधारलेले आहेत की, आणि त्यांची मनेही इतकी बंधमुक्त झाली आहेत की, या शकुनाच्या शिलेची किंमत मैलासाठी पुरलेल्या एखाद्या दगडाइतकीसुद्धा नाही, हे त्यांना गकते; पण भूतकाळापासून अजिबात तुटून निघण्यात काही विशेष पुरुषार्थ आहे, असे या लोकांना वाटतच नाही. उदेपूरचे राजे आपल्या शय्येच्या खाली एक गवताची किंवा दर्भाची चटई घालतात, अगदी न चुकता ती तेथे ठेवतात, आणि याचे कारण तरी इतकेच की, स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय चांगल्या शय्येवर निजणारसुद्धा नाही, राना-वनात गवतावर जसे निजत होतो, तसेच निजत राहू ' अशी पूर्वजांनी केलेली

प्रतिज्ञा जिवंत ठेवावी, असे या राजकुलातील वारसांना वाटत आले आहे. खरे म्हटले म्हणजे सिंहासनाखालच्या त्या पाषाणालाही काही किंमत उरलेली नाही आणि शय्येखालच्या या चटईचीही मातब्बरी राहिलेली नाही; परंतु जुन्या कालरूप स्त्रीच्या पडदणीच्या दशा लोंबत राहाव्या, असे माणसांना वाटते, हे मात्र खरे.

इंग्लंडच्या पार्लमेंटची इमारत अगदी जुनी-पुराणी झाली आहे. अगदीच निकराला आले म्हणजे, हे लोक तिची डागडुजी करतात; पण तिचे जुने रूप जितके ठेवता येईल, तितके ठेवण्याची शिकस्त ते करीत आले आहेत. ही इमारत जर सगळी पाडली आणि जर एक टोलेजंग नवी इमारत बांधली, तर देशोदेशींच्या लोकसभांच्या या जननीचे वैभव केवढे तरी वाढेल, आणि तिच्या सदस्यांचीसुद्धा केवढी तरी सोय होईल; पण रेटारेटी करून, गैरसोय सोसून हे सारे सभासद अडी-अडचणीने तेथे बसून राहतात, याला दुसरा कोणताही अर्थ नाही. परंपरा आणि पीठिका यांचा इंग्लंडच्या ठिकाणी असलेला हा छंदच होय. ऑस्ट्रियाच्या बादशाही राजमुकुटात एक लोखंडाची कांब आहे. त्यांचा दावा असा आहे की, येशू ख्रिस्ताला ज्या क्रॉसवर फाशी दिले, त्या क्रॉसचीच ही कांब आहे. क्षणभर ही कांब त्या क्रॉसचीच आहे, असे जरी मानले, तरी ती मुकुटात ठेवल्याने काय साधते ? पण याचे उत्तर अगदी साधे आहे. ते हे की, येशू ख्रिस्ताबद्दलचा आपला आदर आणि आपले ख्रिस्तीपणाचे सातत्य ही टिकविण्याची ही एक योजना आहे.

माणसे कशाकशाला बिलगतील आणि कशाला काय महत्त्व अर्पण करतील, याचा निकाल करणे फार कठीण आहे. ज्या वृक्षाखाली बुद्धाने आपल्या धर्माचा प्रसार प्रथम सुरू केला, त्याची एक-एक फांदी नेऊन, ती दूर-दूरच्या लोकांनी आप-आपल्या देशांत वाढविली आहे, आणि अशा रीतीने आपले आंतरिक शिष्यत्व तर आहेच आहे, पण बाहेरच्या खुणासुद्धा त्याच आहेत, हे सिद्ध झाल्याचे समाधान हे लोक मानतात. झाड टिकले, तरी ते किती वर्षे टिकेल, याचा निकाल वनस्पतिशास्त्रज्ञच करू शकतील; पण त्यांनी जर का असे सांगितले की, मूळचा वृक्ष इतके दिवस टिकायचा नाही आणि त्याची फांदीही इतके दिवस टिकायची नाही, तर शांतीबद्दल प्रसिद्ध असलेले बुद्ध भिक्षू त्यांच्यावर एकदम तावदरून उठतील. बुद्धाच्या दाताचे

असेच आहे. यु एन् सँगने आपल्या प्रवासवर्णनात असे म्हटले आहे की, बुद्धाचा राखून ठेवलेला दात आपण पाहिला. आणि तो अत्यंत तेजस्वी आहे; म्हणजे प्रत्यक्ष लखलखतो. आता कोणी कितीही मोठा झाला, तरी त्याचा दात लखलखेल, हे काही खरे वाटत नाही. तथापि या दाताच्या द्वारे त्या दीप्तिमान बुद्धाचे दर्शन आपल्याला होत आहे, असे मानल्याने या लोकांना जे पारमार्थिक सुख होत आहे, त्याच्या आड आपण कशाला यावे ? पण आपला मुद्दा असा आहे की, जुन्याला चिकटून राहण्याची माणसाची प्रवृत्ती काय आहे, ती पाहावी. कोणी मृताची नखे ठेवलेली असतात. कोणी त्याच्या केसांच्या बटा ठेवलेल्या असतात. हे सारे प्रयत्न आपण भूतकाळाचे औरस वारसदार आहोत, असे सिद्ध करण्यासाठीच चाललेले असतात.

आता खरोखरच ज्यांना थोटके म्हणता येईल, ती कशी शिल्लक राहिलेली असतात, आणि त्यांची जपणूक किती कसोशीने चाललेली असते पाहा. ब्राह्मणाच्या गळ्यातील जानवे हे काय आहे, हे पाहणे खरोखरच मनोरंजक आहे. पूर्वीच्या काळी, म्हणजे अतिप्राचीन काळी अशी चाल असे की, ब्राह्मणाने आपल्या हाताने सूत काढावे, त्याचे वस्त्र विणावे व ते अंगावर घ्यावे. स्वदेशी चळवळीला जेव्हा इकडे सुरुवात झाली, तेव्हा टिळकांनी हा गते-तिहास सांगितला होता. हळूहळू सर्वच ब्राह्मणांना ही दगदग होईनाशी झाली. त्यांचे व्यवसाय बदलले म्हणा, स्वतः कष्ट नकोत असे त्यांना वाटू लागले म्हणा, तरी पण मूळचे रूप थोडे तरी कायम ठेवावे असे त्यांना वाटू लागले, आणि म्हणून वस्त्राचे रूप आकसत-आकसत सुतांच्या तीन दोरकांवर आले, आणि त्यांच्या ठिकाणी पीठिकेमुळे विलक्षण पावित्र्य उत्पन्न झाले. आज किती सहस्र वर्षे झाली कोणास ठाऊक, पण ब्राह्मणाने पावित्र्याने पुनीत झालेली ही मूळची परंपरा अजूनही बव्हंशी कायम ठेविली आहे. मुसलमानी अमदानीत हजारोंच्या हजारो ब्राह्मणांची मुंडकी उडाली, आणि त्यांच्या जानव्यांचे वजन कित्येक मण भरले, असे इतिहासात म्हटले आहे. ज्याला मी तीन दोरके म्हटले, त्यासंबंधाने केवढा चिवट अभिमान ब्राह्मणांच्या ठिकाणी उत्पन्न झाला होता, याचे उत्तम उदाहरण म्हणजे राजा राजमोहन रॉय यांचे होय. राजा राममोहन रॉय हे सुधारक कुलाच्या पितृस्थानी शोभतात. नवलाची गोष्ट ही

की, या सुधारकाने आपल्या गळ्यातील जानवे शेवटपर्यंत कायम ठेवले! असा काही-एक परंपरेचा आणि प्रतीकांचा अभिमान असतो.

सुवासिनी एकमेकींची ओटी भरतात, आणि ती भरताना गव्हाबरोबर एक खोबऱ्याचा तुकडा त्या ओटीत घालतात. हा तुकडा काय आहे, हे पाहावयास जा, म्हणजे दिसेल की, त्याचा पूर्वज नारळ होता. ओटी भरताना नारळ घालण्याची चाल पूर्वी असे. नारळ हा अपत्याचे प्रतीक कल्पून त्याने ओटी भरावी, म्हणजे तुला चांगले अपत्य होवो, असे म्हटल्यासारखे होते, ही मूळ कल्पना होय; पण नारळ घालणे दर वेळी शक्य होईनासे झाले. मग नारळ नाही तर नाही, निदान त्याची एक वाटी आणि वाटी नाही तर नाही, निदान तिचा एक तुकडा, येथपर्यंत अपत्यासंबंधीची ही सदिच्छा खालावत आली. एक अतिशय उदात्त कल्पना एका क्षुल्लक अवशेषाच्या रूपाने आता शिल्लक राहिली आहे. मुलाची मुंज केली म्हणजे त्याला गुरुगृही पाठवावयाचे आणि तिकडे पाठविताना त्याला पांघरायला हरणाचे कातडे द्यायचे, अशी चाल आश्रमधर्म जेव्हा कडकडीत होते तेव्हा होती; पण दर वेळी आणि प्रत्येक माणसाने हरणाचे कातडे कोठले आणावयाचे? म्हणून मग त्या कातड्याच्या एका तसूभर तुकड्यावर माणसे भागवू लागली. तुकडा पांघरता येणे अर्थातच अशक्य होते. म्हणून तो जानव्यातच गुंतवून टाकण्याची व्यवस्था केली. पूर्वीच्या चालीरीतींचे, संस्कृतीचे अवशेष लोक असे टिकवून धरतात.

पूर्वी बळी देण्याची चाल फार होती, आणि अजूनही अनेक जातींत ती रूढ आहे, आणि यज्ञात कधी काळी ऋत्विजांनी बोकड मारला, म्हणून त्याचा उपहास करणारे तथाकथित जातिविचारमग्न सुधारक हजारोंच्या-हजारो बोकड अजूनही बळी देत असतात. कोपऱ्यावरून वळायचे झाले, अमूक एका झाडाखालून जायचे झाले की, कोंबडे कापले पाहिजे, ही चाल किती ठिकाणी अजून रूढ आहे; पण ज्या लोकांनी ही चाल मागेच सोडून दिली, त्यांनासुद्धा कोणत्या तरी रीतीने बळी देण्याची कल्पना टिकवून धरावीशी वाटली. म्हणून लग्नाच्या मिरवणुकीत दर कोपऱ्यावर नारळ फडाफड फुटतात. ही मूळची बळी जाणाऱ्या प्राण्यांची प्रतीके होत. प्राणी बळी देता येत नाहीत, तर निदान कोहळा कापावा, या चालीचे उगमस्थान सहज समजण्यासारखे आहे. आता नारळ फोडताना हे मूळच्या बळीचे प्रतीक आहे, हे बहुधा

कोणालाही माहीत नसते. केवळ चाल म्हणून ते हे करतात, तथापि तेवढ्या-वरून अभ्यासकमात्र सांगू शकतो की, हे बळीचे प्रतीक आहे.

क्षत्रियांनी दसऱ्याच्या दिवशी शस्त्राची पूजा करावी, हे किती योग्य आहे; पण पूजेला शस्त्र नसले तर, म्हणजे तलवार नसली तर, सुरीची, निदान चाकू-कात्रीची किंवा शेवटी विळीची पूजा करण्यापर्यंत हा चालीचा हट्ट टिकून राहिलेला आहे; पण अभ्यासकालामात्र या विळीच्या द्वारा चाकू, कात्री आणि सुरी यांच्या अंगावरून मूळच्या तलवारीपर्यंत खचीत पोहोचता येते. ही भावना आपल्याच देशात आहे, असे नव्हे. न्यूटन हा आपल्या बागेत बसला असताना एका झाडाखाली त्याची दृष्टी गेली. इतक्यात त्या झाडाचे एक फळ तुटून खाली भुईवर पडले. न्यूटनच्या मनाला टचका बसला आणि फळ खालीच का पडावे, वर का जाऊ नये, बाजूला का जाऊ नये, असा प्रश्न त्याला उत्पन्न झाला आणि या प्रश्नाचा अभ्यास करता-करता, त्याला शेवटी गुरुत्वा-कर्षणाचा शोध लागला आता या कामी खरे महत्त्व न्यूटनचे आहे, पण ज्या झाडाचे फळ खाली पडले, त्या झाडासंबंधानेसुद्धा एक तऱ्हेची आपुलकी उत्पन्न झाली. मग ते झाड जेव्हा वठले, तेव्हा लोकांनी त्याच्या बुंध्याचे, फांद्यांचे काप-कापून बारके तुकडे केले आणि त्या प्रसंगाचे स्मारक म्हणून हे तुकडे त्यांनी आपापल्या कपाटात ठेवून दिले. एका मंगल प्रसंगाचे स्मरण टिकविण्याची त्या लोकांनी केलेली ही तरतूद फार मनोरंजक म्हटली पाहिजे!

जिकडे तिकडे विजेचा लखलखाट आता झालेला आहे आणि आपल्या देवांनासुद्धा तेला-तुपाच्या नंदादीपाऐवजी विजेचा नंदादीप खचीत आवडेल; पण घरात आणि देवघरातसुद्धा विजेचा लखलखाट करूनही तेलाचा नंदादीप आणि तुपाचे निरंजन लावल्याशिवाय मालकीणबाईनाच काय, पण मालक-महाराजांनासुद्धा चैन पडत नाही. बाजारातील शोभिवंत आणि वैभवशाली दुकानांत डोकावून पाहावे, म्हणजे जिकडे-तिकडे विजेचा लखलखाट झाला असला, तरी भिंतीत बसविलेल्या मूर्तीपुढे किंवा चित्रापुढे समईचा लावलेला दिवा आपल्या दृष्टीस पडेल. हे सारे काय आहे? ही सारी सातत्य टिकविण्याची तरतूद आहे. सावित्रीने यमराजाची आर्जवे करून त्याने कब्जात घेतलेल्या आपल्या नवऱ्याला सोडविले, ही अद्भुत कथा स्त्री-समाजातील सौभाग्य भावनेशी कायमची निगडीत झालेली आहे; पण सावित्रीची आर्जवे, आणि

की, या सुधारकाने आपल्या गळ्यातील जानवे शेवटपर्यंत कायम ठेवले ! असा काही-एक परंपरेचा आणि प्रतीकांचा अभिमान असतो.

सुवासिनी एकमेकींची ओटी भरतात, आणि ती भरताना गव्हाबरोबर एक खोबऱ्याचा तुकडा त्या ओटीत घालतात. हा तुकडा काय आहे, हे पाहावयास जा, म्हणजे दिसेल की, त्याचा पूर्वज नारळ होता. ओटी भरताना नारळ घालण्याची चाल पूर्वी असे. नारळ हा अपत्याचे प्रतीक कल्पून त्याने ओटी भरावी, म्हणजे तुला चांगले अपत्य होवो, असे म्हटल्यासारखे होते, ही मूळ कल्पना होय; पण नारळ घालणे दर वेळी शक्य होईनासे झाले. मग नारळ नाही तर नाही, निदान त्याची एक वाटी आणि वाटी नाही तर नाही, निदान तिचा एक तुकडा, येथपर्यंत अपत्यासंबंधीची ही सदिच्छा खालावत आली. एक अतिशय उदात्त कल्पना एका क्षुल्लक अवशेषाच्या रूपाने आता शिल्लक राहिली आहे. मुलाची मुंज केली म्हणजे त्याला गुरुगृही पाठवावयाचे आणि तिकडे पाठविताना त्याला पांघरायला हरणाचे कातडे द्यायचे, अशी चाल आश्रमधर्म जेव्हा कडकडीत होते तेव्हा होती; पण दर वेळी आणि प्रत्येक माणसाने हरणाचे कातडे कोठले आणावयाचे ? म्हणून मग त्या कातड्याच्या एका तसूभर तुकड्यावर माणसे भागवू लागली. तुकडा पांघरता येणे अर्थातच अशक्य होते. म्हणून तो जानव्यातच गुंतवून टाकण्याची व्यवस्था केली. पूर्वीच्या चालीरीतींचे, संस्कृतीचे अवशेष लोक असे टिकवून धरतात.

पूर्वी बळी देण्याची चाल फार होती, आणि अजूनही अनेक जातींत ती रूढ आहे, आणि यज्ञात कधी काळी ऋत्विजांनी बोकड मारला, म्हणून त्याचा उपहास करणारे तथाकथित जातिविचारमग्न सुधारक हजारोंच्या-हजारो बोकड अजूनही बळी देत असतात. कोपऱ्यावरून वळायचे झाले, अमूक एका झाडाखालून जायचे झाले की, कोंबडे कापले पाहिजे, ही चाल किती ठिकाणी अजून रूढ आहे; पण ज्या लोकांनी ही चाल मागेच सोडून दिली, त्यांनासुद्धा कोणत्या तरी रीतीने बळी देण्याची कल्पना टिकवून धरावीशी वाटली. म्हणून लग्नाच्या मिरवणुकीत दर कोपऱ्यावर नारळ फडाफड फुटतात. ही मूळची बळी जाणाऱ्या प्राण्यांची प्रतीके होत. प्राणी बळी देता येत नाहीत, तर निदान कोहळा कापावा, या चालीचे उगमस्थान सहज समजण्यासारखे आहे. आता नारळ फोडताना हे मूळच्या बळीचे प्रतीक आहे, हे बहुधा

कोणालाही माहीत नसते. केवळ चालू म्हणून ते हे करतात, तथापि तेवढ्यावरून अभ्यासकमात्र सांगू शकतो की, हे बळीचे प्रतीक आहे.

क्षत्रियांनी दसऱ्याच्या दिवशी शस्त्राची पूजा करावी, हे किती योग्य आहे; पण पूजेला शस्त्र नसले तर, म्हणजे तलवार नसली तर, सुरीची, निदान चाकू-कात्रीची किंवा शेवटी विळीची पूजा करण्यापर्यंत हा चालीचा हट्ट टिकून राहिलेला आहे; पण अभ्यासकालामात्र या विळीच्या द्वारा चाकू, कात्री आणि सुरी यांच्या अंगावरून मूळच्या तलवारीपर्यंत खचीत पोहोचता येते. ही भावना आपल्याच देशात आहे, असे नव्हे. न्यूटन हा आपल्या बागेत बसला असताना एका झाडाखाली त्याची दृष्टी गेली. इतक्यात त्या झाडाचे एक फळ तुटून खाली भुईवर पडले. न्यूटनच्या मनाला टचका बसला आणि फळ खालीच का पडावे, वर का जाऊ नये, बाजूला का जाऊ नये, असा प्रश्न त्याला उत्पन्न झाला आणि या प्रश्नाचा अभ्यास करता-करता, त्याला शेवटी गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला आता या कामी खरे महत्त्व न्यूटनचे आहे, पण ज्या झाडाचे फळ खाली पडले, त्या झाडासंबंधानेसुद्धा एक तऱ्हेची आपुलकी उत्पन्न झाली. मग ते झाड जव्हा वठले, तेव्हा लोकांनी त्याच्या बुंध्याचे, फांद्यांचे काप-कापून बारके तुकडे केले आणि त्या प्रसंगाचे स्मारक म्हणून हे तुकडे त्यांनी आपापल्या कपाटात ठेवून दिले. एका मंगल प्रसंगाचे स्मरण टिकविण्याची त्या लोकांनी केलेली ही तरतूद फार मनोरंजक म्हटली पाहिजे !

जिकडे तिकडे विजेचा लखलखाट आता झालेला आहे आणि आपल्या देवांनासुद्धा तेला-तुपाच्या नंदादीपाऐवजी विजेचा नंदादीप खचीत आवडेल; पण घरात आणि देवघरातसुद्धा विजेचा लखलखाट करूनही तेलाचा नंदादीप आणि तुपाचे निरंजन लावल्याशिवाय मालकीणबाईनाच काय, पण मालक-महाराजांनासुद्धा चैन पडत नाही. बाजारातील शोभिवंत आणि वैभवशाली दुकानांत डोकावून पाहावे, म्हणजे जिकडे-तिकडे विजेचा लखलखाट झाला असला, तरी भिंतीत बसविलेल्या मूर्तीपुढे किंवा चित्रापुढे समईचा लावलेला दिवा आपल्या दृष्टीस पडेल. हे सारे काय आहे ? ही सारी सातत्य टिकविण्याची तरतूद आहे. सावित्रीने यमराजाची आर्जवे करून त्याने कब्जात घेतलेल्या आपल्या नवऱ्याला सोडविले, ही अद्भुत कथा स्त्री-समाजातील सौभाग्य कल्पनेशी कायमची निगडीत झालेली आहे; पण सावित्रीची आर्जवे, आणि

यमराजाची ही शरणागती एका प्रचंड वटवृक्षाच्या खालीच घडून आली. अर्थातच कथा जशी पूज्य तसा वटवृक्षही पूज्य बनला, आणि शतकानुशतके वट-सावित्रीच्या दिवशी स्त्रिया वडाची पूजा करीत आल्या आहेत. आता माणसांनीच आपल्या वस्तीचा इतका गजबजाट केला आहे की, वडांना त्यांच्या वस्तीत जागाच शिल्लक राहिली नाही. म्हणून मग सुवासिनी स्त्रिया एक वडाची डहाळी घेऊन येतात, किंवा उपाध्यायही आपणहून ती तरतूद करतात. ही डहाळी भुईत रोवून तिची पूजा करण्याची वहिवाट आहे. बोधिवृक्षाच्या फांदीत आणि या वटवृक्षाच्या फांदीत पुष्कळच साधर्म्य आहे असे म्हटले पाहिजे! सांगितले तर आश्चर्य वाटेल, पण ही गोष्ट खरी आहे की, शहरात वडाची फांदीही मिळणे अवघड बनले आणि म्हणून सुवासिनी कागदावर वडाचे चित्र काढून त्याची पूजा करतात. परंपरा टिकवून धरण्याचा हा विलक्षण हट्ट अत्यंत मनोरंजक आणि बोधप्रदसुद्धा आहे.

आणखीसुद्धा काही गमतीची उदाहरणे देता येतील. पूर्वी म्हणजे फार पूर्वी, श्राद्धादी प्रसंगी मांसाशनाची चाल होती आणि कोणता पशू मारला असता पितरांना कोणती गती प्राप्त होते, यांचे काही एक कोष्टक स्मृतिकारांनी बसविलेले होते; पण पुढे ही हिंसा बंद पडत चालली आणि शेवटी ती अजिबात बंद झाली; पण श्राद्धाला मांस हवे, या गोष्टीचे स्मरण श्राद्धे चालविणा'ांना होतेच होते. म्हणून त्यांनी मांसाच्या ऐवजी उडदाची योजना केली! कसे-ना कसे जुन्याला चिकटून राहण्याची ही भावनेची चिकाटी मोठी गमतीदार म्हटली पाहिजे. पूर्वी आणि काही अंशी आतासुद्धा लग्नात पायघड्या घालण्याची चाल होती. वरपक्षाकडील विहिणींची मिरवणूक काढावयाची, तर त्यांचे पाय रस्त्याच्या भुईलाच लागू देणे, हे बरोबर नाही, म्हणून रस्त्यांवर मोठमोठ्या पासोड्या पसरण्याची चाल असे. परटाच्याकडे पुष्कळ पासोड्या धुवावयास येत आणि म्हणून या पाय-घड्यांसाठी पासोड्या पुरविण्याचे काम त्यांच्याकडेच सोपविण्यात येई व धुवावयास आलेल्या लोकांच्या पासोड्या काही मोबदला घेऊन परीट लोक मोठ्या खुषीने देत असत; पण ही चाल हळूहळू बंद पडत चालली. विहिणींनाही वाटू लागले की, एवढ्या मानाची आवश्यकता नाही. पण पायघड्यांची खूण मात्र अजूनही शिल्लक राहिली आहे. नवऱ्यामुलाची आई म्हाणजे

मुख्य विहीण, वधूच्या मंडपात येताना तिच्या पायांखाली लुगड्याच्या घड्या घालण्याची चाल अजूनही आहे. या घड्या म्हणजे पूर्वीच्या रस्त्यावरील पायघड्यांचे अवशेषच होत. परटाचाच विषय सहज निघाला आहे, म्हणून आणखी एक अवशेष सांगतो. पूर्वीच्या काळी परटाकडून आलेले कपडे धुऊन घेण्याची चाल होती. पुढे-पुढे ही चाल बंद पडत चालली; पण तिचा अवशेष मात्र परवा-परवापर्यंत कायम होता, आणि खेडेगावात तो कदाचित अजूनही दिसत असेल. तो अवशेष हा की, परटाकडून आलेल्या कपड्यांवर पाण्याचे चार शिंतोडे टाकावयाचे आणि मग ते घरात नेऊन ठेवावयाचे! शेवटी एक मंगलाचे उदाहरण सांगतो. सुवासिनी स्त्रियांच्या कपाळाला केशराचा मळवट भरण्याची चाल असे. केशर ही भोग्य वस्तू, आणि म्हणून अर्थातच ती सुवासिनीच्या कपाळाला मळवटाच्या रूपाने ते लावीत असत. हा मळवट हळूहळू संकोच पावता-पावता चंद्रकोरीपर्यंत आला आणि पुढे त्याचाही ठिपका बनला; पण या ठिपक्यालासुद्धा केशर मिळणे प्रत्येक सुवासिनीला दुरापास्त बनू लागले आणि म्हणून लाल पिंजर लावण्याची चाल पडली. आता तर पुष्कळ बायका एक चिकट तांबडा रंगच लावतात. पूर्वीच्या त्या केशराच्या मळवटाचा हा अवशेष आहे.

अशा प्रकारची अनेक थोटके संभाळून ठेवण्याची शिकस्त माणसाने चालविलेली असते, ती रूढी बनून राहते आणि हिच्याविरुद्ध कोणी काही वर्तन केले तर तो समाजात अप्रिय बनतो, असा हा भूतकाळाला चिकटण्याचा महिमा आहे. भूतकाळाच्या पारंब्या लांब-लांब आणि अनेक आहेत आणि त्यांना लोंबकळत राहण्यात माणसांना सुख वाटते. याचे कारण तरी एवढेच की, आपण एकाएकी आभाळातून पडलेले नसतो, आपण कोणत्या तरी एका संस्कृतीची औरस संतती आहो, आपण केवळ उपरे मुशाफिर नाही, हे वाटवून घेण्यात माणसांच्या अभिमानाचा पोष होत असतो.

कोणा एका कवीने म्हटले आहे की, घड्याळाची जी टकटक चालते, ती म्हणजे भविष्यकाळाच्या खडकाला बसत असलेले छिन्नीचे बारीक-बारीक घावच होत. ही छिन्नी अखंड चालू असते आणि भविष्यकाळाचा हां-हां म्हणता भूतकाळ बनून जातो. आपण भूत, वर्तमान आणि भविष्य अशी तीन काळांची नावे सांगतो; पण या तिहींपैकी मधल्या काळाची रेषा म्हणजे व्याप्ती अत्यंत

यमराजाची ही शरणागती एका प्रचंड वटवृक्षाच्या खालीच घडून आली. अर्थातच कथा जशी पूज्य तसा वटवृक्षही पूज्य बनला, आणि शतकानुशतके वटसावित्रीच्या दिवशी स्त्रिया वडाची पूजा करीत आल्या आहेत. आता माणसांनीच आपल्या वस्तीचा इतका गजबजाट केला आहे की, वडांना त्यांच्या वस्तीत जागाच शिल्लक राहिली नाही. म्हणून मग सुवासिनी स्त्रिया एक वडाची डहाळी घेऊन येतात, किंवा उपाध्यायही आपणहून ती तरतूद करतात. ही डहाळी भुईत रोवून तिची पूजा करण्याची वहिवाट आहे. बोधिवृक्षाच्या फांदीत आणि या वटवृक्षाच्या फांदीत पुष्कळच साधर्म्य आहे असे म्हटले पाहिजे! सांगितले तर आश्चर्य वाटेल, पण ही गोष्ट खरी आहे की, शहरात वडाची फांदीही मिळणे अवघड बनले आणि म्हणून सुवासिनी कागदावर वडाचे चित्र काढून त्याची पूजा करतात. परंपरा टिकवून धरण्याचा हा विलक्षण हट्ट अत्यंत मनोरंजक आणि बोधप्रदसुद्धा आहे.

आणखीसुद्धा काही गमतीची उदाहरणे देता येतील. पूर्वी म्हणजे फार पूर्वी, श्राद्धादी प्रसंगी मांसाशनाची चाल होती आणि कोणता पशू मारला असता पितरांना कोणती गती प्राप्त होते, यांचे काही एक कोष्टक स्मृतिकारांनी बसविलेले होते; पण पुढे ही हिंसा बंद पडत चालली आणि शेवटी ती अजिबात बंद झाली; पण श्राद्धाला मांस हवे, या गोष्टीचे स्मरण श्राद्धे चालविणा।ंना होतेच होते. म्हणून त्यांनी मांसाच्या ऐवजी उडदाची योजना केली! कसे-ना कसे जुन्याला चिकटून राहण्याची ही भावनेची चिकाटी मोठी गमतीदार म्हटली पाहिजे. पूर्वी आणि काही अंशी आतासुद्धा लग्नात पायघड्या घालण्याची चाल होती. वरपक्षाकडील विहिणींची मिरवणूक काढावयाची, तर त्यांचे पाय रस्त्याच्या भुईलाच लागू देणे, हे बरोबर नाही, म्हणून रस्त्यांवर मोठमोठ्या पासोड्या पसरण्याची चाल असे. परटाच्याकडे पुष्कळ पासोड्या धुवावयास येत आणि म्हणून या पायघड्यांसाठी पासोड्या पुरविण्याचे काम त्यांच्याकडेच सोपविण्यात येई व धुवावयास आलेल्या लोकांच्या पासोड्या काही मोबदला घेऊन परीट लोक मोठ्या खुषीने देत असत; पण ही चाल हळूहळू बंद पडत चालली. विहिणींनाही वाटू लागले की, एवढ्या मानाची आवश्यकता नाही. पण पायघड्यांची खूण मात्र अजूनही शिल्लक राहिली आहे. नवऱ्यामुलाची आई म्हणजे

मुख्य विहीण, वधूच्या मंडपात येताना तिच्या पायांखाली लुगड्याच्या घड्या घालण्याची चाल अजूनही आहे. या घड्या म्हणजे पूर्वीच्या रस्त्यावरील पायघड्यांचे अवशेषच होत. परटाचाच विषय सहज निघाला आहे, म्हणून आणखी एक अवशेष सांगतो. पूर्वीच्या काळी परटाकडून आलेले कपडे धुऊन घेण्याची चाल होती. पुढे-पुढे ही चाल बंद पडत चालली; पण तिचा अवशेष मात्र परवा-परवापर्यंत कायम होता, आणि खेडेगावात तो कदाचित अजूनही दिसत असेल. तो अवशेष हा की, परटाकडून आलेल्या कपड्यांवर पाण्याचे चार शिंतोडे टाकावयाचे आणि मग ते घरात नेऊन ठेवावयाचे! शेवटी एक मंगलाचे उदाहरण सांगतो. सुवासिनी स्त्रियांच्या कपाळाला केशराचा मळवट भरण्याची चाल असे. केशर ही भोग्य वस्तू, आणि म्हणून अर्थातच ती सुवासिनीच्या कपाळाला मळवटाच्या रूपाने ते लावीत असत. हा मळवट हळूहळू संकोच पावता-पावता चंद्रकोरीपर्यंत आला आणि पुढे त्याचाही ठिपका बनला; पण या ठिपक्यालासुद्धा केशर मिळणे प्रत्येक सुवासिनीला दुरापास्त बनू लागले आणि म्हणून लाल पिंजर लावण्याची चाल पडली. आता तर पुष्कळ बायका एक चिकट तांबडा रंगच लावतात. पूर्वीच्या त्या केशराच्या मळवटाचा हा अवशेष आहे.

अशा प्रकारची अनेक थोटके संभाळून ठेवण्याची शिकस्त माणसाने चालविलेली असते, ती रूढी बनून राहते आणि हिच्याविरुद्ध कोणी काही वर्तन केले तर तो समाजात अप्रिय बनतो, असा हा भूतकाळाला चिकटण्याचा महिमा आहे. भूतकाळाच्या पारंब्या लांब-लांब आणि अनेक आहेत आणि त्यांना लोंबकळत राहण्यात माणसांना सुख वाटते. याचे कारण तरी एवढेच की, आपण एकाएकी आभाळातून पडलेले नसतो, आपण कोणत्या तरी एका संस्कृतीची औरस संतती आहो, आपण केवळ उपरे मुशाफिर नाही, हे वाटवून घेण्यात माणसांच्या अभिमानाचा पोष होत असतो.

कोणा एका कवीने म्हटले आहे की, घड्याळाची जी टकटक चालते, ती म्हणजे भविष्यकाळाच्या खडकाला बसत असलेले छिन्नीचे बारीक-बारीक घावच होत. ही छिन्नी अखंड चालू असते आणि भविष्यकाळाचा हां-हां म्हणता भूतकाळ बनून जातो. आपण भूत, वर्तमान आणि भविष्य अशी तीन काळांची नावे सांगतो; पण या तिहींपैकी मधल्या काळाची रेषा म्हणजे ब्याती अत्यंत

सा...३

निरुंद असते. भूतकाळाचे परटोक कुणीही पाहिलेले नाही आणि भविष्यकाळाचे परटोकही कुणाला दिसेल, असे वाटत नाही; पण पुढून धावत येऊन भविष्यकाळ भूतात विलीन होत असतो आणि हे विलीनीकरण व्हावयास जेवढा थोडासा वेळ लागतो, तेवढ्यालाच वर्तमानकाळ हे नाव आहे. एखाद्या प्रचंड धबधब्याचे चित्र डोळ्यांपुढे आणावे. पर्वताच्या विस्तीर्ण पठारावर पसरलेला आणि फेसाळलेला पाण्याचा प्रवाह डोंगरावरून खाली कोसळतो आणि मग खालच्या खडकातून धावत सुटतो. डोंगरावरून कड्यापर्यंत येताना तो भविष्य असतो, खालच्या खडकातुन धावत सुटला, म्हणजे तो भूत होतो; पण त्याला कोसळण्याला जेवढा थोडासा अवधी लागतो, तेवढ्याचा वर्तमान बनतो. अशी लक्षावधी वर्षे मागे गेलेली असल्यामुळे त्यात काय आहे, हे पाहण्याची इच्छा मानवाला आपोआपच होते आणि त्याहीपेक्षा त्यात ठेवून घेण्यासारखे काय आहे, हे पाहून घेण्याची इच्छा तर केवळ अनावर असते. या ठेवून घेतलेल्या गोष्टीसुद्धा आपल्या मूळच्या पूर्ण राहू शकत नाहीत. त्यांच्या दशा किंवा त्यांची थोटके शिल्लक राहतात, आणि तेवढयावरसुद्धा माणसाची जात संतुष्ट राहते!

# ऐतिहासिक चरित्र-लेखन

दत्तो वामन पोतदार

ऐतिहासिक चरित्रे लिहिण्यास निदान एवढी तरी पूर्वतयारी केली पाहिजे (१) ज्याचे चरित्र लिहावयाचे, त्या व्यक्तीविषयी सत्य, साधार अशा माहितीचे संकलन. त्यात स्थल–काल–प्रसंग–घटना–निश्चय, काल–नाम-निश्चय इत्यादी सर्व खटाटोप अभ्यासपूर्वक करावा लागतो. (२) व्यक्ती ज्या देशकालपरिघातील असेल, त्या देशकालपरिघातील परिस्थितीचाही स्थळ काळ-व्यक्ति-निश्चयपूर्वक सप्रमाण अभ्यास करावा लागतो. (३) तौलनिक दृष्टीने व्यक्तिचरित्रावर प्रकाश टाकता यावा म्हणून अन्य देशांच्या इतिहासांशीही शक्य तितका परिचय असावा लागतो. (४) चरित्रविषय ज्या कार्यक्षेत्रातला असेल, त्या कार्यक्षेत्राचे स्वरूप मानवी विकासात कसकसे उत्क्रांत व परिवर्तित होत गेले आहे, त्याचा अभ्यास करावा लागतो. (५) समगुण व समकर्तृक अन्य इतिहासप्रसिद्ध व्यक्तींच्या चरित्रांशी चरित्रविषय तोलून पाहण्याची शक्ती लागते. (६) याशिवाय मानवस्वभावपरिज्ञान, लेखनचातुरी, रचनाकौशल्य इत्यादी आनुषंगिक गुणांचीही आवश्यकता यशस्वी चरित्रलेखकास असते. चरित्र लिहिण्यात लेखकाचा काही हेतूही असण्याचा संभव आहे. केवळ घटितांचे कार्यकारणभाव प्रमाणोपलब्ध रितीने दाखवून देण्याने हा हेतू साध्य होत नाही. मानवी जीवनातील अनेक प्रश्नांबाबत लेखकाचे जे तत्त्वज्ञान असेल, त्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोणातूनच तो चरित्र-विषयाचे दर्शन स्वतः घेईल व इतरांस करून द्यावे, असे इच्छील. येथे तो चरित्रविषयाचा मानवी जीवनातला अर्थ सांगण्यास स्वमतीप्रमाणे प्रवृत्त होत असतो. केवळ ‘ निर्लेप व निरंजन ’ इतिहासकाराची भूमिका ही नव्हे; तर स्वमताच्या रंगाची काच धरून त्यातून तो चरित्रवस्तू पाहत व

दाखवीत असतो. नीरंग भूमिकेतून जुळविलेला व्यक्तिस्थलकालनिश्चयस्वरूप, कार्यकारणसंबंधदर्शक मांडणीचा इतिहास आधीच अवगत असेल, तर असे लेखकरंजित इतिहास किंवा चरित्रग्रंथ वाचण्यापासून वाचकास स्वमतनिर्णयास उत्कृष्ट खाद्य मिळून लाभच होतो; पण अरंजित भूमिकाच अनुपलब्ध असल्याने आणि प्रथमच रंजित भूमिकेवरून वस्तूचे आकलन करण्याचा प्रसंग आल्यास वाचकास सम्यग्दर्शन होईलच, अशी खात्री नाही.

मराठ्यांच्या इतिहाससंबंधाने आपली स्थिती आज अशी आहे की, साधनभूमीच अजून आपण सिद्ध करीत आहोत. ऐतिहासिक साहित्य जमवून, संग्रहून, स्थलकालघटनादिकांचा निश्चय करण्याचे काम आपल्याकडे आज पन्नासपन्नास वर्षे परिश्रमपूर्वक चालू आहे. प्रत्यही आपला साधनसंग्रह वाढत आहे. साधारण वाचकास या कच्च्या साहित्याचा तादृश उपयोग नसतो. सुसंगत कथा सांगणारा वृत्तांत त्यास लागत असतो. साधनसंग्रहाचे काम अमूक दिवशी संपणार, असा निश्चय नसल्यामुळे आणि प्रत्यही तो संग्रह वाढत असल्याने, उपलब्ध साधनांच्या आधारे कार्यकारणभाव ठरवून तयार केलेला वृत्तांतरूप इतिहास वाचण्यास तो उत्सुक असतो. असे इतिहासही गेल्या शे-सव्वाशे वर्षांत कित्येकांनी लिहिले आहेत. जुने धागे कुचके, चुकीचे म्हणून तोडावे लागत आहेत. अशी घडामोड चालू असल्यामुळे जुने इतिहास-वृत्तांत बदलून नवे रचून सांगण्याचे कामही चालू आहे; आणि या दोन्ही क्रिया समाजहितकारीच आहेत. निवळ साधनांचा उपयोग साधारण समाजास तर काहीच नाही; आणि तोवर जिज्ञासेची भूक मारून स्वस्थ राहणे तर मूर्खपणाचेच ठरणार, म्हणून यावच्छक्य प्रयत्नांनी प्रमाणनिर्णीत साधनांच्या आश्रयाने इतिहासाचा पट विणून लोकांसमोर ठेवलाच पाहिजे.

तसे म्हटले, तर मराठ्यांच्या इतिहासाची सामग्री आता पुष्कळच उपलब्ध झालेली आहे सामग्रीच्या मानाने चिकित्सेचे काम फार कमी झालेले आहे. पण ज्या प्रसंगाविषयी साधारणपणे बरी सामग्री उपलब्ध झाली आहे, असे सुटे सुटे प्रसंग व प्रकरणे निवडून त्यावर सप्रमाण चर्चा व चिकित्सा व्हावयास पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे, म्हणजे आता प्रबंध ( monographs ) लिहिण्याची वेळ निःसंशय आली आहे. हे कार्य अर्थात तज्ज्ञांनीच केले पाहिजे. प्रथम प्रमाणपरीक्षापूर्वक साधनसंग्रह, नंतर प्रबंधरचना व सुसंगत

इतिहासवृत्तांत व मग विवेचक इतिहास, असा क्रम असतो. माधवराव पेशव्यांबद्दल बोलावयाचे झाल्यास मराठी व इंग्रजी या भाषांतली बरीच सामग्री आजवर प्रसिद्ध झाली आहे; अमुद्रित सामग्रीही पुष्कळ आहे; परंतु निजामी दप्तरखाना प्रचंड असून तो माधवरावकालीन घटनांशी दृढ निगडित असून त्यातील ऐतिहासिक साहित्य अद्यापी प्रसिद्ध झाले नाही व अन्य रित्याही अभ्यासिले गेले नाही. त्याचप्रमाणे सखारामबापू, नारो शंकर, विंचूरकर, धायगुडे, चंद्रचूडप्रभृती अनेक तत्कालीन प्रसिद्ध पुरुषांकडील पत्रव्यवहार कोठे मिळेल, तर शोधण्याचे काम व्हावयाचे आहे. हिंगणे-घराण्याचाही मोठा, महत्त्वाचा संग्रह अद्यापी अप्रसिद्ध आहे. तसेच कर्नाटकातील सावनूर, बंकापूर वगैरे भागांतील अनेक लहानमोठ्या घराण्यांतील कागदपत्र पुढे आले पाहिजेत; पण हे सर्व काळाधीन आहे; केवळ स्वाधीनचे नाही. इतिहासकाराला काही एवढ्यासाठी अडून बसून आपले कार्य थांबविता येत नाही. उपलब्ध सामग्रीची छाननी करून ऐतिहासिक घटनांचा कालस्थल–बद्धपट प्रथम तयार करणे, हे त्याचे पहिले काम. मग या पटात जेथे त्रुटी असेल, तेथे अनुमान-तर्कादिकांच्या साहाय्याने संगती लावणे व तो पट पूर्ण करणे, हे त्याचे दुसरे काम, आणि या पटातील धाग्या-दोऱ्यांचे संबंध लावून दाखवून सर्व पटाचे परीक्षण मानवी जीवन-सूत्रांस अनुसरून करणे हे त्याचे तिसरे काम. मागे सुचविल्याप्रमाणे मधले म्हणजे प्रामाणिक प्रबंधरचनेचे कार्य अद्यापी व्हावयाचे आहे. ते झाल्यावर इतिहासकाराचे काम बरेच सुकर होते. तसेच, इतिहासकारास पूर्वकाळात वावरावयाचे असल्याने तत्कालीन मानवी जीवन, भूरचना, स्थलस्थिती, स्थलमाहात्म्य, विचारपरंपरा इत्यादिकांचे सूक्ष्म व सांगोपांग ज्ञान असेल तितके उपयोगी पडते. प्रत्यक्ष स्थळे पाहण्याची व तत्कालीन भूमिपट आपल्यासमोर उभा करण्याची आवश्यकताही फार असते.

इतकी सर्वांगसुंदर पूर्वतयारी करणे हे काही सोपे नाही. दीर्घ व्यासंगाचे, परिश्रमाचे व खर्चाचेही हे काम आहे. ते घडेल तेव्हा घडेल. तोवर 'यथामिलितोपचारैः' कार्य करण्यास काय हरकत ? याच दृष्टीने प्रेरित होऊन एखाद्याने चरित्रलेखनाचे कार्य हाती घेऊन पुरे केले, तर ते केव्हाही स्तुत्यच ठरेल. कै. वासुदेवशास्त्री खरेप्रभृतींनी आपल्या ग्रंथांतून जे कार्य करून ठेविले आहे. त्याचा लाभ कोणाही ग्रंथकाराने घेणे हे क्रमप्राप्तच

ठरते. त्याशिवाय रिसायतकारांनाही माधवरावचरित्रासारखी चरित्रे रिसायत-ग्रंथावलीत अंतर्भूत करावी लागलीच आहेत. आणखीही एक-दोन लहान-मोठे प्रयत्न माधवरावचरित्राविषयी प्रसिद्ध आहेत. इतके असूनही स्वतंत्र व :विस्तृत माधवरावचरित्र मराठीत नव्हते आणि ही उणीव प्रस्तुतच्या ग्रंथाने काही अंशांनी तरी भरून निघत आहे हेच या ग्रंथाचा पुरस्कार करण्यास पुरेसे कारण आहे. याहीपेक्षा मागे सांगितलेल्या पूर्वतयारीने लिहिलेला चरित्रग्रंथ लिहिला जाईल, तेव्हा तो स्वयंपुरस्कृतच होईल; पण दुधाची तहान ताकाने भागविणे हे व्यवहारात सर्वमान्यच असते.

मर्यादित अधिकाराने कोणी चरित्रलेखन केले, तरी मर्यादेतही परंपराक्रम बसू शकतोच. आवश्यक अशा सर्वांगाची तयारी उत्तम नसली, तरी काही आवश्यक अंगाची तयारीदेखील उत्तमातली असेल, तर चरित्राला प्रामाण्य व योग्यता तितकी बरीच लाभते. तथापी, प्रेमवश होऊन जेवढा अधिकार मिळविता आला, तेवढ्यात समाधान मानून कोणी ग्रंथनिष्पत्ती, केली तरी ती स्वागतार्ह का समजू नये ? लेखकाच्या मर्यादांवर लक्ष ठेवूनच आपण चाललो, म्हणजे आपणाला नेमकेपणा साधेल आणि मग ग्रंथकाराचे योग्य कौतुक करण्यास आपणांस कसलाही संकोच वाटणार नाही. ग्रंथकाराची भूमिका तज्ज्ञांची किंवा प्रमाण-ग्रंथकाराची जेथे नाही, तेथे अर्थात प्रमाणग्रंथाच्या कोटीत तो ग्रंथ पडणार नाही हे निराळे लिहिण्याची गरज नाही. यावज्जीव अभ्यासकाची प्रमाणचालना निराळ्या कोटीत पडते आणि तदितरांची अर्थात आंगिक व संपादित योग्यतेच्या क्रमाने स्वानुरूप कोटीत पडते. वाचकांना एखाद्या ग्रंथाची कोटी लक्षात येण्यास आता अडचण पडणार नाही.

तज्ज्ञाची कोटी नसली व तदितराची असली तरीही चालेल, पण प्रतिध्वनिरूप लेखन करण्याचा मोह लेखकाला पडला की मोठे भय सहज प्राप्त होते. असली वर्तमानपत्री भूमिका इतिहासकाराला पोषक होत नाही. या मोहासारखाच दुसरा मोह म्हणजे अनेकांची मते अनुवादण्याच्या भरीस पडून मोठमोठ्या विकट व व्यापक विषयांवर त्यांची चरित्रात वास्तविक गरज केवढी, इकडे दुर्लक्ष करून चर्चा करणे हा होय. अर्थात असे मोठाले व व्यापक विषय हाती धरण्यास केवढी पूर्वतयारी पाहिजे, हे निराळे सांगण्याची गरज नाही; पण अनावश्यकपणा स्पष्ट दिसत असताही अशा एखाद्या ग्रंथकारास तो टाळता येत नाही आणि मग

एल्फिन्स्टन, रानडे व केळकर अशांसारख्या विद्वानांची मते उतरून घेण्याखेरीज सोपा मार्ग ग्रंथकर्त्यास सापडत नाही, यात आश्चर्य नाही.

नवीन साधनांचे मंथन करून जुने इतिहास पुन्हा लिहिण्याचा काळ आता आलेला आहे. जुन्या पंडितांची मते व माहिती ही आता गतवर्गात पडली आहेत, परशुरामभाऊ व पुनर्विवाह, बाजीराव व समशेरमुंज इत्यादी उदाहरणे गतवर्गातली होत. नवे साल उगवले असता गतवर्षाचे पंचांग कितपत उपयोगी पडणार? एवढा इशारा पुरेसा होईलसे वाटते. ' हिंदुपदपातशाही ', ' राष्ट्र ' इत्यादी शब्दयोजनाही कित्येक ग्रंथकारांनी मराठ्यांच्या इतिहासाचे विवरण करताना केली आहे; परंतु शास्त्रशुद्धतेचे स्वरूप त्यास नाही. त्यामुळे अशा कल्पनांचा अनुवादही असिद्धानुवाद कोटीत घालणे भाग आहे.

# एकरूप होऊ सगळे

श्रीनिवास नारायण वनहट्टी

संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यामुळे मराठी जनतेची फार मोठी आकांक्षा सफल झाली, चिरवांछित स्वप्न साकार झाले. मराठी संस्कृती, मराठी परंपरा यांच्यांविषयीचा अभिमान भरास आला आणि प्रगतीविषयीच्या आकांक्षा गगन ठेंगणे वाटेल इतक्या उंचावल्या.

केवळ भावनेच्या भरी न जाता वस्तुस्थिती पडताळून घेणे या घटकेस फार उपयोगी ठरेल. बेळगाव-कारवारसारखे असंमत रीतीने बाहेर घातलेले आणि डांग-उंबरगावसारखे राजीखुशीने दान केलेले काही थोडे प्रदेश वगळल्यास बाकीचा सर्व मराठीभाषी प्रदेश आज जसा एका शासनसत्तेखाली एकवटला आहे, तशी स्थिती पूर्वी कधी नव्हती. आज सर्व मराठी जनतेचे एक राज्य झाले आहे. पूर्वी ही जनता भिन्नभिन्न राज्यांमध्ये विभागलेली होती. मराठी भाषा व मराठी जनता इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून बनत चालली होती, असे मानले, तर उत्तरेस राष्ट्रकूट, दक्षिणेस चालुक्य आणि पश्चिमेस व नैर्ऋत्येस काही लहान राज्ये अशी स्थूल मानाने प्राचीन काळातील राज्यसत्तेची विभागणी होती, असे दिसते. नंतर यादवांचे साम्राज्य झाले. सगळा मराठी मुलूख कधी त्यांच्या सत्तेखाली आला असल्याचे दिसत नाही. त्यानंतर बहामनी साम्राज्य आले. त्याच्या अमलाखाली कोकणपट्टी व खानदेश बहुतकरून नसावा. बहामनी साम्राज्याची पाच मुसलमानी राज्ये झाली, त्यामुळे मराठी मुलखाची राजकीय दृष्ट्या आणखी शकले झाली. पुढे शिवाजीमहाराजांनी स्वराज्यस्थापना केली; पण खानदेश, वऱ्हाड, नागपूर हा मराठी मुलूख राज्यात अंतर्भूत होऊ शकला नाही. पेशवाईच्या काळात नागपूरकर भोसले, पेशवे आणि निजाम या तीन सत्तांमध्ये मराठी मुलखाची तिफाळणी झालेली होती.

तोच वारसा पुढे इंग्रजी सत्तेने घेतला. महाराष्ट्राची ही तिभंगलेली स्थिती परवा-पर्यंत म्हणजे सहा वर्षांपूर्वी राज्यपुनर्रचना होईपर्यंत कायम होती.

मराठी प्रदेश अनेक राजसत्तांमध्ये याप्रमाणे विभागलेला राहिल्यामुळे अलगपणाची भावना जोपासली गेली. मराठी जनतेमध्ये ऐक्य भरपूर आहे. देव, दैवते, धार्मिक आचार, विचार, पेहेराव, भोजनपद्धती, सण-समारंभ, करमणुकी व समजुती सर्वत्र साधारणपणे सारख्या आहेत. स्थानपरत्वे आणि जातिपरत्वे भेद आहेत, ते परकेपणा वाटण्याइतके मोठे नाहीत. नागपूरचा मराठी माणूस कोल्हापुरास गेला तरी निराळ्या समाजात आलो, असे त्याला वाटणार नाही; पण शेजारच्या हिंदीभाषी सद्गृहस्थाच्या घरी गेला, तर अति आदबशीर भाषणापासून तो महिलांच्या अदर्शनापर्यंत अनेक गोष्टींत त्याला निराळेपण भासू लागते. मराठी प्रदेशात स्थानपरत्वे निरनिराळ्या बोली असल्या व त्या सगळ्या श्रवणीय, अभ्यसनीय असल्या, तरी संपूर्ण महाराष्ट्राची भाषा मराठी ही एकच आहे.

म्हणजे सामाजिक व भाषिक ऐक्य आहे; पण भावनात्मक ऐक्य उणे पडते. राजकीय सत्तांच्या भिन्नतेमुळे अलगपणाच्या भावनेने मूळ धरले आणि ते दोन-अडीचशे वर्षांच्या परंपरेने वाढीस लागले. हे भेदभावनेचे रोपटे कसे उपटायचे आणि ऐक्यभावनेचे रोपटे कसे वाढवावयाचे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर "महाराष्ट्राच्या निरनिराळ्या प्रादेशिक विभागांमध्ये एकतेची भावना निर्माण करणे हा यानंतरचा आपला पहिला कार्यक्रम असला पाहिजे," अशा अर्थाचे उद्गार मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी काढले होते, ते या दृष्टीने अत्यंत अर्थगर्भ वाटतात.

ज्या भावनेला संस्कृतीत, समाजरचनेत, जीवनपद्धतीत आधार नाही, तिचे निर्मूलन कठीण वाटू नये. हा नागपुरी, हा वऱ्हाडी, हा पुणेरी, हा कोल्हापुरी, हा कोकणी, हा मराठवाडी अशी भेदाची भाषा यापुढे कोणत्याही तोंडातून वा लेखणीतून न निघणे बरे. 'पुणेरी' वृत्ती जी समजली जाते, ती वास्तविक पुण्यातल्या सर्व लोकांच्या ठायी असते असे नाही आणि नागपुरात, कोल्हापुरात किंवा इतरत्रही तशी वृत्ती पुष्कळ आढळेल. वऱ्हाडी दिलदारपणा नाशकात किंवा साताऱ्यातही आढळेल. तर कोल्हापुरी रंगेलपणा नागपुरात कमी प्रमाणात दिसेल, असे नाही. तेव्हा गुणांचा किंवा अवगुणांचा प्रदेशाशी संबंध जोडून

काही विधाने करण्याचे सर्वांनी कटाक्षानें टाळावे. विदर्भात आले की, विदर्भाची स्तुती व पश्चिम महाराष्ट्राची निंदा, कोकणात बोलताना कोकण्यांचा गौरव आणि पुणे-साताऱ्याचा उद्धार, असे करण्याचा कित्येक वक्त्यांना मोह होतो. खरे पाहता दळणवळणाची जलद साधने, व्यापार-उद्योग, राज्यकारभार इत्यादी कारणांमुळे लोकांचे चलनवलन व संघटन इतके वाढले आहे की माणसाचे प्रादेशिक वैशिष्ट्य म्हणून जे सांगितले जाते, त्याला पूर्वीच्या स्थितिप्रधान काळात यदाकदाचित काही अर्थ असला, तरी आता तो राहिलेला नाही. तेव्हा सर्व बाजूंनी सामंजस्य वाढविणे ज्या काळात सर्वांचे पवित्र कर्तव्य आहे, अशा या काळी भेद-भावावर भर देणारी वस्तुतः निरर्थक अशी विधाने करण्यात काय अर्थ आहे ?

प्रादेशिक पंक्तिप्रपंचाची ओरड अशीच भावनोद्दीपनास कारण होते. ज्या विशिष्ट लोकांवर किंवा वर्गांवर अन्याय झाला असेल किंवा ज्यांच्याकडे दुर्लक्ष होत असेल, त्यांच्याकरिता दाद जरूर मागावी व रास्त मार्गाने चळवळही करावी; पण विदर्भावर अन्याय, मराठवाड्याविरुद्ध पंक्तिप्रपंच, असले उद्घोष करण्यात मतलब काय ? असल्या गोष्टींसंबंधात सरकारवरही पुष्कळ जबाबदारी येते, हे येथे सांगणे जरूर आहे. प्रादेशिक भावना उद्दीपित करणाऱ्या अशा ज्या आरडाओरडी होतात, त्यांच्या संबंधाने वस्तुस्थिती काय आहे, खरी गाऱ्हाणी कुणाची आहेत, ती दूर करण्यासंबंधाने सरकार काय करीत आहे, हे लोकांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन सरकारने ताबडतोब तपशीलवार सांगावे, याकरिता सुयोग्य अशी यंत्रणा जर सरकारजवळ तयार नसेल, तर ती सरकारने निर्माण करावी. लोकांना खरी परिस्थिती माहीत नसल्यामुळे अशा आरडाओरडी लोकांचे मन दूषित करू शकतात

यापेक्षा अधिक महत्त्वाचा आणि आजवर अनेकांनी बोलून दाखविलेला विचार हा की, विदर्भ ( म्हणजे जुना मध्यप्रदेश ) आणि मराठवाडा यांच्या कारभारात आणि राज्ययंत्रणेत चांगल्या गोष्टी होत्या. त्यांचा स्वीकार महाराष्ट्र-राज्य सरकारने त्वरित आणि विनासंकोच करावा. जुन्या मध्यप्रदेशाच्या राज्य-कारभारात कित्येक उदार, समंजस व माणुसकीच्या प्रथा होत्या. विदर्भातील माध्यमिक शिक्षण अधिक पायाशुद्ध व पुढारलेले होते, ही प्रस्तुत लेखकाच्या स्वानुभवाची गोष्ट आहे. कायदे, राज्यकारभार व शिक्षण यांची एकरूपता सर्व महाराष्ट्र राज्यात शक्य तितक्या लवकर प्रस्थापित झाली पाहिजे. ही एकरूपता

चांगल्या गोष्टी संग्रह करून प्रस्थापित करावी; जुन्या मुंबई राज्याच्या ठोकळेबाज, जरठ पद्धतीचा ओंडका सर्वांच्या माथ्यावर लादून नव्हे.

अशी एकरूपता प्रस्थापित झाली म्हणजे राज्याचे सध्याचे संभाग जसेच्या-तसेच कायम राखण्याची तरी काय जरुरी आहे? जुन्या मध्यप्रदेशातून आलेल्या आठ जिल्ह्यांचाच विदर्भ हा संभाग करणे किंवा निजाम राज्यातून आलेल्या पाच जिल्ह्यांचाच मराठवाडा या नावाचा संभाग करणे, या प्रकारामुळे प्रादेशिक भेदभावनेचे, न-कळत का होईना, पोषण होते. पूर्वीची राजकीय भेदाची परंपरा काही अंशाने कायम राखली जाते. त्यापेक्षा सहा-सहा जिल्ह्यांचे पूर्व, मध्य, पश्चिम आणि दक्षिण या नावाने चार भाग करून उरलेल्या ठाणे जिल्ह्यासह मुंबई शहराचा पाचवा संभाग करावा. १ नागपूर, चांदा, भंडारा, वर्धा, यवतमाळ, नांदेड; २ अमरावती, अकोला, बुलढाणा, परभणी, औरंगाबाद, जळगाव; ३ धुळे, नाशिक, नगर, बीड, पुणे, कुलाबा; ४ रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, धाराशीव (उस्मानाबाद); ५ ठाणे, मुंबई; याप्रमाणे हे संभाग कल्पिता येतील. संभागांची संख्या अगर जिल्ह्यांची विभागणी यासंबंधाने आग्रह कोणताच नाही. मुख्य उद्देश वर सांगितला आहे, तो साध्य होईल, अशी कोणतीही व्यवस्था अमलात आली, तरी चालेल.

प्रादेशिक भेदभावनेप्रमाणे जातीय भेदभावनेच्या निर्मूलनाचे प्रयत्न जारी राखणे अवश्य आहे. या भेदभावनेचा सध्या बऱ्याच वेगाने ऱ्हास होत आहे, यात शंका नाही; पण त्या वेगाला आणखी चालना देणे आणि चाललेले प्रयत्न अधिक पायाशुद्ध रीतीने करणे जरूर आहे. प्रादेशिक आणि जातीय भेदविषावर उतारा म्हणून आपल्या होऊन गेलेल्या थोर विभूतींच्या विचारधनाचे संगोपन करणे आणि त्यांचा जीवनसंदेश समाजात मुरविणे याचा उपयोग होईल. थोर पुरुषांच्या पुण्यतिथी आपण साजऱ्या करीत असतो, पण त्यांची योजना वरील उद्देशाच्या पूर्तीच्या दृष्टीने कशी करता येईल याचा विचार आपण कितीसा केला आहे? लो. टिळकांची पुण्यतिथी ब्राह्मणांनी साजरी करणे, महात्मा फुल्यांची माळी लोकांनी साजरी करणे किंवा डॉ. आंबेडकरांची महारांनी साजरी करणे, यात त्या विभूतींच्या महाराष्ट्रीयत्वाचा आणि भारतीयत्वाचा कितीसा गौरव होतो? प्रस्तुत लेखकाला या तिघांच्या पुण्यतिथिसमारंभांत पुष्कळदा बोलण्याचा प्रसंग येतो. तेव्हा समारंभाचे चालक

व संघटक त्या त्या विभूतींच्या जातीचेच लोक बहुधा असतात, असे दिसून येते. आमच्यासारख्यांना बाहेरचे पाहुणे म्हणून बोलावण्यात येते; पण 'घरची' मंडळी बहुधा त्या-त्या जातीची असतात; पण त्यात काय मौज आहे ? टिळकांनी उत्सव सुरू केला, तो शिवाजीमहाराजांचा, रामदासांचा किंवा पहिल्या बाजीरावाचा नव्हे. ब्राह्मणमंडळी जर डॉ. आंबेडकरांचा उत्सव करण्यात पुढाकार घेतील आणि महार मंडळी जर टिळकांचा उत्सव स्वयंस्फूर्तीने करतील, तर ते महाराष्ट्राच्या एकतेचे खरे प्रतीक होईल. मग हे सगळे ब्राह्मण अगर महार राहणार नाहीत, सर्वजण 'मराठे' होतील. तसे व्हावेत, व्हायला पाहिजेत.

म्हणून मी असे सुचवितो की, प्रत्येक मोठ्या गावी सर्वांचे मिळून एक उत्सवमंडळ असावे. त्याने सर्व जातींच्या (व सर्व प्रादेशिक विभागातल्या) विभूतींचे उत्सव साजरे करावेत आणि त्यांच्या जीवनसंदेशांचा प्रसार करावा. महाराष्ट्रीयांच्या जीवनाचा उद्धार करणाऱ्या थोरांत थोर अशा पुढील व्यक्तींचा पुण्यतिथि-उत्सव सर्वत्र अवश्य साजरा व्हावा : १. ज्ञानेश्वर २. तुकाराम ३. शिवाजी-महाराज ४. जमशेटजी नसरवानजी टाटा ५. महात्मा ज्योतिबा फुले ६. लोकमान्य टिळक ७. डॉ. आंबेडकर. हे महाराष्ट्राचे सप्तर्षी होत.

साधारण मराठी वाचकास यांच्यापैकी चौथ्या क्रमांकाच्या व्यक्तीविषयी प्रश्न पडेल. बाकीच्या सहाजणांसंबंधाने येथे अधिक सांगण्याची जरुरी नाही. जमशेटजी टाटा हा महाराष्ट्रात किंबहुना अखिल भारतात औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवणारा महान प्रतिभाशाली पुरुष होऊन गेला. त्याचे चरित्र अत्यंत स्फूर्तिदायक आहे. महाराष्ट्राच्या एकरूपतेच्या आणि उत्कर्षाच्या दृष्टीने इतरांच्या बरोबर या पुरुषाचे संस्मरण अवश्य होय.

आता जिल्हा-परिषदा आल्या आहेत. त्यांनी गावोगाव उत्सवमंडळे निर्माण करून या सप्तर्षींचे पुण्यतिथिउत्सव साजरे करावे. हे उत्सव आटोपशीर, वक्तशीर आणि गांभीर्ययुक्त व्हावेत. प्रत्येक उत्सवात सर्व जातींचा, सर्व वर्गांचा समावेश व्हावा. त्यातून उद्योगाला, कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळावे. मराठी जनतेच्या एकरूप प्रगतीचे प्रभावी साधन म्हणून यांचा उपयोग व्हावा.

या सप्तर्षींच्या जीवनातील तेजाचा, त्यागाचा, ऐक्याचा व समतेचा संदेश मराठी जनतेच्या अंतःकरणात कोरून बसविणे हे संयुक्त महाराष्ट्रासाठी बळी गेलेल्या हुतात्म्यांचे अति-उज्ज्वल स्मारक होईल. कारण त्यांचे बलिदान यांच्याकरिताच झाले.

# एक अपूर्व संध्या

नरहर विष्णु गाडगीळ

साध्या गोष्टीसुद्धा प्रसंगाने आणि परिस्थितीने असाधारण आणि असामान्य होतात. मानवी जीवनातच हे होते असे नाही, तर सृष्टीमध्येही हे घडत असते. दोन नद्या एकत्र आल्या, संगम झाला, ही अगदी साधी गोष्ट आहे; पण यातच एक असाधारण भावना उत्पन्न होते. मानवी मनात तिचे प्रतिबिंब उतरते. संगम म्हणजे क्षेत्र ही समाजाची धारणा होते. मग तो संगम समोरासमोर झाला की, मनुष्य त्या गोष्टीला अधिक महत्त्व देतो. त्या संगमाचे महत्त्व अधिक मानतो. नद्या अनेक आहेत; पण प्रत्येकीला मनुष्य काही पुण्यसलिला मानीत नाही. वास्तविक प्रत्येक नदी, प्रत्येक नाला यांचे कूळ एकच. आकाशातून पडलेले पाणी समुद्राप्रत जाते, आणि या प्रवासात ज्या प्रमाणात त्या-त्या नदीचा व्याप व विस्तार वाढतो, त्या: प्रमाणात ती पवित्र मानली जाते. ती "तीरांच्या पादपांचे" वर्धन करीत जाते, तीरावरल्या भूमिभागाला समृद्ध करीत जाते, काठांवर बसलेल्या मानवांच्या जीवनात आनंद पसरीत जाते आणि मग अशा विशाल नदीच्या तीरांवरील प्रदेशांतून अज्ञात काळात कुणी तप केल्याच्या कथा प्रसृत होतात. पुराणे मग इतिहास बनतात, आणि सामान्य गोष्टीसुद्धा प्रेरक आणि उत्साह देणाऱ्या ठरतात.

वास्तविक सृष्टी हे एक महाकाव्य आहे. या काव्याला अंत नाही. त्यात किती खंड आहेत, हे कुणी सांगू शकत नाही. पर्वत आणि नद्या, लहान-मोठी सरोवरे, सागर आणि महासागर ही सर्व त्या महाकाव्याची पर्वे आहेत, असे म्हटले आहे. पर्वताच्या गुंफांत आणि नद्यांच्या संगमांच्या सान्निध्यात मानवाची बुद्धी सर्जनशील होते. अथांग रत्नाकराकडे, विशाल महासागराकडे पाहून तीच गोष्ट अनुभवाला येते. प्राचीन ऋषिमुनींनी आपले धर्मग्रंथ याच

वातावरणात निर्माण केलेले आहेत. या व असल्या सृष्टीच्या मनोहर सान्निध्यात काव्य सुचले नाही,असा मनुष्य विरळाच! मधुर संगीताने,सुभाषिताने आणि ' युवतीनां च लीलया ' ज्याचे चित्त द्रवत नाही, अशा माणसाची यथायोग्य संभावना सुभाषितकारांनी केलेली आहेच! पण या सुभाषितात सृष्टीतील सौंदर्यस्थळांचीही भर घालावयास पाहिजे, असे मला वाटते. अशाच एका सौंदर्यस्थळाच्या सान्निध्यात प्रस्तुत लेखाची प्रेरणा आहे.

पाणी-योजना कमिटीच्या संदर्भात, दक्षिणेतील राज्यांत तावडतोब काय करता येईल, याची चौकशी करून त्यासंबंधी शिफारसी करण्याचे काम भारत सरकारने एका समितीवर सोपवलेले होते. त्या समितीचा प्रमुख या नात्याने त्या वेळी मी केरळ राज्यात गेलो होतो. केरळ प्रदेशाची सौंदर्य-विषयक कीर्ती मी लहानपणापासून ऐकत होतो. ' केरळ-कोकिळ ' या नावाचे एक मासिक अगदी लहानपणी, म्हणजे सुमारे ५० वर्षांपूर्वी अवलोकनात येत असे, आणि त्यातील लेखक ' महाराष्ट्रभाषाचित्रमयूर ' यांचे लिखाण पण वाचनात येत असे. तरुणपणी राजा रविवर्म्याची चित्रे, –काही अस्सल आणि काही छापील अशी,—पाहण्याचा योग आला होता. आणि केरळातील हा कलावंत माझ्या आदराचे एक स्थान झाला होता. ज्या भूमीत जे सर्जन होते, ते त्या भूमीतील गुणद्रव्यांचे थोड्याबहुत प्रमाणात प्रतिबिंब असते. परिस्थितीने पुरुष बनतो. म्हणजे त्याचे जीवनदर्शन, त्याचा वर्तनक्रम, ही कमीजास्त प्रमाणात परिस्थितीची निर्मिती असते आणि या दृष्टीने या कला-वंतांच्या रचनात्मक स्थितीत—ज्या स्थितीत त्याचे आदर्श आकार घेऊ लागले त्या स्थितीत—केरळातील सृष्टिसौंदर्याने खास मोठा परिणाम केला असला पाहिजे असे माझे मत होते व आहे.

केरळातील स्त्रीपुरुष स्वच्छ, टापटिपीचे, नीटस आणि देखणे असतात, असे त्यांचे वर्णन महात्माजींनी केलेले आहे. आद्य शंकराचार्य हेही केरळभूमीचे सुपुत्र. त्यांची जन्मभूमी पहावी, ही फार दिवसांची इच्छा होती. मंत्रि-मंडळात असताना कामानिमित्त तिकडे जाण्याची संधी अनेक वेळा आली होती; पण ते घडले नाही. तसेच, कै. वल्लभभाईंनी केरळला भेट दिली होती, तेव्हा त्यांनीही आग्रह केला होता; परंतु त्याही वेळेस जाणे घडले नाही. तात्पर्य, लहानपणापासून इच्छा असूनही साठी उलटल्यानंतर ही घटना

घडायची हा ईश्वरी संकेतच असला पाहिजे !

त्यामुळे सांगण्यात आलेले काम तात्बडतोब स्वीकारून पहिल्या प्रथम केरळ-राज्याला भेट देण्याचे ठरवले. कार्यक्रम निश्चित झाला. पाटबंधाऱ्यासंबंधीच्या ज्या योजना चालू होत्या, त्यांची पाहणी करावयाची, हे मुख्य काम. पण माजी मंत्री आणि विद्यमान समिति-प्रमुख या नात्याने भेट होणार असल्यामुळे, स्वागताचे अनेक समारंभही त्या कार्यक्रमात प्रविष्ट करण्यात आले होते. तथापी दैव मला सर्वस्वी अनुकूल होते. मी त्या ठिकाणी पोहोचण्याच्या आधीच ७–८ दिवस विषबाधित अन्नाच्या प्रकारात काही माणसे दगावली ! त्यामुळे बहुतेक समारंभ छाटले गेले, आणि काही २–३ समारंभ घडून आले, त्यांमध्ये कुठेही साखरेचा अगर गव्हाचा पदार्थ नव्हता. काकवी-मिश्रित चहा पिण्याचे अपूर्व भाग्य लाभले आणि जेवण म्हणजे यथार्थतया भातुकलीच होती ! पण इच्छा व्यापक होती. इष्ट मर्यादित ठेवणे आवश्यक होते.

ता. १५ मे रोजी अगंदी ब्राह्म मुहूर्तावर मुंबईतील सांताक्रूझ विमानतळाहून " अथ विमानमार्गेण " निघालो. गेल्या १४ महिन्यांत माझ्याइतका विमानाचा प्रवास विमानहाके सोडून दिल्यास कुणीही केला नसेल ! त्यामुळे या प्रवासाच्या बाबतीत मी इतका निगरगट्ट झालो होतो की, विमान मला लागायच्या ऐवजी मीच विमानाला लागणे अधिक संभवनीय होते ! मला वाटत होते, वैशाख महिना असल्यामुळे दक्षिण दिशेला जाताना डाव्या बाजूने अखंड प्रवास करणारा सूर्य माझ्यासारख्या महान व्यक्तीला मुजरा करण्यास येईल आणि त्याच्या प्रकाशात पश्चिम किनाऱ्यावरील कोकण प्रांतातील सृष्टिसौंदर्य, जलदुर्ग पाहतपाहत मी जाईन. तथापी, सूर्याऐवजी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून धुके आणि ढग आमच्या मार्गावर जणू सत्याग्रह करताना दिसू लागले ! विमान डाकोटा असल्यामुळे ते फार उंचावर जाऊ शकत नव्हते. नाही तर व्हायकौंटप्रमाणे २० हजार फुटांवरून प्रवास केला असता; आणि वामनाने पददलित केलेल्या पृथ्वीला, वराहाने तुच्छ लेखलेल्या पृथ्वीला, मीही तुच्छ लेखले असते. तथापी, मला ही संधी मिळायची नव्हती. म्हणूनच की काय, पहिला तासभर प्रवास अत्यंत त्रासदायक झाला. खुर्चीचे पट्टे बांधा आणि सोडा, हीच कवायत करीत बसावे लागले !

सुमारे १॥–१॥। तासांनी परिचित भूभाग दिसू लागला आणि थोड्याच वेळात वेळगावच्या विमानतळावर उतरलो. सीमेच्या वादात हा भाग परिचित होता; कारण म्हैसूर आणि मुंबई यांतील सीमा म्हणजे हा विमानतळ, अशी सूचना करण्यात आली होती. विमानतळावर उपाहारगृहही नव्हते आणि बसावयास प्रशस्त जागाही नव्हती. तथापी, वातावरण प्रसन्न होते आणि आकाशही निरभ्र होते. १५ मिनिटांत पुनः विमान सुरू झाले आणि तासाच्या आत मंगलोरच्या घाटमाथ्यावरील विमानतळावर आम्ही उतरलो. हा विमानतळ म्हणजे एक अपूर्व गोष्ट आहे. अन्य विमानतळ सामान्य भूमीवर आहेत; हा मात्र डोंगरपठारावर आहे. या विमानतळावर येण्यापूर्वी गोव्याची भूमी दुरून दिसत होती. गोव्याच्या भूमीवरून जावे अशीही इच्छा होती; पण ते मना आहे, असे पायलटने सांगितले ! त्यामुळे डोकेदुखीचा प्रश्न झालेला गोवा उजव्या बाजूला ठेवून, क्षणभर त्याला उजवी घालून आम्ही मंगलोरला आलो. तेथून कोचीनच्या विमानतळावर येताना सर्वच पाण्याचे प्रवाह, नारळाची झाडे आणि त्यांच्या कुशीत लपलेली लहानलहान कौलारू घरे असा देखावा वरून दिसत होता. वरून पाहताना सर्वत्र पाणीच-पाणी दिसत होते. विमानतळ कुठे आहे, हे पाहण्याची उत्सुकता वाटत होती; पण तो नीटसा दिसेना. मग मात्र भीती वाटू लागली. या सगळ्या जलप्रवाहाशी पाठशिवणीचा खेळ खेळताना विमान एखादवेळी पाण्यात तर नाही ना उतरणार ? आणि तसे झाले तर काय करायचे याची योजना योजनाप्रिय हिंदुस्थानचा एक नागरिक या नात्याने मी लागलीच तयार केली. चष्मा आणि घड्याळ यांचे रक्षण केलेच पाहिजे, हा निश्चय झाला; पण पेनविषयी निश्चित मत होईना. कटिवस्त्र ठेवून अंगावरील बाकीचे कपडे सोडावयाचे हाही निर्णय घेताना अडचण पडली नाही ! तथापी, असे काही घडायचे नव्हते आणि अगदी :अरसिक रीतीने आमचे विमान कोचीन विमानतळावर उतरले. तिथे औपचारिक स्वागत झाले आणि १५ मिनिटांत आम्ही त्रिवेंद्रमच्या विमानात बसलो; १ वाजता मुक्कामावर पोहोचलो. 'सरकारी पाहुणा' या नात्याने सर्व व्यवस्था होतीच. अर्थात अनुभव चिमणरावांपेक्षा निराळा आला !

"कन्याकुमारीला भेट द्यायची आहे का ?" असे त्रिवेंद्रमच्या इंजिनियरने विचारले आणि मी तत्काळ होकार दिला. नेमलेल्या कामाबाहेर काही तरी

केलेच पाहिजे, हे मंत्र्याचे धोरण स्वीकारले! त्यामुळे ता. १६ रोजी सकाळी मुख्य मंत्री श्री. नंबुद्रीपाद यांचे स्वागत स्वीकारून आम्ही मोटारने कन्याकुमारीला जायचे ठरविले.

या जवळजवळ १०० मैलांच्या प्रवासात आपण जणू एखाद्या शहरातून जात आहोत असा भास होत होता. एक वस्ती संपली, की लागलीच दुसरी सुरू. दुतर्फा घरे. वाक्यात स्वल्पविराम असावा, तशी उपाहारगृहे; अर्धविरामाप्रमाणे शाळागृहे आणि पूर्णविरामाप्रमाणे एखादा कालवा, असे होत होते. एखाद्या महापुरुषाच्या दर्शनार्थ लोकांनी गर्दी करावी, तशी नारळींच्या झाडांनी दुतर्फा गर्दी केलेली होती. एखाद्या नटव्या स्त्रीने गळ्यात जडजड मण्यांची माळ घालावी आणि लोकांना ती दिसावी म्हणून पदर किंचित बाजूला सारावा, त्याप्रमाणे या वृक्षांची स्थिती झालेली दिसत होती. वृक्षांना नारळच नारळ लागलेले दिसत होते. रस्त्यातील उपाहारगृहाजवळ जणू काही तसेच दृश्य दिसत होते. माणसांची टोळकीच्या टोळकी एकत्र येऊन, हातांत वर्तमानपत्र घेऊन चर्चा करीत होती. स्त्रीपुरुष स्वच्छ, नीटनेटके आणि व्यक्तिमत्त्व असलेले दिसत होते. सहज चौकशी करता असे समजले की, देवीकोलम मतदारसंघातील मतदानाचा तो दिवस होता. केरळातील ८० टक्के जनता साक्षर आहे. हिंदू, मुसलमान, हरिजन आणि ख्रिश्चन या चार जमातींचा संगम तिथे झालेला आहे. तिथल्या ख्रिश्चन जनतेने दुसऱ्या शतकापासून तो धर्म स्वीकारला; काहींच्या मते तर जीझसच्या मृत्यूनंतर ५–१० वर्षांतच ती ख्रिश्चन झालेली आहे. आजच्या जमान्यातसुद्धा धर्मच तिथे प्रभावीही दिसत होता, आणि अर्थशून्य दिसत होता! जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण आता आर्थिक होऊ लागलेला आहे, असे अनेकांनी मला सांगितले. सकाळी भेटलेल्या वृत्तपत्रप्रतिनिधींनीही तेच सांगितले होते. मोठ्या पुढाऱ्याला भेटणे हे वृत्तपत्रकारांचे काम असते; पण ते आपण होऊन न आल्यास त्यांना बोलावून आणणे हे लोकशाहीतील पुढाऱ्यांचे कर्तव्य असते! त्यामुळे ते मला भेटायला आले नसते तर मीच त्यांना बोलावले असते, हे निश्चित! त्यांनीच मला या निवडणुकीबद्दलची कल्पना दिली होती. म्हणूनच या शांत आणि सुंदर वातावरणातून प्रवास करीत असताना मी जागजागी गाडी थांबवीत असे आणि चहाचा शोध करून मिळवलेल्या कॉफीत संतोष मानीत. तेथे जमलेल्या मंडळींशी

थोडीबहुत चर्चाही करीत असे. निदान ७–८ ठिकाणी असे केले असेल. "व्यक्ती तितक्या प्रकृती" या न्यायाने विविध दृष्टिकोण नजरेस आले; पण एक गोष्ट मात्र निर्विवादपणे आढळून आली. ती म्हणजे विद्यमान मंत्रिमंडळातील सदस्यांच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल लोकांना वाटत असलेला नितान्त आदर! तात्पर्य, या प्रवासात सृष्टीचे सौंदर्यनिरीक्षण आणि मानवी संघर्षाचा विचार करीत मी पुढे-पुढे चाललो होतो. योजना अशी होती की, संध्याकाळ होण्यापूर्वी निदान अर्धा तास तरी कन्याकुमारीस पोचायचे, आणि सूर्यास्त झाल्यानंतर तेथून परत निघायचे. कारण मार्गदर्शक इंजिनियरने सांगितले होते की, कन्याकुमारीतली संध्याकाळ म्हणजे एक अलौकिक सृष्टिसौंदर्याचा नमुना असतो.

सुमारे ५ वाजता आम्ही कन्याकुमारीला पोचलो. तिन्ही बाजूंना समुद्र होता. हिंदुस्थानच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे भूप्रदेश निमूळता होत गेला होता आणि शेवटला बिंदू तर अवघा फर्लांग-दोन फर्लांगाइतका दिसत होता. मोटार समुद्रापासून १०० यार्डांवर ठेवून आम्ही दक्षिणाभिमुख चाललो होतो. डाव्या बाजूला बंगालचा उपसागर जणू काही भारतभूमीची पूजा करण्यासाठी तरंगरूपी पुष्पांजली वाहत होता. किनाऱ्यापासून ३०० यार्डांवर एक लहानसे बेट दिसले. तेथे स्वामी विवेकानंदांनी काही दिवस तप केले होते, अशी आख्यायिका सांगण्यात आली. जिथे जमिनीचा शेवटचा बिंदू होता, त्या ठिकाणी एक लहानसा घाट, आणि त्याच्या अलीकडे कन्याकुमारीचे देऊळ होते. प्राचीन काळी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत राज्य करणारा भरत-नामक एक राजा होता. त्याच्या मुलीचे नाव कुमारी होते. राजाने आपले राज्य मुलात आणि मुलीत वाटले होते. (तेव्हा या दृष्टीने विचार करता हिंदू कोडातील मागणी किती यथार्थ आहे, हे सहज ध्यानात येईल!) या भागात तिचे राज्य असताना त्याला 'कुमारीनाडू' म्हणजे कुमारीचे वसतिस्थान असे नामाभिधान प्राप्त झाले. अशीही आख्यायिका सांगतात की, विश्वातील पराशक्ती कुमारीच्या रूपाने येथे तप करीत होती.

आसपास अनेक तीर्थे आहेत. गायत्री, सावित्री, सरस्वती, मण्डन अशी अनेक तीर्थे तिथे आहेत. त्यातले एक स्थाणू तीर्थही आहे. त्यासंबंधीची आख्यायिका मोठी सुरस आढळली. बाणासुर राक्षसाचा वध करून देशावरले संकट निवारावे, म्हणून एक यज्ञ करण्यात आला होता. या यज्ञातून पराशक्ती

अनुक्रम ... ०५८८५ ... वि: ... निबंध
क्रमांक ... २२२० ... नोंद दि ... २२।३।६७

कुमारी म्हणून बाहेर आली. तिचा विवाह झाला, तर बाणासुराचा वध होण्यासारखा नव्हता म्हणून भानगडी करण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या नारद-मुनींनी एक क्लृप्ती शोधून काढली. " डोळे नसलेला नारळ, पेरे नसलेला ऊस आणि शिरा नसलेले विड्याचे पान जो आणील, त्याच्याशी तू विवाह कर ! " असा कानमंत्र त्याने तिला दिला; पण इतके करूनही एका राजपुत्राने ते सारे काही आणले ! त्यामुळे नारदाने आणखी काही युक्त्याप्रयुक्त्या लढवल्या आणि अखेरीस तो राजपुत्र त्या ठिकाणी स्थाणू राहिला. त्याचेच आज तीर्थ झाले आहे सौंदर्यस्थळांच्या अनुरोधाने आख्यायिका नेहमीच निर्माण होत असतात. त्याचा प्रत्यय इथेही आला !

अशा ठिकाणी बहुतेक यात्रेकरू भक्तिभावाने येतात. आम्ही मात्र भक्ति-भावाने आलो नव्हतो. सौंदर्योपासक म्हणून आलो होतो. सत्य, शिव आणि सौंदर्य यांपैकी सौंदर्याची प्रेरणा निदान माझ्या मनात तरी प्रभावी होती. सूर्योदय आणि सूर्यास्त कोणत्याही स्थळी मानवी मनाला सदैव आनंद देतात. पण ह्या स्थळीं मनात काही विशेष भाव उत्पन्न होतात. पूर्वेस बंगालच्या समुद्रातून वर येणारा सूर्य बारा तास आपली कामगिरी करून पश्चिम महासागरात विलीन होतो. हे दोन्ही कालबिंदू इथे अत्यंत प्रेक्षणीय असतात. दोन्ही दृश्ये मनोहारी. अपूर्व प्रभात आणि अपूर्व संध्या !

आम्ही पोचेपर्यंत सहस्ररश्मी पश्चिम सागराच्या वर १०–२० हात कललेला होता. असे सांगतात की, चैत्र शुद्ध पौर्णिमेला पूर्व समुद्रातून चंद्राचा उदय आणि पश्चिम समुद्रात सूर्याचा अस्त एकाच वेळी होताना दिसतो. एकाच वेळी अस्त आणि उदय हे सौंदर्य तर खरेच; पण त्याबरोबर ते एक नैतिक सुविचार प्रकट करणारेही आहे. लोकशाही युगामध्ये हा देखावा चैत्र पौर्णिमेला दिसत नसेल, पण निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एका मंत्रिमंड-ळाचा अस्त आणि दुसऱ्याचा उदय या स्वरूपात तो दिसून येतो ! जगाच्या रहाटगाडग्यातील रिकामे पोहोरे भरून वर येतात आणि भरलेले रिकामे होतात हे आपण नेहमीच पाहत असतो.

अशा प्रकारचे विचार डोक्यात चालू होते. तेवढ्यात आमच्या वाटाड्याने सांगितले की, पलीकडचा वाळूचा ढिगारा जलदगतीने ओलांडून गेले पाहिजे म्हणजे सूर्यास्ताचा देखावा स्पष्टपणे पाहता येईल ! आमच्या समितीतील;

२१४८९

बहुतेक लोक साठी उलटलेले होते. लालसिंग तगडे खरे; पण हृदयाच्या विकारामुळे तेसुद्धा जलद चालण्यास नाखूष होते. त्यांनी वाळूतच बैठक मारली. म्हैसूरचे नरसिंहय्या म्हणजे लहानशी मूर्ती; पण सर्वांत तेच जलदगती ठरले आणि त्यांच्या पाठोपाठ हा मर्द मराठा कुठेही न थांबता जात होता! रेताडातून झपाट्याने पावले उचलीत जाणे मोठे जिकिरीचे असते; पण मानवी मन असेच आहे की, कुणाच्या उत्कर्षापेक्षा अवनतीकडेच त्याचे लक्ष अधिक वेधते! त्यामुळे सूर्याचा अस्त पाहण्यासाठी आम्ही अधीर झालो होतो. आमच्या पायात क्षणभर हरणाची गती प्राप्त झाली होती. शंख आणि शिंपले ओलांडीत, तुडवीत आम्ही भराभर पुढे जात होतो. समुद्रापासून ५–१० पावलांवर पोचेपर्यंत आम्ही अगदी थकून गेलो होतो.

आकाश निरभ्र होते. सूर्यबिंब लाल झाले होते; पण ती पराक्रमाची लाली वाटत नव्हती. श्रेष्ठ व महान पुरुष आपत्काळींसुद्धा विलक्षण धैर्याने वागतो. त्या वेळीं त्याच्या मुखावर जी एक अपूर्व शोभा झळकत असते, तशीच ही शोभा वाटत होती. क्षणभरसुद्धा विसावा न घेता, कसल्याही फळाची आकांक्षा न धरता, जगाची एवढी सेवा करणारा हा कर्मवीर जगातील कृतघ्नतेच्या जाणिवेमुळे जणू काही कष्टी झालेला आहे, असे वाटत होते. जगाचा कोनाकोपरा आपल्या प्रकाशाने उजळणारा, अनंत जीवांना प्रेरणा—नव्हे, जिवनसत्त्वे देणारा—प्रवासी एक मुक्काम तयार करून दुसऱ्या मुक्कामाकडे जायला निघाला होता-एखादा वर्तमानपत्रांचा बातमीदार बातम्या देण्यासाठी घाईघाईने आपल्या कार्यालयाकडे धावपळ करीत जाताना दिसतो, त्याप्रमाणे जगातील सर्व घडामोडींचा साक्षीदार जगाचे इतिवृत्त विश्वनिर्मात्याकडे रुजू करण्यासाठी जात असावा. त्याने काय पाहिले असेल, काय ऐकले असेल, याची संपूर्ण कल्पना कुणालाही येऊ शकत नाही. मनुष्य जे-जे काही करीत असतो, त्याचे साक्षीदार सृष्टीतील प्रभावी द्रव्ये असतात. चंद्र, सूर्य आणि ही भूमी या सर्वांना मनुष्य शरीराने जे करतो आणि मनाने जे चिंतितो, ते सारे अवगत असते, असे धर्मशास्त्र सांगते. हे खरे असेल काय? आणि तसे असेल, तर माझ्या मनातले विचार हा सूर्यनारायण खास जाणीत असला पाहिजे.

आणि त्याच क्षणी एकाएकी आठवण झाली. याच स्थळी, अशाच एका सूर्यास्ताचे वेळी पूज्य विनोबाजींनी जाहीर प्रतिज्ञा केली होती : “जीविताचा

उरलेला प्रत्येक क्षण या भारतभूच्या द्वारे सर्व जगाच्या सेवेसाठी खर्च करीन !"

त्या प्रतिज्ञेची आठवण होताच एक निराळेच वातावरण उत्पन्न झाले. ती संध्या मग मामुली संध्या उरली नाही. मनात निराळेच भाव निर्माण होऊ लागले. क्षणभर पार्थिव अस्तित्व विसरून गेलो. क्षणभर निराळ्याच एका सृष्टीत वावरू लागलो. सूर्य कलेकलेने समुद्राच्या पाण्याखाली अदृश्य होत आहे, हे पार्थिव डोळ्यांना दिसत होते; पण मनात निराळाच प्रकाश उमटत होता. कधीही कमी न होणारा, क्षणोक्षणी वाढत जाणारा प्रकाश मनात उमटत होता.

तेवढ्यात कुणी तरी 'परतण्याची वेळ झाली,' असे म्हटले आणि पार्थिव सृष्टीशी तुटलेला संबंध पुन्हा एकदा जोडला गेला !

बुडत्यास हात द्यावा, ही नेहमीची जनरीत आठवली आणि धावत जाऊन सूर्याला घट्ट पकडावे, बुडण्यापासून वाचवावे, अशी पोरकट कल्पना मनात आली. प्रस्तुत संदर्भात ती पोरकट खचीतच नव्हती ! पण मी तसे केले नाही. झालेही नसते, याची जाणीवही तत्काळ झाली; पण हाच भाव जीवनाचा प्रधान हेतू असावा, हेच त्या अपूर्व संध्येतील अध्यात्म बरोबर घेऊन मी परत फिरलो.

# पस्तीस वर्षांपूर्वीचे पुणे

प्रल्हाद केशव अत्रे

भल्या सकाळीं मागे असलेल्या तांबट-गल्लीमधील तांबटांच्या ठकठकीने मी एकदम जागा झालो. तसा विचित्र आवाज पूर्वी मी कधीच ऐकला नव्हता आणि पुण्याच्या कसबा पेठेखेरीज असा आवाज दुनियेत दुसरीकडे क्वचितच ऐकावयास मिळेल. तो आवाज ऐकून एका नव्या जगात आपण आलो आहोत, असा मला भास झाला. त्या ठकठकीबरोबरच जाग्या झालेल्या आजूबाजूंच्या बिऱ्हाड-करूंचा गोंगाटही हलके हलके वाढू लागला. खेडेगावात राहणाऱ्या माझ्या-सारख्या मुलाला इतक्या सकाळीं असा कोलाहल ऐकण्याची मुळीच सवय नव्हती. खेड्यात सकाळचा सूर्य चांगला कासराभर वर आला, तरी गाव जागे होत नाही आणि आपल्या भोवती दाटीवाटीने लोक राहत असल्याची जाणीव तर खेडेगावातल्या माणसाला मुळीच नसते. म्हणून मला तो सर्वच अनुभव नवा आणि चमत्कारिक वाटू लागला. इतक्यात आगगाडीची कर्कश शिटी लांबून कुठून तरी एकदम किंचाळली. त्यावर ताडकन अंथरुणामधून उठून मी खिडकीपाशी धावत आलो आणि जवळपास आगगाडी कुठे दिसते आहे का, हे खिडकीमधून डोकडोकावून पाहू लागलो. मी ऐकलेली ती पहिलीच आगगाडीची शिटी होती. ती शिटी ऐकून माझ्या काळजात जे काही भावनेचे विलक्षण कंप उठले, त्यांचे वर्णन आजही करणे अशक्य आहे. आगगाडी बघण्यासाठी म्हणून मी खिडकीत आलो, तो खाली अंगणामध्ये असलेल्या पाण्याच्या नळाकडे माझे लक्ष गेले. ज्या माणसाने नायगाराचा धबधबा प्रथम पाहिला असेल, त्याला देखील तो बघून तितके आश्चर्य वाटले नसेल, जितके आश्चर्य पुण्यामधला तो पाण्याचा नळ पहिल्यांदा बघून मला वाटले आणि पुण्यात आल्याबद्दल मला खरोखर धन्यता वाटली.

आमच्या खेडेगावामध्ये नदीवरून पाणी भरून घरात आणण्यासाठी केवढ्या यातायाती कराव्या लागत, ते मला चांगलेच माहीत होते. म्हणून घरच्या अंगणात नळामधून अखंड वाहणारी पाण्याची ती स्वच्छ आणि वाटोळी धार बघून लोक पुण्याची स्तुती का करतात, हे त्या क्षणी मला कळून चुकले. त्या दिवशी सारा वेळ मी 'नळराजा' चे सौंदर्य अवलोकन करण्यात घालवला. एवढेच नव्हे, तर नळावर कोणी नसेल, तेव्हा त्याच्याशी नाना तऱ्हेच्या जलक्रीडाही करावयाला मी मागेपुढे पाहिले नाही. जवळच शेजारी एक लहानसा चौकोनी हौद होता. त्याच्या मधोमध तोटी नसलेले कारंजे भुळूभुळू वाहात होते. ह्या हौदाच्या पाण्यात जवळ असलेल्या एका उंबराची लाल फळे पडलेली होती. त्यातली काही फुटून उमललेल्या फुलांप्रमाणे दिसत होती. हौदाच्या पाण्यात पाय सोडून मी 'जलविहार' करीत किती वेळ तरी त्या ठिकाणी बसलो होतो. त्याच दुपारी मामांच्या बरोबर मी फडक्यांच्या हौदासमोर असलेल्या सुगंध्याच्या दुकानी गेलो. कासारगल्लीतून फडक्यांच्या हौदाकडे जाताना उदबत्त्यांच्या, नागरमोथ्यांच्या आणि कुंकवाच्या वासाने त्या अरुंद बोळाचा भाग नुसता दरवळून गेला होता. त्या वेळी माझ्या नाकात शिरलेला तो वास अद्यापीही माझ्या डोक्यामधून गेलेला नाही. कसबा पेठेमध्ये त्या काळी जशी वाईट वासाची ठिकाणे होती, तसा तो एक चांगला वासाचा विभाग होता. लहानपणाच्या सर्वच आठवणी काही ना काही तरी विशिष्ट आवाजांनी आणि वासांनी गुंफलेल्या असतात. मला पुण्याची आठवण झाली की, माझ्या डोक्यात तीन आवाज आणि एक सुवास जागा होतो. टांग्यांची ठकठक, आगगाडीची शिटी, घागरीत पडलेले नळाचे पाणी आणि उदबत्त्यांचा अन् नागरमोथ्यांचा सुगंध. पुण्याने माझ्या मनावर केलेले पहिले संस्कार हे होत !

पस्तीस वर्षांपूर्वीच्या मी या गोष्टी बोलत आहे. तशी फार वर्षे झालेली नाहीत; पण या तीन तपांच्या काळात पुण्याचा भूगोल इतका बदलून गेलेला आहे की, पस्तीस-छत्तीस वर्षांपूर्वीचे पुणे कसे होते, याचे वर्णनच करून सांगितल्यावाचून ऐकणाराला त्याची कल्पना यावयाची नाही. त्या वेळी नवा पूल नसल्याने नदीपलीकडचा पुण्याचा सर्व भाग आम्हांला

परराष्ट्रातल्या मुलखाप्रमाणे अनोळखी वाटे. जणू काही या काठावरच्या पुण्याचा आणि पल्याडच्या अनाड प्रदेशाचा मुळीच काही संबंध नव्हता. त्या वेळी नदीवर फक्त दोन पूल होते. नारायण पेठेत लकडी पूल आणि मंगळवार पेठेत दगडी पूल. मी राहत होतो, तेथून दगडी पूल फारच जवळ होता. दगडी पुलापर्यंत जाणाऱ्या अरुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दारू-ताडीचे गुत्ते आणि बोंबील–मासळीचा बाजार यांचा एवढा ‘ घमघमाट ’ सदोदित दरवळलेला असे की मुठीत नाक धरल्यावाचून त्या भागात पाऊलही टाकणे अशक्यच असे. लकडी पुलाचे स्वरूप त्या वेळी हिमालयातल्या ‘ लक्ष्मण झूल्या ’ सारखे होते. पुलाच्या गावाकडल्या बाजूला दुतर्फा गवऱ्यांची आणि लाकडांची दुकाने होती आणि पल्याडच्या बाजूला आज ज्या ठिकाणी डेक्कन जिमखाना वसाहत सुरू होते, तेथे वाळलेल्या गवताच्या मोठमोठ्या उंच गंजी रचून ठेवलेल्या असत. तेथून फर्ग्युसन कॉलेजपर्यंतचा सर्व भाग उजाड आणि ओसाड होता. नवरात्रामध्ये चतुःश्रृंगीच्या यात्रेला जाताना वर्षातून एकदाच त्या वाटेने जाण्याची पुणेकरांना पाळी येई.

इंग्रजी राज्याचा आणि शिक्षणाचा अनेक वर्षे संपर्क लागूनही पुण्याच्या स्वरूपात त्या वेळी आधुनिकत्व असे फारच थोडे निर्माण झालेले दिसत होते. पहिले महायुद्ध सुरू व्हायला तीन-चार वर्षांचा अवकाश होता. पेशवाईच्या अखेरीस पुण्याचे जे स्वरूप तेच थोड्या फार फरकाने त्या वेळेपर्यंत टिकून राहिले असले पाहिजे, असे म्हणावयाला मुळीच हरकत नाही. अर्थातच पुण्यात त्या वेळी म्युनिसिपालिटी होती. तिचे ऑफिस त्या वेळी रे मार्केटवरच्या वर्तुळाकार मजल्यामध्ये होते; पण शहराच्या आणि लोकांच्या जीवनावर त्या वेळी म्युनिसिपालटीचे संस्कार झालेले आढळून येत नव्हते. उभ्या पुणे शहरात त्या वेळी रुंद रस्ता नमुन्यापुरतादेखील पाहावयाला मिळाला नसता. गावात जिकडे-तिकडे बोळांचे, आळ्यांचे आणि गल्यांचेच राज्य माजून राहिले होते. हा शाळूकरांचा बोळ, तर तो मुझुमदारांचा बोळ. हा गोंधनीचा बोळ, तर तो काकिर्ड्यांचा बोळ. ही तपकीर गल्ली, तर ती कासारगल्ली. ही चोळखण-आळी, तर ती दाणेआळी. काही-काही बोळांची तर केवळ अभिमन्यूच्या चक्रव्यूहाशीच तुलना करता येईल, इतके ते गुंतागुंतीचे आणि भानगडीचे होते. एका पेठेमधून एका तोंडाने आपण बोळात शिरलो, म्हणजे

राजापूरच्या गंगेप्रमाणे आपण भलत्याच कुठल्या तरी पेठेतल्या दुसऱ्याच बोळाच्या तोंडामधून प्रगट झाल्याचे आपणांस आढळून येत असे आणि त्यामुळे पुणे शहराच्या अद्‌भुत रचनेबद्दल आपणांला अचंबा वाटून राही. अप्रिय माणसांची आणि देणेकरांची तोंडे चुकविण्याच्या दृष्टीने हे बोळ आणि गल्ल्या फारच उपयोगी पडत असत, यात शंका नाही.

त्याखेरीज पुणेकरांच्या वैयक्तिक जीवनाशी आणि चारित्र्याशी हे बोळ आणि या गल्ल्या त्या वेळीं फारच निगडित झालेल्या होत्या, असे म्हणतात; पण जाऊ द्या. त्या भानगडीत या ठिकाणी आपणाला शिरण्याचे कारण नाही. पुण्यातल्या या जुन्या वैशिष्ट्यपूर्ण बोळांपैकी पुष्कळच बोळ आता नाहीसे झालेले आहेत. काही बोळांची नावे तशीच शिल्लक उरलेली असतील; पण त्यांचा त्या वेळचा चेहरामोहरा आता आमूलाग्र बदलून गेलेला आहे. त्या वेळीं पुण्याच्या रस्त्यां-मधून भाडोत्री टांग्यांखेरीज आणि सरदारांच्या चारचाकी बग्यांखेरीज दुसरी वाहने दिसून येत नसत. मोटारी तर मुळीच नव्हत्या. पायगाड्या असत, पण फारच थोड्या. त्या वेळचे बहुतेक सर्व विद्यार्थी पायांनेच शाळेला आणि कॉलेजला जात असत. शहरात लोकवस्ती माफकच होती. विशेष सणावारी आणि बाजाराच्या वेळी काय ती रस्त्यांमधून गर्दी दिसून येई. असे असूनही त्या वेळीं पुण्याचे रस्ते इतके वाईट असत की सांगता सोय नाही. उन्हाळ्यात वीत वीत धूळ आणि पावसाळ्यात ढोपर ढोपर चिखल, हे त्या वेळच्या पुणे शहराच्या रस्त्यांचे एक अविस्मरणीय वैशिष्ट्य होऊन बसलेले होते. गावामध्ये तेव्हा वीज आलेली नव्हती. घासलेटच्या दिव्याचे कंदील बऱ्याच लांब लांब अंतरावर कडेकडेने लावलेले असत. यांपैकी निम्मे दिवे बहुधा नादुरुस्तच असत. काही दिव्यांत तेल नसे, काहींत वाती नसत, तर काहींच्या चिमण्या फुटून गेलेल्या असत. या घासलेटी दिव्यांच्या अपुऱ्या आणि अर्धवट प्रकाशात रात्रीच्या वेळी पुणे इतके भेसूर आणि उदासवाणे दिसे की, त्या आठवणींने अद्यापीही माझ्या अंगावर काटा येतो. रात्रीचा हा अंधूक उजेड गावातल्या रंगेल राघोभराऱ्यांच्या पथ्यावर पडे, तर सभ्य आणि संसारी सखारामबापूंना तो अतिशय त्रासदायक होई. मध्यरात्रीनंतर शहरातून हिंडायला त्या वेळी खरोखरच भय वाटे. गॅसच्या बत्त्या त्या वेळी नुकत्याच आल्या होत्या; पण उभ्या गावामध्ये म्युनिसिपालिटीने सार्वजनिक ठिकाणी अशा दोन-तीनच गॅसच्या

बत्त्या लावलेल्या होत्या. शनिवारवाड्यानजीक जुन्या मंडईत बटाट्या मारुती-समोर अशी एकच गॅसची बत्ती उभारलेली मला आठवते. संध्याकाळी ही गॅसची बत्ती जेव्हा पेटवली जात असे, तेव्हा ती पेटविण्याची क्रिया बघण्यास त्या बत्तीभोवती कमीत-कमी शे-दोनशे माणसांचे कडे जमा होत असे. अर्थात त्या वेळी पुण्यात निरुद्योगी लोकही पुष्कळच असत, यात शंका नाही.

त्या वेळी शहरामध्ये ड्रेनेज सुरू झालेले नव्हते. त्यामुळे घरातला मैला भंगी लोकच डोक्यांवरून वाहून नेत. या पद्धतीचा पुण्याच्या घरांच्या रचनेवर असा परिणाम झालेला होता की, शौचकूप घराच्या अगदी तोंडाशी बांधावा लागे. म्हणजे घरात न शिरता रस्त्यावर उभे राहूनच मैल्याच्या पाट्या शौचकूपा-मधून बाहेर काढणे भंग्यांना सोयीचे पडे. भंग्यांच्या दृष्टीने हे अतिशय सोयीचे होते खरे; पण घरात राहणाऱ्या माणसांच्या आणि बिऱ्हाडकरूंच्या दृष्टीने मात्र हे अत्यंत गैरसोयीचे होते. हाताने नाक दाबून धरण्यावाचून पुण्यामधल्या कोणत्याही सामान्य घरात त्या वेळी शिरताच येत नसे. परगावच्या एखाद्या प्रतिष्ठित पाहुण्याला तर घरात बोलावणेही त्या वेळी कष्टाचे वाटे. कारण पुण्याच्या घरांना शिव्या देत-देतच बाहेरगावचे लोक घरामध्ये शिरत आणि शिव्या देत-देतच आतून बाहेर पडत. काही-काही घरांच्या दरवाज्याच्या दोन्ही बाजुंना जयविजयसारखे शेतखाने उभे असत आणि आत येणारांचे ते असे काही मोकळ्या चेहऱ्यांनी स्वागत करीत की, त्यांचे दर्शन चुकविता-चुकविता माणसांची अगदी तिरपीट उडून जाई. पुण्यामधील त्या वेळची सकाळची दृश्ये अगदी ठरलेली असत. सात-साडेसातच्या सुमारास आपण घरातून बाहेर पडलो, की प्रथम आपल्या नाकातोंडात धुळीचे लोटच्या लोट शिरू लागत. कारण झाडूवाल्या महारणींचे रस्तासफाईचे काम त्या वेळी जोरामध्ये सुरू झालेले असे. या बोळातला केर त्या बोळात झाडीत न्यायचा आणि या गल्लीतला कचरा त्या गल्लीत ढकलायचा, एवढेच रस्तासफाईचे तंत्र त्यांना माहीत असे. या धुळींच्या वावटळींमधून मोठ्या कष्टाने आपण कुठे बाहेर पडतो आहोत, तोच चार-दोन वेळा तरी आपली आणि एखाद्या भंग्याची टक्कर होण्याचा प्रसंग येई. डोक्यावर उंच टोकऱ्या आणि हातात खराटे अशा थाटाने भंगी आणि भंगिणी नऊ-नऊ आणि दहा-दहा वाजेपर्यंत पेठापेठांमधून अगदी राज-रोसपणे हिंडत असत. त्यानंतर पुण्याच्या रस्त्यांमधून प्रामुख्याने मिरविणारा

तिसरा प्राणी म्हणजे पुण्याचा न्हावी. त्या वेळी गावात सलूने सुरू झाली नव्हती. म्हणून गिऱ्हाइकांच्या शोधासाठी न्हावीच रस्त्यारस्त्याने हिंडत असत. काही-काही पेठांमध्ये न्हाव्यांचे बसण्याचे चव्हाटे असत, यांना खुंट असे म्हणत. प्रत्येक खुंटावर चार-दोन न्हावी तरी आपल्या पायांचे केस भादरीत किंवा नाकातले केस चिमट्याने उपटीत बसलेले हमखास आढळायचेच. वाढलेल्या दाढीचे खुंट खाजवीत खाजवीत गिऱ्हाईक त्यांच्या रोखाने येऊ लागले, म्हणजे न्हावी मुकाट्याने आपली धोपटी उचलून त्याच्या मागोमाग चालू लागे.

सार्वजनिक हौदावर जाऊन आंघोळ करणे हा त्या वेळच्या पुष्कळशा पुणे-करांचा सकाळचा एक आवडता व्यवसाय होता. शनिवारवाड्याच्या पूर्वेला नानांचा हौद, विश्रामबागेच्या दक्षिणेला पुष्करणीचा हौद आणि शहराच्या पश्चिम भागात सदाशिव पेठेचा हौद हे तीन हौद सर्वांत मोठे आणि प्रसिद्ध असे हौद होते. कात्रजचे पाणी या हौदांना आणलेले होते. नेहमी हे हौद पाण्याने तुडुंब भरलेले असत. सकाळच्या प्रहरी अनेक स्त्री-पुरुष या हौदाच्या बाजूला असलेल्या प्रशस्त दगडी फरसबंदीवर मनसोक्त आंघोळ करीत बसलेले असावयाचे. हे हौद बुजून आता इतकी वर्षे झालेली असली, तरी त्या हौदां-बद्दलच्या माझ्या आठवणी अजूनही फारशा बुजलेल्या नाहीत. खडक-वासल्याच्या पाण्याचा पुरवठा होण्याच्या पूर्वी कात्रजचे पाणी पुण्याला मिळण्याची व्यवस्था पेशवाईच्या काळापासून केलेली असे. मोठमोठे दगडी पाट बांधून हे पाणी पुण्यात आणलेले होते. या पाटांचे दगडी उच्छ्वास भिकारदास मारुतीकडून पर्वतीला जाणाऱ्या रस्त्यावर बांधलेले होते. उच्छ्वासाची लाकडी झाकणे उघडून आत पाहिले, की जोराने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा असा काही खळखळाट ऐकू येई की, क्षणभर छातीत धडकी बसे. गावामधल्या कित्येक मोठमोठ्या वाड्यांतल्या हौदांत हे पाणी नेऊन सोडले होते. खडकवासल्याच्या पाण्यापेक्षा ते चवीला अधिक चांगले लागे आणि विशेषेकरून ते नेहमी थंडगार असे. ही पाण्याची योजना आता नष्ट झाल्याने पुण्याचे एक वैशिष्ट्य नाहीसे झाले आहे, असे म्हटले पाहिजे.

पुणे हे त्या वेळी दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध असे. पुणेरी पगडी आणि पुणेरी जोडे. एक डोक्यावर वापरावयाची गोष्ट आणि दुसरी पायांत घालायची वस्तू.

दोहोंचाही रंग लालभडक असे. डोक्यावर लाल ऐटबाज पगडी ठेवून आणि पायात सुबक रंगीत जोडा घालून हातात मोतियाचा गजरा खेळवीत एखादा हौशी पुणेकर बुधवारचौकातून वेलबागेच्या रोखाने जाऊ लागला म्हणजे ते एक बघण्यासारखे दृश्य असे. प्रौढ वयाचे पुण्यातले बहुतेक ब्राह्मण त्या वेळीं पगड्याच घालीत. पुणेरी जोड्यांचे मात्र एक वैशिष्ट्य असे. तो कोरा असेपर्यंतच त्याची खरी शोभा आणि दिवाणखान्यात नेण्याची त्याची लायकी. तो जुना झाला की, त्याचे स्थान एकदम शौचकूपाच्या दाराशी. काही लोक ठिगळे लावून आणि गोठ घालून पुणेरी जोडे वापरीत; पण ते अतिशयच हास्यास्पद दिसत. पावसाळ्याच्या दिवसात पुणेरी जोडे घालणाऱ्या पुणेकरांची मात्र खूपच फजिती उडत असे. चालताना त्यांच्या टाचेखालचा चिखल मागे कोटावर उडू लागे आणि थोड्या वेळातच कोटाच्या पाठीवर उभे गंध लावल्यासारख्या चिखलाच्या दोन जाड रेघा उमटलेल्या दिसू लागत. वहाणा आणि चपला येऊ लागल्यापासून मात्र हा पुणेरी जोडा हलके-हलके नाहीसा होऊ लागला. त्या काळी पुण्यात पोशाखाची ' फॅशन ' अशी मुळींच नव्हती, असे म्हटले तरी चालेल. वेशभूषेचा नीटनेटकेपणा आणि व्यवस्थितपणा फारच क्वचित आढळून येई. बहुतेकांच्या दाढ्या बोट-बोट वाढलेल्या असत आणि निम्म्याहून अधिक लोक रस्त्याने अनवाणीच जात. पांढरी शुभ्र धोतरे, स्वच्छ सदरे किंवा अंगरखे फारच कमी पाहावयास मिळत. पांढरा कपडा म्हटला, की तो मळकट तांबूसच दिसायचा, हा जणू काही नियमच ठरून गेला होता.

कपड्यावरून माणसाच्या स्वच्छतेचा बोध त्या काळात क्वचितच होई. त्याच्या कपाळी पांढरे व तांबडे गंध किंवा टिका असला, म्हणजेच त्या दिवशी त्याने आंघोळ केली असली पाहिजे, असे बघणाराला कळून यावयाचे. बहुतेक लोक कपाळी गंध लावीत. शाळेतल्या विद्यार्थ्यांमध्ये तर गंध लावण्याची एक फॅशनच पडली होती म्हणानात. शाळा-कॉलेजांतली मुले डोक्यावर हंगेरियन टोप्या घालीत आणि पुस्तकांची पिशवी पोस्टमनप्रमाणे गळ्यामध्ये आडवी घालून अन् धोतराचा घट्ट काचा मारून रस्त्याने जात. बायकांच्या किंवा मुलींच्या पोषाखात त्या वेळीं काहीच आकर्षण नव्हते असे म्हटले तरी चालेल. आधी रस्त्यामध्ये त्यांची रहदारी फारच कमी असे. रंगीबेरंगी पातळांचा शोध त्या वेळीं लागलेला नव्हता. घरी धुतलेली विटक्या रंगांची सुती लुगडी नेसून स्त्रीवर्ग घराबाहेर वावरायचा.

संसारी स्त्रियांची वेषभूषा त्या वेळीं जुनाट तऱ्हेची होती. एवढेच नव्हे, तर त्या काळच्या वेश्यांदेखील कासोट्याचे लुगडे नेसून, डोक्यावर पदर घेऊन, पायांत साखळ्या घालून आणि हातात चांदीचा पेला घेऊन मोठ्या अदबीने बेलबागेमध्ये किंवा तुळशीबागेमध्ये देवदर्शनाला जात. पायांपासून डोक्यापर्यंत इंग्रजी पद्धतीचा पोषाख केलेले पुरुष त्या वेळी गावामध्ये मुळींच दिसत नसत. काही सुशिक्षित माणसे पायांत नुसते पायमोजे आणि बूट घालीत, तर काही सदऱ्यावर नुसत्या कडक कॉलरी घालीत; आणि एखादा फारच फॅशनेबल माणूस धोतर नेसून वर गळ्याभोवती ' नेकटाय ' बांधून ऐटीने रस्त्यातून चाले. सायकलवरून जाणारा एखाद-दुसरा माणूस डोक्याला तरटाची साहेबी टोपी घाली, तर तेवढ्यामुळे त्याला केवढा गर्व चढलेला दिसे. काळी मखमलीची ' गंधर्व टोपी ' ही पुण्यातली पोषाखामधली मला आठवत असलेली पहिली क्रांती होय. या टोपीचा प्रसार त्या काळात झपाट्याने झाला आणि तिने लवकरच बाकीच्या सर्व टोप्यांचे उच्चाटन करून टाकले.

# ध्ये य वा दी

गजानन त्र्यंबक माडखोलकर

सृष्टीत जी स्थित्यंतरे नेहमी घडून येतात, त्यांची विकासवादाच्या अनुषंगाने संगती बसविण्याचा उद्योग शास्त्रज्ञांकडून सदैव होत असतो; परंतु काही स्थित्यंतरे इतकी विलक्षण असतात की, शास्त्रज्ञांनाही त्यांची उपपत्ती लावणे अशक्य होते. कारण शास्त्रज्ञ झाले तरी तेही सतत आलेल्या अनुभवांच्या आधारावरच सिद्धान्तांची उभारणी करीत असतात. पण मनुष्याचा अनुभव हा स्वभावतःच इतका संकुचित असतो की, त्याच्या अनुरोधाने सृष्टीतील सर्व घडामोडींचे रहस्य उकलणे प्रायः अशक्यच आहे. हाच न्याय मानवी समाजात वारंवार होणाऱ्या क्रांत्यांनाही लागू पडतो. एखादी गोष्ट घडून गेल्यावर तिच्या कारणांची मीमांसा करणे फारसे कठीण नाही. म्हणूनच जगात आजवर ज्या क्रांत्या झाल्या त्यांच्या कारणांची परंपरा इतिहासकारांनी बहुधा बिनचूक दाखविलेली आढळते. विभूती एकदा निर्माण झाल्यावर तिचा अवतार व्हावयाला अनुकूल परिस्थिती आधीच तयार झाली होती, हे सहज सिद्ध करता येते. तथापी, विभूतीचे अवतारकार्य हा विकासाचा परिणाम आहे, हे जरी क्षणभर मान्य केले, तरी विभूतीच्या कार्यात तिच्या अंतःस्फूर्तीलाही तितकेच महत्त्वाचे स्थान आहे हे विसरून चालणार नाही. पुष्पांचे सौंदर्य आणि सुवास यांचा परिपोष व्हावयाला सूर्यप्रकाशाइतकाच वृक्षाचा स्वभावधर्मही कारण होत असतो. काही विभूतींच्या चरित्रांत असा चमत्कार दिसून येतो की, त्यांच्या कर्तृत्वाचे बीज तत्कालीन परिस्थितीत मुळीच होत नाही. काल हा विभूती निर्माण करतो हे जितके खरे, तितकेच विभूती कालाला निर्माण करते, हे सुद्धा खरे आहे. नाही तर ज्याच्या धर्माचा स्वीकार आज अर्ध्याअधिक जगाने केला आहे, त्या ख्रिस्ताला सुळावर चढण्याचा प्रसंग का आला असता ? बुद्धाच्या धर्माचा प्रसार

त्याच्या डोळ्यादेखत ज्याप्रमाणे सर्व हिंदुस्थानभर झाला, त्याचप्रमाणे खिस्ताच्या धर्माचा प्रसार का झाला नाही ? त्याला काल अनुकूल नव्हता, हेच खरे; व म्हणूनच प्रतिकूल काळाच्या क्रोधाला बळी पडण्याचा दुर्धर प्रसंग खिस्तावर ओढवला.

परंतु काही विभूतींचा काळ कधीच निर्माण होत नाही. किंबहुना काळाची अननूकूलता त्यांच्या अनन्यसाधारण योग्यतेचेच एक लक्षण मानता येईल. अनुकूल किंवा प्रतिकूल काळाची कदर कोणाला ? ज्यांना यशाची अपेक्षा असेल त्यांना; पण ' निराशेचा गाव दिधला आम्हांसी ' हीच ज्यांची भावना, त्यांना काळ अनुकूल असो अगर नसो, आपले कार्य पूर्ण केल्याशिवाय ते राहत नाहीत. मग ते कार्य जितके निष्काम असते तितकेच निष्फळ ठरले, तरी चिंता नाही. अशा विभूतींना ' ध्येयवादी ' म्हणतात. त्यांच्या कार्याला ज्याप्रमाणे काळाच्या अनुकूलतेची अपेक्षा नसते, त्याचप्रमाणे काळ त्याला मर्यादाही घालू शकत नाही, त्यांचे कार्य त्रिकालाबाधित, सनातन असते. विनाश हा काळाचा कायदा आहे. तथापी, ध्येयवादी विभूतींचे कार्य अविनाशी असते. त्याला ऐतिहासिक स्वरूप कधीच येत नाही. शास्त्रज्ञांचे सिद्धान्त विनाशी असतात. संशोधनाच्या प्रगतीबरोबर नवीन सिद्धान्त प्रस्थापित होताच जुन्या सिद्धान्ताचे फक्त ऐतिहासिक महत्त्व तेवढेच शिल्लक राहते. मानवी अनुभवावर अधिष्ठित झालेले शास्त्रज्ञांचे सिद्धांत मनुष्याच्या शरीराप्रमाणेच मर्त्य असतात. मनुष्याचा आत्मा जसे वारंवार नवे देह धारण करतो, तशी या अनुभवात्मक ज्ञानाला सिद्धांतांची नित्यनवीन शरीरे धारण करावी लागतात. त्या ज्ञानाचा उन्मेष विकासाच्या तत्त्वाला अनुसरून होतो; परंतु ज्या ज्ञानाचा उदय अंतःस्फूर्तीच्या उद्रेकातून झालेला असतो, त्याला मात्र विनाश किंवा विकास यांपैकी कोणत्याच उपाधीचा उपसर्ग होत नाही. जगातील सर्व ज्ञानाचा उगम अनुभव आणि अंतःस्फूर्ती यांच्यापासून झाला आहे. त्यामुळे मानवजातीचे जे जे गुरू आजपर्यंत होऊन गेले, त्यांत दोन प्रकार दृष्टीस पडतात. जॉन्सन, रामदास, मोरोपंत, लॉक, मिल हे अनुभवाच्या अनुरोधाने उपदेश करणारे गुरू. त्यांचे वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांत अंतःस्फूर्तीचे जीवन अगदी कमी. सॉक्रेटिस, खिस्त, तुकाराम, मॅझिनी यांची तत्त्वसृष्टी अंतःस्फूर्तीच्या उद्रेकातून आविर्भूत झाली असल्यामुळे मानवजातीला स्फूर्ती देणाऱ्या जीवनाचा लाभ त्यांच्या तत्त्वज्ञानापासून सतत

होत असतो. हे ध्येयवादी आंतरिक प्रेरणेने बोलतात. त्यांचे कार्य स्वयंस्फूर्त असते व त्यामुळे समाजाला त्यांचे तत्त्वज्ञान कधीच लवकर मान्य होत नाही. कोणताही नवीन विचार ग्रहण करताना समाज कमालीची चळवळ करतो. मनुष्याचा स्वभाव जात्याच इतका दुरभिमानी आणि दुराराध्य आहे की, त्याच्या अनुभवाच्या कक्षेपलीकडील कोणतीही गोष्ट सुखाने सांगून त्याला पटत नाही, उलट सांगणारालाच तो मूर्ख ठरवितो. आयुष्याचे चार दिवस मजेने घालविण्याचे सोडून विचार करण्याच्या फंदात कोण पडतो ? जगातील प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर सुखाशेचे चांदणे पडलेले पाहावे, हीच त्याची इच्छा. ढगांची उदात्त छाया पडलेल्या स्तब्ध सरोवराप्रमाणे दिसणारी विचारी मनुष्याची गंभीर मुद्रा त्याला बघवत नाही. सुखलोलुप आणि सत्ताधारी लोकांना विचारवंतांविषयी वाटणारा हा विद्वेष 'He thinks too much : such men are dangerous.' या उद्गारात शेक्सपियरने अगदी भेदक शब्दांनी व्यक्त केला आहे. जिनोवाच्या सुभेदाराने मॅझिनीच्या पित्याजवळ त्याच्याविषयी असे उद्गार काढले होते की, "हा तुमचा मुलगा रात्री-अपरात्री एकटाच विचार करीत भटकत असतो ! हे त्याचे लक्षण काही ठीक नव्हे. एवढ्या वयात हा विचार तरी कसला करतो ? तरुण मुलांनी असे एकसारखे विचारात गढून राहणे मला इष्ट वाटत नाही !"

ध्येयवादी विभूतींविषयी समाजाची भावना सामान्यतः याच प्रकारची असते. त्यातही ज्यांचा स्वार्थ समाजातील रूढींच्या शाश्वतीवर अवलंबून असतो, त्या स्थितिप्रतिनिविष्टांना तर ध्येयवादी हा आपला शत्रूच वाटतो. जगातील सत्ताधारी वर्ग आणि ध्येयवादी यांचे हे शत्रुत्व जगाच्या अगदी आरंभापासून चालत आले आहे आणि सुधारणेची जरी आता परमावधी झालेली असली, तरी ख्रिस्ताला सुळावर चढविण्यात जो क्रूरपणा तत्कालीन समाजाने दाखविला, त्याचा आज लोप झाला आहे, असे मानण्याचे काहीच कारण नाही. साम्राज्यवादी राष्ट्रांकडून क्रांतिकारकांचा जो छळ सध्या होत आहे, तो कमी क्रूरपणाचा असतो, असे कोण म्हणेल ? किंबहुना, सुधारणेची सर्व शस्त्रास्त्रे उपयोगात आणून, क्रांतीची बीजे खणून काढण्याचा उद्योग प्राचीन राष्ट्रांना इतक्या अहमहमिकेने खचित करता आला नसेल. सामान्य क्रांतिकारकांना फक्त सत्ताधारी वर्गाशीच झगडावे लागते; परंतु ज्याला लोकांच्या विचारातच

क्रांती घडवून आणावयाची असते, त्याला दडपून टाकण्याकरिता सर्व समाजाची प्रतिकारशक्ती एकवटून उभी राहते. सीझरच्या सत्तेविरुद्ध राजद्रोहाचे शब्द तोंडातून काढल्याबद्दल रोमन सुभेदाराने ख्रिस्ताला फार तर तुरुंगात डांबले असते; पण खुद्द ख्रिस्ताच्या देशबांधवांना त्याच्या राजद्रोहापेक्षा प्रचलित धर्माविरुद्ध त्याने पुकारलेल्या बंडाचीच चीड अधिक आली व रोमन सुभेदार 'नको, नको,' म्हणत असता ख्रिस्ताच्या हत्येचे पाप स्वखुषीने आपल्या शिरावर घेऊन यहुदी लोकांनी त्याला सुळावर चढविले. माझिनीबद्दल राज्य सत्तेचा पुरस्कार करणाऱ्या इटालीतील देशभक्तांना जितका द्वेष वाटे, तितका कदाचित ऑस्ट्रियन सरकारलाही वाटला नसेल.

समाजाच्या या विरोधाशी झगडावयाला जो मनाचा बेगुमानपणा लागतो, त्यालाच वीरवृत्ती म्हणतात. नुसते शौर्य म्हणजे वीरवृत्ती नव्हे. जगात जितके राज्यसंस्थापक किंवा बंडखोर होऊन गेले आहेत, तितक्यांच्या ठिकाणी शौर्य बहुधा भरपूर होते; पण तेवढ्याच एका कारणामुळे त्यांना 'वीर' (Hero) कोण म्हणेल ? पुष्कळ पाणी असल्यामुळेच जर पावित्र्य येते, तर ते कोणत्याही प्रचंड जलाशयाला आले असते. साहसी वृत्तीचे विशुद्ध तेज ज्यांच्या ठिकाणी अविर्भूत होते, त्यांनाच 'वीर' म्हणतात; परंतु प्रत्येक वीर हा ध्येयवादी असतोच, असे नाही. गॅरिबाल्डी हा वीर होता, तरी ध्येयवादी नव्हता; पण ध्येयवाद्याच्या ठिकाणी मात्र वीरवृत्तीचा आत्यंतिक उत्कर्ष झालेला दृष्टीस पडतो. त्याच्या ठिकाणी वीराच्याच काय, पण तत्त्वज्ञ आणि कवी यांच्यांही आत्मिक गुणांचा उदात्तपणा एकवटलेला असतो. तत्त्वज्ञाची तपश्चर्या सत्याच्या साक्षात्कारा-करिता चाललेली असते; वीर स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सर्वस्वावर लाथ मारतो व कवीच्या स्फुरणशील प्रतिभेला सौंदर्यदर्शनाचे वेड लागलेले असते. तत्त्वज्ञाचा सत्यशोधनाचा प्रयत्न परिणामी जरी सर्व मानवजातीच्या निःश्रेयसाला कारण होत असला, तरी मूलतः मात्र तो सर्वस्वी आत्मैकनिष्ठ असतो. वीराची स्वातंत्र्यभक्ती कितीही उज्ज्वल असली, तरी सत्याची चाड त्याला असतेच, असे नाही. शिवाय सौंदर्याचे संस्कार ग्रहण करावयाला मनाची जी सूक्ष्म-तरल वृत्ती अवश्य दिसते, तिचाही त्याच्या ठिकाणी प्रायः अभावच असतो. कवीला लागलेले सौंदर्याचे वेड तर इतके उत्कट असते की, त्यामुळे त्याला सत्यासत्याचेच काय, पण सदभिरुचीचेही प्रसंगी भान राहत नाही. बर्नार्ड

शॉ यांनी म्हटल्याप्रमाणे सौंदर्याच्या संवर्धनापुरतीच त्याच्या ठिकाणी सदसद्विवेक बुद्धी शिल्लक राहिलेली असते. त्यांनी आपल्या ' द डॉक्टर्स डायलेमा ' ( The Doctor's Dilemma ) या नाटकात रेखाटलेले चित्रकाराचे स्वभाव-चित्र हा कलावंताप्रमाणेच कवीच्याही मनोरचनेचा एक नमुनेदार मासला आहे. शेलीसारखा सत्त्वशील सौंदर्योपासक फार विरळा. ज्याप्रमाणे सत्यनिष्ठा ही जितकी कल्याणप्रद तितकीच कठोर असते, त्याप्रमाणे सौंदर्याचे वेडही जितके आनंददायक तितकेच उन्मादक असावे, असे दिसते. एरवी, गटे किंवा ऑस्कर वाइल्ड यांच्यांसारख्या प्रतिभाशाली कवींच्या नैतिक अधःपतनाची मीमांसा कशी करावयाची ? किंबहुना, No artist has ethical sympathies, (' कलावंतांना नैतिक भावनाच नसतात, ') हा ऑस्कर वाइल्डचा सिद्धान्त, निदान कवींच्या पुरता तरी, खरा मानणे अगदीच गैर होणार नाही.

परंतु ध्येयवादी हा जितका सत्यनिष्ठ तितकाच सौंदर्यलुब्ध, आणि जितका सौंदर्यलुब्ध तितकाच स्वातंत्र्यभक्त असतो. सत्याशिवाय सौंदर्याला व सौंदर्या-शिवाय स्वातंत्र्याला अस्तित्व नाही, अशी त्याची श्रद्धा असते. स्वातंत्र्य हे साधन आहे. साध्य नव्हे; सत्याचे संरक्षण व सौंदर्याचे संवर्धन हे स्वातंत्र्याचे ध्येय आहे आणि व्यक्तीला काय, अगर राष्ट्राला काय, स्वातंत्र्य जर नसेल, तर हे ध्येय साध्य करून घेता येणार नाही, अशी त्याची श्रद्धा असल्यामुळेच तो स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी आत्मार्पण करायला प्रवृत्त होतो. देशाच्या स्वातंत्र्या-करिता झगडणारा वीर आणि ध्येयवादी यांच्यांत जर कोणता अत्यंत महत्त्वाचा फरक असेल, तर तो हाच. माझिनी व गॅरिबाल्डी यांच्या चरित्रांत हा फरक उत्तम रीतीने व्यक्त झाला आहे. वैयक्तिक स्वार्थाचा तर त्याच्या ठिकाणी पूर्ण लोप झालेला असतोच; पण राष्ट्रीय स्वार्थाचीही भावना त्याला सहन होत नाही. कारण मानवी कल्पनेचे विराट स्वरूप त्याच्या ठिकाणी प्रकट होत असते. इटालीच्या स्वातंत्र्याकरिता माझिनीने इतकी धडपड केली, पण ती कोणत्या हेतूने ? नुसत्या इटालीचे स्वातंत्र्य त्याला नको होते. ' रोम सर्व जगाला स्वतंत्र करील,' अशी त्याची श्रद्धा होती व या श्रद्धेवरच त्याचा विश्वात्मक राष्ट्रधर्म अधिष्ठित झाला होता; पण माझिनीच्या या श्रद्धेची कशी संभावना झाली ? संकुचित दृष्टीच्या समकालीन देशभक्तांना त्याच्या या ध्येयवादाविषयी कधीच फारसा आदर वाटला नाही व व्यवहारचतुर मुत्सद्द्यांनी तर त्याला

मुळांतच काढले. परंतु त्यामुळे मझिनीची योग्यता कमी मानावयाला कोण तयार होईल ? आकाशात अतिशय उंचावर भ्रमण करणारा गरुड कितीही भव्य असला, तरी भुईवर खुरडणाऱ्या कोत्या दृष्टीला तो क्षुद्रच दिसतो व आकाशात कितीही उंच भराऱ्या या गरुडाने मारल्या, तरी घरटे बांधण्याकरिता अखेर त्याला भूतलच गाठावे लागेल, अशी ग्वाही तो आपल्या मनाला दिल्यशिवाय राहत नाही; पण घरटे बांधण्याकरिता गरुड आकाशातून खाली उतरला, तरी हिमगिरीच्या रजतशुभ्र शिखरांचाच तो आश्रय करतो, जमिनीवरील झाडा-झुडुपांकडे ढुंकूनही पाहात नाही, हे या व्यावहारिकाच्या गावीही नसते. ध्येयवादी व्यवहाराच्या भूमिकेवर उतरला, म्हणजे व्यवहारालाही विशुद्ध स्वरूप दिल्याशिवाय राहात नाही. त्या दृष्टीने इंग्लंडच्या शतकानुशतके टिकलेल्या साम्राज्यापेक्षा माझिनीच्या उण्यापुऱ्या वर्षाच्या आतच बुडालेल्या रोममधील लोकसत्ताक राज्याला जगाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण शक्याशक्यतेच्या विचारांनी बावरून गेलेल्या मानवी बुद्धीला इतिहासातील असले अनुभव बघूनच आपल्या उद्धाराची काही आशा वाटते. माझिनीचा ध्येयवाद तत्कालीन समाजाला वेडेपणाचा वाटला; पण त्याचा विश्वात्मक राष्ट्रधर्म आज अखेर समाजसत्तावादाच्या विकसित स्वरूपात जगाने मान्य केलाच की नाही ? आज ज्याचा अशक्य म्हणून उपहास केला, त्याचाच उद्या अभिमानाने अंगीकार करावयाचा, ही जगाची नेहमीचीच पद्धत आहे; आणि ध्येयवादी जर शक्याशक्यतेच्या आवर्तात सापडून संशयात्मा झाला, तर मानवजातीचे पाऊल कधीच पुढे पडणार नाही.

शक्याशक्यतेचे हे विचार स्वार्थामुळे सुचत असतात. ज्याला केवळ यशाचीच अपेक्षा असते, त्याची बुद्धी शक्याशक्यतेच्या विचाराने वारंवार कुंठित होते; पण ध्येयवादी कशाचीच अपेक्षा करीत नाही. यशाची अपेक्षा त्याला नसते, असे नव्हे; परंतु अनुकूल काल येईपर्यंत वाट पाहण्याइतका धीर मात्र त्याला मुळींच नसतो. एक प्रकारच्या अंतःस्फूर्तीने, आंतरिक प्रेरणेने त्याच्या कर्तृत्वाला चलन मिळते; व त्यामुळे, यश मिळो अगर न मिळो, अवज्ञेची किंवा आदराची पर्वा न करता, तो आपले विचार बोलून जातो, आणि त्यातच त्याचा अलौकिकपणा आहे. विचारांच्या समाधीत बुद्धी विलीन झाली, म्हणजे त्याच्या उघड्या डोळ्यांपुढे स्वप्नसृष्टीचा विकास होतो व

म्हणून त्याला ' द्रष्टा ' ( seer ) असे म्हणतात. तत्त्वज्ञानी दृष्टी भूतार्थांचे – भूतकालीन अनुभवांचे – रहस्य शोधीत असते. मुत्सद्दी फक्त पायांपुरते पाहतो, वर्तमानापलीकडे त्याची दृष्टी जातच नाही; पण ध्येयवाद्याला मात्र मानवजातीच्या उन्नतीची स्वप्ने सदैव पडत असतात व ती स्वप्ने बोलून दाखविण्याचे धाडस तो करतो, म्हणून लोक त्याला ' भविष्यवादी ' ( prophet ) म्हणतात; पण या भविष्यकथनाबद्दल त्याला केवढे घोर प्रायश्चित्त भोगावे लागते ! यज्ञ केल्याशिवाय दिव्य किंवा सामर्थ्य प्राप्त होत नाही, अशी पूर्वी कल्पना होती. ज्या ध्येयांमुळे मानवी जीविताला पावित्र्य आणि पूर्णता येते, त्यांची प्राप्तीसुद्धा यज्ञाशिवाय होत नसावी काय ? नाही तर माझिनीसारख्या राष्ट्रधर्माच्या प्रवर्तकाला जन्मभर हद्दपारी का भोगावी लागली असती ? आणि ख्रिस्तासारख्या विश्वधर्माच्या प्रवर्तकाला काट्यांचा मुकुट घालून सुळावर मरण का आले असते ? अखिल मानवजातीच्या पापाकरिता एकट्या ख्रिस्ताने आत्मयज्ञ केला, याचा तरी अर्थ काय ? गांधीजींचे वर्णन करताना रवींद्रनाथांनाही यज्ञाचीच उपमा सुचली होती; आणि खरोखरीच, जगात आजपर्यंत जे जे ध्येयवादी होऊन गेले, त्यांची चरित्रे पाहिली, म्हणजे अद्याप आम्ही ' नरयज्ञा ' चा त्याग केलेला नाही, असेच मनाला वाटते; पण त्याबद्दल दोष तरी कुणाला द्यावा ? कारण जगाची धारणा यज्ञाशिवाय होत नाही, असे खुद्द भगवंतांनीच सांगितले नाही काय ?

# जीवनातील करार

पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

सरदार विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्याविषयी पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे : हैदरावर मोहीम चालू होती. त्या वेळीं मराठ्यांच्या छावणीच्या आसपास हैदराच्या काही टोळ्या हिंडत आहेत, अशी टेहळ्यांनी बातमी आणली. विठ्ठल शिवदेव लगेच घोड्यावर स्वार झाले आणि चार-पाचशे लोक बरोबर घेऊन त्या टोळ्यांना गारद करण्याच्या इराद्याने बाहेर पडले. छावणीच्या पलीकडे एक नदी होती; पण पावसाळा नसल्यामुळे तिला पाणी बेताचेच होते. फौजेने ती सहज ओलांडली व त्वरेने दौड करून तिने हैदराच्या टोळ्यांना गाठले. उभयपक्षी चकमक चालू झाल्यावर ध्यानीमनी नसता एकाएकी आकाशात ढग जमले व तासाभरात इतका पाऊस पडला की मधली नदी दुथडी भरून वाहू लागली आणि छावणीत परत येण्याचा मार्ग बंद झाला. त्या वेळीं त्यांची स्नानसंध्या झाली नव्हती. हैदराच्या टोळ्यांना पिटाळून लावू व घटका-दोन घटकांत परत येऊ, असा त्यांचा अदमास होता; पण पावसामुळे सगळाच घोटाळा झाला. शिवाय मराठ्यांचा येण्याचा मार्ग बंद झालेला पाहून हैदराच्या आणखी टोळ्या जमू लागल्या आणि त्या दिवशी मोठीच धुमश्चक्री झाली. सरदारांचे वय त्या वेळी ७८ वर्षांचे होते. एकादशीचा दिवस. स्नान झाल्यावाचून तोंडात पाणीही घालावयाचे नाही, मग फराळ तर लांबच राहिला. त्या दिवशी छावणीत परत यायला मध्यरात्र झाली. त्यानंतर विठ्ठल शिवदेवांनी स्नान केले आणि नेहमीचे जपजाप्य उरकून मग फराळ केला.

विठ्ठल शिवदेवांप्रमाणेच जुन्या काळच्या अनेक लोकांविषयी या किंवा या तऱ्हेच्या गोष्टी आपण ऐकतो. हे लोक हा जो निग्रह करीत, हा जो करार त्यांच्या जीवनात दिसे, तो त्या काळाच्या धर्मबंधनामुळे ते पाळीत, हे उघडच

आहे. धर्माची अनुशासने, रूढी, कुलाचार यांवर त्या वेळी माणसांची दृढश्रद्धा असे व त्यामुळे त्या परंपरेने आलेली व्रते कितीही कठोर व दुःसाध्य असली, तरी ती ते सहज आचरीत व अजूनही क्वचित आचरतात, असे आपण पाहतो. सध्या आता विज्ञानयुगाच्या प्रगतीमुळे धर्मावरची श्रद्धा ढळलेली आहे. धर्म-बंधनाची किंमत आता कोणी करीत नाही आणि निग्रह करण्यास मानवी मनाला जुन्या पीठिकांकडून मिळणारे बळ नाहीसे झाले आहे.

मग त्या जागी कोणते नवे बळ आले आहे ?

हाच प्रश्न आहे ?

राज्यक्रान्ती झाल्यानंतर एक शासन उलथून पडते; आणि त्याच्या जागी दुसरे आले नाही, तर देशाची काय अवस्था होते तें चीन, ब्रह्मदेश इ. देशांच्या उदाहरणांवरून आपणास कळून येतेच आहे. दृढ असे शासन नसल्यामुळे तेथे सर्वत्र बेबंदशाही, बजबजपुरी माजून राहिली आहे; आणि देशाचे जीवनच खुंटून गेले आहे. चांगले किंवा वाईट, कोठले तरी शासन हे समाजाच्या जीवनाला अवश्य आहे. समाजाच्या बाह्य जीवनासंबंधी हे जे सत्य तेच त्याच्या मानसिक जीवनाला लागू आहे. तेथे कोणते तरी शासन अवश्य आहे. मागल्या काळी धर्माचे, पापपुण्याचे शासन होते. आता आजच्या काळी शासन कोणते आहे ?

समाजाची प्राथमिक अवस्था ही मनुष्याच्या आयुष्यातील बालपणासारखी असते. त्या वेळी आपले हिताहित कळण्याची पात्रता जशी लहान मुलांना नसते, तशीच प्राथमिक अवस्थेत समाजालाही ती नसते. त्यामुळे समाजाच्या नेत्यांना जी जी बंधने मानवाच्या प्रगतीला अवश्य वाटतात, ती समाजावर लादावी लागतात आणि ती केवळ पाशवी दंडसत्तेने लादण्याऐवजी धर्म-कल्पनांची पुण्याई त्यांच्या मागे उभी केली, की त्यांचे पालन त्या काळी कसोशीने होत असे. म्हणून ' इष्ट धर्मेण योजयेत् ,' असे मागे धोरण असे. पण समाज जसजसा प्रगत होईल, जास्त सुसंस्कृत होईल, तसतशी अशी बंधने लोकांवर लादण्याची आवश्यकता कमी झाली पाहिजे. किंबहुना, माझ्या मते हीच प्रगतीची व्याख्या होय. पाशवी दंडसत्ता किंवा परलोकातील शिक्षेचे भय यांची आवश्यकता राहिली नाही, आणि शास्त्र, इतिहास, तर्क यांच्या साहाय्याने जे समाजाला कल्याणकारक ठरेल, ते स्वतःहून पाळण्याची मानवाची

अंगची प्रवृत्ती वाढली की तो मानव व त्याचा तो समाज प्रगत झाला, सुसंस्कृत झाला, प्रौढ झाला, असे म्हणावे. म्हणजे धर्मप्रणीत पापपुण्याची भीती ही शक्ती जाऊन, अनावश्यक ठरून, तिच्या जागी विवेक ही शक्ती उदय पावली, की मानव सुसंस्कृत झाला व त्याचा समाज प्राथमिक अवस्थेतून निघून प्रौढ अवस्थेत आला, असे म्हणण्यास चिंता नाही.

पण समाजाची कोणतीही अवस्था असली, तरी मानवाला निग्रह, संयम, आत्मदंडन करण्यास साह्य करील, अशा कोणत्या तरी शक्तीचे अधिराज्य त्याच्या चित्तावर असले पाहिजे, हे मात्र निर्विवाद आहे.

आज आपल्या समाजापुढे हा मोठ्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे आणि त्याला आपण काय उत्तर देऊ, तो आपण कसा सोडवू, यावर आपले यशापयश अवलंबून आहे. आपल्या समाजातील व्यक्तींच्या मनावर कसले अधिराज्य आहे ? धर्मबंधनाचे नाही, हे तर निश्चित आहे. एकादशी आहे, म्हणून मध्यरात्रीपर्यंत आचमनसुद्धा घेऊ नये, आणि तशाच स्थितीत दिवसभर झुंजत रहावे, ही निष्ठा समाजात शेकडा एकाच्याही ठायी राहिली नाही. ती राहिली नाही, यात दुःख करण्याजोगे काही आहे, असे मला वाटत नाही; पण ती निष्ठा गेली, तर तिच्या ठायी दुसरी कोणती तरी आली पाहिजे, ही चिंता समाज करीत नाही, हे पाहून मात्र भीती वाटू लागते, हे खरे आहे,

आमच्या समाजात अशी कोणती निष्ठा आज आहे, असे वाटत नाही. धर्मनिष्ठा लुप्त झाली आहे व विवेकनिष्ठा अजून उदय पावलेली नाही, अशा अवस्थेत आज आम्ही आहो. आमच्या मनावर आज अधिराज्य असे कसलेच नाही.

परमार्थाचे महत्त्व कमी होताच त्या ठायी राष्ट्रनिष्ठा तितक्याच तीव्रतेने यावयास पाहिजे, तरच जीविताला काही पीळ, काही करार निर्माण होईल; पण तसे झाल्याचे आमच्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात दिसत नाही. स्वभाषेचा अभिमान हे राष्ट्रनिष्ठेचे एक प्रमुख अंग आहे. पण आता स्वातंत्र्य आल्यावरही पूर्वी इंग्रजी अमलात जितकी आणि जशी स्वभाषेची उपेक्षा लोक करीत, तशीच आजही करीत आहेत. मुंबई विद्यापीठाने तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच नव्या अवसानाने देशी भाषांच्या अवहेलनेस सुरुवात केली आहे. सार्वजनिक सभांतून मराठी न बोलण्याची जी क्षुद्र कारणे मागे सांगितली जात

असत, तीच सांगून अजूनही वक्ते इंग्रजीत बोलतात, व श्रोते ऐकून घेतात. दहा हजारांच्या समुदायात चार-दोन मराठी न जाणणारे असले, की तेवढे कारण मातृभाषेच्या उपेक्षेस पुरे होते. पूर्वपरंपरेचा अभिमान, स्वदेशीचे व्रत यांविषयी अशीच शिथिल वृत्ती सर्वत्र दिसून येते. आमच्या बुद्धीला आग्रह असा दिसतच नाही.

मातीच्या गोळ्याने कोठल्या तरी विशिष्ट आकाराचा आग्रह धरल्यावाचून त्याला मूर्तीचे पद प्राप्त होणार नाही. जसा धक्का बसेल, तसा तो गोळा मुरडू लागला, तर त्याला लाथांखेरीज दुसरे काही मिळणार नाही. मी अमुकच आकार धारण करीन, असा आग्रह त्याने धरताच लोक त्याच गोळ्याला वंदन करू लागतात. मूर्ती व मातीचा गोळा यांच्यांत अशा आग्रहाखेरीज दुसरा कोणताच फरक नाही; पण तो फरक म्हणजे जमीनअस्मानाचा फरक आहे. मानवी जीवितासंबंधी हेच खरे नाही काय ? एरवी माणूस हा मातीचा गोळा आहे. धर्म, राष्ट्रीयत्व हे जे आग्रह त्याच्या बुद्धीला निर्माण होतात, त्यानेच त्याचे कर्तृत्व फुलून येते व त्याला श्रेष्ठ पदवी प्राप्त होते.

असे आग्रह आमच्या जीवनात नाहीत, एवढेच नव्हे तर ही कल्पनाच आमच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानातून लुप्त झाल्यासारखी दिसते. आमच्या शाळा व विद्यालये पाहा. विद्यार्थ्यांच्या मनोरचनेला कोरीव, रेखीव आकार उत्पन्न करण्याची पहिली जबाबदारी शाळांची आहे आणि व्याख्या शिकवणे, नियम पाठ करून घेणे, पाठांतर करणे, सनावळी घोकून घेणे, यांनी ते संस्कार मुलांच्या मनावर होत असत. हल्लीच्या शिक्षणतज्ज्ञांचे व या संस्कारांचे वाकडे आहे. महाराष्ट्रात अशी एकही शाळा नाही, की जेथे विज्ञान, गणित, भूगोल यांतील व्याख्या मुलांनी पाठ केल्या पाहिजेत, अशी कसोशी केली जाते. 'असे का ?' म्हणून विचारले तर मोठे उदार तत्त्वज्ञान सांगितले जाते! नुसत्या व्याख्या पाठ करण्यात अर्थ नाही! पण अर्थ समजून पाठ करण्यात तर अर्थ आहे ना ? मग ते कोठे केले जाते ? कोठेही नाही. आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्थिती अशी आहे. अंध धर्मनिष्ठा गेली व डोळस विवेकनिष्ठा अजून फार दूर आहे. अर्थ समजल्यावाचून मुलांनी श्लोक पाठ करणे वाईट, म्हणून ते रद्द झाले आणि अर्थ समजाऊन देऊन पाठांतर करून घ्यावयास अजून प्रारंभ व्हावयाचा आहे. व्याकरणाची कसोशी हे रेखीवपणा निर्माण होण्याचे दुसरे साधन आहे; पण

शाळा-कॉलेजांतील जीवनातून व्याकरण हे अजिबात नष्ट होते की काय, अशी भीती आता वाटू लागली आहे. विद्यार्थ्यांच्या समोर अध्यापनासाठी उभे राहिले, म्हणजे त्यांच्या व्याख्याशून्य, व्याकरणशून्य मनांची जाणीव होऊन आपण निर्गुण-निराकार परब्रह्मांसमोर उभे आहोत की काय, असा भास होतो आणि ही काही हल्लीच्या शिक्षणातील चूक म्हणून नाही. शिक्षणशास्त्राचे हल्लीचे तत्त्वज्ञानच तसे आहे. एका शिक्षणसप्ताहात आदर्शपाठ झाल्यानंतर चर्चेच्या वेळी एका विख्यात शिक्षणतज्ज्ञाने ' मुलांनी वरून अभ्यास धरून यावा, अशी माझी मुळीच अपेक्षा नाही, त्यांची शिकण्याची इच्छा असली म्हणजे पुरे, ' असे सांगितलेले मी ऐकले आहे. ही निराग्रही वृत्ती धन्य होय !

जे शाळेत आहे तेच गृहजीवनात आहे. अमुक केल्यावाचून मी जेवणार नाही, अमुक संपल्यावाचून मी झोपणार नाही, असा करार किती बालकांच्या जीवनात सापडेल ? रोज रामरक्षा म्हटल्यावाचून मी झोपणार नाही, ही निष्ठा गेली. तिच्या जागी ' रोज टाइम्समधील अग्रलेख तोंडपाठ केल्यावाचून मी झोपणार नाही, ' ही नवी निष्ठा गोपाळराव गोखले यांनी निर्माण केली होती; पण ती जुनी व ही नवी या दोन्हीपैकी एकही निष्ठा सध्याच्या गृहजीवनात राहिलेली नाही. नियमित उठणे, नियमित स्नान करणे, नियमित नमस्कार घालणे या ज्या सवयी धर्मबंधनांमुळे मागे जडत व मातीच्या गोळ्याला आकार आणण्यास मदत करीत, त्या आता गेल्या. आता त्यांच्या जागी काय आले ? या सवयीची चेष्टा करणारे लघुनिबंध ! ' उशिरा उठण्याचे महत्त्व, ' ' आळशीपणाची कैफियत ! ' आणि हे निबंध दुसरी-तिसरीला नेमण्याची रसिकता सध्याचे शिक्षणतज्ज्ञ प्रकट करीत आहेत.

धर्मबंधनांचा आपण सध्या निरोप घेत आहोत,घेतलाच आहे; पण त्याविषयीची एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. धर्मप्रणीत बंधनांइतकी कार्यक्षमता विवेकप्रणीत बंधनांत निर्माण करणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. रशियातील कम्युनिझमविषयी लिहिताना लॉर्ड केन्स, सिडने वेब यांसारखे महापंडितही कम्युनिझम हा दुसरा धर्मच आहे, असे आग्रहाने प्रतिपादतात. प्रा. लास्की यांनी या बाबतीत प्रकट केलेले विचार फारच उद्बोधक आहेत. सोव्हिएत रशियात कम्युनिझमवर लोकांची एकांतिक व अंध अशी निष्ठा आहे. याचे समर्थन करताना ते म्हणतात की, रशियात कम्युनिस्ट पक्षाला इकडचा पर्वत

तिकडे उचलून ठेवावयाचा होता. वीस वर्षांच्या अवधीत त्यांना पाचशे वर्षांचे कार्य करावयाचे होते. इतके अलौकिक दुःसाध्य कार्य साधण्यास जे बळ लागते, ते धर्मनिष्ठेवाचून येणे शक्यच नव्हते.

पंडितांच्या या मतांचा आपण विचार केला पाहिजे. जुनी अंध, तर्कशून्य धर्मबंधने पुन्हा प्रस्थापित करावीत, असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. ती नष्ट झाल्याबद्दल मला क्षणमात्र दुःख होत नाही; पण मार्क्सवाद्यांसारख्या पूर्ण जडवादी लोकांना आपल्या पुनर्घटना करण्यासाठी जे सामर्थ्य हवे होते, त्यासाठी त्यांना, अर्वाचीन काळच्या का होईना, पण धर्मनिष्ठेसारख्याच एका निष्ठेचा आश्रय करावा लागला, या घटनेचा अर्थ आपण दृष्टिआड करून चालणार नाही. समाजाच्या रोजच्या जीवनक्रमामध्ये, शाळा-कॉलेजांत, गृह-जीवनात, सार्वजनिक जीवनात जी नियंत्रणे, जी बंधने प्रस्थापित करावयाची त्यांची विवेकशुद्धता अगदी लहान मुलांनासुद्धा दरवेळी पटली पाहिजे, पटवून देता आली पाहिजे, इतका जो डोळसपणाचा आग्रह आपण सध्या इंग्रजांच्या उदारमतवादाच्या संसर्गाने धरीत आहोत, तो घातक ठरल्यावाचून राहणार नाही. कोणत्याही समाजाला इतके विवेकनिष्ठ जीवन आचरिता आलेले नाही व येणे शक्य नाही. म्हणून कशाचा तरी आग्रह हा अवश्य असतो. कोणता तरी करार जीवनात अवश्य असतो. कोठे तरी माणसाने हटून बसणे अवश्य असते. कोणत्या तरी गोष्टी गृहीत धरून त्यांचा पीळ धरणे अपरिहार्य असते. त्यांची जी मूलतत्त्वे, त्यांच्या मागचे जे तत्त्वज्ञान, त्यांची चवकशी पंडितांनी जागरूकपणे अखंड करीत रहावी; पण प्रत्येकाच्या जीवनात ती चवकशी दरघडीला निर्माण करण्याचा जो उपक्रम चालू आहे, तो अनिष्ट आहे. व्याख्येचा अर्थ मुलांना समजत नाही, तर पाठच करू नये, श्लोकाचा अर्थ येईपर्यंत पाठांतर बंद करावे, असे जे धोरण, ते या वृत्तीचे द्योतक आहे. सार्वजनिक सभेत स्वभाषेत बोलावे, स्वदेशी व्रताचे आचरण अखंड करावे, हे नियम कोणत्याही क्षुल्लक कारणासाठी तेथल्या-तेथे ‘ विवेक ’ करून माणसे उधळून देतात, हे त्याचेच द्योतक आहे. या माणसांच्या मनाला कसलाच पीळ नाही आणि पीळ नाही म्हणजे मनुष्यत्वालाच काही उणे आहे, असा इतिहासाचा निर्वाळा आहे.

आमच्या कथाकादंबऱ्या व चित्रपट पहा. यांतले नायक कसे आहेत ?

त्यांच्या मनाविरुद्ध काही झाले, त्यांच्यांवर असह्य अशी आपत्ती आली, काही विपरीत प्रसंग आला की, लगेच दारू पिऊ लागतात, अनाचार करू लागतात. प्रेयसीने नकार दिल्याबरोबर सर्व ध्येयवाद गुंडाळून ठेवून कोठे तरी परागंदा होणे ह्याच पुरुषार्थ दाखविणाऱ्या नायकांची कादंबऱ्यांत बरीच गर्दी आहे! मोठ्या ध्येयाने प्रेरित झालेला, मोठ्या आकांक्षा चित्तात बाळगणारा व त्यासाठी वाटेल तो प्रसंग आला, तरी धिमेपणाने तोंड देणारा असा नायकच अलीकडच्या प्रसिद्ध कादंबऱ्यांत व नाटकांत सापडेनासा झाला आहे; आणि एखादा तसा असलाच, तर तो पहिल्याच तडाख्याला लोळण घेतो, असे दृश्य असते. अशा नायकाचे मनोविश्लेषण मोठ्या चतुराईने करावे, यातच कादंबरीकार गढून गेलेला असतो. जीवनात कोठे पीळ दिसेल, कोठे आग्रह दिसेल, याची जणू काय ललितलेखकांना भीतीच वाटत आहे. ' पुरोगामी वाङ्मय ' या विषयावर लिहिताना, ' टिळक-गांधी हे सरकारशी घनघोर संग्राम करीत असताना, पुरोगामी म्हणविणाऱ्या लेखकांनी बहुधा मानापमानातील लक्ष्मीधराचीच भूमिका स्वीकारलेली होती, ' असे आचार्य जावडेकरांनी म्हटले आहे, ते याच अर्थाने असावे.

रशियात क्रांती झाली, त्या वेळी काही वर्षे तेथील लोकांच्या मनावरची सर्व बंधने नष्ट झाली होती. सिगरेट, दारू, अनाचार हेच पुरोगामी, असे काही लोकांना वाटू लागले होते. चार तरुणतरुणी एकत्र जमल्यावर व्यभिचारास अनुकूल न होणाऱ्या मुलीस अनैतिहासिक वृत्तीची व मागासलेली अशी शिवी मिळत असे; पण तेथील मार्क्सवादी नेते सावध होते. निग्रह, संयम यांवाचून समाज टिकणे अशक्य, हे त्यांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी धर्मावर घाव घातला; पण त्याच वेळी सामाजिक तत्त्वज्ञान त्या ठायी प्रस्थापित केले; आणि आपल्या तरुणांना पराकाष्ठेच्या संयमाचे व निग्रही जीवनाचे धडे दिले. कम्युनिस्ट संघटनेत अनाचार तर लांबच राहिला, पण सिगरेटलासुद्धा बंदी आहे. आणि याच तऱ्हेचे अनेक निग्रह त्यांना पाळावे लागतात. ही कडक व्रते पाहूनच त्यांच्या नवीन तत्त्वज्ञानास पंडितांनी धर्म म्हणून संबोधिले. या करारी जीवनामुळे या तपश्चर्येमुळे रशियाला केवढे सामर्थ्य प्राप्त झाले आहे, हे आपण आज पाहतोच आहो.

व्रतबद्ध, नियमबद्ध, जीवनाला आपल्याकडे हसण्याची चाल आहे. पूर्वीची वेडगळ, अर्थशून्य व्रतवैकल्ये हीच त्याला बरीचशी कारणीभूत आहेत, हे खरे; पण वेडगळ बंधनांना हसताना आपण जीवनातील एकंदर बंधनांनाच हसतो आहोत, हा विवेक आपणांस राहिला नाही; आणि त्यामुळे आपले गृहजीवन, शालेय जीवन व सार्वजनिक जीवन शिथिल झाले आहे. त्यातली तपश्चर्या नष्ट झाली आहे.

नव्या शास्त्राची नवी नियमने येऊन आपल्या जीवनात पुन्हा तपश्चर्या आली नाही, तर या शिथिल, बंधनहीन जीवनास आकार येणार नाही आणि सामर्थ्य तर साकारतेत आहे. नुसत्या मातीच्या गोळ्यात नाही. परमेश्वरालाही जेव्हा-जेव्हा कार्य करावयाचे असते, तेव्हा साकार व्हावे लागते; आणि साकारता याचा अर्थच वेदान्तात बंधने, नियमने, नियंत्रणे असा आहे. त्यांवाचून प्रत्यक्ष परमेश्वरालाही सामर्थ्य प्राप्त होत नाही, मग मानवांना कसे होणार ?

# दोन महान परित्याग

अरविंद गंगाधर मंगरूळकर

कालिदासाने आपल्या कलाकृतींमध्ये पुष्कळ व्यक्तिरेखा आपल्याला बहाल केलेल्या आहेत; पण त्यांच्या रेखाचित्रणांचे साचे बनू नयेत, म्हणून त्याने विलक्षण खबरदारी घेतली आहे. ' रघुवंश ' हे एकच काव्य जरी उदाहरणांसाठी घेतले, तरी त्यात किती तरी भिन्न राजांची आणि राण्यांची व्यक्तिचित्रे आलेली आहेत. आता राजाराजांत फरक दाखविणे एकवार शक्य होईल; पण आदर्श राजा-राजांत फरक तो काय दाखविणार ? आणि तो कसा टिकविणार ? पण असे दिसते की, या राजमालिकेतला प्रत्येक राजा अद्वितीय आहे, दुसऱ्यांहून भिन्न आहे. रंगांचे उणे-अधिक थर देऊन चित्रकार ज्याप्रमाणे त्यांचा कमी-अधिक परिणाम घडवून आणतो, त्याप्रमाणे कालिदासाने त्या-त्या गुणांवर भर देऊन ही चित्रणे साधिली आहेत. हे करताना प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी एकच स्थूल गुण न कल्पिता गुणसमुच्चय कल्पून एखाद्याच विशिष्ट गुणाचा उठाव त्याने आणला आहे. एरव्ही, ही चित्रणे ठोकळेबाज झाली असती. यात काही गुणांना त्याने पुरोभूमी दिली आहे; काहींना पार्श्वभूमी दिली आहे. त्यांचा योग पुन्हा व्यक्तीशी घातला आहे. त्यामुळे राजाचे आदर्शत्व संभाळूनही प्रत्येक राजाला त्याचे त्याचे असे व्यक्तित्व आले आहे. सर्वच राजे शूर, पण दिलीपापासून शेवटच्या अग्निवर्ण राजापर्यंत शौर्यगुणाला चित्रणात वेगवेगळी भूमी दिली आहे. दिलीप हा शांत आहे; उदास आहे; धर्मप्रवण आहे; अपत्यासाठी आतुर आहे; पण त्याच्या बायकोने — सुदक्षिणेने — आपला उदासपणा निष्ठेखाली झाकून ठेविला आहे. रघू म्हणजे प्रतापी सूर्यच आहे. त्याचा पराक्रम व औदार्य, — दोन्ही दांडगी. त्याला गृहस्थी कोमलतेची नाजूक झालर नाही. तर अज हा प्रेममूर्ती; पण अजाची राणी इंदुमती हिला मात्र

फारसे व्यक्तित्व नाही. तिला तसे व्यक्तित्व दिल्याने कदाचित अजाचे चित्रण फार लिवलिवीत झाले असते. रामचंद्राविषयी जेवढे सांगावे, तेवढे थोडेच आहे. कारण त्याच्या व्यक्तित्वाला सर्वांत जास्त पैलू आहेत, आणि ते व्यक्तित्व तसेच गूढही आहे. रामाचा मुलगा कुश हा तर शीलाने आपल्या पित्यासारखा आणि मातेसारखा, – दोन्ही.

अशाच रेखाकृती स्त्रियांच्याही बाबतीत आढळतात. काही-काही स्त्रियांची चित्रणे तो स्केचिस् काढून सोडून देतो, तर काही तो आलंकारिक ( decorative ) करतो.

कालिदासाच्या स्त्रियांच्या चित्रणाविषयी काही स्थूल गोष्टी सांगता येण्यासारख्या आहेत. सीता, उमा, शकुंतला, सुदक्षिणा या सर्वांनाच दुःखे सहन करण्याचे फार मोठे सामर्थ्य आहे. शिवाय, त्यांच्या त्या दुःखाचा गगशा अथवा बकवा नाही. सर्व सोसणे शांतपणे. त्या सोसण्यात निग्रह आहे; एक प्रकारचा हट्ट आहे; ' मोडेन, पण वाकणार नाही,' ही खणखणीत वृत्ती आहे. अर्थात ही वृत्ती शकुंतलेच्या बाबतीत सौम्य स्वभावातून दिसते; तर उमेच्या बाबतीत उग्रपणाने दिसते. सीता तर दुःखाचे डोंगरच्या डोंगर पोटात घालते. तिचे दुःख पाहून आपल्याला वाईट तर वाटतेच, पण भयही वाटते. क्षणक्षर असे वाटते की, ती उरी फुटून जाणार. पण पुढे लगेच कळते की, दुःख ही तिची तपश्चर्या आहे. ती स्वतःही तसेच म्हणते. तिला त्याची जाणीव आहे. जवळ-जवळ सर्वच स्त्रियांच्या बाबतीत हे थोड्या-फार अंशांनी खरे आहे. या त्यांच्या दुःखाला कधी कधी त्या स्वतःच अभावितपणे जबाबदार असतात; पण मुळात त्या निरपराध असतात. शकुंतला आणि सीता तर अगदीच निरपराध. शकुंतला अश्रापही आहे. तिचे वय तरी किती कोवळे ! आणि इतक्या कोवळ्या वयात आपल्या बेवारशी मुलाला घेऊन राहण्याचा घोर प्रसंग तिजवर यावा ! नियतीच्या कठोर प्रहाराने या स्त्रिया अगदी जर्जर होऊन जातात, धुळीला मिळतात. पण धुळीतूनही ज्वाला उफाळावी तशी सीता उठते आणि शकुंतलाही. पण शकुंतला मात्र नंदादीपाच्या शांतमंगल ज्योतीसारखी. या त्यांच्या सर्व दुःखात कसलीच तक्रार नाही. बोभाटा नाही. दुःखाच्या आरंभवेळी त्यांना पीळ पडतो खरा; त्यांची आतडी तुटतात; पण त्यांची मनस्विनी वृत्ती, हट्टी वृत्ती त्यांना धीर देते. मग त्या एकदम अबोल होतात. बोलके दुःख सोसवते,

अबोल दुःख कापीत जाते. अशा वेळी त्यांच्या व्यक्तित्वाचा पीळ कळतो. दोन गोष्टी कालिदासाला मंजूर नाहीत, असे दिसते : पुरुषांच्या बाबतीत पराक्रमाचा बकवा आणि स्त्रियांच्या बाबतीत दुःखाचा गगशा. या कलात्मक संयमामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांना खोलपणा लाभला आहे. त्याच्या व्यक्तिरेखा शेक्सपियरच्या व्यक्तिरेखांसारख्या व्यामिश्र ( complex )'नाहीत; पण त्यांत गुणांचा, कलागुणांचा प्रचंडपणा अतिशय आहे. त्यांत epic dimensions आहेत.

हट्ट आणि निग्रह हे गुण त्याच्या स्त्रियांच्या ठायी फार आढळतात. जळून जाण्याचा प्रसंग आला, तरी सीता तोंड म्हणून उघडीत नाही. ती दुःखात मूक राहते, पण दुःखामुळे ती मूक होत नाही. तिच्या मूकत्वाचे कारण तिचा निग्रह. ज्या गोष्टी इतरांना स्वतः समजावयाला पाहिजेत, आणि रामचंद्राने ओळखावयाला हव्या अशी तिची अपेक्षा, त्या ती बोलणार नाही. कारण ते करणे तिच्या मते व्यर्थ आहे. यामुळे तिच्या अवतीभोवतीच्या लोकांवरची जबाबदारी विलक्षण वाढते. रामाने तिचा अरण्यात त्याग केल्यावर तिला वाल्मीकी भेटले. त्यांना पाहताच तिने डोळे पुसले. ती उठली आणि गर्भमंथर अवस्थेत त्यांना तिने वाकून नमस्कार केला; पण ती काही बोलली नाही. तोंड तर मुळीच वेंगाडले नाही. ( आपले सुख हे आपण लोकांना देऊ शकतो; पण दुःख हे निरंतर आपलेच असते. ते कोणीही घेऊ शकत नाही. स्वतः रामही सीतेचे दुःख पाहू शकला नाही आणि सीतेलाही रामाचे अबोल दुःख उमगले नाही. ) वाल्मीकींनी मग तिची अवघडलेली अवस्था लगेच जाणली. त्यांनी तिचे सांत्वन केले आणि म्हटले, "जानकी, मी ओळखलं. तुझ्यावरचा आरोप मिथ्या आहे आणि रामाच्या रागाला तर बूडच नाही. तेव्हा तू वाईट वाटून घेऊ नकोस. अगं, हे तुझं माहेर आहे माहेर. ( पहिल्या खेपेला स्त्रिया प्रसूतीसाठी माहेरी जातात, त्याचा हा किती हृदयंगम निर्देश आहे ! ) – आणि खरं म्हणायचं, म्हणजे रामाचा मला रागच आला आहे. कारण त्याच्या वागणुकीला ना अर्थ, ना कारण. अगं, तुझा सासरा दशरथ माझा केवढा सुहृद ! तुझा पिता जनक केवढा ज्ञानी ! आणि तू तरी केवढी पतिनिष्ठ ! अगं, कोण तुला मग जवळ करणार नाही ? तू अगदी चिंता करू नकोस. इथले शांत वातावरण तुला भारी आवडेल. येऊन-जाऊन आपल्या मुलांचे संस्कार कोण

करणार, एवढीच तुला काळजी ना ? – मी करीन ते. इथली ही शांत वाहणारी तमसा नदी, तीतलं स्नान, मुनिकन्यका, त्यांनी तुझ्यासाठी आणलेली कंदमुळे, झाडांना दोन्ही वेळ पाणी घालण्याचं तुझं काम, – साऱ्या गोष्टींनी तुझ्या दुःखाला विरंगुळा पडेल." खरोखर, त्या रामचरितमानस अशा वृद्ध वाल्मीकींच्या या गोड, शांत बोलांनी सीतेला त्या वेळी त्रिभुवन थिटे झाले असेल. तिला रानावनात हे वृद्ध माहेरच भेटले! प्रेमळ, प्रौढ सासरा भेटला! 'रामाचा आपल्याला मोठाच राग आला आहे,' असे म्हणून वाल्मीकिंनी तिच्या वाहत्या दुःखावर त्यात कशी हलकी फुंकर घातली आहे!

क्षुब्ध भावनांच्या आवेगाचे प्रसंग रंगविल्यावर समाहित वृत्तीचे भाव रंगविण्याची कालिदासाला फार रुची आहे. अजविलापानंतरही असाच एक शांत आणि उपदेशपर प्रसंग त्याने योजिलेला आहे. सीतेची अवघडली स्थिती, तिचे निरपराधित्व, वाल्मीकींचे वय, त्यांचा अधिकार, पाखरांच्याही मृत्यूने कळवळणारे त्यांचे हृदय, जनक आणि दशरथ यांच्या उभय घराण्यांशी असलेला त्यांचा घरोबा, इत्यादी गोष्टींचा कवीने किती खोल मार्मिक उपयोग केला आहे! रामावरच्या रागाचा उल्लेख तर त्याने मुळात रामाचे नावही न घेता 'भरताग्रज' (भरताचा थोरला भाऊ) असे पद योजून केला आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. या निर्देशाने सीतेला समाधान वाटले असले पाहिजे. मात्र अखेरीस अनेक वर्षांनी वाल्मीकीची आणि रामाची जेव्हा गाठ पडते, तेव्हा तो या जुन्या गोष्टी उकरून काढीत नाही. कारण त्यात काय हशील? सर्वच व्यक्ती दिलदार!

शकुंतला आणि सीता यांच्यांवर परित्यागाचा प्रसंग आला, तेव्हा त्या दोघी गर्भवती होत्या, म्हणजे स्त्रीविषयी अत्यादर आणि अत्यास्था दाखवावी अशा स्थितीत होत्या. एक अद्यापी वनकन्या, दुसरी तेजस्वी महाराज्ञी. एक अगदी कोवळ्या वयात, दुसरी प्रौढा. एक निष्पाप, दुसरी संकटांनी तावून सुलाखून निघालेली. दोघी आश्रमाच्या आश्रयाला गेलेल्या; पण शकुंतलेचा परित्याग सीतेच्याहीपेक्षा भीषण होता. नवऱ्याने दोघींना टाकले; पण शकुंतलेच्या बाबतीत दुष्यंताने तिच्या ठिकाणचा गर्भच नाकारला होता आणि त्यामुळे ती स्वैरिणी, कुलटा ठरली! सीतेच्या बाबतीत रामाने ते केले नाही. एवढेच नव्हे, तर अश्वमेध यज्ञातही तिचीच प्रतिकृती ठेवून तिजबद्दलचे गाढ प्रेम,

नितान्त विश्वास व्यक्त केला होता आणि रामाने दिलेल्या या निर्व्याज अमृताच्या गोडच-गोड घुटक्याने तिचे पोट भरून गेले होते! ती शांत झाली! तृप्त झाली!

रावणाने सीतेचे जे अपहरण केले, त्याने सीतेवर जरी मोठे संकट आले होते, तरी त्याच्या निराकरणाची जिम्मेदारी सर्वस्वी रामाची होती. किंबहुना एका अर्थाने ते रामावरचेच संकट होते. अशा संकटाचा निरास बाहुबलाने करता येतो. तसा तो झालाही. पण तिच्यावर कोसळलेले दुसरे संकट त्याहूनही भीषण होते. ते घरचे होते. अकल्पितपणे आलेले होते. मेघावाचून पावसाचे तुफान व्हावे, त्याप्रमाणे शत्रूवाचून संकट कोसळले! त्यात रामाला दोष देणे आणि मोकळे होणे, हे सोपे नव्हते. नलाने दमयंतीचा अरण्यात रात्रीच्या वेळी त्याग केला, तेव्हा नल हा कलीच्या अधीन गेला होता, आणि दमयंती त्याला दोष देऊ शकत होती. कारण ते परस्परातले वैयक्तिक निवाडे होते. त्यात ध्येय-धोरणांचा प्रश्न नव्हता; पण येथे परिस्थिती वेगळी होती. प्रश्न नुसता वैयक्तिक असता, तर हे उत्तररामचरित कदाचित घडलेच नसते; पण तो प्रश्न दुसऱ्या व्यापक प्रश्नाशी गुंतलेला होता. त्यामुळे पेच पडतो तो आपल्याला, आणि दुःख होते ते त्या दोघांना. या पेचात आपण रामाचा पक्ष जसा घेऊ शकत नाही, त्याप्रमाणे सीतेलाही फक्त सहानुभूतीच दाखवू शकतो. एखाद्या सायंकाळी तिच्याजवळ बसून आपण दोन अश्रू तमसेत ढाळू शकतो, इतकेच काय ते! पण रामाबद्दल सहानुभूती दाखविण्याइतके आपण त्याच्याजवळही जाऊ शकत नाही. कारण तो चंद्राइतका अभिराम असुनही त्याचे सान्निध्य चरचरीत आणि असह्य आहे. तो सर्वांशी करुणापूर्ण आहे, पण प्रेमविषयीभूत व्यक्तींना भारी कठोर आहे. लक्ष्मणाशी तो असाच कठोर झाला आणि त्याने त्याचा त्याग केला. त्याबद्दल त्याला दुःख झाले नसेल काय? ज्याने चौदा वर्षे सावलीसारखी रामाच्या सान्निध्यात आत्मविलोप करून काढिली, त्याला गवताच्या पात्याप्रमाणे फेकून देणे हे रामाला काहीच नसेल काय? आणि त्याने लक्ष्मणाला तरी काय वाटले असेल? पण ही माणसे म्हणजे खरोखरच ज्वाळा भक्षण करणारी माणसे आहेत! आणि ज्वाळा भक्षण करूनही वर तृप्तीच्या ढेकरा देणारी! त्यांचा मृत्यू हाही जणू अनंतकाळच्या जीवनासाठी आहे!

सीतेचा परित्याग ही केवळ भारतीय वाङ्मयामधलीच नव्हे, तर भारतीय

संस्कृतीमधली अत्यंत विलक्षण शोककारी घटना आहे. केवळ वाङ्मयीन घटना म्हणून या घटनेचा आपण विचार करू शकत नाही. ती आपल्या जीवितपटात सामावून गेलेली गोष्ट आहे. मालकाने घरच्या पाळीव पक्षिणीला कपटाने खाटकाच्या हवाली करावे, त्याप्रमाणे सीतेच्या परित्यागाचे दृश्य दिसते, असे भवभूतीने म्हटले आहे. पण या म्हणण्यात त्रागा आहे. काहीसा बेभानपणा आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, राम आणि सीता यांचे दुःख हे आपलेच दुःख आहे. आपल्या संस्कृतीमधला ध्येयवादाच्या दृष्टीने उज्ज्वल पण अनाकलनीय, आणि व्यक्तिगत दृष्टीने पराकाष्ठेचा दुःखमय प्रसंग, असे त्याचे काहीसे वर्णन करता येईल. पण इतक्या दुःखदायक प्रसंगातही सीतेच्या ठिकाणी लाचारी, भग्नता वा संताप प्रकट झाला नाही. तिच्या निग्रहाचे वज्रमय स्वरूप हे असे आहे. ते पाहिले, म्हणजे रामाने केलेला तिचा परित्यागही बोथट होऊन जातो, आणि आपले लिवलिवीत कणे ताठ होतात. सीता कधीकधी किती नम्र होते, तेही याच संदर्भात पाहण्यासारखे आहे. लंकेहून अयोध्येला आल्यानंतर सीता ही आपल्या सास्वांना भेटायला गेली, तेव्हा त्यांच्या दुःखांना नमस्कार करताना ती म्हणाली, "रामावर नाना संकटे आणणारी ही मी कुलक्षणी सीता नमस्कार करते आपल्याला!" तो आत्मारोप नव्हता; तर दुःखाच्या पुढ्यातली ती नम्रता होती; पण रामाने आपला त्याग केल्यानंतर राखेतून ज्वाळा उसळावी तशी, पण नम्रपणे ती उभी राहिली. ती लक्ष्मणाकरवी रामाला म्हणाली, "मी अग्नीत शुद्ध झाले. ती तुझ्या डोळ्यांदेखत, आणि आता सांगोवांगीच्या गोष्टींवरून तू माझा त्याग करतोस होय? हे तुझ्या ज्ञानाला शोभतं! आणि कुळालाही शोभतं! — पण तुला तरी दोष देऊन काय उपयोग? जीवितात तू स्वैर वर्तन कधीही केलेलं नाहीस, हे मला पूर्ण माहीत असता मी तुला दोष तरी कसा द्यावा? माझीच ही जन्मजन्मांतरीची पातकं म्हटली पाहिजेत! पूर्वी तू लक्ष्मीचा त्याग केलास, आणि माझ्याबरोबर वनात आलास! हा दावा आता लक्ष्मीनं साधला, आणि मला घरातून बाहेर काढायला लावलं, दुसरं काय? वाईट एवढंच वाटतं की, जी मी आश्रयदात्री होते, तीच आज आश्रित बनले! असो. असं झालं, तरी माझ्या उदरातली तुझी जिवंत आठवण मी नष्ट करणार नाही. ती रघुकुलाची कोवळी आठवण आहे. म्हणून यापुढे मी तपश्चर्या करीतच उरलेलं आपलं जीवन कारणी लावणार आहे.

या तपस्येचं फळ मला पाहिजे, ते एवढंच की, पुढच्या जन्मीही तूच माझा पती व्हावास,—पण अशी ताटातूट मात्र त्यात नको. ( ती याच जन्मी दोनदा झाली ! ) आता तुला एवढच विनवायचं आहे की, यापुढे मी महाराज्ञी नाही. एक साधीसुधी तपस्विनी आहे आणि तसंच तू माझ्याकडे पाहावंस, याहून जास्त काही नको. ”

रामाची ही गृहलक्ष्मी खरोखर केवढी डोंगराएवढी आहे ! जिचे चारित्र्य असे, तिला रामावाचून अन्य पती शोभणार तर नाहीच, पण सहनही होणार नाही. पहिल्या सपाट्यास तिच्या बोलण्यात जी धार आली, ती क्षणभरच ! पण पुढे ती लगेच सावरली. या सर्व निरोपात केवढा संयम आणि समंजसपणा आहे ! आत्मसमर्थनाचा शब्द नाही, की लाचारीची हवा नाही ! त्याने रामचंद्रच जणू पराभूत झाला.

आणि खरोखरच राम पराभूत झाला ! सीतेचा हा सारा निरोप लक्ष्मणाने रामाला सांगितला. हेतू असा की, ‘ आता तरी रामाने तिला परत आणायला सांगावे. ’ पण चौदा वर्षांच्या सहवासानंतरही लक्ष्मणाला ‘ राम ’ कळला नाही, असे म्हटले पाहिजे. मानवी जीवन हे असे आहे, क्षणात कळते, ते जन्मात उमगत नाही आणि जन्मभर एकत्र राहूनही एक क्षणही कळत नाही. मात्र तो निरोप ऐकताक्षणी राम गहिवरून आला ! त्याचे गोड मुख पौष मासातल्या चंद्राप्रमाणे उदास, धुकट होऊन गेले. ते अश्रूंनी डवरून आले. कारण मैथिलीला त्याने घरातून जरी काढून लावले होते, तरी मनातून काही काढून लावलेले नव्हते. ज्या जानकीसाठी रामाने अरण्यात तो अमर शोक केला होता, त्या जानकीची किंमत आता ‘ एक अश्रुबिंदू ’ ! पण तो अश्रू दसलाखाचा होता ! कारण तो घनगंभीर रामाचा होता !

कालिदासाने वर्णिलेला सीतेचा शब्द तर पराकाष्ठेचा करुण आणि अन्योदात्त आहे. रामाच्या अश्वमेधयज्ञासाठी कुश आणि लव हे ‘ मैथिलीपुत्र ’ ( —हा कालिदासाने योजलेला खास शब्द ! कारण रामाला अजून त्यांची ओळख पटावयाची होती, आणि त्याने त्यांचा स्वीकारही केलेला नव्हता.—) आले होते. यज्ञमंडपामध्ये ते वाल्मीकींनी शिकविलेल्या रामायणाचे मधुर गायन करीत, तेव्हा ठिकठिकाणी त्यांच्या भोवती आबालवृद्ध मंडळींचे कडे पडे. ती गोड मुले, रामाचे गंभीर चरित्र, वाल्मीकींची अभिजात कलारचना, कुशलवां-

सारखे कोकिलकंठ गायक, रूप व गायन यांच्या वावर्तीतले त्यांचे अप्रतिम माधुर्य, या सर्वांमुळे श्रोते नुसते धुंदफुंद होऊन जात आणि हा काही साधारणांचा अभिप्राय नव्हता. गानकलाभिज्ञ अशा काव्यज्ञांचा तो अभिप्राय होता. तो शेवटी रामाच्या कानी गेला. रामाला मोठे नवल वाटले, आणि त्यांनी केलेल्या आपल्या चरित्राची गायने ऐकायला स्वतः रामाची स्वारी आपल्या भावांसह आली. गोड बालआवाजीमध्ये त्यांचे गायन सुरू झाले मात्र,--सारी सभा चित्रासारखी तटस्थ झाली. पहाटेच्या वेळी एखाद्या निर्वात वनस्थलीवर दवबिंदू चमकावे, त्याप्रमाणे ऐकता ऐकता सभाजनांची मुखे अश्रूंनी डवरून आली ! गहिवर दाटले ! त्यांचे चेहरेमोहरे तर थेट रामासारखे ! जणू दोन रामांनी एका रामाच्या चरित्राचे गायन चालविले होते. पोरवय पाहून रामाने त्यांना काही देणग्या देऊ केल्या; पण ते त्या घेत ना ! —केवढी ही नाट्यवंचना ! ते 'कुश लव' काय 'कुशीलव' होते ? व्यावसायिक होते ? आणि त्यात पित्याने मुलांना दिलेली देणगी ! ! जेथे सर्वच त्यांचे, तेथे रामाचे प्रीतिदान हे कोणाचे म्हणावे ? जेथे त्यांचे जीवितच रामापासूनचे, तेथे प्रीतिदाने तरी कोणाची ? मुले रामासारखी, हे सभाजनांना दिसणे सहज शक्य; पण रामाला ते कसे पटावे ? आपला मुलगा आपल्यासारखा आहे, ही साक्षही लोकांनीच पटवावी लागते ! एकाच वेळी केवढी जवळीक, आणि केवढा दुरावा ! समोरून हत्ती निघून गेल्यावर त्याची पावलट पाहून तो हत्ती असल्याची खात्री पटावी, तसा हा प्रकार होता ! पण मुलांची ही इतक्या कोवळ्या वयातली कडकडीत निःस्पृहता पाहून लोक मात्र थक्क होऊन गेले. रामाने त्यांना विचारले,

" बाळांनो, तुम्हांला हे गायन कुणी शिकविलं ? आणि ही कुणाची बरं रचना ? " ( पित्याचा मुलांना किती परखड प्रश्न हा ! )

कुशलवांनी अर्थातच वाल्मीकिमुनींचे नाव उच्चारिले.

क्षणात रामाला सर्व चित्रपट उलगडला असावा. तो गंभीर झाला, आणि वाल्मीकींकडे गेला. सीतात्यागाची, पुत्रवियोगाची निष्कृती त्याला कदाचित करावयाची होती काय ? कालिदास हा अनेकदा धड्यामधले शब्द सोडून देतो, असे दिसते. रामाने आपले सर्व राज्य वाल्मीकींच्या पायी वाहिले – कशासाठी ? ते राज्य काय वाल्मीकी घेणार होते ? की सीता घेणार होती ? की छोट्या देणग्याही

न घेणारी ती गोंडस मुले ते घेणार होती ? खरोखर, रामाचा हेतू काय होता ? की ती नुसती प्रतारणा होती ?—राम ? आणि प्रतारणा ?— पण हा सर्व प्रसंग कूट आहे खरा. वाल्मीकींनी सर्व जाणले. त्या कारुणिक कवीने रामाला म्हटले. " रामचंद्रा, ही मैथिलीची मुलं तुझीच मुलं आहेत. तेव्हा आता तू सीतेचा स्वीकार कर. तेच उजू आहे. "

" मुने, सीता खरोखर अग्नीमध्ये शुद्ध होऊन निघालेली आहे तिच्या शुचितेबद्दल काय मला शंका आहे ? ( लोकापवाद आणि मी काय एकरूपच आहो ? ) पण राक्षसांचे शील सर्वांना माहीत आहे, त्यामुळे येथल्या लोकांना तिच्या शुचितेची खात्री पटेना. —पण असो. मैथिलीनं अयोध्यावासीयांची प्रचीती पटवावी, म्हणजे झालं. मी मुलांसकट तिचा स्वीकार करीन. " तीर्थोदक आणि अग्नी यांचीदेखील शुचिता ज्या सीतेच्याच निकषावर पाहावी, तिला स्वतःच्या शुचितेची प्रतीती करून देण्याचा प्रसंग यावा ना ? पण लोकोत्तर प्रतिभावंत आणि जग यांमध्ये अनेकदा असा तडा जातो. ही आपली मुले आहेत, हे कळल्यावरही रामाचे पुत्रवात्सल्य दुष्यंतासारखे अनावर झाले नाही. तो शांतच होता. आणि एकंदर प्रसंगाला आता काहीसे अटीतटीचे आणि प्राचीन कायद्याचे स्वरूप आले होते. रामाचा हा निवाडा होता. तो शासनाधिपती होता; आणि वाल्मीकी झाले, तरी त्यांना धर्मासनस्थ राजाचा निर्णय मानणे भागच होते. या सर्व पेचात आता न्याय हा अन्याय दिसू लागला ! सुचिता ही अशुची ठरली !

कल्याणैषी वाल्मीकींनी धर्मासनस्थ राजाचा हा न्याय मान्य केला आणि अन्याय पचविला ! सीतेची शुचिता त्यांना माहीत होती; पण तिची अशुचिता त्यांनी तेवढ्यापुरती गृहीत केली. हेतू हा की, साऱ्यांचेच कल्याण व्हावे. सीतेने एखादे दिव्य करून दाखवावे, एवढीच काय ती मागणी ! किती क्षुल्लक मागणी ! —क्षुल्लक ? —पण एकदा त्या वृद्ध मुनींनी ती मागणी मान्य केल्यावर आणि सीतेला शिष्यांकरवी आश्रमातून यज्ञमंडपात आणविल्यावर सीतेला मात्र आपले वृद्ध माहेरही फिरल्यासारखे वाटले असेल. दुष्यंताने त्याग केल्यावर शकुंतलेचा तिच्या माहेरच्याही माणसांनी असाच त्याग केला. सीता आता तिसऱ्यांदा अयोध्येत आली. पहिल्यांदा ती अयोध्येत आली, ती नवोढा म्हणून, नवी नवरी म्हणून. दुसऱ्यांदा आली, ती महाराज्ञी होण्यासाठी आली, अणि

आता तिसऱ्यांदा ती आली, ती तपस्विनी माता म्हणून. प्रथम आली, ती निर्लेप कुमारी म्हणून. नंतर आली, ती रावणाचा कलंक घेऊन. शेवटी आली, ती तो कलंक धुण्यासाठी. एका काळची महाराज्ञी! आणि आजची तपस्विनी! आजची तपस्विनी आणि उद्याची देवता! जानकी, याज्ञसेनी, शकुंतला या सर्वांनाच अशा राजसभेत अशा घोर प्रसंगानें यावे लागले आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. सीतेच्या बरोबर ते तेजस्वी कुमारही होतेच. भारतीय आर्यस्त्रियांची ती महन्मंगल मूर्ती असलेली सीता काषाय वस्त्रे नेसली होती. बरोबर वाल्मीकी होतेच. कालिदासाने म्हटले आहे की, उदात्त स्वर आणि शब्दसंस्कार यांनी सिद्ध झालेल्या ऋग्वेदातल्या ऋचेसमवेत सूर्याला सामोरे जावे, त्याप्रमाणे वाल्मीकी दोन मुलांसकट असलेल्या सीतेला घेऊन त्या उदास, तेजस्वी रामाकडे आले. केवढा अद्‌भुत प्रसंग हा! ज्यांनी तो पाहिला ते धन्य! असामान्यांचा हा प्रसंग; आणि तो सामान्यांनी पाहिला. सीता येऊन स्तब्ध उभी राहिली. तिचे उदास, विशाल नेत्र आपल्या पायांवर खिळलेले होते; पण ती येताच समाजनांचे नेत्र आपोआप खाली वळले. लोंगर पिकले म्हणजे साळींच्या माना लवतात. त्याप्रमाणे, सभाजनांमध्ये जे कलुष होते, त्यांचे लवले आणि शुद्ध होते, त्यांचेही लवले. जिला शुद्धतेशिवाय दुसरे काहीच माहीत नाही, तिच्या बाबतीत दुसरं अनुमान ते कसले! लोकोत्तर माणसांची संकटे पाहू नयेत, असे म्हणतात. लोकोत्तर माणसांची तेजस्विताही कोणाला पाहता येत नाही.

वाल्मीकी दर्भासनावर बसले होते. त्यांनी सीतेला आपल्या शीलाबद्दल लोकांची खात्री पटविण्यास सांगितले; परंतु वाल्मीकींसारख्या दिव्यचक्षू ऋषीलाही नियतीचे विलसित अंदाजता आले नाही. काय होणार, आणि सीतेच्या मनात काय होते, ते कोणालाच माहीत नव्हते. कदाचित सीतेलाही ते माहीत नसेल. यापूर्वी सीतेने एक ' दिव्य ' केलेले होते; पण ते लंकेत. त्या वेळी राम हा अतिशय उग्र झालेला होता; पण लंकेतल्या त्या ' दिव्या ' चे अयोध्यावासीयांना काय होय? म्हणून आता दुसऱ्या ' दिव्या ' ची मागणी! एका ' दिव्या ' ने ज्यांची खात्री पटली नाही, त्यांची जणू दुसऱ्याने पटणार होती. ' दिव्य ' म्हणजे काय ' चमत्कार ', आहे? ' जादू ' आहे? ते काय कोयीतून रोप काढून दाखवायचं आहे? —तो पुनर्जन्म आहे. ती जीविताची शुद्धी आहे, आणि ती

एकदाच होत असते. आता या वेळी 'दिव्य' करणे म्हणजे क्षणभर का होईना, लंकेतल्या सीतेच्या स्वीकारापासून हा वेळपर्यंत तिचे चारित्र्य कलंकित होते, असे न सांगता ध्वनित करण्यासारखे होते. तेजोगोलाने आपल्या कपाळावर कलंक वागविण्यासारखे होते. निष्पापांच्या ठिकाणी पाप, अभिमानी लोकांच्या ठायी अपमान, निर्मलांच्या बाबतीत मल, हे जानकी, पांचाली आणि शकुंतला या पुण्यश्लोकांचे भागधेय आहे! शिवाय, आता सीता ही काही जीवनाला इतकी चिकटून राहिलेली नव्हती की, लोकांखातर, रामाखातर, मुलांखातर, वाल्मीकींखातर, वा राज्ञीपदाखातर हा सर्व खटाटोप तिने करावाच. कार्य संपताच बत्तिसाव्या वर्षी जगाचा मुकाट्याने निरोप घेणारे एकविसाव्या वर्षी सांगून जगातून निघून जाणारे महात्मे जगात होऊन गेले. त्यामुळे वाल्मीकींच्या शिष्यांनी सीतेच्या ओंजळीत घातलेले पुण्योदक तिने घेतले आणि मेघांच्या गंभीरपणाने तिने उच्चार केला, "वाणी, मन आणि कर्म यांतल्या कोणत्याही द्वारे पतीच्या ठिकाणी माझा व्यभिचार नसेल, तर हे विश्वंभरे देवी, मला तू आपल्या उदरात घे." रामाने परित्याग केला, तेव्हा यापूर्वी ती मूर्च्छित होऊन आपली आई धरित्री हिच्याकडे गेली होती; पण त्या वेळी आईच्या मनात जणू किंतु होता. त्यामुळे तिने मुलीला उदरात घेतले नाही; पण आज कसोटी सीतेची नव्हती; धरित्रीचीच होती! आज प्रसंग वेगळा होता. सीतेचे वरील उद्गार विराम पावताच विद्युल्लतेच्या तेजाप्रमाणे भूमीच्या उदरातून एक तेजोमंडळ प्रकट झाले. साक्षात वसुंधरा प्रकट झाली! त्या वसुंधरेला महासागरांचा — रत्नाकरांचा — कमरपट्टा होता. तिने त्या भूमिकन्येला आपल्या मांडीवर घेतले आणि रामचंद्र 'नको, नको' म्हणत असताना भूमिदेवी भूमिकन्येसह जेथून आली, तेथे लुप्त झालीच. जाताना सीतेने एकवार आपल्या त्या सुंदर, कठोरकोमल पतीकडे डोळाभर पाहून घेतले!

शकुंतलेचे अखेरीस पुत्रासह दुष्यंताशी मीलन झाले. याज्ञसेनीचे पाचही मुलगे युद्धात मारले गेले, पण शेवटी तिला राज्ञीपद मिळाले. द्रौपदी पतींच्या सहवासात होती, सहवासातच राहिली. पण जानकीचा योग वेगळा होता. तिला पती लाभला, त्याचे प्रेम लाभले, पण त्याचा चिरयोग झाला नाही. रावणाने सीतेचे अपहरण केले, तेव्हा ती दोघेही एकमेकांना हवी होती. लंकेत रावणवधानंतर ती लाभली, तेव्हा रामाने तिचा त्याग केला, पण तो लोकांखातर.

नंतर त्यांचे मीलनही झाले. अयोध्येत त्याने तिचा दुसऱ्यांदा त्याग केला. तो केवळ लोकांखातर होता काय ? तसा तो नसावा. त्याने तिला टाकले; पण तिला तो हवा होता. अरण्य, लंका आणि अयोध्या या तिन्ही ठिकाणी राम आणि सीता यांचा वियोग झाला. अरण्यात तो प्रीतीच्या गाढ सावलीत झाला. लंकेत तो लोकांच्या अग्निकाष्ठात झाला आणि अयोध्येत तो कर्तव्याच्या प्रखर उन्हात झाला. अरण्यात ती दोघेही यौवनाच्या उभारीत होती; लंकेत ती काळजीच्या मध्यान्हीत होती. अयोध्येत ती परिपक्वतेच्या माधुर्यात होती. त्यामुळे अयोध्येतला त्याग हा जसा कारुण्यपूर्ण तसाच संस्मरणीय होता. श्रेष्ठ मूल्यांच्या दृष्टीने तो संस्मरणीय आणि मूल्यांच्या परिमाणांच्या दृष्टीने कारुण्यपूर्ण. अयोध्येतील त्याग महान; पण तो दोन प्रकारचा होता. जीवनातल्या श्रेष्ठ मूल्यांच्या प्रतिपालनासाठी प्रथम रामाने सीतेचा त्याग केला. या त्यागाचे फळ अमूर्त होते; पण नंतर सीतेने आपल्या व्यक्तितत्वाच्या शुचितेसाठी रामाचा त्याग केला. भारतीय संस्कृतीत पतिपत्नींनी एकमेकांचे केलेले हे दोन महान परित्याग होत ! नुसता रामाने सीतेचा परित्याग केला असता, तर तो कदाचित करकरीत आणि असह्य झाला असता; पण सीतेनेही भूमिप्रवेशापूर्वी त्याचा तसाच परित्याग केला. त्या परित्यागाने रामाने केलेल्या पूर्वीच्या त्यागाला कोमलता आली, शोभा आली. एकतर्फी त्याग हा त्याग होत नाही; धिक्कार होतो. दुतर्फी त्याग हा उच्च अर्थाने, व्यापक भूमिकेने स्वीकार ठरतो. त्यात लौकिक दुःखाचा विलाप असतो; पण अलौकिक आत्मिक समाधान नांदते. ती खरी शोकात्मिका होते आणि त्या शोकात्मिकेचे स्वरूप वैश्विक होते. समजा की, सरतेशेवटी अयोध्यावासीयांच्या मागणीवरून, रामाच्या सांगीवरून, वाल्मीकीच्या आज्ञेवरून सीतेने जर एखादे ‘ दिव्य ’ केले असते.—तर लोकांची खात्री कदाचित पटली असती; पण मग सीतेचे काय झाले असते ? रामाची गृहलक्ष्मी म्हणून पुन्हा तिने यावयालाच पाहिजे होते ? पुन्हा सिंहासनावर बसावयालाच हवे होते ? पुन्हा लौकिक आचारविधीमध्ये निमग्न व्हावयालाच पाहिजे होते ? लौकिक दृष्ट्या यशस्वी व्हायलाच पाहिजे होते ?—कशासाठी ?— कशासाठी ?

# बटाट्याची चाळ : एक चिंतन

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

बटाट्याची चाळ अजून उभीच आहे. ऊन खात, पाऊस पचवीत, समोरच्या नवीन-नवीन इमारतींना तोंड देत उभी आहे. खिडक्यांचे आणि कठड्यांचे लाकडी गज अर्ध्याहून अधिक उडाले आहेत. जिने आपली पायरी सोडून वागायला लागले आहेत. भल्याभल्यांचे पाय इथे घसरू लागले आहेत. भिंतीचे पोपडे उडाले आहेत. रंग तर कित्येक वर्षांपूर्वी उडाला. खूपच वर्षे झाली त्याला. आज जो रंग भिंतींना दिसतो ती छटा कोठल्याही डब्यातून येणाऱ्या रंगाची नाही. हा अनेक वर्षे अनेकांनी पुसलेल्या बोटांतून, टेकलेल्या डोक्यांतून, धुरातून तयार झालेला रंग आहे.

ओळखू येण्यासारखा रंग होता तो फार जुना काळ !—फार फार जुना. त्या वेळीं मुंबईची रहदारी कुणालाही धक्के न देता हलत होती. अधिक लफ्फेबाज मंडळी व्हिक्टोरियातून जात येत. मोटारी मोजक्याच होत्या. त्यांनाही दोन्ही बाजूंना चकचकीत पितळी कंदील होते. त्यामुळे त्या खानदान सोडलेल्या उनाड, थिल्लर पोरींसारख्या हुंदडत नव्हत्या. व्हिक्टोरिया घोड्यांची मने न दुखतील, अशा बेताच्या वेगाने धावायच्या.

घरांतली कर्ती माणसे त्या वेळीं हंगेरियन टोप्या घालायची, नाही तर चौकड्यांचे रुमाल बांधायची. वकिलांना पगड्या घ्यायची ऐपत होती – आणि डॉक्टर लोक भक्कम आकाराची फेल्ट हॅट घालायचे. माणसे एक तर म्हातार-पणामुळे मरायची; किंवा प्लेग, देवी, कॉलरा यांसारख्या मातब्बर रोगापुढे मान टाकायची. इन्फ्ल्युएंझादेखील जरा अधिक ताकदीचा होता. तात्पर्य, तो ‘ काळ ’ काळ म्हणून घ्यायच्या लायकीचा होता.

देशभर पारतंत्र्याचे वारे खेळत होते. पुढारी संख्येने बेताचेच होते.

करमणुकीच्या कार्यक्रमांना ' सांस्कृतिक कार्यक्रम ' म्हणत नसत. नाटक, नाच, नायकिणीचे गाणे—असे ठसठशीत शब्दप्रयोग होत आणि असल्या गोष्टींशी संबंधित असणारांना वस्तीच्या अलीकडे ओढण्याचा आग्रह नव्हता. नाटकी मंडळी तोंडाला रंग लावल्याशिवाय बोलत नसत आणि गाणारी मंडळी केवळ तबल्या-तंबोऱ्यांच्या आधारावर जगायची. संगीत तिथूनच फुलत होते. परिषदा नव्हत्या आणि चर्चा नव्हत्या. दिवसा मिळणाऱ्या प्रतिष्ठेशी ह्या रात्री जागव णाऱ्या मंडळींना कर्तव्य नव्हते. चांगली ऊन्हे पायांशी लोळेपर्यंत कुशी बदलत रात्रीच्या सुरांची मस्ती चाळवीत ही मंडळी पडलेली असे.

साहित्याचा बाजार भरलाच नव्हता. फुटकळ विक्रीची दुकाने होती—अजून पेठ तयार झाली नव्हती. कुठे तरी दोनपाच पाले ठोकलेली होती. त्यांत समर्थांचे श्लोक छेलबटाऊ मोहनेला टेकून उभे असत आणि ठकसेन राजपुत्राच्या खांद्यावर मान टाकून शनिमाहात्म्य विसावलेले दिसे. कथा-कहाण्या सरळ होत्या. कुणाचे तरी भले व्हावयाचे, नाही तर निसंतान व्हायचे. वायफळ शब्दांचे बुणगे साहित्यात घुसले नव्हते. जे काही तेथे घडायचे, ते दांडीवर टाकलेल्या राजापुरी पंचांइतकेच स्वच्छ, विनसुरकुतलेले आणि देशी ! कथानायक आणि नायिका सद्‌गुणी असत. नायकाने नायिकेला पाहिले की तिच्याशी लग्न करावे, असा एक साधा, सरळ, कुठल्याही निरोगी पुरुषाला येणारा विचार मनात येई. आणि मग कथालेखक उगीच त्या दोघांना इकडूनतिकडून हिंडवून शेवटी त्यांचे लग्न जमवीत. मग ' प्रिय वाचक ' नावाच्या गृहस्थाला बरे वाटे ! ' प्रिय वाचकां'चे मागणे त्याहून ' लई ' नसायचे, झोपेपुरते त्याला एखादे पुस्तक लागायचे. कुठल्याही सद्‌गुणी माधवाचे आणि सुंदर व शालीन मालतीचे लग्न झाले आणि ती सुखाने नांदू लागली, की तो निद्रादेवीच्या राज्यात जायचा. निद्रादेवीची वगैरे त्या वेळी राज्ये होती. पुढे ती खालसा झाली.

हा सारा काळ आता गेला; पण बटाट्याच्या चाळीने पाहिलेला हा काळ आहे. बटाट्याच्या चाळीचा रंगदेखील त्या काळाबरोबरच उडत गेला. त्या वेळी ' सफेती ' म्हणत रंगाला. रंगसंगती जन्माला आली नव्हती—रंगसफेतीचा तो काळ ! तिच्या आयुष्यात मुद्दाम म्हणून दिलेले दोनच रंग. एक मूळचा चुना फासला होता तो—आणि पहिल्या महायुद्धात इंग्रजांचा जय झाला तेव्हा मालकांनी तिला पिवळी केली होती. खिडक्या-कटड्यांना मात्र जे एकदा

मद्रासी तपकिरीच्या रंगाचे लिंपण असले, ते कायमचे. त्यानंतर मग चुन्याची बोटे पुसून अगर पानाच्या पिचकाऱ्या टाकून मंडळींनी जी काही रंगोटी केली, ती निराळी !

स्थूलमानाने आठवणी सांगायच्या, म्हणजे पहिल्या कायदेभंगाच्या चळवळीत चाळीचे कठडे भंगायला सुरुवात झाली. वेचाळीसच्या चळवळीत आणि काही होळ्या मिळून लाकडी गज उडाले आणि खिडक्या उघड्या पडल्या. दुसऱ्या महायुद्धात ब्लॅक-आउटचे निमित्त होऊन जिन्यातले आणि गॅलरीतले दिवे गेले ते पुन्हा आलेच नाहीत. प्रजासत्ताक-दिनाच्या घोषणाईला चाळीतली मंडळी कोटात जाऊन वर्षभराचे दिवे एकदम पाहून घेतात. कठडे गेले, दिवे गेले, फरशी उखडत चालली आहे. भिंतीवर आतल्या बाजूला दुधाचे हिशेब आणि बाहेर कोळशांच्या आणि खडूच्या साहाय्याने काढलेली ' चाइल्ड आर्ट ! ' मुख्यतः ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत नुसत्या रेषा किंवा क्वचित खिळ्यांनी लांब फराटे ओढलेले आहेत. काही ठिकाणी कोणी तरी ' दुष्ट ' किंवा ' डुक्कर' असल्याविषयीचा उल्लेख आहे. दुसऱ्या मजल्याच्या जिन्याच्या एका खांबावर ' नाना कर्झन आहे. ' असा खिळ्याने लाकडात कोरलेला एक उल्लेख आढळतो, त्यावरून ही चाळ कर्झनच्या काळात उभी राहिली असावी, असाही कोणी तर्क बांधील. त्याखेरीज जागोजागी खिळ्यांनी भिंतीत कोरलेला उगवता सूर्य आणि उडते कावळे यांच्या चित्रांमुळे इथे आगळी शोभा आली आहे. शौचकूपांतल्या भिंतीवर मात्र अगदी अलीकडेच खजुराहच्या चित्रकलेला खाली पाहायला लागणारी चित्रे दिसू लागली आहेत. पूर्वी केवळ पानांच्या पिचकाऱ्यांतून काही अभावित आकृती निर्माण होत; परंतु ही अतिप्राचीन धर्तीची चित्रे ही चाळीतल्या अतिअर्वाचीन मंडळींची देणगी आहे, असे म्हणतात.

बाकी एरवी बटाट्याची चाळ आयुष्यभर ओकीबोकीच राहिली. उगीच दसरादिवाळीला चारसहा पणत्या, झेंडूची तोरणे आणि आंब्याचे टहाळे सोडले, तर चाळीवर बाकी सौंदर्याचे संस्कार जवळजवळ नाहीतच. क्वचित कुणी गॅलरीत रांगोळीही घालीत असत; पण ती घालून होण्यापूर्वीच येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या पावलांनी गॅलरीभर व्हायची. नव्या नवऱ्या चार दिवस आपापल्या परीने खोल्यांची दारे-खिडक्या सजवा-धजवायच्या; पण वर्षभरातच दुपटी वाळायला लागायची पुढल्या कठड्यावर आणि मग पाळण्यातली मंडळी जमिनीवर

झोपायच्या वयाची झाली, की गाद्यांही वाळत पडायच्या कठड्यावर. अंगा-खांद्यांवर शोभेची लेणी पडली नसली, तरी चाळ राहिली मात्र सदैव नांदती-गाजती ! साथीच्या आणि लढाईच्या दिवसांत आसपासच्या चाळी ओस पडल्या; पण बटाट्याची चाळ तशी होती. ढीम लागू दिला नाही इथल्या माणसांनी प्लेगाला आणि जर्मन-जपान्यांना ! चाळीला वाऱ्या-उजेडाचे वावडे ! मधल्या चौकात चाळीची सारी घाण साचते. डास आहेत, ढेकूण आहेत, पिसवा आहेत, —पण माणसे पणतवंडांना मांडीवर खेळवून गेली. मलेरियात कुडकुडली, प्लेगात गाठी उठल्या, देवी आल्या, पण साठीच्या आतले काही कुणी कुणाच्या खांद्यावरून गेले नाही. चाळीचा चिवटपणा दिसामासांनी चाळकऱ्यांत देखील उतरला. चाळीतल्या डासांची नाही म्हटले तरी हजारावी पिढी असेल; पण मच्छरदाणी ही वस्तू चाळीत नव्हती. मच्छर-दाण्या आल्या, त्या ब्रिन्हाडातल्या पोरी कारकुनी करायला लागल्या, तेव्हापासून. एरवी माणसे उघड्यावर झोपली. टेबलावरचे पंखे, भिंतीवरचे आरसे, एक-सारखे एक चहाचे कप आणि बशा, बायकांच्या छत्र्या, मखमली चपला मनीब्यागा—असल्या गोष्टी चाळींत आल्या, त्या पुरुषांच्या पगारातून नाही, मुलींच्या पगारातून. एवढ्या एवढ्याशा चिमुरड्या, ठिकऱ्या खेळून गॅलरीच्या लाद्या उकरून काढणाऱ्या कारट्या चाकरमान्या झाल्या. जन्म गेला त्यांचा इथे, —आणि अशाच हुंदडत आणि कारकुनी करीत राहिल्या, तर उरलेला जन्म इथेच जाईल; पण चाळीची लाज वाटते त्यांना. मैत्रिणींना कधी-कधी चहाला बोलावतात आणि ओनरशिपचा ब्लॉक शोधण्याच्या गोष्टी बोलतात.

बटाट्याच्या चाळीला एवढ्या एका गोष्टीचे फार:फार दुःख होते. पूर्वी असे नव्हते. त्या पोरींना चाळीची ओढ होती, बर्व्यांची येशी लग्न होऊन पनवेलीस सासरी जायला निघाली, तेव्हा दहादहा वेळा वळून चाळीकडे पाहत होती, सगळी चाळ डोळे पुशीत होती. वास्तविक बर्व्यांचे आणि काशिनाथ नाडकर्ण्याच्या वडलांचे—सोनबा नाडकर्ण्यांचे—मुळीच बरे नव्हते. पण येशी व्हिक्टोरियात बसली, तेव्हा सोनबा नाडकर्ण्याने चार लोकांत धोतराच्या सोग्याने डोळे आणि फॅ्य ऽ ऽ असा आवाज काढून नाक पुसले होते. किती पोरी गेल्या इथून ! समेळकाकांची गुलाब उरणला आपल्या सासरी गेली, त्याला किती वर्षे झाली. सोने चोवीस रुपये तोळा होते तेव्हा ! आता गुलाबच्या मुलीचे लग्न झाले परवा.

प्रत्येक बिऱ्हाडात जाऊन आमंत्रण देऊन आली. बऱ्याच मुलांना आपल्या बापाला अरेतुरे करणारी ही कोण बाई, हे कळेना. काशिनाथ नाडकर्णी, भाईसाहेब, सोकाजी ह्यांच्याबरोबर गुलाब लपंडाव आणि छापापाणी खेळली होती चाळीत. पोरांना काय ठाऊक ! तिच्या मुलीने "शीः ! कसली ग चाळ ही ! –" म्हटल्यावर जी खेकसली तिच्या अंगावर ! इथल्यासारखे दिवस पुन्हा यायचे नाहीत, म्हणाली. लहानपणच्या सगळ्या सगळ्या मैत्रिणींची चौकशी केली. जाता-जाता गुप्त्यांच्या खोलीपाशी जराशी थबकली...प्रभातफेऱ्यांच्या दिवसांत ...पहाटे...गुप्त्यांचा आतेभाऊ...मनोहर...गुप्त्यांच्या आप्पासाहेबांनी घरातून त्याची ट्रंक फेकून घालवून दिलं होतं...गुलाबला किंचित गलबलल्यासारखे झाले — गुप्तीणबाईंना "आलं पाहिजे हो लग्नाला, —" म्हणताना गुलाबचा गळा इतका भरून आला होता की, आपले वाक्य पुरे होतेय की नाही, याची तिला भीती वाटत होती.

— त्या पिढीला चाळीची माया होती. नळावरची भांडणे नळावर संपायची. झाले-गेले नळाच्या पाण्याला मिळायचे. पुन्हा बर्विणकाकू पावशीणबाईंचे पापड लाटायला स्वतःचे पोळपाट-लाटणे घेऊन हजर. त्रिलोकेकरशेटचा टाइम्स, बाबा बर्व्यांचा केसरी, जनोबा रेग्यांचा विविधवृत्त चाळभर हिंडायचे.

स्वस्ताई आली, महागाई आली,– पण नवे गुंजभर सोने कुणी विकत घेतले नाही, आणि असलेले विकले नाही. लग्नात अंगावर सोने घेऊन परक्या घरातल्या मुली यायच्या. त्यांच्या पोरी दुसऱ्याच्या घरात जाताना घरातले घेऊन जायच्या, — नव्या सुना येताना त्यांच्या घरांतले घेऊन यायच्या. सोन्याचांदीची अशी साधी उलाढाल. फार तर पाटल्या मोडून बांगड्या आणि मोहनमाळ मोडून चपलाहार एवढा कायापालट. पुरुषमंडळीदेखील दिवाळीला काय कापड-चोपड घेत असत, तेवढीच खरेदी. ती देखील मुख्यतः धोतरांची आणि मुलांच्या कापडाची. उभ्या चाळीत पँट वापरणारे दोघेचे गृहस्थ. एक त्रिलोकेकर आणि दुसरे अण्णा पावशे ! पैकी त्रिलोकेकर डकची प्यांट गोल नळकांडी होईपर्यंत वापरायचे, आणि अण्णा पावशांना मुन्सिपाल्टीच्या पाणीखात्याकडून मिळालेल्या खाकी विजारीला — पाणीखात्यात असून किती पाणी लागले, ते अण्णा जाणे आणि त्यांची पँट जाणे ! चाळीत एकदोन सिल्कचे आणि एकदोन आल्पाकाचे डगले, बाकी सर्व मद्रास चेकचे कोट ! सदरे बहुधा रेघांच्या आणि कळकट रंगांच्या

कापडांचे ! कोटाचे चिवट कापड दुसऱ्या युद्धापूर्वीच गेले. त्या कापडाचे वर्णन 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि— नैनं दहति पावकः, ' ह्याच्या अलीकडे करणे अशक्य ! त्याला धोबी फाडू शकत नसे — इस्त्री जाळू शकत नसे. स्लेटपाटीवर खूपसे लिहून बाहीने पुसल्यावर पाटीवर जो रंग दिसतो, तसा अगर काळसर पांढऱ्या — राख, काळी रेती आणि पांढरी वाळू मिसळल्यावर दिसणाऱ्या — रंगाचे ते कापड शिंपीदेखील कसे फाडत असे, देव जाणे. एकूणच टिकाऊपणा हा त्या काळच्या प्रत्येक गोष्टीचा धर्म होता. घरातल्या धाकट्याला पहिल्या चारी यत्ता थोरल्या भावाच्या चड्डयांवर आणि पुस्तकांवर शिकता येत. पुस्तक बदलणे हे ट्रामचा नंबर बदलण्याइतके अशक्य वाटत होते.

चाळीचा वीजपुरवठा हा एडिसनलादेखील धक्का देणारा मामला होता खाली विजेचा दाब ' भयंकर ' असल्याची एक सूचना आहे. याहून त्या विजेत काही भयंकर शिल्लक राहिलेले नाही. बरीच वर्षे तिसऱ्या मजल्यावर वीज चढत नसल्याची एक कथा ऐकिवात आहे. युद्धकाळात ए. आर. पी. च्या नियमांचा भंग घडवितो, म्हटले तरी घडू शकला नव्हता. कोणे एके काळी लावलेले नागमोडी फिलामेंटचे लांबोडके बल्ब् ( चाळीच्या परिभाषेत ग्लोब ) परवा-परवापर्यंत जीव आणि थोडीशी वीज धरून होते. जिन्यातले दिवे चोरणाराने ते काय उद्देशाने चोरले देव जाणे. बहुधा चोरी दिवसा झाली असावी. कारण रात्री ते दिवे इतके केविलवाणे दिसत, की अगदी अडला चोर देखील त्याला हात लावू शकला नसता.

आता जमाना बदलला. काही महिन्यांपूर्वी समेळकाकांच्या घरी विजेची नळी आली. बटाट्याच्या चाळीत ती नळी शोभत नव्हती. काळे जुनेर नेसलेल्या, डोक्यावरचा भांग फाटलेल्या, आडवी चिरी लावलेल्या, तोंडाचे बोळके झालेल्या आणि अंगावरच्या जुनेराच्याच वर्णाच्या आजीबाईंनी आपल्या दोन्ही कानांच्या पाळ्यांवर सिगारेटच्या चांदीच्या गोल टिकल्या कापून चिकटवल्या, तर जो अवतार दिसेल, तशी बटाट्याची चाळ त्या प्रकाशामुळे दिसू लागली. चाळीला ती नळी रुचली नाही.

तशा बऱ्याचशा गोष्टी चाळीला रुचल्या नाहीत. अण्णा पावशांच्या घरात डॉक्टरी सल्ल्याच्या निमित्ताने दुधाच्या कपात पहिले अंडे फुटले, तेही चाळीला आवडले नव्हते. आजवर पावशांच्या घरातून मधल्या चौकात

पडणाऱ्या केरकचऱ्यात मुख्यतः निर्माल्य आणि दत्ताचे सुकलेले हार पडायचे. त्यात आता द्रोणात गुंडाळलेली अंड्यांची टरफले पडायला लागली. चाळ शहारली. चाळीला वाणीचे वावडे नव्हते; पण कुठल्या खोल्यांतून कुठली घाण पडावी, ह्यासंबंधी तिची काही निश्चित मते होती. ह्या मतांबद्दल दिवसेंदिवस बेपर्वाई वाढत होती आणि चाळ खचत होती. तिचे आणखी काही पोपडे उडत होते. सासरी जाणाऱ्या मुली कचेरीत जाऊ लागल्या होत्या आणि मुलीचे लग्न कसे होईल, याची चिंता करणारे पूर्वीचे बाप जाऊन कमवत्या पोरीने लग्न केले तर काय, याची चिंता करणाऱ्या बापांची पिढी आली होती. बटाट्याच्या चाळीला असल्या बापांच्या डोक्यावर तुळई आदळावी, असे लाखदा वाटे ! पण मग तिला त्यांची दया येई. तिने ह्या बापांना कठड्याएवढे उंच असल्यापासून पाहिले होते. त्यांनाच काय, त्यांच्याही बापांना पाहिले होते. लांब डगले आणि गोल टोप्या घालणारे ! आकाशातला देव आणि ऑफिसातला साहेब ह्यांखेरीज कुणालाही न घाबरणारे ! गुप्ते-चौबळ, हट्टंगडी-पावशे यांचे बाप ! स्वतःच्या मुलींना नवरे शोधून देणारे, बायकांना वर्षातून फक्त दोन लुगडी घेऊन देणारे, पोरांच्या कानफटीत मारून अभ्यासाला बसवणारे, ऐंशी-नव्वद रुपयांत दहा जणांचा गाडा ओढणारे—ते संरक्षक बाप ! ज्यांचे पाय जिन्यावर वाजले की पोरांची डोकी पुस्तकांत जात, बायकांचे पाय स्वयंपाकघराकडे वळत, ते ! त्यांच्या साहेबांचे रविवारी देखील त्यांच्याशिवाय चालत नसे. दहा-दहा वर्षांत एकही कॅज्युअल लीव्ह ते घेत नसत. दूधवाला भैय्या आणि रामा गडी यांना ते न भिता ठणकावू शकत असत. निराळे बिऱ्हाड करायच्या गोष्टी कुजबुजणाऱ्या मुलाला आणि सुनेला ' गेट-आउट ' म्हणून सांगण्याची त्यांना हिंमत असे. बायका पोरांना कापाच्या मैदानावरची जत्रा आणि बालगंधर्वाचे नाटक वर्षातून एकदा दाखवणारे ! ट्रामचा आणा वाचवून त्यात मेथीची जुडी बसवणारे. दुसऱ्या महायुद्धाच्या आधीच हे बाप एकामागून एक असे संपले. पावशांच्या बाबांबरोबर चाळीतला शेवटला खणखणीत आवाज गेला. गुप्त्यांच्या बाबांचे फुलबूट पायाला येतील, असा लंबाचवडा पाय त्यानंतर चाळीला लागला नाही. चौबळांच्या बाबांनंतर काळ्या अल्पाकाचा डगला पुन्हा चाळीत शिवला गेला नाही; आणि हट्टंगडींचे बाप्पा गेले, ते जणू आपल्या भरघोस मिशांबरोबर सर्वांच्याच मिशा घेऊन गेले. बटाट्याच्या चाळीने अखेरचे बिनचूक इंग्रजी

आणि मेकॉले, स्पेन्सर, मिल ही नावे हट्टंगडीबाप्पा गेले, त्यानंतर पुन्हा ऐकली नाहीत.

त्यानंतरच्या बापांची पिढी ही उमेदीत म्हणून आलीच नाही. दुसऱ्या महायुद्धाने त्यांची कंबरडीच मोडली. अन्न महाग, धान्य महाग, कापड महाग, औषध महाग—पण चाळीने निष्ठा सोडली नाही. भाडे तेच राहिले. महागाईच्या वाळवंटात तेवढीच हिरवळ ! चाळीला त्याचा अभिमान होता. तिला हा नवा पैसा नको होता. युद्धकाळातील ती सूज आलेली लक्ष्मी--हिडीस वाटत होती. चाळीबाहेर असला पैसा खूप लोकांच्या खिशात आला. चाळीत मात्र महागाईभत्त्याच्या चार दिडक्या अधिक आल्या असतील; पण त्या पैशानेदेखील चाळीत पाप आणले ! एक भेकडपणा आणला. आता सारे बदलले ! संध्याकाळी बाप परतू लागले, ते उद्याची चिंता करीत. त्यांच्या आवाजातले त्राण गेले. काही वर्षांपूर्वी स्वैपाकघरात आईला खोबरे किसून देणारी, नाही तर तांदूळ निवडून देणारी मुलगी आता कठड्याला टेकून दिलाची आणि मोहब्बतीची गाणी म्हणायला लागली. चाळीला वाटे, यांचे बाप ह्यांच्या दोन मुस्कुटात का नाही भडकावीत ? तिलाही त्या दोन खोल्यांतला शृंगार पाहिल्याच्या आठवणी होत्या. बाप्पा हट्टंगड्यांनी आजींच्या (एच. मंगेशरावांची आई) गळ्यात मोहनमाळ स्वतः घातली होती; पण दारे-खिडक्याच काय, पण वरची झापेदेखील बंद करून ! आणि आता ह्या पोरी मोठमोठ्याने गॅलरीत जाऊन 'आवस वाढा गे माय,' म्हणणाऱ्या भिकारणींसारख्या प्रेमाचा आवस गळा काढून मागत होत्या. चाळीला वाटे, जागच्या जागी कोसळून जावं !

अशी किती दुःखे आणि किती यातना ! आता वास्तविक वरवर पाहणाऱ्याला चाळीत किती उत्साह दिसतो. उत्सव होतात, सप्ताह होतात, भगिनी-मंडळ निघालेय; पण चाळीचे मन त्यांच्यांत रमत नाही. पूर्वी बर्व्यांच्या घरी तेवढा गणपती बसायचा; पण समेळकाकांचे दादाजी मखर करीत. एच. मंगेशरावांचे बाप्पा आरत्या गात. चौपाटीवर बर्व्यांच्या घरचा गणपती विसर्जनाला जायचा, पण पाट डोक्यावर घेऊन स्वतः जनोबा रेग्यांचे काका चौपाटीच्या समुद्रात शिरायचे ! लाटा अंगावर घेत जनोबांचे काका पाण्यात शिरले, की पोरे भ्यायची. मोठी माणसे म्हणायची, "काका बेतानं." काका आपल्या कोकणी मराठीत ओरडायचे, "रे, समुद्राची भीती कोंकण्याक कित्याक घालतास ! — मास्यक

आणि मार खाणाऱ्याकू पाण्याचं भय नसतं." त्या वेळी चाळीतल्या पोरांना त्रिलोकेकरशेटचे फादर (त्यांना चाळीत सर्वजण 'फादर' म्हणत.) 'मोफतमधी' (हा त्यांचाच शब्द) भेळ खायला देत. ह्या उत्सवाला कमिटी नव्हती, अकाउंट नव्हता, हिशेबाबद्दल शंका नव्हती. जी गत पुरुषांच्या उत्सवाची तीच बायकांच्या! बायका भांड-भांड भांडत; पण पहिलटकरणीला धीर देण्याचे काम, आजारी बिऱ्हाडात मिठातली आमली पोहचविण्याचे काम —दिवाळीचा फराळ, पापडा-लोणच्यांच्या तयाऱ्या, ह्या सार्वजनिकच व्हायच्या. भगिनी-मंडळाच्या चर्चा हातांत काम असल्याशिवाय व्हायच्याच नाहीत. पापड लाटीत, गोधड्या शिवीत, अगर लाडू वळीत साऱ्या चाळीच्या निंदा व्हायच्या. त्यासाठी मंडळाची निराळी कचेरी आणि पदाधिकारिणी नव्हत्या. भांडणाला 'भांडण' म्हणत,—'स्पर्धा' म्हणत नसत. मुलांच्या मुंजी, मुलींच्या मंगळागौरी, बारशी, हळदीकुंकवे, असा वर्षभर या-ना-त्या बिऱ्हाडात सांस्कृतिक कार्यक्रम असायचा. त्याखेरीज हट्टंगडीच्या घरी सिद्धारूढस्वामींचा उत्सव, नाडकर्ण्यांच्या घरची साटमबुवांची पुण्यतिथी, वर्व्यांच्या घरची गीताजयंती आणि त्रिलोकेकरशेटच्या घरचे नवरात्र (—बायलीबाई 'नवरत्न' म्हणतात, आणि ही चुकी कोणीही दुरुस्त केली नाही.), नागूतात्या आढ्यांच्या वडलांच्या वेळची गुरुपौर्णिमा—हे साऱ्या चाळीचेच उत्सव होते. सभेळकाकांच्या घरात सगळ्यांच्या घरच्या सजावटीचा मक्ता होता. मखरे, माळा-तोरणे, कागदी फुले स्वतःच्या खर्चाने ते करीत. हौसेला घटनेच्या नियमांत बांधले नंतरच्या पिढीने. आणि मग निवडणुका आल्या,–भांडणे आली. चाळीतला ओलावा ओसरला; फक्त ओल राहिला.

पण अजून धागे तुटले नाहीत. अजूनही चाळीत लग्नमुंज झाली तर माणसे अंग मोडून राबतात. कार्य घरचे आहे म्हणतात. कुठे तरी एकाच नळाच्या पाण्यातून प्रेम आले, ते टिकले आहे. साऱ्यांच्या भाड्यांना रामागड्यांनी एकाच रस्त्यावरची माती फासली आहे,—त्या मातीची ओढ जराजरा शिल्लक आहे.

पण ती किती टिकणार आहे, ही चाळीला चिंता आहे. पायातच कोठे तरी हादरा बसला आहे,—आपण खचतो आहो, अशी भीती आहे. आद्य मालक कै. धुळा नामा वटाड्यांनी चाळ बांधली, तेव्हा चार माणसांचा संसार इथे

सुखाचा व्हावा, अशी इच्छा भाड्याच्या पैशाच्या खाली दडलेली होती. समोरच्या चाळी आपोआप पडल्या. काही पाडल्या. तसाच प्रसंग एक दिवस आपल्यावर आहे, अशी चाळीच्या पोटात भीती आहे; पण या भीतीने ती खरी हादरली नाही. तिला भीती आहे, ती आपल्या मागून जी वास्तू उभी राहील, तीत माणसे दारे बंद करून राहणाऱ्या समोरच्या ब्लॉकमधल्या माणसांसारखी राहतील, ही ! प्रत्येकाला कदाचित अधिक स्वातंत्र्य असेल; पण ते तीन खोल्यांत, अगदी स्वतंत्र वॉशबेसिन आणि संडास-बाथरूम असणाऱ्या ब्लॉक-मध्ये, दिवसभर दारे बंद करून राहण्याचे स्वातंत्र्य तिला भेडसावते !—कारण चाळीची दारे आणि ब्लॉकची दारे ह्यांतला मुख्य फरक तिला ठाऊक आहे. बिऱ्हाड परगावी गेल्याशिवाय चाळीतल्या खोल्यांची दारे बंद झाली नाहीत,— आणि ब्लॉकची दारे सदैव बंद असतात. ही दारे सताड उघडी,—त्या दारांना दाराशी आलेल्या माणसावर अविश्वास दाखविणारी बारीक भोके असतात. इथे आतल्या माणसांच्या पानांत काय पडले आहे, ते गॅलरीतून जाणाऱ्या-येणाऱ्याला दिसते. अण्णा पावश्यांनी घेतलेला कढीचा भुरका गॅलरीपर्यंत ऐकू येतो. तिथे टेबलावर जेवतील, पण दारे बंद करून चोरून जेवतील. चाळीला दुःख आहे, ते ह्या चोरट्या जीवनाचे !

—पण आता इलाज नाही. चाळ कोलमडत आली आहे. शेवटला घाव कोण घालणार, याची ती वाट पाहात आहे. तिला चिंता आहे, ती एकच : हा घाव घालणारा, तिने ज्याचा आजवर भार वाहिला, त्या माणसांच्या नातवंडा-पणतवंडांना सिमेंट-कॉंक्रीटच्या प्रचंड कपाटांच्या खणांत बंद करून ठेवणार आहे. त्या कपाटांत " त्रिलोकेकरशेट, येता काय बेझिक खेळायला ? "— " जनोबा, आज काय पापलेट-बिपलेट गावलो की नाय चांगले ? "— " शांताबाई, यमीबरोबर वाटीभर डाळीचे पीठ द्या पाठवून. "—" कुशाभाऊ, रजा झाली का सँक्शन ? "—असे मोकळे आवाज ऐकू येणार नाहीत. पहिलट-करणीच्या पाठीवरून, ना जातीची ना पातीची अशी शेजारची म्हातारी " अगं, बावीस बाळंतपणं झाली माझी,—" असा धीर देणार नाही. सासरी निघालेल्या चाळीतल्या पोरीकडे पाहून आनंदाने रडणाऱ्या डोळ्यांची संख्या मर्यादित होईल. मॅट्रिकला निघालेला गंपू साऱ्या वडीलधाऱ्या मंडळींच्या पाया पडला होता. नव्या ब्लॉकातला अभिजित किंवा अमिताभ कदाचित रॉक्-रॉक्-रॉक्

म्हणत ' एक्झाम् ' द्यायला जाईल.

आणि चाळीला वाटते, जमिनीसपाट झालेला आपला देह तीन मजल्यांनी उठून वर येईल, आणि म्हणेल—" अरे, नाही रे, माझ्या पोटात ह्यापेक्षा खूप-खूप माया होती ! "

# सावरकरांचे वक्तृत्व

सखाराम गंगाधर मालशे

वीर सावरकरांचे व्यक्तित्व अनेकांगांनी समृद्ध आहे; ते खरोखरच अष्टपैलू आहे. परंतु त्यांच्या अंगचे कवित्वादी पैलू कितीही चमकदार असले, तरी त्यांच्या वाणीचे पाणी काही आगळेच आहे. त्यांच्या अंगच्या गुणरत्नांत त्यांचे वक्तृत्व म्हणजे कौस्तुभमणीच !

केवढाही मोठा समाज नागाप्रमाणे डोलवयास लावण्याची त्यांची किमया अद्भुत आहे. मोठ्या सभांतले श्रोते एकजिनसी थोडेच असतात? बरेचसे आदर बाळगणारे असले, तरी अशा सभांत विरोधकही पूर्वग्रह घेऊन बसलेले असतात. कोणी केवळ कुतूहलाने आलेले असतात. पण भक्त, अभक्त, तटस्थ अशा सर्वांना सावरकर आपल्या वाणीने मंत्रमुग्ध करून सोडतात. भक्तांच्या बाबतीत अर्धे काम उरकतो, तो त्यांचा रोमहर्षक भूतकाळ ! 'सावरकर' म्हटल्याबरोबरच मनात क्रांतिसूचक विद्युत थरारून जाते. सावरकरांची टेंगणी-ठुसकी, कृश, कष्टभोगी, चेहऱ्याभोवती प्रतिभेचे तेज असणारी मूर्ती व्यासपीठावर श्रोत्यांसमोर उभी राहिली, की मनात अनेक स्मरणांची गर्दी उडून जाते. सागराला कळवळून दिलेला भावकोवळा शाप आठवतो; पंचखंडांत गाजलेले मार्सेलिसचे वीरोड्डाण आठवते; शनिमाहात्म्यातल्या विक्रमराजाप्रमाणे कोलू पिसणारा आणि घाणा ओढणारा अंदमानातील राजबंदी आठवतो; काट्याची लेखणी आणि भिंतीचा कागद करून छलात फुललेली कलापूर्ण 'कमला' आठवते; जन्मठेपेच्या काळात त्यांच्या व्यक्तित्वाभोवती निर्माण झालेले दंतकथांचे रहस्यमय वलय आठवते. तोच 'हिंदू बांधवहो' किंवा 'हिंदुबंधूंनो' अशी मृदू स्वरात, अनुनासिके घुमवीत, विलक्षण गोडव्याने उद्गारलेली हाक कानांवर पडते, आणि खोल कुठून तरी सहभावनेची संवेदना साद देत वर येते.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ



वक्त्याचा खरा कस लागतो, तो अभक्तांच्या व तटस्थांच्या बाबतीत. तेथे वक्ता हा पारधी आणि श्रोते ही त्याची शिकार, अशी काहीशी स्थिती असते. अशा वेळी समूहमनाची नाडी अचूक ओळखणे हे वक्त्याच्या यशाचे मर्म असते. नाठाळ पण उमदा घोडा काबूत आणायचा, तर बुजरेपणाने थाप मारायची सोय नसते. बहुरंगी श्रोत्यांच्या सभेचे तसेच असते. अंतरीची तळमळ, बिनतोड युक्तिवाद, प्रत्युत्पन्नमतित्व, प्रसंगावधान यांचे पाठबळ असल्याशिवाय असा श्रोतृसमाज काबूत येत नसतो. सावरकरांच्या वाणीला हे सर्व गुण वश आहेत. नाठाळ घोड्याला काबूत आणताना तारतम्यही ठेवावे लागते. कधी गोंजारून, चुचकारून घ्यावा लागतो, तर कधी एखादा सराईत घोडेस्वार पहिलीच थाप अशी ठेवून देतो की, घोड्याला कळून चुकावे की, स्वार काही कच्च्या गुरूचा चेला नाही ! रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून सुटका झाली, तेव्हा सावरकरांचा पाठपुरावा करणारा मतस्तंभ पाठीशी उभा नव्हता. तो सावरकरांनी केवळ आपल्या वाणीने उभा केला. त्यांच्या क्रांतिजीवनाविषयी आकर्षण वाटणारे लोकही त्यांच्या हिंदुत्ववादाला बिचकणारे होते. अशा कांक्षेखोर वृत्तीने आलेल्या श्रोतृसमाजालाही आपलासा करील, असा त्यांच्या व्याख्यानाचा प्रारंभ असे. श्रोत्यांच्या मनाची नाडी नेमकी ओळखून त्यांच्या मनात घर करील, त्यांना गुदगुल्या करील, असा उल्लेख व्याख्यानाच्या प्रारंभीच करून त्यांच्या रुचीशी ते संवाद राखीत. नागपूर-अमरावतीकडे गेले, तेव्हा त्यांनी पहिले वाक्य हे उच्चारले, “ज्यांना प्रतिटिळक म्हणत, त्या दादासाहेब खापर्ड्यांच्या भूमीत मी व्याख्यानासाठी आलो आहे.” भागानगरच्या लढ्या-संबंधी शनिवारवाड्यासमोर व्याख्यान होते. शनिवारवाड्याच्या दिंडी-दरवाज्याकडे लगबगीने हात करून ते म्हणाले, “अरे, नाना फडणिसांनी काढलेल्या, निजामाच्या नाड्या आखडणाऱ्या राजाज्ञा, याच वाड्याच्या आतल्या दालनातून सुटल्या ना ?” जमनादास मेहतांच्या उमेदवारीला पाठिंबा देणारी सभा होती. सावरकरांच्या एका पायाला काही दुखणे झाले होते. व्याख्यानाची सुरुवात अशी झाली : “माझा एक पाय रुग्णाईत आहे. असे असताही मी आलो आहे. त्याअर्थी जमनादासांना पाठिंबा द्यायला मी एका पायावर सिद्ध आहे, हे दिसून येईल.” त्यांच्या मुंबईतील एकसष्टीसमारंभाच्या वेळी रँ. अप्पासाहेब परांजपे यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते. सावरकरांची स्तुति

करणारे अप्पासाहेबांचे भाषण आधी झालेले होते. या वेळी बोलावयास उठताच सावरकर म्हणाले, " मी अप्पारावांचा महाविद्यालयातील विद्यार्थी. माझे गणित फार कच्चे ! अप्पारावांनी माझ्या उत्तरपत्रिकेवर चूक म्हणून किती तरी फुल्या मारल्या होत्या. तेव्हा मला फार वाईट वाटे; पण आज तेच माझे गुरुवर्य माझे राजकारणातले गणित तंतोतंत बरोबर असल्याचे सांगत आहेत, याचा मला अत्यंत आनंद होत आहे. " मुंबईच्या आंग्रेवाडीत व्याख्यान असले की सुरुवातच अशी होणार, " इंग्रजांना नौयुद्धात जरब बसविणाऱ्या ह्या आंग्र्यांच्या वाड्यात. . . . . ."

जनरुचिसंवाद राखून पहिल्या फटकाऱ्याला श्रोत्यांची मने आपलीशी करण्यासाठी इतिहासाची फार मदत होते; आणि इतिहास तर सावरकरांपुढे हात जोडून उभा ! आसामातील ' ओहोम ' लोक स्वतःला ' हिंदू ' म्हणवून घ्यायला तयार नव्हते. तिकडे सावरकरांचा दौरा झाला. तिथल्या व्याख्यानात ' ओहोम ' जमातीने गतकालात हिंदुत्वासाठी केवढा त्याग केला, त्याचे चित्र इतिहासाधारे रेखाटून त्यांनी त्यांची मने काबीज केली. काश्मिरी पंडितांचे पूर्वग्रह त्यांनी असेच इतिहासाच्या ज्ञानाने धुऊन काढले. शिखांचा इतिहास तर त्यांच्या जिभेवर नाचत असे. ग्रंथसाहेबातली वचनामागून वचने ते धडाधड बोलून दाखवू लागले की, प्रत्यक्ष शीख लोकसुद्धा तोंडात बोटे घालीत आणि विशाल हिंदुत्वाची व्याख्या त्यांना हां हां म्हणता पटे.

भागानगरच्या लढ्याच्या वेळी आर्यसमाजी कार्यकर्त्यांच्या बैठकीत सावरकरांनी वाणीचा समर-चमत्कारच दाखविला. सर्वांवर गांधींच्या विचारसरणीचा पगडा होता. गांधीजींनी लढा बंद करण्याचा सल्ला दिला होता; पण पळत सुटणाऱ्या मावळ्यांना परतविणाऱ्या सूर्याजीप्रमाणे सावरकरांनी एका व्याख्यानाने पारडे फिरविले ! सप्रूपरिषदेतही सावरकरांच्या वाणीने असाच चमत्कार केला. खुद्द तडजोडवादी मवाळांकडून त्यांनी पाकिस्तानविरोधी वेद वदविले ! एक काळ असा होता की, सावरकर कोठेही जावोत, त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव पडला नाही, असे झाले नाही. सिंधच्या दौऱ्यानंतर ' सिंध ऑब्झर्व्हर ' ह्या त्या वेळच्या वजनदार पत्राने म्हटले होते, " He came, he spoke, he conquered ".

सावरकरांच्या वक्तृत्वात जातिवंत नाट्याचा प्रत्यय येतो. नाट्याचा हा

ढंग कधी घणाघाती रोखठोकपणाने, कधी उपहासाचा बुरखा घेऊन, कधी उपरोधाचा जंबिया परजून, तर कधी कोटी-प्रतिकोटी किंवा विनोद करून प्रकट होतो. लाठीधारी तरुणांच्या मेळाव्यापुढे बोलताना ते हसत-हसत म्हणतील, "आजकाल पोरीसुद्धा लाठी फिरवू लागल्या आहेत. आता निदान बंदुका तरी हातात घ्या, नाही तर पोरीच तुमची डोकी शेकून काढतील." साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून सैनिकीकरणाचा संदेश देणे कितपत योग्य वा अयोग्य, हा वादाचा मुद्दा आहे; पण ते त्यांचे भाषण म्हणजे वक्तृत्वकलेचा एक नमुनाच म्हणावे लागेल. "जे राष्ट्र खुरटे आणि दुबळे, त्याचे साहित्यही कसे खुरटे आणि दुबळे बनून जाते, ते तुम्ही नालंदेला विचारा, तक्षशिलेला विचारा," असे सांगून त्यांनी प्रश्न केला होता, "ऑस्ट्रियाच्या मरणाची किंकाळी ऐकलीत ना परवा? त्याच्या शेवटच्या अध्यक्षाने शेवटचे हे वाक्य उच्चारले की, 'We yield under German swords and not under German sonnets!'" भाषा वाकवण्याची कला उत्तम साधलेली असल्याने विरोधकांवर कुरघोडी करणे सावरकरांना सहज जमते. तर्कशास्त्राच्या भक्कम पायावर उभे राहून विरोधकांवर प्रश्नांची फैर झाडणे, ही सावरकरांची खास लकब आहे. डॉ. पट्टाभींनी लिहिलेल्या काँग्रेसच्या इतिहासात क्रांतिकारकांच्या कार्याला योग्य ते श्रेय दिले गेलेले नाही. त्याचा उल्लेख करून ते म्हणतील, "अरे, तुम्ही खूप दडवाल; पण तुमचे बाप आम्ही इथं जिवंत आहोत ना! आम्ही इथं जिवंत असताना राष्ट्रात खरीखुरी चळवळ वीस सालापासून सुरू झाली, असे तुम्हांला म्हणवले तरी कसे?" कै. लाला हरदयाळ यांच्याबद्दलची उपेक्षावृत्ती पाहून म्हणतील, "इकडे कोणी देशभक्त उंदीर मेला तर तुम्ही स्तंभच्या-स्तंभ खरडता, नि तिकडे लाला हरदयाळ देशासाठी फकिरी पत्करून वणवण करीत पतन पावला, तर त्याच्यासाठी साध्या दोन ओळीही तुम्हांला देववत नाहीत ना?" अशा रोखठोक सवालांतून 'बापा' सारखे रासवट उल्लेख आले, तरी औचित्यभंगकारक असे सहसा बोलले जायचे नाही. एकदा 'हिजडा' हा शब्द निसटून गेला होता, आणि विरोधकांनी 'मोहोळ' उठविले होते; पण असे क्वचित घडले आहे. असे सवालांमागून सवाल झडू लागले की, भाषेचे तट तटातटा तुटून जातात. 'मराठी,' 'हिंदी,' 'इंग्रजी' या तिन्ही भाषांतून त्यांचा

वाक्प्रवाह अप्रतिहतपणे सुरू होतो. फजलूल हक्‌च्या ' हम हिंदुओंको सताएंगे, ' याला उत्तर मिळायचे, ते हिंदी भाषेत! त्याच्या "We are tigers and lions," या वल्गनेला उत्तर मिळायचे, ते इंग्रजीत. "Yes! Fazlul Haq and his party consists of tigers and lions. But we Hindus are men and men are not beasts! Men can capture, control and imprison thess wild beings!" असे उत्तेजक खाद्य मिळाल्यावर श्रोत्यांतून टाळ्यांचा गजर न झाला, तरच नवल! विरोधकांच्या वल्गनांना त्यांच्या-त्यांच्या भाषेत प्रतिटोले देऊन झाले की पुन्हा मराठी रुळावर गाडी यायची! मात्र वेग असा की, मार्ग बदलल्याची वास्तपुस्त घ्यायला श्रोत्याला उसंतच मिळायची नाही. कै. शिवरामपंत परांजप्यांसारखा नाजूक, रेशमी चिमटे घेणारा, वहाणेदार उपरोध सावरकरांच्या वक्तृत्वात कमी. त्यांचा उपरोध पुष्कळदा वाक्य उच्चारण्याच्या खोचक पद्धतीत असतो. भागानगरच्या लढ्याच्या वेळी म. गांधी म्हणाले होते, "I was all the while anxious not to embarrass His Exalted Highness, the Nizam." गांधीजींचे हे वाक्य सावरकर ज्या उपरोधाच्या ठसक्यात उच्चारीत असत, तो अजूनही अनेकांच्या स्मरणात असेल. पंडित गोविंद वल्लभ पंतांनी मुसलमानांचे वाटेल तसे लाड पुरविले, तरीही त्यांचे हृदयपरिवर्तन झाले नाही. त्यांनी काँग्रेस मंत्रिमंडळे गेली म्हणून 'मुक्तिदिन' पाळला. या संदर्भात वर्तमानपत्रांतल्या मजकुराची कात्रणांवर कात्रणे वाचून दाखवून सावरकर म्हणाले, ' या मुक्तिदिनाने पं. पंतांचा मानभंग झाला. मग ते गव्हर्नरसाहेबांकडे गेले, आणि त्यांची आळवणी करते झाले की, "श्रीकृष्णा, नाही ना रे आम्ही मुसलमानांवर जुलूम केला?" साहेबांनी आश्वासिले, "—द्रौपदी, नाही बरं!!" ' खिजविणाऱ्या खोचक स्वरात ही वाक्ये उच्चारून सावरकरांनी पंतांना अगदी चीत केले होते! त्यांच्या उपरोधातले हे नाट्य मिस्किल वृत्तीतून उगम पावलेले नसे; त्याचा उगम विद्वेषातून झालेला असे.

समर्पक दाखले देऊन प्रतिपक्षाला निरुत्तर करण्यात सावरकरांचा हातखंडा आहे. हे दाखले कधी ऐतिहासिक असतील; तर कधी अनुभवातले. गेले महायुद्ध सुरू झाले, तेव्हा प्रारंभी इंग्लंड-अमेरिकेचा ' ग्रेट डिमॉक्रसीज् ' असा गौरव करून पं. नेहरूंनी त्यांच्या बाजूने सहानुभूती दर्शविली होती

पं. नेहरूंचे वाभाडे काढताना ' अमका साम्राज्यवादी आहे, ' म्हणून इतरांच्या नावाने डांगोरा पिटणारी राष्ट्रे स्वतःच कशी आपमतलबी आणि स्वार्थी आहेत, हे एकाच मार्मिक दाखल्याने सावरकरांनी पटवून दिले होते. तो दाखला असा : " अंदमानमध्ये मी महासज्जनांच्या संगतीत राहत होतो. प्रत्येक चोरी वा घरफोडीसाठी एकेक, याप्रमाणे सात सात सलकडी हातात मिरवणारे असे ते महासज्जन ! एका महासज्जनाने कुठून तरी सुईदोरा चोरून आणला होता. जेवणाच्या वेळी त्याने तो आपल्या ढुंगणाखाली लपवून ठेवला होता. दोऱ्याचे टोक बाहेर दिसण्यासारखे राहिल्याने त्याच्यामागे बसलेल्या दुसऱ्या अतिसज्जनाने तो सुईदोरा हळूच ओढून मागच्या मागे लांबविला. बंदिशाळेत सुईदोरा आणणे हा दंडनीय अपराध होता. पर्यवेक्षकाकडे तक्रार नेणे अशक्य ! तेव्हा तो महासज्जन माझ्याकडे आला आणि म्हणू लागला, ' बालिस्टरसाहाब माझा सुईदोरा फलाण्याने चोरला. ' मी म्हटले, ' क्षुल्लक सुईदोरा ! त्याचे काय घेऊन बसलास ? ' त्यावर तो सात्त्विक संतापाने म्हणाला, ' सुईदोऱ्याचे काही नाही हो ! पण चोरी किया उन्होने—चोरी किया बालिस्टरसाहाब ! ' चोरी-घरफोडीसाठी सात सलकडी मिरवणारा तो महासज्जन ' चोरी किया, चोरी किया, ' म्हणून ओरडत होता. आजची युद्धयमान राष्ट्रे तोच प्रकार करीत आहेत ! "

कै. वा. म. जोश्यांचे व्यक्तित्व कोणीतरी प्रश्नचिन्हाने सुचविले होते. मला वाटते, सावरकरांचे व्यक्तित्व ' च ' ह्या एकाच अक्षराने सुचविता येईल. स्वमताचा प्रचार करताना सावरकरांमध्ये जशी बावनकशी कळकळ दिसते, तसाच दुर्दम्य आत्मविश्वास दिसतो. नागपूरकडच्या एका दौऱ्यात एका साम्यवाद्याने छद्मीपणाने विचारले, " तुम्ही मार्क्स वाचला आहे काय ? " सावरकरांनी रोख ओळखून तावडतोब सवाल केला, " मार्क्सने सावरकर वाचला होता काय ? " हा आत्मविश्वास प्रेषिताच्या जातीचा आहे. या आत्मविश्वासाचा निदर्शक असा ' च ' त्यांच्या व्याख्यानात पदोपदी येतो. ' घडून आलेच पाहिजे ', ' करतीलच करतील ', ' नाहीच नाही ', ' शंकाच नको ', ' करणारच ', ' होणारच ' असे प्रयोग त्यांच्या तोंडी वारंवार येतात. या ' च ' ने त्यांचे वक्तृत्व अत्यंत परिणामकारक झाले आहे. ' याल तर तुमच्यांसह ' यांसारख्या सावरकरसूत्रांचा जनक हा ' च ' आहे. त्यांच्या वाणीला ठाशीवपणा आणि सिद्धांतवाणीचा पीळ हा ' च ' च देत असतो.

वक्ताच लटपटीत असेल, तर तो श्रोत्यांची भूमिका घट्ट काय करणार कपाळ! त्यांच्या अनुयायांची भूमिका दृढ बनविण्यात हा 'च' च प्रभावी ठरतो. 'सूडा'चेही तत्त्वज्ञान हा 'च' प्रखरपणे बनवू शकतो. विपक्षीयांना कट्टर विरोधी बनविणारा व स्वपक्षीयांच्या आदराचे भक्तीत आणि अंधभक्तीत पर्यवसान करणारा हा 'च' आहे. गवयाची जशी सम, तसा हा सावरकरांचा 'च'. त्याला हटकून टाळी मिळालीच म्हणून समजा.

विशिष्ट शब्द घुमवीत म्हणणे, विशिष्ट शब्दांवर जोर देणे, उपरोधगर्भ वाक्ये स्वर हेलावीत आणि मान डोलावीत म्हणणे, कधी वाक्ये अपुरी सोडणे, क्वचित मध्येच स्वर खाली आणणे, प्रश्नामागून प्रश्नांची फैरी झाडणे, अंगविक्षेप शब्दांइतक्याच वेगाने करणे, साभिप्राय थांबणे या बारीकसारीक गोष्टींनी त्यांच्या वक्तृत्वाचे नाट्य उभे राहते. 'स्वातंत्र्य', 'हिंदुत्व', 'दायित्व'. 'मानबिंदू' 'एकमेव', 'स्वयमेव', 'सुखेनैव', 'अवश्यमेव', 'हिंदुजगत', 'तथाकथित', 'संचलन', 'संघटन', 'भूदल', 'नौदल', 'वायुदल', 'आसेतुहिमाचल', 'आसिंधुसिंधू' यांसारखे वाक्प्रयोग त्यांच्या भाषणात वारंवार येतात; पण ते अशा ठसक्यात बाहेर पडतात की, अडाण्यातल्या अडाण्यालासुद्धा त्यांच्या अर्थांचा प्रत्यय यावा. 'हिंदू' हा शब्द ते अशा जिव्हाळ्याने आणि तन्मयतेने उच्चारतात की, तो ऐकताच श्रोत्यांच्या अंतःकरणातून एक नादमय लहर उमटून जावी.

सावरकरांच्या यशस्वी व्याख्यानाचा आदि-मध्य-अंत अगदी सुसूत्र आणि लयबद्ध असतो. शिकारी शिकार बुजू नये, म्हणून सावधपणे एकेक पाऊल अदमास घेत पुढे टाकतो, आणि ती टप्प्यात आली, की हाकहाक करून तिला पूर्णपणे काबूत आणितो; तद्वत सावरकरांचा प्रस्ताव एकेक शब्द थांबत-थबकत मोजूनमापून होत असतो. सूर्य हळूहळू दीप्तिमान होऊन धुके कुठल्या-कुठे उडवून लावितो, त्याप्रमाणे त्यांच्या वाणीचे तेज प्रखर होऊ लागते. त्यांची वाक्सरिता उगमाशी संथ असते, पण एकदा का सपाटी मिळाली की तिचा लोंढा भरवेगात येतो आणि किल्मिष पार धुऊन टाकतो; निराश निर्माल्य आशादायक भविष्याचे स्वप्नजल शिंपून फुलवितो. व्याख्यान ऐन भरात आले, की श्रोत्यांची नसन्‌नस, त्यांच्या नाडीचा ठोकान्‌ठोका एकतान होतो, जिवाचे कान होतात, आणि दीड-दोन तासांनी जेव्हा व्याख्यान संपते, तेव्हा रम्य, दिव्य,

सोनेरी असे स्वप्न एकाएकी हरपले, अशी मनाला चुटपूट लागून राहते.

कधी-कधी तर त्यांच्या वाणीला परतत्त्वाचा, कवित्वाचा स्पर्श होऊन 'सोने आणि सुगंधी' अशी स्थिती होत असे. टाचणी पडली तर नाद उठेल, :अशी तल्लीनता सहस्रावधींच्या सभेला येई. मग नवव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी वर्णिलेल्याप्रमाणे,

**साहाजें तर्‍हीं अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा**
**तैं दोंदें पेलती अक्षरां । प्रमेयाचिं**
**अर्थु बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्राऽन्चि अभिप्रायाते विये**
**भावांचा फुलौरा होंतु जाये। मती वरि**

असा वक्तृत्व-सोहळा अनुभवावयास मिळे. अंतरीच्या जिव्हाळ्याने स्वतः सावरकर भारून जात आणि श्रोत्यांना भारून टाकीत. अशा वेळी यांची दृष्टी अनंतापलीकडचा वेध घेऊ लागे. मग हिंसा-अहिंसेची चर्चा करता-करता हरिणबालकांचा वध करून स्वतःच्या पिलांना ममतेने पाजणाऱ्या व्याघ्रीची कल्पना ते सृष्टीवर बसवीत. देशाचे एकत्व सांगताना झटकन म्हणत, 'हिमालयाला आग लागली, तर सिंधुसागराने विझवायला धावले पाहिजे.' श्रोत्या-वक्त्यांच्या मिळणीनंतर जणू हृदय फाटून ऊर्जस्वल गद्यकाव्य स्रवू लागे : "माझ्या हृदयात अखंड भारताचा आलेख कोरला गेला आहे. त्यातला कोणता प्रांत मी तोडून देऊ? पेशावर देईन, तर त्या प्रांतात पाणिनि, आपल्या गीर्वाण-वाणीचा मोठ्यातला मोठा व्याकरणकार होऊन गेला. द्वारका देईन, तर साक्षात श्रीकृष्णाचा अवतार तिथे झाला. बंगालमध्ये कालीमातीची, चैतन्याची पूजा होते. महाराष्ट्र म्हणाल, तर मी माझे हृदयच तोडून दिल्यासारखे होईल. व्यास, वाल्मीकि, पराशर अशा महान तपस्व्यांनी पावन केलेल्या देशाचे, या अखंड भारताचे तुकडे करण्यास कोणता हाडाचा हिंदू सिद्ध होईल?" अभिनव भारताच्या सांगतेच्या प्रसंगीची 'हे सुरसरिते सिंधु,' म्हणून फोडलेली हाक नाटकी नव्हती. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' अशा कोटीतला तो हुंकार होता. त्यांच्या एकसष्टीनिमित्त परशुरामभाऊ कॉलेजच्या मैदानात जी विराट सभा झाली, ती अविस्मरणीय होती. त्या व्याख्यानाचा प्रारंभच हृदयाचा ठाव घेणारा होता. त्याचा आशय असा : "मी आता स्वागतासाठी भूषविलेल्या

कमानीच्या दरवाज्यातून आत आलो, आणि तुमच्यासमोर उभा आहे. तुमच्या मनात काय भावना असतील, ते मला सांगता येत नाही; पण माझ्याही मनातल्या भावना मला व्यक्त करता येत नाहीत. कारण मी दोन दरवाजे पाहिले आहेत; मी अंदमानात पाऊल टाकले, तेव्हा बंदिशाळेच्या दगडी दरवाज्यातून—की ज्यातून माझी चिताच काय ती बाहेर पडेल, असे मला बजाविण्यात आले, त्या दरवाज्यातून—आत गेलो होतो. तो दरवाजा मी पाहिला होता आणि आज हे महाद्वार पाहात आहे. हे दोन दरवाजे ज्याने पाहिले आहेत, त्या माझ्या मनातल्या भावना — पट्टीचा वक्ता असा माझा बोलबाला असूनही—मी व्यक्त करू शकत नाही."

भविष्यकाळासंबंधी आपले सुखस्वप्न पुण्याच्या एका सभेत अगदी उत्स्फूर्त शब्दांत त्यांनी चितारले होते. ते ऐकता ऐकता साहित्यसम्राट केळकरांसारख्या समतोल गृहस्थाचे सात्त्विक भाव जागृत झाले, आणि त्यांच्या डोळ्यांत आसवे दाटली, असे चरित्रकारांनी लिहून ठेवले आहे. ते सुखस्वप्न विस्ताराने सांगण्यासारखे आहे :

"तुम्हांला हिंदुध्वजाखालीच असलेले हिंदुराष्ट्र स्थापायचे आहे काय, असे मला कोणी विचारतील.—होय! गटेच्या वेळी प्रशियाचे तुकडे-तुकडे होऊन प्रशियाच्या राजवाड्यात नेपोलियन गादीवर बसला होता, तेव्हा गटेने कविता केली : 'या सिंहासनावर माझा स्वकीय राजा पाहीपर्यंत आणि हा परका राजा जाईपर्यंत मी असाच भीक मागत हिंडेन.' गटेची ती वल्गना आज चारपाच पिढ्यांनंतर सत्य ठरली आहे. आज हिटलरच्या नेतृत्वाखाली सारे जर्मन राष्ट्र एक झाले आहे. वटवृक्षाचे बीज मोहरीहून लहान असते, पण त्या बीजात जी स्फूर्ती असते, ती वाढता-वाढता तिचा प्रचंड वटवृक्ष बनून त्याखाली गाईंची खिल्लारे विसावा घेत असतात, आणि श्रांत पथिकांना तो सावली देत असतो.

मलाही एक वल्गना करू द्या! माझे गाणे मला गाऊ द्या!!

या जगात हिंदुत्वाचे मानाचे राष्ट्र हिंदुध्वजाखालीच स्थापन झाले पाहिजे!

माझी वल्गना खोटी ठरली, तर मी वेडा ठरेन! माझी वल्गना खरी ठरली, तर मी द्रष्टा ठरेन! हा माझा वारसा मी तुम्हांला देत आहे!"

सावरकरांचे हे सुखस्वप्न आज तरी भग्न भासत आहे; परंतु त्यांच्या वाणीचे

ऐतिहासिक कार्य काय, याचा मूल्यामूल्यविवेक करण्यासाठी हा लेख लिहिलेला नाही.

सावरकरांचे व्याख्यान पडले, असे कधी घडले असेलसे वाटत नाही. 'वक्ता दशसहस्रेषु' या कोटीतलेच ते वक्ते आहेत. त्यांचे रंगलेले व्याख्यान हा एक चमत्कार होता, शब्दातीत अशा प्रचीतीची गोष्ट होती. त्यांची उत्तमोत्तम व्याख्याने ऐकावयाची संधी मला मिळाली होती. माझ्या त्या अहोभाग्यात इतरांना वाटेकरी करून घ्यावे, हाच या लेखाचा हेतू.

# र वि वा र

**नारायण सीताराम फडके**

माझ्या लिहिण्याच्या टेबलासमोर भिंतीवर एक कॅलेंडर आहे; त्यात बाकीचे सर्व दिवस काळ्या शाईत छापले आहेत; पण महिन्यातले सारे रविवार तांबड्या रंगात दाखविले आहेत. सहा सहा घरांच्या अंतरावरचे ते लालभडक आकडे पाहताना मी दरवेळी क्षणमात्र थबकतो. कारण माझी दृष्टी त्यांवर स्थिरावण्याऐवजी त्यांच्या पलीकडे उडी घेते व या धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनात सापडलेले जे अगणित जीव, आपापल्या चक्राभोवती फिरता फिरता कॅलेंडरमधल्या रविवारांकडे पाहून विश्रांतीच्या अपेक्षेचा घुटका गिळतात, तेच मला अधिक स्पष्ट दिसू लागतात. कचेऱ्यांतले कारकून, बँकांतले हिशेब-तपासनीस, सॉलिसिटर्सच्या हाताखालचे टायपिस्ट, शाळामास्तर—अशांची प्रचंड गर्दी माझ्यापुढे उभी राहते. या गर्दीतली प्रत्येक व्यक्ती शिणलेली, थकलेली, गांजलेली आहे, अगदी टेकीला आलेली आहे; पण हे सारे लोक पुनःपुन्हा कॅलेंडरवरच्या रविवारांकडे पाहतात, विश्रांतीची हिरवळ त्यांना दिसते, आपापल्या जिवाची घोडी ते पुन्हा दामटतात, अन् मग पत्रांच्या नकला केल्या जातात, लठ्ठ लठ्ठ बुकांत रुपये-आणे-पैंचे आकडे भरले जातात, कज्जांचे कागद तयार होतात, विद्यार्थ्यांचे निबंध तपासले जातात—सारांश, जगाचा एकंदर व्यवहार सुरळीत चालू राहतो. सोमवारपासून शनिवारपर्यंतचे कामाचे सहा दिवस आहेत म्हणून मानवी आयुष्याचा अवाढव्य व्याप उरकला जात आहे, अशी तुमची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. काम न करण्याचा रविवार आहे, म्हणून सारी कामं सुरळीत चालली आहेत ! विश्रांतीचं आश्वासन देणारा रविवार यायचा असतो, म्हणून तुम्ही-आम्ही सहा दिवस कष्ट करतो. रविवारचं आकर्षण नजरेच्या टप्प्यात सतत असतं, म्हणूनच माणसं आधीचा सहा दिवसांचा

खडतर प्रवास करू शकतात.

मात्र हे आकर्षण असं चमत्कारिक आहे, अन् इतकं चिवट आहे, की रविवारी प्रत्यक्ष विश्रांती मिळाली नाही, तरी ते नष्ट होत नाही किंवा कमीही होत नाही. तसा विचार केला, तर मनाजोग्या पूर्ण विश्रांतीचा रविवार आपल्या वाट्याला क्वचितच येतो. सामान्यतः तुमचा-आमचा अनुभव असा की, रविवारकडे मोठ्या आशेने डोळे लावावे, अन् प्रत्यक्ष रविवार उजाडावा तो रोजच्यापेक्षाही अधिक कामाचा अन् कटकटीचा! माझे मित्र 'नानाजी' कमिशनरच्या ऑफिसात कारकून आहेत. 'रविवार आला, की मग आपण साहेबाचे चार चव्वल थोडेच लागतो, मनःपूत आळसात घालवू मग आपण तब्बल चोवीस तास' अशी सुखस्वप्नं ते शनिवार रात्रीपर्यंत मनाशी रचीत असतात; पण रविवार उजाडल्यापासून त्यांची ती स्वप्नं भग्न व्हायला प्रारंभ होतो. उठल्याबरोबर बाप्या वर्तकाकडे जाऊन चहा उकळायचा त्यांनी बेत केलेला असताना, तोंड धुता-धुताच "काय नानाजी, उठलात की नाही?" अशी बाप्याचीच हाक त्यांना ऐकू येते, अन् मग आता त्यालाच उलट चहा देणं भाग आहे, अशा दारुण विचारानं येणारी मूर्च्छा कशीबशी सावरून खोटी ब्रत्तिशी दाखवीत त्यांना पुढे व्हावं लागतं, आणि बाप्यानं केलेला हा अपशकुन त्यांना नंतर दिवसभर भोवतो. थोरल्या दामूचं इंग्रजी पाचवं रीडर आज विकत घ्यायलाच पाहिजे असतं, केशाच्या छत्रीचा दांडा आज बसवून आणल्यावाचून सोय नसते, छबीला शाळेच्या संमेलनाच्या नाटकात काम मिळालेलं असतं ते तिला नवी साडी घेऊन दिली नाही तर तिच्या बाई तिच्याकडून काढून घेणार असतात, स्टोव्ह कित्येक दिवस बिघडलेला असतो तो दुकानात नेणं अगत्याचं असतं,- एक ना दोन, अशा हजार कामांची यादी त्यांच्या हाती पडते, अन् नानाजी चरफडत घराबाहेर पडतात. त्यांना घरी परत यायला एक वाजतो. जेवल्यानंतर ते जरा आडवे होतात न होतात, तो चाळीच्या गणपति-उत्सवाचे चिटणीस वर्गणी मागायला येतात. त्यांना पोचवायला ते दाराशी जातात, तोच कापड दुकानदाराचा मनुष्य बिल मागण्यासाठी प्रकट होतो; आणि असल्याच नको असलेल्या माणसांची मग वर्दळ सुरू होऊन त्यांच्या संकल्पित रविवारची दुर्दशा उडते. नानाजींचे बहुतेक रविवार अशाच मासल्याचे असतात; परंतु तरीदेखील प्रत्येक सोमवारी कचेरीत जाऊन अंगातला कोट काढून नोकरीचं जू मानेवर

घेताना ते कॅलेंडरातल्या रविवारकडे पाहतात व मनाशी म्हणतात, " थांबा, आता या रविवारी अशी विश्रांती घेतो ! मी कुणाचा नाही अन् कुणी माझं नाही ! बाऽऽस ! " अन् असं स्वतःशी पुटपुटलं, की त्यांना नवीन सामर्थ्य येतं, मानेवरच्या जोखडाचं ओझं त्यांना सुसह्य वाटतं !

मला स्वतःला तर रविवारच्या या ठकबाजीचा इतका अनुभव आलेला आहे की, त्या ठकबाजीसाठीच तो दिवस मला फार प्रिय वाटू लागला आहे. नाही तर ठकबाजी वाटते तितकी अश्लाघ्य नाही. गोड गोष्टीची गोडी टिकवायला अन् वाढवायला तर तिचा फार उपयोग होतो. जो अगदी सतत प्रामाणिकपणानं वागेल असा प्रियकर हवा, की ज्याच्या ठकबाजीवर लक्ष ठेवावं लागेल असा प्रियकर हवा, याचं प्रामाणिक उत्तर स्त्रियांकडून मिळालं तर पाहा. " लबाडा ! लुच्चा ! " असे म्हणण्यात प्रेमार्त अंतःकरणाला काही एक विशेष समाधान असतं. आईसुद्धा तान्ह्या मुलाचे पापे घेऊन कौतुक करताना " अरे लुच्चा ! अरे लबाडा ! " अशा शब्दांनी त्याचं कौतुक करते की नाही, बघा. कृष्ण कन्हय्या प्रत्येक गोपीला प्रिय होता, याचं कारण तो साऱ्या गोपींशी ठकबाजी करीत होता हेच. सारांश, ठकबाजी मी वाईट समजत नाही; आणि न चुकता हमखास विश्रांती देणाऱ्या रविवाराऐवजी ठकबाजी करणारा रविवार माणसाच्या वाट्याला आला, हेच अधिक बरं झालं, असं मी मानतो. रविवार मला फसविणार, हे मी ओळखून असतो, त्याची फसवेगिरी चालू द्यायची नाही असं, मी मनाशी योजलेलं असतं, अन् या गमतीच्या द्वंद्वयुद्धात जरी बहुधा त्याचा विजय होतो, तरी एखादे वेळी माझाही होतो. अन् मग जी अनपेक्षित विश्रांती मला उपभोगता येते तिची मौज किती वर्णावी ! अशा वेळी मी काय करतो, हे माहीत आहे? आळशीपणाची करता येईल तेवढी कमाल करतो !

हो, आळशीपणाची ! कारण, खऱ्या विश्रांतीची माझी कल्पना रूढ कल्पनेहून वेगळी आहे. मी मानसशास्त्र वाचतो व कॉलेजात शिकवतो. तरी मी स्वतःला मानसशास्त्रज्ञ म्हणवीत नाही; पण माझे एक स्नेही आहेत ते स्वतःला तसं म्हणवितात. ( असल्या लोकांमुळेच सामान्य लोकांत शास्त्रांची पत राहणं कठीण झालेलं आहे ! ) हे माझे स्नेही नेहमी पुस्तकांचे आधार देऊन सांगतात, की अजिबात काम बंद ठेवणं नव्हे, तर कामात बदल करणं म्हणजेच खरी विश्रांती. मला हे बिलकुल मान्य नाही. दुसरं काम करण्यासाठीच पहिलं थांबवायचं असेल,

तर मग तेच करीत राहिलेलं काय वाईट ? तास बदलला की दुसरे मास्तर येतात, दुसरा विषय सुरू होतो, म्हणून त्यानं काय विद्यार्थ्याला विसावा मिळतो की काय ? हा न्याय धरला, तर मजुरालासुद्धा म्हणता येईल की, बाबा, दगड फोडून थकला असशील, आता लाकडं फोड, म्हणजे तुला विसावा मिळेल ! ते काही नाही, विसावा म्हटलं, की कामाचं नाव निघता कामा नये. खटपट, धडपड, धावपळ सारं बंद झालं पाहिजे. जबाबदारी, तसदी, तकलीफ म्हणून उरता कामा नये. जिच्यासाठी अट्टाहास करावा लागेल, अशी चैनदेखील उपयोगाची नाही !

रविवारी अमक्या नाटकाला जायचं, अमका चित्रपट बघायचा, अमकी मॅच पाह्यची, अमक्याला चहाला बोलवायचं, किंवा अमक्याच्या घरी जेवायला जायचं, असे कार्यक्रम आखून लोक आपल्या सोन्यासारख्या रविवारचं कसं वांगं करून टाकतात, ते मी वारंवार पाहतो. सोमवारी सकाळी त्यांचे चेहरे पाहावे तो ओढलेले, त्रासलेले दिसतात. सारा रविवार त्यांनी विसाव्याची शिकार केलेली असते, व विसाव्याची व त्यांची चुकामूक झालेली असते. कारण सुख, आनंद, विश्रांती या गोष्टीच अशा आहेत, की त्यांचा मुद्दाम पाटलाग केला की त्या मिळत नाहीत. त्या सहज येतील तेव्हा पकडाव्या, हेच शहाणपणाचं; सुख हे मुद्दाम अढीत घालून पिकत नाही. झाडावरच पक्क होऊन अकस्मात टपकन खाली पडणाऱ्या फळासारखं आहे ते !

म्हणून माझ्या मनाजोगता रविवार आला, की मी आळशीपणाची कमाल करणार. अमक्या वेळी उठलं पाहिजे, अमक्या प्रहरी जेवलं पाहिजे, कुणाला भेटायला जायचं आहे म्हणून किंवा कुणी भेटायला येणार म्हणून दाढी केली पाहिजे, स्नान केलं पाहिजे, केलं तर इतक्याच वेळात आटपलं पाहिजे, प्रतिष्ठेला शोभतीलसे कपडे घातले पाहिजेत, टपाल पाह्यलं पाहिजे, किंवा पत्रांची उत्तरं धाडली पाहिजेत, लेख तयार केला पाहिजे,—असलं कोणतंही बंधन मी शिल्लक ठेवणार नाही ! साऱ्या जबाबदाऱ्यांचं दडपण मनावेगळं फेकून देणार ! हवं तेव्हा उठेन, हवं तिकडे जाईन, हवं त्याच्याशी बोलत बसेन, हवं ते वाचीन, हवं ते गाणं म्हणेन, हवे ते कपडे करीन, हवं तेव्हा खाईन,—किंवा लहर लागली तर पक्षिणीच्या पंखांत अंग ठेवून गप्प राहणाऱ्या पिलाप्रमाणं अष्टौप्रहर अंथरुणात पडून राहीन !

असा रविवार माझ्या आयुष्यात अजून आलेला नाही. पण तो केव्हा तरी

येणार आहे खास ! त्याची स्वप्नं मला नेहमी पडतात. तो आला, की आळशीपणाची परमावधी करून खऱ्या विश्रांतीचा उपभोग जन्मात एकदा का होईना पण मी घेणार आहे. तो आला, की मी आपल्या डायरीत त्याची सुवर्णाक्षरांनी नोंद करीन.—पण छे छे, करणार नाही. निदान त्या रविवारी तरी नाही. कारण त्या दिवशीच्या संपूर्ण आळसाला अन् लहरीपणाला या लहानशा प्रतिज्ञेचं गालबोट तरी मी का लागू देईन !

# चा ळि शी चे घ र

विष्णु सखाराम खांडेकर

हल्ली सकाळी आठ ते साडेआठच्या दरम्यान एक क्षण असा येतो की, त्या वेळी माझी मलाच कीव येते. तीन-साडेतीन महिने झाले या विचित्र क्षणाचा अनुभव आला नाही, असा एकही दिवस उजाडला नाही. आठसव्वाआठच्या सुमाराला न्हाणीघरात पाऊल टाकताना मला त्या क्षणाची आठवण येते. उपरती, वैराग्य, संसाराची असारता, मानवी मनाची चंचलता वगैरे वगैरे गोष्टी माझ्या डोळ्यांपुढे उभ्या राहतात आणि न्हाणीघरातले कपाट उघडताच---

त्या कपाटात मनुष्याच्या शरीराचा एखादा सांगाडा किंवा असलीच दुसरी काही तरी भयंकर गोष्ट असली पाहिजे, असे तुम्हांला वाटेल. पण तसली काही भानगड तिथे नाही. वैराग्य प्राप्त व्हायला गौतम बुद्धाला रोगी मनुष्य आणि प्रेत पाहावे लागले. पण बुद्धाच्या कालापासून जग आता बरेच पुढे गेले आहे, नाही का ? त्यामुळे सध्या एखादी लहानशी गोष्टसुद्धा बुद्धाला मिळालेला धडा सामान्य माणसांना शिकवू शकते.

आमच्या न्हाणीघरातले कपाट एखाद्या अजबखान्याइतके किंवा विविध वस्तूंनी भरलेले असले, तरी त्याला आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्याची कळा नेहमीच आलेली असते. साबणाच्या चुन्याची पेटी किंवा खोबरेल तेलाची वाटी त्या कपाटात असणे स्वाभाविकच आहे. पण घरातल्या इतर राजस कपाटात ज्यांना जागा मिळत नाही; अशा अनेक वस्तूंनाही हेच कपाट उदारपणाने आश्रय देत असल्यामुळे त्यातली विचित्र गर्दी काही अस्वाभाविक म्हणता येणार नाही. राजवाडे आणि बंगले यांच्यापेक्षा धर्मशाळा व देवळे ही नेहमीच भरलेली दिसायची ! त्यात नवल ते काय ? अवीचा निष्प्राण फुटबॉल,

सिगरेट ओढण्याची नक्कल करते वेळी मंदाला उपयोगी पडणारी खेळातल्या जात्याची खुंटी, आणि लताने डोळा काढून आंधळा केलेला कुत्रा, या सर्वांचे संमेलन या विशाल अंतःकरणाच्या कपाटातच होऊ शकते.

अर्जुनाला विश्वरूप दाखविण्याकरिता कृष्णाने उघडलेल्या तोंडाशीच काय ती या कपाटाची तुलना होऊ शकेल; म्हणून हे कपाट उघडताना विश्वरूप दिसल्या-बरोबर अर्जुनाची काय गाळण उडाली असेल, हे मला पुरेपूर कळते. मी कपाट उघडतो, ते आंघोळीच्या वेळेपुरती चाळिशी ठेवायला एक सुरक्षित जागा हवी, म्हणून! पण चाळिशी ठेवता-ठेवता माझे मन म्हणत असते,—ही चाळिशी इथे सुरक्षित राहील की नाही, याची शंकाच आहे! आपण आंघोळ करीत असताना मंदाला सिगारेट फुंकायची, किंवा लताला आपल्या आंधळ्या कुत्र्याला गोंजारण्याची लहर आली तर? सावणाचा चुरा काढताना सौभाग्यवतीने काही गडबड केली तर?—छे! चाळिशी अशी उघड्यावर टाकणे अगदी चुकीचे आहे. तिचे एक घर हरवले, म्हणून काय झाले? आपण दुसरे विकत घ्यायला हवे. आज संध्याकाळी मुद्दाम बाजारात जायचे, आणि—

हा बेत गेले दोन-तीन महिने मी दररोज करीत आहे, जुन्या चाळिशीकरिता नवे घर विकत घेणे हे काही प्रौढ विधवेचा पुनर्विवाह जुळविण्याइतके कठीण नाही; पण—

हे काम गेल्या तीन महिन्यांत माझ्या हातून झाले नाही, हे मात्र खरे. दररोज सकाळी आठ ते साडेआठच्या दरम्यान माझ्या या कर्तव्याची मला आठवण होते. घराच्या अभावी चाळिशी केव्हा फुटेल याचा नेम नाही; ती फुटली की पाच-पंचवीस रुपयांचा नाहक खर्च आपल्याला करावा लागणार, इतकेच नव्हे, तर नवी चाळिशी मिळेपर्यंत लेखनवाचन थांबवून एखाद्या आंधळ्याप्रमाणे आपल्याला काही दिवस कंठावे लागणार, या साऱ्या गोष्टी कपाट उघडल्याबरोबर मला स्पष्ट दिसतात. चाळिशीचे घर आजच्या-आज खरेदी करण्याची प्रतिज्ञा मी मनातल्या मनात करतो; पण संध्याकाळ झाली की, ती प्रतिज्ञा कुठे जाते, कुणाला ठाऊक! मी सिनेमाला, फिरायला किंवा स्नेह्यांशी गप्पागोष्टी करायला जातो. एखादे वेळी बाजारात गेलो, नि या प्रतिज्ञेची आठवण झाली की मी मनात म्हणतो,—आपल्याला खरेखुरे घर विकत घ्यायचे असे थोडेच आहे! अवघे पाच मिनिटांचे काम! आताच त्या दुकानात

जायला कशाला हवंय्? घरी परत जाताना---

परत जाताना मला चाळिशीचे घर विकत घेण्याची आठवण होत नाही. रात्र अंधारी असो अगर चांदणी असो, घराकडे परत येताना तिची शोभा पाहण्यातच माझे मन गुंगून जाते. काळोखात लुकलुकणाऱ्या चांदण्यांकडे पाहून मला वाटते, – आयुष्य हे काळोख्या रात्रीसारखे आहे. आपल्यापासून दोन हातांच्या अंतरावर काय आहे हे दिसत नसले, तरी मधे लक्षावधी योजनांचे अंतर असूनही तारकांचा मंद अंधुक प्रकाश माणसाला रंजवतोच की नाही?

चांदण्या रात्री माझ्या मनात येते, – आयुष्य हे चांदण्यासारखे आहे. प्रीतीची चंद्रकोर कितीही लहान असली, तरी ती मनुष्याच्या मनातल्या निराशेला एका क्षणात उजळून टाकते.

असल्या काव्यकल्पनांत गुंगून जायची सवयच आहे मला! त्यामुळे पाळण्याच्या झोक्यांनी झोपी जाणाऱ्या बालकाप्रमाणे असल्या कल्पनातरंगांवर झुलत झुलत मी निद्रेच्या राज्यात प्रवेश करतो. सकाळी उठल्यावरही या मधुर कल्पनांची सुंदर छाया माझ्या मनावर पसरलेली असतेच. मात्र चहा पिऊन आंघोळीकरिता न्हाणीघरात पाऊल टाकले, आणि—चाळिशी सुरक्षित ठेवण्याकरिता कपाट उघडले की—

उद्यापासून अभ्यासाला सुरुवात करायची, असा वर्षभर बेत करणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेच्या मंडपाच्या दारात जी स्थिती होत असेल, तिचा मला क्षणात अनुभव येतो. चाळिशीचे घर विकत घेणे अतिशय आवश्यक असूनही—

आणि मग—

स्वतःवर रागावलेल्या मनाला शांत करण्याकरिता मी म्हणतो, —अंः? चाळिशीचे घर विकत घेण्याच्या बाबतीत आपल्या हातून हलगर्जीपणा होत आहे, हे खरे! पण या निष्काळजीपणामुळे जास्तीत-जास्ती किती तोटा होईल? फार तर पंचवीस रुपये! पंचवीस रुपयांकरिता स्वतःवर चिडण्यात काय अर्थ आहे! लहानपणापासून आपण नियमित व्यायाम केला असता, तर आपली प्रकृती एखाद्या पहिलवानासारखी राहिली असती! मग आपण कुस्त्या मारून पैसे मिळविले असते,—आणि कदाचित जमले नसते, तरी आपल्याला भरावे लागलेले डॉक्टरांच्या बिलाचे पैसे तरी वाचले असते की नाही? जी कथा

व्यायामाची, तीच हिशेबाची! व्यवस्थित हिशेब ठेवण्याची सवय आपण लावून घेतली असती, तर आपले शेकडो रुपयांचे नुकसान टळले असते; नि आपण काय नुसत्या पैशाच्याच बाबतीत बेहिशेबी आहो? दोन तास फुकट गेल्याबरोबर 'दोन हिरे हरवले!' म्हणून खेदाने उद्‌गार काढणाऱ्या एका पंडिताचे शब्द आपल्याला विद्यार्थिदशेतच पटले होते. पण कुणी बोलायला आले की त्याच्याशी किती वेळ गप्पागोष्टी करीत बसावे याचे भानच राहत नाही आपल्याला! गुळाच्या ढेपीला चिकटणाऱ्या मुंगळ्याप्रमाणे आलेला मनुष्य बसून राहतो, आणि आपणही गुळाच्या गणपतीप्रमाणे बसून त्याला आपल्या वेळाची लूट करू देतो. गप्पागोष्टींत आपला आतापर्यंत जो वेळ गेला आहे, तेवढा जर वाचनात गेला असता,—एवढ्या अवधीत दोन-तीन हजार तरी चांगली पुस्तके आपण वाचली असती! पण—

अशा रीतीने मी स्वतःच्या आयुष्याचा आढावा घेऊ लागलो, की माझे मलाच हसू येते. मी आळशी नाही किंवा विलासी नाही. पण असे असूनही आयुष्यात सहजासहजी करता येण्याजोग्या किती तरी गोष्टी मी केल्या नाहीत—अजूनही मी करू शकत नाही. पहाटे उठून खूप लांब फिरायला जाणे,—वाचलेल्या पुस्तकावरले आपले विचार निरनिराळ्या वह्यांत टिपून ठेवणे—वेळी अवेळी चहा न पिणे,—लिहीत असताना अवी आणि मंदा यांनी त्रास दिला तर त्यांच्यावर न रागावणे,—एक सोडून हजार गोष्टी मला करावयाच्या आहेत. त्या कारणांसाठी अधूनमधून शिकस्तीचे प्रयत्न करतो मी; पण घरात गजराचे घड्याळ असूनही मी पहाटे लवकर उठत नाही. दर महिन्याला नव्या-नव्या वह्या आणूनही आपण कुठे काय टिपून ठेवले आहे याचा मला कधीच पत्ता लागत नाही. चहाच्या दुष्परिणामांवर एक सुंदर व्याख्यान देण्याइतकी तयारी असूनही चहा वाटेल त्या वेळी माझ्या पोटात शिरू शकतो आणि कादंबरीतल्या बालकांच्या लीला लिहीत असताना अवि-मदानी धुमाकूळ मांडला की, मी त्यांच्या अंगावर असा खेकसतो—

हे खेकसणे संपल्यावर माझे मलाच वाईट वाटते. एवढी लहानशी गोष्ट! पण ती आपल्याला कशी साधत नाही, याचे मला आश्चर्य वाटते. मनुष्य नेहमी अपूर्ण राहावा अशीच निसर्गाची योजना असली पाहिजे! नाही तर—

खरेच! डार्विनने वानर हा मनुष्याचा पूर्वज आहे, म्हणून जो शोध लावला

तो किती सत्य आहे! वानर दरवर्षी पावसात भिजतात आणि भिजताना पुढल्या वर्षी घर बांधून राहण्याचा निश्चय करतात. वानर निर्माण झाल्यापासून लाखो पावसाळे आले आणि गेले; पण वानराचे घर काही कुणी अजून पाहिलेले नाही! मग आपल्याला तीन महिन्यांत नवे घर मिळाले नाही, म्हणून माझ्या चाळिशीने माझ्यावर रागावण्यात काय अर्थ आहे?

# पुराणांतली वांगी

अनंत आत्माराम काणेकर

गणूकाकांशी माझे मतभेद नेहमीच होतात, पण त्यांच्या एका शक्तीचं मला नेहमी कौतुक वाटतं. कोणत्याही कूट प्रश्नाचे ते अगदी सहज आणि चटदिशी उत्तर देऊ शकतात. लहानपणी तर त्यांच्या या शक्तीमुळे मी थक्क होऊन जात असे. त्या वेळी मला जर कुणी प्रश्न विचारला असता की, जगातल्या सर्व म्हणण्यांचा राजा कोण? तर त्याचं मी तत्काळ उत्तर दिलं असतं, 'गणूकाका—आमचे गणूकाकाच!'

लहानपणी मी त्यांना एकदा विचारलं, 'काका, मारवाड्याच्या डोक्यावर तीन पट्टे का हो असतात?'

काका तावडतोब उत्तरले, 'अरे, मारुतीनं ओढलेत ते त्यांच्या डोक्यावर!

'म्हणजे?' मी उद्गारलो.

'मारुतीनं लंका जाळली, हे तुला माहीत आहे ना?'

'हो, पण त्याचा मारवाड्याच्या...'

'ऐकून तर घे,' काका सांगू लागले, 'शेपूट पेटविण्याकरिता त्यानं शेपटाला खूपशा चिंध्या गुंडाळल्या, आणि घासलेटचे डबे तो शोधू लागला. मारवाडी व्यापाऱ्यांकडे गयावया करून तो घासलेट मागू लागला. पण मारवाडी कसले खप्पी; ते म्हणाले, आम्ही नाही देणार फुकट घासलेट. मारुती संतापला. भुभुःकार करून त्यानं त्यांची गुदामं फोडली, घासलेटचे डबे बाहेर काढले, आणि त्यांत शेपूट बुडवून पेटवून दिलं. त्या पेटत्या शेपटानं आधी प्रत्येक मारवाड्याच्या डोक्यावर त्यानं तीन-तीन पट्टे ओढले, आणि मग लंकेला आग लावायला तो निघाला. तेव्हापासून मारवाड्यांच्या डोक्यावर हे तीन पट्टे आहेत.'

काकांनी दिलेली ही माहिती ऐकून मी अगदी खूप होऊन गेलो. त्या वेळेला तरी माझं समाधान झालं.

आता मोठा झाल्यावर काकांच्या उत्तरावर मी इतका बेफाम विश्वास ठेवीत नाही; तरी पण काकांच्या विशाल कल्पनाशक्तीचं मला अजूनही पूर्वीइतकंच कौतुक वाटतं. परवा मी त्यांना सहज म्हटलं, ' का हो, काका, पण-बीण, बाप-बीप असं केव्हा-केव्हा आपण म्हणतो, त्यातले हे बीण आणि बीप शब्द कुठून हो आले ?'

काकांच उत्तर तयारच होतं. ते म्हणाले, ' देव विश्वामित्राचं ऐकेना, तेव्हा तपश्चर्या करून प्रतिसृष्टी निर्माण करण्याची धमकी विश्वामित्रानं देवाला दिली होती, तुला माहीत आहे ना ?'

मी ' हो ' म्हटलं.

' पुढे देव नमला, आणि विश्वामित्रानं आपला तो विचार सोडून दिला.' काका सांगू लागले. ' पण थोडीशी प्रतिसृष्टी निर्माण झालीच होती. त्या सृष्टीतले हे शब्द अजून आपल्या भाषेत राहिलेत !'

विश्वामित्राची प्रतिसृष्टी आणि प्रतिसृष्टीतले हे शब्द, ही काकांची कल्पना मला अतिशय हृद्य वाटली. हृद्य वाटायचं एक विशेष कारण होतं. माझ्या डोक्यात अलीकडे एक चमत्कारिक विचार सारखा घोळत असतो. पुराणांतली वांगी पुराणांत, असं म्हणतात खरं, पण पुराणांतल्या वांग्यांच चांगलं चमचमीत भरीत करून खाता येईल, असं अलीकडच्या काही शोधांवरून मला वाटू लागलं आहे. ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र वगैरे अस्त्रांची वर्णनं आम्ही पुराणांत वाचीत होतो आणि तो अस्त्रं सोडल्यावरोबर पृथ्वी कशी थरथरा कापत होती, सप्त-सागर कसे उफाळून वर येत होते, आकाश कसं कोसळून खाली येत होतं, भर दिवसा मिट्ट अंधकार कसा होत होता आणि मध्यरात्री लख्ख प्रकाश कसा पडत होता वगैरे वगैरे गोष्टींचं आम्हांला विलक्षण आश्चर्य वाटत होतं. हे आपले पुराणांतले वर्णन आहे. वास्तव जगात हे काही शक्य नाही, अशी आमची खात्री होती. ॲटम् बॉंबची आणि त्याच्या स्फोटाची वर्णने वाचून ही पुराणांतली वांगी आता डोळ्यांसमोर झाडांना लटकू लागली आहेत.

मध्यरात्री सामसूम झाल्यावर मी रेडिओ लावून बसतो. तेव्हा विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीची मला पुन्हा-पुन्हा आठवण होते. एखादे वेळी तुर्कस्थानमधील

अंकारा शहरात कुणी बोलत असेल, त्याचा आवाज ऐकू येतो, तर कधी ऑस्ट्रेलियातील सिडनीमधले शब्द कानांवर पडतात. कुठं तुर्कस्थान, कुठं ऑस्ट्रेलिया ! त्या बोलणारांना कल्पना तरी असेल का, की मुंबई नावाच्या एका शहरात एका कोपऱ्यात बसलेल्या एका माणसाच्या कानांवर आपण बोलत असलेले शब्द पडत असतील म्हणून ? आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द त्याच क्षणाला साऱ्या विश्वाच्या कोनाकोपऱ्यात जातो,— हिमालयावर उड्डाण करीत असलेल्या एखाद्या विमानात, पॅसिफिक महासागराच्या तळाशी असलेल्या एखाद्या पाणबुडीत, आफ्रिकेतल्या जंगलात, न्यूयॉर्कमधल्या गगनचुंबी इमल्याच्या एकशे-दहाव्या मजल्यावर तो टिपून घेणारे यंत्र असेल, तर तो ऐकता येईल हे खरं, पण ऐकू येवो अगर न येवो, तो इतक्या दूर सर्व ठिकाणी जातो, हे केवढं महान आश्चर्य आहे!

रात्रीच्या प्रशांत वेळी या आश्चर्यांचा विचार करीत असता कल्पनाशक्तीला आणखी एक पाऊल पुढं टाकावंसं वाटतं. साऱ्या विश्वाला वेढून टाकणाऱ्या लहरी आमचे शब्द सर्वत्र नेतात हे जर खरं, तर आणखीही एक गोष्ट खरी असण्याचा संभव आहे. या लहरी हे शब्द साठवूनही ठेवू शकत असतील. विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीसारखीच, कुणी सांगावं एखादी आवाजाची दुनिया असेल. आजचे, कालचे, अनादिकालापासूनचे माणसाचे आवाज या दुनियेत वावरत असतील; उद्या एखादा शास्त्रज्ञ या लहरींचं एखादं नवं रहस्य उघडकीला आणील, या आवाजाच्या दुनियेची दारे आपणासाठी खुली होतील आणि मग ?—मग कल्पना करावी तितकी थोडीच ! कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता, प्रत्यक्ष त्याच्या शब्दांत आपणाला ऐकता येईल; भगवान बुद्धाची प्रवचने त्याच्या आवाजात आपण ऐकू. डेमॉस्थेनिस, सिसिरोची भाषणं, शिवाजीचे शब्द, काय-काय आपणांला ऐकता येईल. मात्र व्याख्यानांचे खोटे रिपोर्ट देणं अशक्य होईल. सिनेमाला नेईन, असं मी काल म्हणालोच नव्हतो, म्हणून नवऱ्यांना बायकांशी भांडता येणार नाही. आणखी पुष्कळच काही होईल ! पुराणांतली वांगी पुराणांत, असं गणूकाकांना सांगण्याची काही सोय उरलेली नाही, एवढं खरं.

# मंडईची बस

**शकुंतला परांजपे**

“ काय लिलूताई, बसला थांबलीस वाटतं ? ” रस्त्याने जाताना माधवने थांबून विचारले.

“ हो ना. तू कुठं चाललास माधव ? ”

“ मंडईत. या बघ पिशव्या.”

मग थांब की जरा माझ्याबरोबर. आत्ता येईल बस. ”

“ छे रे बुवा. आपण नाही कधी बसमध्ये पाय ठेवीत ! ”

“ का रे, बाबा ? तिनं काय घोडं मारलं तुझं ? ”

“ उभं कुणी रहावं सारखं ? ”

“ ते का ? कधीच जागा नाही मिळत बसायला ? ”

“ मिळाली, तरी लगेच पुढच्या थांब्याला कुणी तरी बाई चढते, तिला उभं राहू देऊन बसलं, तर आपले हाल होतात. आणि आपण उभं राहून तिला जागा दिली, तर जास्तच हाल होतात. सांगितलं आहे कुणी पैसे खर्चून हाल सोसायला ? त्यापेक्षा पायीच गेलेलं काय वाईट ? चल तूही पायी. छान सकाळची वेळ आहे.”

“ आले असते रे. पण दहा मिनिटं झाली, मेलीची वाट पाहते आहे; आता नाही पड खाणार. आता बसमधूनच जाणार ! ”

“ अच्छा तर मग. पाहू आधी कोण पोचतं मंडईला ! ”

पाच मिनिटांनी बस आली, रांगेत मी पहिलीच होते. तेव्हा बसायला जागा मिळाली. माझ्या समोरच्या बाईला कंडक्टर तिकीट विचारू लागला. तिने मंडईचे एक तिकीट मागितले.

“ बाई, ही मुलगी तुमचीच का ? ”

" हो माझीच."

" किती वर्षांची ? "

" पावणेतीन."

" आणि ही मुलगी पण तुमचीच का ? "

" हो, ही दीड वर्षांची. हा मुलगा तीन महिन्यांचा. झालं आता समाधान ?" बाईंनी चिडून उत्तर दिले.

" मग बाई. तिकिट काढायचं नाही, मुलांना मांडीवर घ्या."

" तिन्ही मुलांना कुठं मांडीवर घेऊ, बाबा ? "

मला तिची दया येऊन तिच्या मोठ्या मुलीला मी मांडीवर घेऊ लागले, तर तिने 'आऽई' म्हणून हा:गळा काढला! मधली पण माझ्याजवळ येईना. तेव्हा तान्ह्या मुलालाच मी घेतलं, आणि लवकरच त्यानं माझ्या चांगुलपणाचा फायदा घेऊन चांगला तीर्थप्रसादही दिला!

दुसऱ्या एका बाईला कंडक्टरने तिचा एक आणा परत दिला.

" बाई, दुसरी गिन्नी द्या. ही गिन्नी चालायची नाही. "

" न्हाई बाबा माझ्याजवळ दुसरी गिन्नी. "

" मग कसं करायचं ? "

" तूच काढ बाबा आता माझं तिकीट. माझा नातू आहे तुझ्याएवढा." म्हातारी म्हणाली.

कंडक्टर बिचारा चांगला होता. त्याने तिचे तिकीट काढले. पुढल्या थांब्याला गाडी थांबते तो ही मारामारी!

" मी त्याला आधी चढू देणार नाही. " दोघी बायका आणि एक मुलगा कडाक्याने भांडत होती.

" काय तंटा आहे ?" कंडक्टरने विचारले.

" मी रांगेत पहिली आहे. कुणीही सांगेल. आणि हा माझा मुलगा. "

" या पहिल्या आहेत, हे एकदम कबूल. पण मुलगा रांगेत मुळीच उभा नव्हता, आत्ता येऊन मधेच घुसतो आहे. "

" मी पोस्टात गेलो होतो दोन मिनिटं, आणि आईनं माझी जागा धरली होती. "

" अशी जागा धरायला हा काय नाटक–सिनेमा का आहे ? चला

बाई तुम्ही. बाई, तुम्ही चला. चला. चला. आता बाळ, तूही ये. उभं राहायला जागा आहे."

विनबोभाट तंटे सोडवण्यात पुण्याचे कंडक्टर किती हुशार असतात! कृष्ण मेननना सुद्धा हार जाणार नाहीत!

"बाई सरळ बसा. दादा, पाय समोर घ्या. बाई, कुठं जायचं?'

"सांग बाळ राजीव, या मामांना कुठं जायचं ते?"

"चाकलेट घ्यायला!"

"बाई, तुम्हीच सांगा, वेळ जातो माझा."

"मंडईचं एक तिकीट द्या. राजुली, पैसे दे बाळ त्यांना."

"मी नाही देणार!"

"बाई, मुलगा तीन वर्षांचा नाही ना झाला?"

"नाही."

"नाही कसा? परवाच नाही का माझा तीन वर्षांचा वाढदिवस झाला आणि चौथं लागलं ते. तीनचाकीसुद्धा मिळाली मला."

"मग बाई दोन आणे द्या."

"त्याला काय समजतं? वेडा कुठला! हं दे पैसे. पाडलेस? कधी समजायचं तुला, राजू?"

इतक्यात एक तिकीट चेकर तपासायला तिकिटे मागू लागला. दुसऱ्या एक बाई आपल्या लाडक्या मुलाला म्हणाल्या,

"संजीव, दाखव राजा त्यांना आपली तिकिटं. कुठं ठेवलीस?"

"मी छान-छान तारे केले त्यांचे! बघ कसे लुकलुक करताहेत."

"बाई, आता ही तिकिटं चालणार नाहीत. दुसरी काढावी लागतील."

"कसं करावं संजीव तुला?"

संजीव आणि राजीव! राजीव आणि संजीव! जो उठावा आणि पाहावा तो मुलगा आपला संजीव नाही तर राजीव. त्या नेहरूंच्या इंदिरेला झाले असेल, कुठून आपल्या मुलांची नावे संजीव आणि राजीव ठेवली.

कंडक्टरच्या कैचीची किटकिट सुरू झाली, "कुठं जायचं दादा?"

"मंडई."

"एक रुपयाची मोड नाही. किती जणांना रुपयाची मोड देऊ?"

कंडक्टरने एका माणसाला गूळ-आळीचे तिकीट दिले. त्याने एकच आणा कंडक्टरच्या हातावर ठेवला.

" दादा, गूळ-आळीला दोन आणे पडतात. "

" उद्या देईन बावा तुझा दुसरा आणा. देवाशपथ बुडवणार नाही. "

कंडक्टर हसू लागला. शेजारच्या माणसाने एक आणा त्याच्या हातावर ठेवला.

" आता तुमचे पैसे मी कवा देणार ? "

" नाही दिले तरी चालतील. "

" मग दादा ह्ये दोन पेरू आपल्या लेकरांला द्यावा. " असे म्हणून त्या भल्या माणसाने झोळीतून दोन पेरू काढून त्या उदार माणसाच्या हातात कोंबले.

विश्रामबागवाड्यापाशी बस थांबली.

" मागून नका उतरू; पुढून उतरा. चला अजीबाई. उतरा हिंं; तुम्हांला शनीच्या पाराशी जायचं आहे ना ? "

" पण शनीचा पार कुठं आलाय अजून ? "

" बाई, तिथं बस थांबत नाही. पुढं मंडईपर्यंत जावं लागेल. "

" का रं बाबा ? पारावरून जाती, तर थांबायला काय झालं तुझ्या बशीला ? "

" मधेच थांबता येत नाही, बाई—"

" आमच्या खेड्यातली अडाणी बैलं उतरणीला पर थांबवता येतात, अन् तुझी पुण्यातली फक्कड गाडी सरळ रस्त्यालाबी थांबवता येईना ? "

" कायदा आहे, आजीबाई. मी काय करू ? हं उतरा. मी देतो तुमची गाठोडी. "

" बरं बाबा. उतरते बापडी ! आता ही इत्की गाठोडी घेऊनशान फरफटाया लावतोस म्हातारीला ! तुला कुनी म्हातारी न्हाई घरी ? "

" आहे की, म्हातारी आहे, नि म्हातारा पण आहे. माझ्या घरची गाडी असती आजीबाई, तर थेट तुम्हांला जागेवर पोचवलं असतं. "

शेवटी मंडई आली. अर्धी अधिक बस उठून उभी राहिली आणि उतरू लागली. मुंडासे बांधलेल्या एका माणसाला कंडक्टरने थांबविले.

" दादा, तुम्ही पूलगेटचं तिकीट काढलं आहे ना ? मग इथं कुठं उतरता ? "

" मंडईत एका दलालाला निरोप सांगूनशान येतो."

" तोवर बस कशी थांबेल ? "

" हा आलोच बगा. जाऊ नका हं. थांबा की बाईच."

" तसं नाही थांबता येत, दादा. तुम्हांला पुढली बस घ्यावी लागेल."

" असं म्हनता ? मंग ह्ये तिकीट चालल ना म्होरच्या बशीला ?"

" ते कसं चालेल ? दुसरं काढावं लागेल."

" आगगाडीच्या वर तुमच्या बशीची मिजास ! "

" आहे खरी." कंडक्टर हसतच म्हणाला.

"- मंग हे घ्या तुमचं तिकीट. आन माझं दोन आनं द्या माघारी. मी उतरतो हतंच."

" ते पण आता नाही देता येत. एकदा काढलेल्या तिकिटाचे पैसे परत देता येत नाहीत, दादा."

" न्हाई मंजी ? लई लबाड लोकं हायती पुन्यातले ! "

परत घरी जाताना बसकरिता बराच वेळ थांबावं लागलं. सांडेपर्यंत भरलेल्या पिशव्या दोन्ही हातांत धरून मोठी रांग लागली होती. पहिल्या बसमध्ये जागा मिळाली नाही. दुसरीमधे उभे राहायला जागा मिळाली. माझ्या मागून एक म्हातारा चढला. त्याला एका तरुण माणसाने जागा दिली, आणि 'देव तुला म्हातारा करील' हाच आशीर्वाद देत तो बसला. विश्रामबागवाड्याशी फारच पोक आलेला दुसरा एक म्हातारा चढला. अर्थात बसायला जागा नव्हतीच; पण पहिला म्हातारा उठून उभा राहिला. " बसा दादा, तुमी माझ्या-पक्षी म्हातारे आहात. बसा." तो उठून उभा राहतो, तो आणखी एका मुलाने त्याला जागा दिली. कंडक्टर तिकीट देत होता.

" कुठं जायचं ? "

" लकडी पूल. "

" मग एक आणा द्या. "

" लकडी पुलावर जायला तिकीट लागत नाही." तो माणूस मिस्किलपणे हसत म्हणाला. कंडक्टरही काही कमी नव्हता.

" मग पास दाखवा म्हणजे सोडतो."

मी लकडी पुलाच्या अलीकडच्याच थांब्यावर उतरले.

# एकाकी

इरावती कर्वे

मी एकटी आहे. मी काय एकाकी आहे होय? मुळीच नाही. माझ्याभोवती माझी काळजी घेणाऱ्यांची गजबज आहे. मग मी काय असहाय आहे? अं हं. मी हाक मारण्यापूर्वीच किती तरी हात मला मदत द्यायला तयार आहेत—कुणाला म्हणून माझ्या अंतःकरणाचा ठाव सापडला नाही असा का प्रकार आहे—छे! तसेही नाही. माझ्या अंतःकरणाचा ठाव सापडलेली पण पुष्कळ आहेत. मग मी एकटी कशी?

मी एकटीच होते—आहे व पुढेही एकटीच असणार आहे. हे उमजायला जवळजवळ सगळे आयुष्य जावे लागले! सगळ्या गोष्टींचे हे असेच आहे. सर्व आपल्या डोळ्यांपुढे असते, पुस्तकांतून वाचीत असतो—समजले आहे असा भास होत असतो—एक दिवस कसे कोण जाणे—अंतरी एकदम वीज चमकावी असा प्रकाश पडतो व खरोखरचे समजते. मी माझ्या स्कूटरवर बसून स्वतंत्रपणे चालवू लागले तेव्हाची गोष्ट. पहिल्याच दिवशी माझ्यापुढे एक टांगा होता. टांग्याचा वेग किती, मोटारीचा वेग किती या गोष्टी मला अगदी तोंडपाठ होत्या. मला टांग्याच्या पुढून एक वळण घ्यावयाचे होते. मी आपली वाट पाहत होते, टांगा पुढे सटकेल आणि मी वळेन म्हणून. एकदम माझ्या डोक्यात लख्ख झाले. अरे मी तर टांग्यापेक्षा किती तरी जास्त वेगात जाऊ शकते की!!

एखादे वेळी डोक्यात प्रकाश पटदिशी पडतो. कधीकधी फार फार वेळ लागतो. मोठ्या श्रमाने मी किती तरी गोष्टी एकत्र केल्या होत्या. द्राविड भाषांमधील नात्यांचे शब्द माझ्याजवळ जमले होते. वंशावळी पण खूप होत्या.

पण द्राविड कुटुंबरचनेचे सूत्र काही लक्षात येत नव्हते. गोळा केलेली माहिती शक्य तितक्या मुद्देसूदपणे मांडून— "अमक्या-अमक्या गोष्टीमागील सूत्र काही उमजत नाही," म्हणून लेख लिहिला. तो प्रसिद्ध झाला, पण मनाचे काही समाधान होत नव्हते. असे महिनेच्या महिने गेले. असमाधान–सूक्ष्म रुखरुख–हा एक स्थायी भाव होऊन बसला होता; पण वर-वर मात्र मन आणि शरीर इतर कामांत व्यग्र होती. एक दिवस मी सकाळी उठले, ती द्राविड कुटुंबरचनेचे उलगडलेले सूत्र घेऊनच. माझा पूर्वीचा लेख काढून त्यात उल्लेखिलेल्या सर्व गोष्टी डोळ्यांखाली घातल्या. आता कशी साऱ्या विसंगतींना संगत लागत होती— एखादेही टोक विनासंदर्भ, अधांतरी लोंबत राहिलेले नव्हते. जे विचार कर-करूनही समजत नव्हते, ते विनासायास हाती आले तरी कसे ? असे काही झाले, म्हणजे एका ओळीची आठवण होते. "नायमात्मा प्रवचनेन लभ्यः, न मेधया, न बहुना श्रुतेन । यम् एव एष वृणुते तेन लभ्य : . . .।।" हा आत्मा आहे ना तो प्रवचनाने मिळत नाही, बुद्धीने हाती लागत नाही, पुष्कळ पढून गवसत नाही. तो स्वतः होऊन ज्याला निवडतो, त्याला तो मिळतो. ही ओळ मनात आली की कॉलेजात शिकलेला इंदुमतिस्वयंवराचा सर्ग आठवतो व डोळ्यांपुढे चित्र उभे राहते ते स्वयंवराचे. किती राजकुमार बिचारे जिवाचा आटापिटा करीत होते, पण तिने ज्याला माळ घातली त्यालाच ती मिळाली. तस्सा खट हा आत्मा आहे. म्हणजे काय खटपटच करू नये ? कोणी म्हणतात, ह्या वाक्यात परमेश्वरी कृपेचे सूत्र गोवलेले आहे. ईश्वर म्हणतात ना, तो तपश्चर्येने लाभत नाही, त्याची कृपा व्हावी लागते !

अगदी ह्याच तऱ्हेने एक दिवस एकदम मला ज्ञान झाले, की मी एकटी आहे. ध्यानीमनी नसता डोक्यात जो प्रकाश पडतो, त्याला कृपा म्हणता येईल का ? ज्ञानाचा हा स्रोत मला तरी विजेच्या लोळासारखा वाटला. मी त्यात भाजून निघाले, तडफडले. वरून जिवंत होते, तरी आतून मेल्यासारखी झाले. एकटे असणे ही गोष्ट काय एवढी भयंकर आहे ? जगाच्या गलबल्याने कंटाळून एकटे असावे असे वाटत नाही का कधी ? मनस्वी राग आला म्हणजे नाही का आपण होऊनच माणूस जगापासून दूर होण्याचा प्रयत्न करीत ?

रागाने दूर निघून जाणे, रुसून कोपऱ्यात बसणे, जगाला कंटाळून लांब जाणे हे सर्व प्रकार खरे एकटेपणाचे नव्हत. आपली चहा होत नाही, लोकांना

आपले अंतरंग समजलेच नाही, असे वाटून मनुष्य जेव्हा रागाने जातो, तेव्हा, मनाच्या कुठल्या तरी कोपऱ्यास जगाच्या निकटपणाची जाणीव त्याला असतेच. जगाने माझी आज उपेक्षा केली, तरी उद्या त्याला माझी किंमत कळेल, ह्या गावी माझी चूज राहिली नाही तरी कुठे तरी दुसरीकडे माझ्या भावनेला खासच साद मिळेल, अशी त्याची खात्री असते. ह्या एकान्तवासाची सर्व भूमिकाच लोकसापेक्ष असते. लोकांपासून तोंड वळवले, तरी पशुपक्षी, झाडे यांच्या सहवासात संतकवी परमेश्वरचिंतन करीत होते, असे दिसते. म्हणजे जरी कोणी रुसले, रागावले, एकान्तवासात गेले तरी ते एकटे नसते.

मला जे एकटेपणाचे ज्ञान झाले, त्यामुळे मी इतकी भांबावून, गडबडून गेले, तो अगदी खराखुरा, अनादी अनंत असा एकटेपणा आहे. तो माझाच नव्हे, सर्व जीवजातीचा—ज्यात-ज्यात म्हणून चैतन्य आहे, त्याचा एकटेपणा आहे. आपल्याभोवती जी माणसे आहेत, त्यांना आपण कधी भेटलोच नाही-अशा भेटीची शक्यताच नाही. डोळा डोळ्याला भिडतो. काही तरी मिळालेसे वाटते, पण ती खरी मिळणीच नाही. स्पर्शाची तीव्र अनुभूती ही भेट नव्हे. एखाद्याचा पायरव कानी पडावा, त्याचे शब्द कानी यावे, पण हे सर्व भेटीचे प्रसंग म्हणजे समुद्रात सहजगत्या प्रवाहाने एकत्र येणारी लाकडे जशी एकमेकांना टक्कर देतात त्यापेक्षा विशेष जास्ती असे काही नाही. शेवटचा उपाय म्हणून देवाच्या पायावर डोके ठेवले. मंदिराच्या दाराशी जरा बसले, तेथेही मनात हाच विचार आला, "अठ्ठावीस युगे ह्या क्षणाची वाट पहात तू उभा असणार, जन्मजन्मांतरीच्या फेऱ्यात मी चुकून तुझ्या पायांवर येऊन आदळले." ही काय भेट म्हणायची ? एक आत्मा, दुसऱ्या आत्म्याला भेटणेच शक्य नाही.

ह्या परिस्थितीला आल्यावर आपण शेवट गाठला, ह्यापलीकडे जाणे शक्य नाही असे वाटले. माझ्या समजुतीप्रमाणे मी स्वस्थ होते, पण मला न सांगता न सवरता मन ह्या कोंडीतून सुटण्याचा प्रयत्न करीतच होते. आता पुढे मार्ग नाही, ही कबुली द्यायला मन तयार नसतेच.

नेहमीच्या वाचनातील ओळी व शब्द निराळ्याच संदर्भात मनापुढे यायला लागतात. शब्द तेच—अर्थ प्रत्येक शब्दाचा तोच, पण मनाच्या स्थितीप्रमाणे वाक्यार्थात निराळेपणा किंवा खोली यायला लागते. 'विश्वात्मकें देवें' हे दोन शब्द कितीदा ऐकले असतील, डोळ्यांनी पाहिले असतील, पण ह्या वेळच्या

वृत्तीमुळे मन तेथेच घोटाळत राहिले. विश्वात्मकता, सर्वात्मकता म्हणजे सर्व एकाएकी आत्म्याचे भेटण्याचे स्थान नाही का ? प्रत्येकाला विश्वात्म्याची भेट होण्याची शक्यता आहे — व काही असामान्य व्यक्तींना ते साधलेही होते. विश्वात्म्याची भेट म्हणजे सर्वत्र विखुरलेल्या एकाएकी जिवाशीही भेट ही परिस्थिती आपोआपच आली की, — ह्या विचारांनी मनाला बरे वाटले. म्हणजे हा नवा विचार मनात आल्याबरोबर माझी लगेच इतरांशी एकात्मता झाली, असे मुळीच नाही. पण 'एकटेपणा' वर एक तोडगा अस्तित्वात आहे, ह्या जाणिवेनेच बरे वाटले. मी माझी समजूत घातली की एकटेपणा वाटणे म्हणजे आपल्याभोवती कुंपण घालणे आहे. हे कुंपण तुटले, तर सर्वात्म्याशी व त्याद्वारे इतरांशी खरी भेट होण्याची शक्यता आहे. पण मी आपल्याभोवती शब्दांचे जंजाळ पसरीत होते व 'बोलाच्याच कढीभाताने' भूक शमविण्याचा प्रयत्न करीत होते.

ज्या मनाने माझ्यापुढे हा विचार आणला, तेच शत्रूप्रमाणे माझ्यापाठी लागले होते. मी कुठे खाईन दम किंवा विश्रांती घेईन ह्याची सोयच नाहीशी झाली होती. कसे का होईना, माझे समाधान झाले होते ना — पण मन स्वस्थ बसू देत नव्हते. काही तरी दुवा हाताशी आहे पण सापडत नाही, तसे झाले होते.

नवा दुवा सापडला, तो पण गोष्ट वाचता-वाचताच. पूर्वी वाचलेले पण नक्की आठवेनासे झालेले — फक्त हुरहुरीच्या रूपाने राहिलेले काय होते ते समजले व उलगडा झाला, आणि मनाची धडपड पण थांबली "आत्मा एव-इदम् अग्रे आसीत् एकः एव । सः अकामयत । बहु स्यां...!" पूर्वी पहिल्या प्रथम आत्माच फक्त होता. — एक होता. त्याने इच्छा केली, मी पुष्कळ व्हावे — "स. अबिभेत् तस्माद् एकाकी बिभेति"...त्याला भीती वाटली — एकटे असले म्हणजे अशीच भीती वाटते. "स वै नैव रेमे — तस्मादेकाकी न रमते".....त्याला करमेचना. एकटे असले, म्हणजे करमत नाही. त्याला वाटले, आपल्याला बायको असावी. एकटे असले, म्हणजे असेच वाटते.

मला खूप हसू आले. एकदम मनावरचे किती तरी दिवसांचे दडपण गेले. सर्वात्मा सर्वात्मा म्हणतात ना, तो पूर्वी एक होता — अद्वितीय होता, त्याला एकटे वाटले ! त्याला वाटले, पुष्कळ व्हावे !

गम्मतच आहे. एकटे, सर्वात्मक, -- दुसरे नाही, असे असले म्हणजे इतर असावेत, असे वाटते. ब्रह्म झाले म्हणून काय झाले ! त्याला पण कुणाचे तरी बोलणे ऐकावेसे वाटले, — कुणाला तरी पहावेसे वाटले, म्हणून ते पुष्कळ झाले; आणि त्याचे तुकडे एकमेकांची खरी भेट होत नाही, म्हणून रडतातच. एक असतानाचा एकाकीपणा घालविण्यासाठी तुकडे व्हायचे, आणि पुष्कळ असल्यामुळे वाटणारा एकाकीपणा घालविण्यासाठी विश्वात्म्याकडे धाव घ्यायची हे चक्र कधीच थांबणार नाही.

माझ्या अगदी आतल्या मनाचे पण समाधान झाले वाटते.

ते सुद्धा कुरतडायचे थांबून

दमलेल्या कुत्र्यासारखे पुढच्या पंजांत डोके टेकून शांत निजले.

# मांजराच्या मिशा

भगवंत गोविंद देशमुख

असं म्हणतात की, मांजराला जर एखाद्या अरुंद जागेतून, उदाहरणार्थ खिडकीच्या उभ्या गजांमधून, जावयाचं असलं, तर अगोदर ते आपलं तोंड त्यांत घालून बघतं. जर मिशांना गजांचा स्पर्श न होता तोंड पलीकडे गेलं, तर त्याला कळतं की, येथून पलीकडे जाणे शक्य आहे आणि जर मिशांना धक्का लागला, तर लागलीच ते माघारी फिरते. मांजराच्या बाबतीत ही गोष्ट खरी असेल, कदाचित नसेलही ! पण माणसाला मात्र अशा एखाद्या साधनांची अत्यंत आवश्यकता असल्याची मला तीव्रतेने जाणीव होते. माणसाच्या मिशा समजा जरी वाढविल्या तरी, या दृष्टीने उपयुक्त ठरण्याची शक्यता नाही. कारण एक तर, त्या मांजराच्या मिशांप्रमाणे सरळ नि ताठ राहू शकत नाहीत. आणि जरी राहिल्या, तरी माणसासमोर काही केवळ, जवळ जवळ असलेल्या दोन स्थिर गजांमधून जाण्याचा प्रश्न थोडाच असतो ! अनेक ‘ वेगवेगळ्या ’ वाहनांच्या वर्दळीनं गजबजून गेलेला रस्ता ओलांडून जाताना माझा जेव्हा गोंधळ उडतो, तेव्हा मला मांजराच्या मिशांची आठवण येते. क्षणभर मांजराचा एवढ्यापुरता हेवा वाटू लागतो व निसर्गानं माणसात निर्माण केलेली ही उणीव दूर करणारं एखादं यांत्रिक साधन तरी अवश्य निर्माण व्हायला हवं, असं वाटू लागतं. वस्तुतः रस्ता ओलांडताना असं कितीसं चालावं लागणार ? अवघी दहा-वीस पावलं काय ती टाकावयाची असतात. बरं, तीही मी अगदी शक्य तेवढ्या वेगानं टाकीत असतो, नि तरीही मला या कामी कितीतरी वेळ लागतो. दोन्ही बाजूंनी मोटारी, सायकली, रिक्षा इत्यादी वाहने सारखी धावत असतात, नि त्यामुळे रस्ता ओलांडण्याइतकी मोकळी वाटच मला मिळत नाही. वस्तुतः वाट मिळत नाही असं म्हणण्यापेक्षा, मिळेल असं मला वाटत नाही; हेच खरं. ही

मोटार गेली, म्हणजे आपण पुढे सरकू, तो रिक्षा गेला म्हणजे पुढे पाऊल टाकू अशा विचारात मी तात्कळत उभा राहतो, नि एका मोटारीनंतर दुसरी मोटार व एका रिक्षानंतर दुसरा रिक्षा येताना दिसल्यामुळे पुन्हा पूर्ववत विचार करू लागतो. बराच वेळ रेंगाळल्यावर योगायोगाने जेव्हा दोन्ही बाजूंना एकही वाहन दृष्टिपथात येत नाही, तेव्हा कुठे मी पलीकडे जातो. इतर अनेक लोक झपाट्यानं रस्ता ओलांडीत असताना आपल्यालाच का जमू नये, याचा जेव्हा मी विचार करू लागतो, तेव्हा मला कळतं की, आपल्याला वाहनांच्या गतीचा अंदाज घेऊन स्वतःच्या गतीशी मेळ घालता येत नाही. या कारणामुळेच मला वाटतं की, या कामी उपयुक्त ठरणारं एखादं यंत्र अवश्य निघावं. उडत्या पक्ष्याला गलोलीतून दगड मारताना, ज्याप्रमाणे पक्ष्याची गती, त्याची अपेक्षित दिशा व गलोलीतील दगडाचा वेग यांचा अंदाज घेऊन नेम धरावा लागतो त्याप्रमाणे रस्ता ओलांडतानाही करावं लागतं आणि हे काम वाटतं तितकं सोप नाही, निदान मला तरी तसं वाटत नाही. अंदाज मीही बांधीत असतोच. ही रिक्षा जवळ येईपर्यंत मी पुढे जाईन, ती सायकल वळण्यापूर्वी मी पलीकडे जाईन, इत्यादी बेत ठरवून मी निघू लागतो; पण लागलीच वाटतं की, मधेच एखादी मोटार आली तर ? किंवा सायकलचा वेग वाढला तर ? नि या प्रश्नांनी गोंधळून जातो. मात्र मनातील हा गोंधळ बाहेर दिसू नये, याचा मी कसोशीने प्रयत्न करीत असतो; कारण ते शहरी शिष्टाचारात बसत नाही. साहजिकच रस्त्याच्या कडेने रेंगाळताना, मी असं दाखवीत असतो की, जणू आपण कुणाची तरी वाट बघत थांबलो आहोत. अर्ध्या रस्त्यातून परतायची पाळी आली, तरी हावभाव मात्र असे करीत असतो की, जणू एखादे विसरलेले काम आठवल्या-मुळेच आपण परत फिरत आहो; परंतु परवा गावाकडच्या एका मित्राबरोबर भटकण्याचा अनुभव आल्यापासून मात्र या बाबतीत अगदी निराळेच विचार माझ्या मनात येऊ लागले आहेत. या मित्राचा प्रकार माझ्यापेक्षा सवाई आढळला मला. बॉस्वेलनं जॉन्सनची एक आठवण आपल्या पुस्तकात दिली आहे. बॉस्वेल एकदा जॉन्सनला म्हणाला, ' मला कधी-कधी अगदी कंजूषपणा दाखवावा असे वाटू लागते. ' जॉन्सननं उत्तर दिलं, ' मलाही तसं वाटतं कधी-कधी; पण मी ते बोलून दाखवीत नाही.' माझ्या मित्रात व माझ्यात नेमका हाच फरक मला दिसून आला, नि त्यामुळेच त्या दिवशीचा तो विचित्र प्रकार घडला

हे गृहस्थ प्रथमच हैद्राबाद बघावयास येत होते. सकाळीच आम्ही बाहेर पडलो. वर्दळ अजून विशेष सुरू झाली नव्हती. एके ठिकाणी रस्ता ओलांडावयाचा होता. मी दबकत-दबकत वळण घेतले. पण आमच्या या मित्रांनी मात्र आपले धोतर वर, खोवले, कोटाच्या बाह्या मागे सारल्या, नि इकडे-तिकडे बघून जोरात धूम ठोकली व फूटपाथवर येताच एखादा मोठा पराक्रम केल्याप्रमाणे माझ्याकडे बघितले. आपल्यापेक्षाही अधिक भित्रा माणूस भेटल्याने मला एकीकडे समाधान वाटले खरे; पण त्यापेक्षा अस्वस्थच अधिक वाटले. मी त्याला विचारले, 'अरे, असं काय करतोस तू?' तो म्हणाला, 'मग काय करायचं? एखाद्यानं मोटार अंगावर घातली तर?' अधिक चर्चा न वाढविता मी एक रिक्षा ठरविली, नि आम्ही रिक्षातून पुढे निघालो. वाटले, आता तरी हा स्वस्थ बसेल, पण झाले उलटेच! रिक्षात बसल्यापासून 'जरा आहिस्ता लेना भाई. रोक के. अरेऽऽऽवो देख मोटर. ठैरो, ठैरो.' इत्यादी सूचना त्यानं ओरडूनओरडून द्यावयाला आरंभ केला. मी म्हटलं, 'अरे, रिक्षा तो चालवतोय, तू नव्हे. त्याला काय दिसत नाही?' तो म्हणाला, 'ते खरं रे. पण आजूबाजूनं येणाऱ्या मोटारी तर हा माणूस चालवत नाही ना? त्यांनी आपल्या अंगावर घातली मोटार, तर घ्या काय? आपली काळजी घेतलेली बरी होऽ!' आणि सारा दिवसभर हा प्रकार चालू होता. प्राणिसंग्रहालय बघावयास जावे, नि लोकांनी आपल्यालाच बघू लागावे, म्हणजे जसे वाटेल, तसे मला वाटले; पण उपाय नव्हता. त्याला आपल्या भावना लपविता येत नव्हत्या व त्याची भीती खरी होती. रस्ता ओलांडताना होणाऱ्या माझ्या मनातील गोंधळामागेही हीच भीती असेल काय?—असावी; कदाचित उघड नसली, तरी सुप्त रीतीने. तिची जाणीव मात्र मला आजवर झालेली नव्हती. किंबहुना, ही जाणीव करून घेण्याचे मी टाळले होते म्हणा हवे तर; मात्र त्या दिवशी जेव्हा या भीतीचे प्रगट रूप व तिचा विचित्र परिणाम पाहिला, तेव्हा मात्र आपली काही भूल होत आहे, याची खात्री पटली. तसंच पाहिलं, तर रस्त्यानं जाताना आपण प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यातच वावरत नसतो का? हे बसचे अजस्र धूड, ही फटफटी, हा ऑटोरिक्षा, ही सायकल, नि हा टांगा, म्हणजे मृत्यूच्या जबड्यातील लहान-मोठे दातच होत. हा जबडा सारखा मिटतो आहे; उघडतो आहे. या दातांच्या सांदींतून, फटींतून, आपण जोवर वावरतो, मधल्या

पोकळीत जोवर राहतो, तोवर ठीक आहे; पण जर थोडी चूक झाली तर ? तर काय, मोठा आवाज ब्रेक लागल्याचा, धक्का बसल्याचा, माणसांचा गोंधळ, धावपळ, नि संपले ! दुसरे दिवशी वर्तमानपत्रांत बातमी भीषण अपघाताची. कमी का येतात अशा बातम्या ? आणि तरीही आपण वाटेनं चालतच असतो. सारे लोक चालत असतात. बुद्धजातककथांत, एके ठिकाणी मानवी जीवनावर एक रूपक केलेलं आहे. " एक माणूस, मागे वाघ लागल्यामुळे धावताना एका पडक्या विहिरीत घसरून पडला, पडता-पडता विहिरीच्या भिंतीतून बाहेर आलेल्या एका पिंपळाच्या मुळ्यांना धरून अधरच लटकला खाली विहिरीच्या तळाशी एक कृष्णभुजंग सळसळतो आहे. वर तो वाघ उभा आहे. नि डोक्यावर एक मधमाश्यांचे मोहळ लोंबलेले आहे. त्या मोहळातून थेंब थेंब मध ठिपकतो आहे व तो जिभेनं चाटण्यासाठी त्या माणसाची धडपड चालू आहे. " असं आहे जीवन ! रस्त्यावर उभं राहून या दृष्टीनं विचार करू लागलो, तर जातक-कथेचंच अधिक भीषण स्वरूप जाणवल्यावाचून राहत नाही; पण माझा प्रश्न आहे तो असा की, जीवनातील केवळ ही भीषणताच सत्य मानून कसे चालेल ! ही भीषणता जेवढी खरी, तेवढीच ' तो मधाचा थेंब ' चाखण्याची माणसाची दुर्दम्य इच्छाही खरीच नव्हे काय ? म्हणून तर अपघाताच्या घटना प्रत्यही कानी पडत असता व डोळ्यांना दिसत असताही माणसं रस्त्यानं जाऊ शकतात ! आणि माणसाची ही जीवनप्रवृत्ती काही या जातककथेत वर्णिल्या-इतकी अनाठायी व निराधार नाही. तिला बळकट आधार आहे; भक्कम पाया आहे. तसं नसतं तर, माणसाचं जीवन, सामूहिक जीवनच शक्य झालं नसतं.

माझ्या मित्राला वाटत होती, त्याप्रमाणे वस्तुतः सर्वांनाच भीती वाटावयाला लागली, तर काय होईल बरं ? मला त्याचाही अनुभव आलेला आहे. अनेकांना आलेला असेल. हैद्राबादेत पोलिस ॲक्सन होण्याचा थोडे दिवस आधीच्या काळात जे अस्थिर, भीतिग्रस्त व साशंकतेचं जीवन अनेकांप्रमाणे मीही अनुभवलं. त्याची आठवण झाली की अजून पायांखालची जमीन निसटू लागल्या-सारखं वाटतं. जेव्हा गाड्या लुटल्या गेल्या, घरं फोडली गेली, रस्ते शस्त्रधारी अरब पठाणांनी भरून गेले, तेव्हा बाहेर जाऊन घरी येईपर्यंत मनात काय म्हणून येऊन जात नसे ! ' मागून येणारा माणूस, कुणास ठाऊक कोण आहे.

ते? समोरचा माणूस जवळ येताच, कुणास ठाऊक काय करील ते? बाजूच्या माणसाची बंदुक कुणास ठाऊक केव्हा कुणीकडे वळेल ते? ते जीवन नव्हतेच! तो जगण्याचा आभास होता. विश्वास फक्त झाडांवर, जनावरांवर काय तो ठेवता येत होता; माणसांवर नव्हे! असं जेव्हा होतं, तेव्हा जीवन असह्य होतं, अशक्य होतं; कारण माणसांवरील विश्वास, माणसांच्या योग्यायोग्य निवडणाऱ्या बुद्धीवरील विश्वास, त्याच्या अंतकरणावरील, माणुसकीवरील विश्वास, हाच जीवनाचा आधार आहे. वाईट, दुष्ट, क्रूर माणसं कुठं व कधी नव्हती नि नाहीत? पण म्हणून काही प्रत्येक माणूस दुष्ट, वाईट नि क्रूर आहे, असं आपण मानीत नाही. चोऱ्या होतात, दरोडे पडतात, भांडण होतात, खूनही पडतात, नि तरीही आपण प्रत्येक माणसाला घाबरत नाही. वस्तुतः वाटेनं चाललेला कोणीही माणूस चोर, गुंड नसेल कशावरून? पण असं मानून जग चालत नाही, चालू शकत नाही. मानवी व्यवहार खोटेपणावर, लबाडीवर चालतो, असं म्हणण्याची रूढी आहे; पण ते अल्पसत्य आहे, नि म्हणून एकंदर मानवी जीवनाचा विचार करताना असत्य आहे. माझ्या मित्राला जसं वाटत होतं की प्रत्येक मोटार, प्रत्येक सायकल ही त्याच्या अंगावर येण्यासाठीच जणू काय येत आहे; त्याप्रमाणे वस्तुतः वाटायला काय हरकत आहे? तुम्ही म्हणाल, 'रस्त्याने चालण्याचे कायदे आहेत, वाहनं चालविण्याचे कायदे आहेत, नि म्हणून ही भीती व्यर्थ आहे.' वस्तुतः कायद्याचं बंधन हे ते पाळणाराला असतं; मोडणाराला नव्हे! नि म्हणून समोरून येणाऱ्या मोटारचा ड्रायव्हर एकदम उजवीकडून डावीकडे येऊन अनेकांच्या अंगांवरून मोटार नेणार नाही, हे गृहीत धरण्याकरिता काय पुरावा आहे? हात दाखविणाऱ्या पोलिसाच्या खुणेवर साऱ्या रस्त्याचा प्रवास तुंबतो किंवा वाहतो, पण या पोलिसाचा बांधच फोडून हा प्रवाह धावू लागणार नाही, असं कशावरून? हे सर्व शक्य आहे; अगदी सहज शक्य आहे, नि तरीही ते आपण मानीत नाही, तसं मानून चालत नाही, आपल्याला तसं मानता येत नाही. कारण आपला माणसावर विश्वास असतो, माणसाच्या सत्प्रवृत्तीवर विश्वास असतो. सारी माणसं प्रतिभावान, मुत्सद्दी व अलौकिक बुद्धिमत्तेची नसतात, तशी ती मूर्खही नसतात, सारी माणसं संत, महात्मे नसतात, तशी ती नीचही नसतात, जगात मूर्खही आहेत व नीचही; पण सर्वसामान्यतः माणसं चांगलीच असतात.

रस्त्यावर अपघातही होतात, पण ते अपवाद म्हणून. अपघात व्हावेत, यासाठी काही रस्ता व वाहने थोडीच आहेत? हे सत्य आपण जाणलेच पाहिजे. एखाद्याला पटत नसेल, तरीही ते मानलेच पाहिजे; कारण त्यावाचून रस्त्याने चालताच येणार नाही, जीवन जगताच येणार नाही. रस्त्याने सुरळीतपणे चालण्याकरिता असो, की जीवन सुरळीतपणे जगण्याकरिता असो; इतरांच्या गतीचा अंदाज घेणे जसे आवश्यक आहे, तसेच इतरांवर विश्वास टाकणेही आवश्यक आहे.

माझ्या मित्राबरोबर भटकण्यात, हे एक महत्त्वाचे सत्य मला गवसले आहे, नि त्यामुळे माझ्या मनातील गोंधळ व त्यामागील सुप्त आशंका आता कमी होत आहे. मानवी जीवनाचे सूत्र हाती लागल्यासारखे मला तेव्हा-पासून वाटत आहे, नि म्हणूनच आता रस्त्याने चालताना मला मांजराचा हेवा वाटत नाही. मांजराच्या मिशा मांजरालाच लखलाभ असु देत! माणलाला त्या मिशांचीही गरज नाही, की त्यांचे कार्य करू शकणाऱ्या एखाद्या यंत्राचीही गरज नाही.

रस्त्याने चालताना असो की जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात वावरताना असो. माणसाला हव्यात दोन गोष्टी : एक भोवतालच्या गतिमान परिस्थितीचा वेध घेऊ शकणारी बुद्धी व दुसरी म्हणजे इतरांवरील, माणसाच्या माणुसकी-वरील विश्वास. हे असेल, तरच वाटचाल. हे असेल, तरच जीवन. हेच इष्ट आहे, कारण हेच सत्य आहे, नि नसले तरी स्वीकारणे अपरिहार्य आहे; कारण जगण्याचा तेवढा एकच मार्ग आहे.

# टीपा

: १ :

## लोकमान्य टिळक ( १८५६-१९२० )

बी. ए. ( १८७७ ) व एल्एल् बी. ( १८७९ ) झाल्यानंतर चिपळूण करांनी प्रखर ध्येयवादाने प्रेरित होऊन सुरू केलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' ला जाऊन मिळाले. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज व केसरी-मराठा ही वृत्तपत्रे स्थापन करण्यात त्यांनी चिपळूणकर-आगरकर यांच्या सहकार्याने भाग घेतला. १८८७ मध्ये आगरकरांनी 'केसरी' चे संपादकत्व सोडले, त्या वेळी 'केसरी-मराठा' या संस्थेची जबाबदारी टिळकांनी स्वतःच्या शिरावर घेतली. १८९० मध्ये राजिनामा देऊन ते फर्ग्युसन कॉलेजमधून बाहेर पडले व भारताला स्वराज्य मिळवून देण्याच्या तीव्र इच्छेने धडाडीने राजकारणात पडले. त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून सरकारने त्यांना दोनदा सक्त कारावासाची शिक्षा फर्मावली. 'आर्क्टिक होम इन दी वेदज,' 'ओरायन,' 'गीतारहस्य' व 'केसरीतील निवडक लेख भाग १ ते ४' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

टिळकांच्या राजकीय लेखनामध्ये काटेकोर, तर्कशुद्ध व सडेतोड विचारसरणी आढळते. त्याचप्रमाणे त्यांच्या संशोधनात्मक लेखनामध्ये त्यांचे पांडित्य, सत्य-निष्ठा, अनाग्रहीपणा व गुणग्राही वृत्ती इत्यादी वैशिष्ट्ये प्रकर्षाने आढळतात.

चिंतामणराव वैद्य-( १८६१-१९३८ ). 'भारताचार्य' ही पदवी. भारत-

इतिहास-संशोधक-मंडळामध्ये भरीव संशोधनात्मक कामगिरी. व्यासंग, व्यापकता व विद्वत्ता यांमुळे त्यांच्या लेखनास फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. 'महाभारताचा उपसंहार,' 'दुर्दैवी रंगू' (कादंबरी) व 'शिवाजी' (इंग्रजी चरित्र), 'श्रीकृष्ण' व 'श्रीराम' यांची चरित्रे इ. ग्रंथ प्रसिद्ध. यश्चेनं...' ऋषिप्रणीत श्रद्धेने जो याचे नित्य श्रवण करील.' इदं महाकाव्य...– 'महात्मा ऋषीचे हे महाकाव्य'. यच्चापि सर्वगं...–जी सर्वव्यापक [अशी वस्तु'] तिचेदेखील प्रतिपादन केलेले आहे. सर्वोपजीव्य ...–सर्वांना आधारभूत. चारी पुरुषार्थ— धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ. परं न लेखक...—परंतु हे लिहून घेणारा कोणीही लेखक पृथ्वीवर अस्तित्वात नाही. मॅक्स मुलर—(१८२३–१९००). अँग्लो–जर्मन संस्कृतज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, आणि प्राच्यविद्येतील प्रकांड-पंडित. 'Sacred Books of the East' या ग्रंथमालेचे संपादक. वेबर–(आल्बेश्त १८२५–१९०१). जर्मन प्राच्यविद्यापंडित. संस्कृत व प्राकृत भाषांतील ग्रंथांची यानेच प्रथम पाश्चात्त्य जगताला सविस्तर, चांगल्या रीतीने ओळख करून दिली मॅक्डॉनेल— (आर्थर अँथनी : १८५४–१९३०). वैदिक वाङ्मयाचे जगप्रसिद्ध अभ्यासक व भाषाशास्त्रज्ञ, 'Vedic Index,' 'Vedic Reader' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध. प्रो. ल्यासन – (ख्रिस्तियन : १८००–१८७६). जर्मन प्राच्यविद्याविशारद. भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृत नाटके यांचे संशोधक. 'प्राचीन भारतीय संस्कृती' बद्दल जर्मन चार भागांत भाषेत ग्रंथ. त्यांखेरीज रामायणाचे दोन सर्ग, हितोपदेश, गीतगोविंद व मालतीमाधव यांची जर्मनमध्ये भाषांतरे. ॲना बेझंट—(१८६७–१९३४). १८९३ साली प्रथम भारतात आल्या. भारताच्या कल्याणासाठी आमरण झटणाऱ्या प्रसिद्ध इंग्रज विदुषी. वयाच्या ६७ व्या वर्षी होमरूल लीगच्या चळवळीत त्या टिळकांच्या पक्षात आल्या. मद्रास येथे अड्यारला थिऑसॉफीचे मोठे केन्द्र व धर्मशिक्षण देणारे पहिले हिंदी विद्यापीठ त्यांनी काशी येथे स्थापन केले. गीतेचा इंग्रजीत अनुवाद. कोहिनूर–जगप्रसिद्ध हिरा. त्याची हकीकत अतिशय मनोरंजक आहे. मूळचा तो कर्णाजवळचा. १३०४ मध्ये माळव्याच्या राजाकडून अल्लाउद्दीन खिलजीने तो हिरावून घेतला. १५२६ मध्ये झालेल्या पानिपतच्या लढाईत तो हुमायूँच्या हाती लागला. पुढे १७३९ मध्ये नादिरशहाने जी लूट भारतातून नेली, तीत हा हिरा होता. परंतु शहा रूख नावाच्या नादिरशहाच्या वंशजाकडून तो

अफगाणिस्तानच्या बादशहाकडे गेला. १८ व्या शतकात पंजाबचा राजा रणजितसिंग याने तो स्वपराक्रमाने परत मिळविला. १८४९ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने तो रणजितसिंगाकडून मिळवून इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीला नजर केला. त्यावेळी त्याचे वजन १८६$\frac{1}{16}$ कॅरेट होते. नंतर त्याला पैलू पाडून १०८$\frac{1}{3}$ कॅरेट वजनाचा हा हिरा इंग्लंडच्या राजमुकुटात बसविण्यात आला.

: २ :

## वासुदेवशास्त्री खरे ( १८५८—१९२४ )

चिपळूणकर, टिळक, आगरकर यांचे समकालीन. विष्णुशास्त्र्यांनी काढलेल्या न्यू इंग्लिश स्कूलला सुरुवातीपासूनच वासुदेवशास्त्रीही शिक्षक म्हणून जाऊन मिळाले होते. पुढे मिरजेच्या शाळेत संस्कृताचे शिक्षक. सुरुवातीला फक्त पंधरा रुपयांवर लागले. निवृत्त झाल्यानंतर त्यांना फक्त पंधरा रुपयांचेच पेन्शन होते. असे असताही शास्त्रीबुवांनी स्वतःच्या पदरास खार लावून घेऊन इतिहास-संशोधनाचा महाप्रचंड उद्योग केला. ‘ यशवंतराव ’ हे महाकाव्य ‘ गुणोत्कर्ष ’,‘ तारामंडळ ’,‘ चित्रवंचना ’,‘ कृष्णकांचन’,, शिवसंभव ’ व ‘ उग्रमंगल ’ ही सहा नाटके, नाना फडणिसांचे चरित्र व ऐतिहासिक लेख-संग्रहाचे पंधरा खंड इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध.

न. चिं. केळकरांच्या ‘ मराठे व इंग्रज ’ या ग्रंथास लिहिलेल्या प्रस्तावनेतून ‘ मातीचे भांडे ’ हा वेचा घेतला आहे. शास्त्रीबुवा हे मिरजेस शिक्षक असताना केळकर त्यांचे विद्यार्थी होते.

तवारीख – इतिहास. नाना-नाना फडणीस ( १७४२ — १८०० ). संपूर्ण नाव-बाळाजी जनार्दन भानू. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांना फडणिशीची वस्त्रे मिळाली व पुढे बारभाईचे कारस्थान यशस्वी झाल्यानंतर आपल्या मुत्सद्देगिरीने नाना राज्याचे मुख्य कारभारी झाले. हैदर – १७४१च्या सुमारास प्रथम म्हैसूरच्या लष्करात हैदर हा साधा सैनिक होता. नंतर म्हैसूरचे राज्यपद त्याने स्वपराक्रमाने मिळविले. पेशव्यांच्या गृहकलहाचा फायदा घेऊन याने राघोबादादास मदत केली. इंग्रजांनी चिलूरच्या लढाईत ( १७८२ ) याला

ठार मारिले. साल्बाईचा तह —ग्वाल्हेरच्या दक्षिणेस तीन मैलांवर साल्बाईचा किल्ला आहे. १७८२ मध्ये इंग्रज-मराठे-युद्धाचा शेवट महादजी शिंद्यांच्या मध्यस्थाने या ठिकाणी झाला. **शिंदे व भोसले यांचा पराभव**–महादजी शिंदे १७९४ मध्ये मरण पावल्यानंतर शिंद्यांच्या गादीवर दौलतराव आला. १८०३ मध्ये इंग्रजांनी उत्तर हिंदुस्थानात सगळीकडे शिंद्यांचा पराभव केला. १८१७ साली शेवटी शिंद्यांनी इंग्रजांशी तह करून मांडलिकत्व पत्करले. भोसल्यांपैकी मुधोजी ऊर्फ अप्पासाहेब याचा इंग्रजांनी १८०३ मध्ये पाडाव केला. १८१६ मध्ये सीताबर्डी येथे लढाई होऊन भोसल्यांचा पराभव झाला व त्यांना मांडलिकत्व स्वीकारावे लागले. **छ. ९ साबात**–'सुहूरसन' नावाच्या मुसलमानांनी रूढ केलेल्या पद्धतीने लिहिलेली तारीख. या ठिकाणी 'तारीख ९ महिना साबात' अर्थ. **छ. १६ रमजानी**—रमजान महिन्यातील १६ वी तारीख. **खुरशो**–खुर्ची; **फर्द**—एकेरी वस्त्र, एकेरी पत्र– **कौशल**–कौन्सिल, सभा, चर्चा. **बुटलेर**–स्वैंपाकी, बबर्जी. **यशवंतराव होळकर**– (मृत्यू १८११). तुकोजी होळकरचा दासीपुत्र. मराठेशाहीतला शेवटचा अतिशय शूर सरदार मोठ्या अडचणीतून याने स्वतःची फौज उभी केली; आणि अफगाणिस्तानापर्यंत सर्व राजेरजवाड्यांना पत्रे लिहून इंग्रजांची काही काळ धूळधाण केली. इंग्रज सैन्याची फजिती याच्याइतकी दुसऱ्या कोणीही केली नसेल. इंग्रजांनी शेवटी १८०५ मध्ये तह करून याच्या ताब्यातला पूर्वीचा सर्व प्रदेश त्याच्याकडे कायम ठेवला.

## : ३ :

## अ. ब. कोल्हटकर ( १८७९–१९३१ )

वृत्तपत्रव्यवसायाच्या धकाधकीच्या व्यवसायावर मनापासून प्रेम करणारे व लेखनाचे जबरदस्त व्यसन असलेले साहित्यिक म्हणून अच्युतरावांचे नाव प्रसिद्ध आहे. शिक्षणाच्या निमित्ताने साताऱ्यास चुलत्यांकडे (बळवंत) राहिले. व त्यांचेच नाव वडिलांच्या ठिकाणी (वामनराव) शाळेत नाव घालण्याच्या निमित्ताने जे एकदा लागले, ते कायमचेच. एल्एल्. बी होऊनही

त्यांचे मन वकिलीत रमले नाही. नागपूर-कॉंग्रेसचा अध्यक्ष कोण असावा, या-संबंधी आपल्या ‘देशसेवक’ या पत्रामध्ये त्यांनी जो जहाल लेख लिहिला, त्यामुळे त्यांना राजद्रोहाच्या आरोपावरून २॥ वर्षे कारावास भोगावा लागला. तुरुंगातून सुटल्यावर ‘श्रुतिबोध’ नावाचे मासिक सुरू केले. परंतु लोकमान्यांच्या जहाल राजकारणाने प्रेरित होऊन ते वृत्तपत्रव्यवसायात शिरले. ‘संदेश’, ‘स्वातंत्र्य’, ‘राष्ट्रमत’ ही दैनिके, ‘युगांतर’, ‘चाबुकस्वार’, ‘रणसंग्राम ही साप्ताहिके व काही मासिके काढली. त्यांतल्या ‘संदेश’मधील चुरचुरीत आणि चटकदार लेखनवैशिष्ट्यांनी त्यांनी दैनिक वृत्तपत्र कमालीचे लोकप्रिय केले. स्वतःची नाटकमंडळी काढून, काही नाटके लिहून, त्यांनी ती रंगभूमीवर आणली व स्वतःही त्यांत कामे केली. चटकदार, आकर्षक लेखनाची उपजत देणगी, नानाविध उद्योगांमुळे प्राप्त झालेली बहुश्रुतता आणि त्याचबरोबर वाङ्मयीन टीकालेखनासाठी आवश्यक असणारी विश्लेषणवृत्ती या सर्वांचा मोठा मनोरंजक समन्वय त्यांच्या लेखनात दिसून येतो.

१९२७ साली पुणे येथे झालेल्या साहित्य-संमेलनाच्या अध्यक्ष-स्वागताध्यक्षांच्या व्यक्तित्वाची चर्चा करणारा ‘हे तात्या आणि हे तात्या’ हा बहारदार लेख अच्युतरावांनी ‘चाबुकस्वार’मध्ये लिहिला होता हरिपंत—तात्या फडके (१७२९–१७९४). बाळंभट नावाच्या नाना फडणिसाच्या घरच्या भिक्षुकाचा हा मुलगा. पहिल्या माधवरावांनी यास प्रथम कारकून म्हणून फडणिशी दप्तरात नेमिले. पुढे बारभाईच्या कारस्थानात त्याचे महत्त्व वाढले. त्र्यंबकराव पेठे यांच्या निधनानंतर हा मराठ्यांचा सेनापती झाला व राघोबादादांचा पाठलाग करून याने इंग्रजांना जेरीस आणले. हैदरापासून खंडणी वसूल करून मराठी फितुरांचा यानेच पाडाव केला. टिपूवरच्या पहिल्या व दुसऱ्या स्वाऱ्यांत हाच प्रमुख होता. **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** — (१८७१–१९३४). प्रसिद्ध नाटककार, टीकाकार, विनोदलेखक व ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक. **नरसिंह चिंतामण केळकर**– (१८७२–१९४७). ‘केसरी’चे संपादक. लोकमान्य टिळकांचे निष्ठावंत अनुयायी. राजकीय पुढारी, अव्वल दर्जाचे निबंधकार, रसिक वृत्तीचे टीकाकार, कादंबरीकार इ. अनेकविध नात्यांनी मराठी वाङ्मयाच्या बहुतेक दालनांतून विहार. **नाटकांचा सोमवार** — महत्त्वाची नाटके शनिवारी, रविवारी अथवा सुटीच्या दिवशी लावली जात, व त्या मानाने कमी लोकप्रिय

व कमी उत्पन्नाची नाटके सोमवारी लावण्याचा प्रघात असे. **आबासाहेब म्हाळस** — जळगाव येथील एक वकील. **विनायक कोंडदेव ( ओक )** — ( १८४०–१९१५ ) ' बालमित्र ' नावाच्या मुलांच्या मासिकाचे संपादक. कवी व निबंधकार. लेखणी जुन्या वळणाची व उपदेशपर. **भालचंद्र कृष्ण ( भाटवडेकर )** – ( १८८५–१९२५ ). मुंबईतील एक प्रसिद्ध डॉक्टर व प्रागतिक पुढारी. **खाडिलकर, वरेरकर, शुक्ल**—कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडीलकर, भार्गवराम विठ्ठल ऊर्फ मामा वरेरकर व सदाशिव अनंत शुक्ल हे तिघे मराठी नाटककार. **असहकारी किंवा प्रतिसहकारी** — इंग्रजांच्या जुलमी राज्यकारभारास प्रतिबंध घालण्यासाठी सरकारी पदव्या, नोकऱ्या शाळा, कॉलेजे व कोर्टे यांवर बहिष्कार घालण्याची म. गांधींनी सुरू केलेली १९२० नंतरची राजकीय चळवळ. **ना. पटेल**—( विठ्ठलभाई जव्हेरभाई : १८७१–१९३३ ). मध्यवर्ती कायदेमंडळाचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष ( १९२५ ). राजकारणात फार मोठे यश मिळविले. **बाळासाहेब नातू**— ( मृत्यू १८५० ). दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत पुण्याचा रेसिडेंट एल्फिन्स्टन याच्याशी संधान बांधून पुण्याची पेशवाई व सातारची छत्रपतींची गादी घालविणारे फितुर गृहस्थ. **विविधज्ञानविस्तार**—१८६७ च्या जुलैत श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर ( १८४४–१९०१ ) यांनी सुरू केलेले मराठीतील महत्त्वाचे मासिक. पहिली चार वर्षे गुंजीकर संपादक होते; नंतर जनार्दनपंत मोडक ( १८४५-१८९० ) यांनी पुढे १७ वर्षे त्याचे संपादन केले. त्याच वेळी पुरुषोत्तमपंत नाडकर्णी यांनी त्यांच्या आर्थिक व्यवहाराची जबाबदारी पतकरली. २९ व्या वर्षापासून रावसाहेब मोरमकरांच्याकडे ही जबाबदारी आली. मराठीमधील सर्वांत महत्त्वाचे व विचारप्रवर्तक असे हे मासिक ठरते. कोल्हटकरांचे बहुतांश वाङ्मयीन लेख विस्तारातूनच प्रसिद्ध झाले. ६९ वर्षे चालून हे मासिक बंद पडले. **टिंबक्टू**—उत्तर आफ्रिकेतील सहारा वाळवंटाच्या नैर्ऋत्येकडे असलेले अगदी छोटे गाव. आंग्ल कवी टेनिसन याने या विषयावर कविता लिहिली म्हणून वाङ्मयामध्ये हे नाव वारंवार येते. **गंगाधरराव देशपांडे** — ( १८६०–१९६० ). कर्नाटकातील प्रसिद्ध वक्ते आणि पुढारी. टिळकांचे कर्नाटकातील अनुयायी. त्यामुळे त्यांना ' कर्नाटकसिंह ' म्हणण्यात येते. मुंबईस १९०७ साली निघालेल्या ' राष्ट्रमत ' या दैनिकाच्या संपादक-

मंडळात ते होते. **शिवरामपंत परांजपे**—(१८६४–१९२९). प्रतिभावंत साहित्यिक व वक्ते. ‘काळ’ पत्राचे संपादक. वक्रोक्ती, काव्यमयता व स्वातंत्र्यप्रियता या वैशिष्ट्यांनी त्यांचे लेखन संपन्न आहे. **मौज पत्र**—१९२३ साली अच्युतरावांचे सहकारी अनंत हरी गद्रे यांनी चालू केलेले आकर्षक साप्ताहिक-पत्र. श्री. पांडोबा भागवत यांनी ‘मौजे’चे स्वरूप अतिशय आकर्षक ठेविले होते. गद्रे, सारोळकर, स. अ. शुक्ल, वि. पु. भागवत यांनी हे पत्र १९६० पर्यंत चालविले. पुढे ते बंद पडले. **सी. आर. दास**—(चित्तरंजन दास : १८७०–१९२५). बंगालमधील प्रसिद्ध कवी, वकील, राजकारणी पुढारी व वृत्तपत्रकार. ‘वन्दे मातरम्’ या इंग्रजी दैनिकाचे संपादक. असहकारितेच्या चळवळीत राष्ट्रीय पुढाऱ्यांवर भरलेल्या खटल्यात वकीलपत्र घेऊन त्यांनी जी कामगिरी केली, ती प्रसिद्ध आहे. **जोशी-खापर्डे**—वीर वामनराव गोपाळ जोशी (१८८१–१९५६) व गणेश कृष्ण खापर्डे (१८६४–१९३८). वऱ्हाड-नागपूरकडील प्रसिद्ध वकील व लोकमान्य टिळकांचे सहकारी. ‘राक्षसी महत्त्वाकांक्षा’ ‘रणदुंदुभी’, ‘धर्मसिंहासन’ व ‘शीलसंन्यास’ ही वामनरावांची चार नाटके प्रसिद्ध आहेत. **बालगंधर्व**—नारायणराव श्रीपाद राजहंस (१८८८–१९६७). मराठी रंगभूमीचे प्रख्यात गायक नट. स्वर्गीय आवाजामुळे त्यांच्या अगदी तरुणपणी टिळकांनी त्यांना ‘बालगंधर्व’ हीं पदवी दिली. **ड्युक ऑफ वेलिंग्टन**—(१७६९ – १८५२). जनरल आर्थर वेलस्ली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत हा भारतात आला होता. १८०५ पर्यंत टिपू व मराठे यांशी इंग्रजांचा सेनापती म्हणून लढला, व श्रीरंगपट्टणच्या लढाईत टिपू सुलतानास याने ठार मारले. १८०५ मध्ये तो इंग्लंडला परत गेला. तेथेही वॉटर्लूच्या लढाईत इंग्लंडचा सेनापती म्हणून त्याने नेपोलियनचा पराभव करून त्याला सेंट हेलिना येथे अटकेत ठेविले. त्याच्या या असाधारण यशामुळे १८२८–३० मध्ये तो इंग्लंडचा पंतप्रधान म्हणून निवडून आला व त्याला ‘ड्यूक ऑफ वेलिंग्टन’ हा किताब मिळाला.

: ४ :

## द. बा. (काकासाहेब) कालेलकर (१८८५)

सर्वोदयवादी, अध्यात्मप्रवण दृष्टीचे निबंधकार. मराठीइतकेच गुजराथी

भाषेवर प्रभुत्व. त्यांनी व्यापक भूमिकेवरून चिंतनशील व विचारप्रवर्तक निबंध लिहिले आहेत. हिंदू धर्म; हिंदू संस्कृती यांबद्दलचे त्यांच्या निबंधांतील विचार त्यांच्या सूक्ष्म परिशीलनाची ग्वाही देतात. येथे छापलेला निबंध केवळ वर्णनात्मक व संकलनात्मक आहे. निबंधांबरोबरच काही उत्कृष्ट असे प्रवासवर्णनात्मक लेखनही त्यांनी केले आहे.

'जीवनातील आनंद', 'हिंडलग्याचा प्रसाद', 'जीवनविहार', 'लोकमाता', 'हिमालयातील प्रवास' व 'स्मरणयात्रा' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

**पुरश्चरण**–धार्मिक अनुष्ठान. **कथाकली**–केरळमधील लोकनृत्याचा एक प्रकार.

**जटिलो मुण्डी लुचितकेशः**—जटा वाढविणे, वस्तऱ्याने केस काढणे व मुठीने केस उपटून काढणे असा त्रिविध मार्ग.

: ५ :

## श्री. म. माटे ( १८८६–१९५७ )

अस्पृश्यतानिवारणासाठी कर्त्या समाजसेवकाचे व्रत घेऊन माटे प्रथम मराठी जनतेपुढे आले. त्यानंतर पुण्याच्या नूतन मराठी विद्यालय व सर परशुरामभाऊ महाविद्यालय येथे उत्तम अध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. विचारप्रवर्तक व व्यासंगपूर्ण लेख आणि स्वानुभवावर आधारलेल्या काही कथा त्यांनी प्रसिद्ध केल्या. विज्ञाननिष्ठ बुद्धिवाद, आकर्षक मांडणी, भाषेवरचे प्रभुत्व व चिकित्सक वृत्ती यांमुळे टिळक-आगरकर-केळकरांच्या मालिकेतील निबंधकार म्हणून त्यांना मानाचे स्थान मिळाले. नानाविध उदाहरणांनी एखादा महत्त्वाचा विषय वाचकांच्या मनात ते सहजपणे ठसवितात. प्रस्तुत निबंधात त्यांच्या सामाजिक, धार्मिक व ऐतिहासिक विषयांवरच्या चिकित्सक व्यासंगाचे जसे दर्शन घडते, तसेच भाषेवरच्या प्रभुत्वाही जाणीव होते. व्यासंगामुळे विषय दुर्बोध होण्या-ऐवजी त्यांच्या बाबतीत तो अतिशय रोचक होतो.

त्यांचे 'अस्पृष्टांचा प्रश्न', 'विज्ञानबोध', 'उपेक्षितांचे अंतरंग', 'विचारशलाका', 'आपापले हितगुज', 'रसवंतीची जन्मकथा' इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

उत्खननशास्त्र — पृथ्वीच्या पोटात गडप झालेल्या वास्तू, वस्तू यांचा जमीन खणून शोध घेणारे शास्त्र. न्या. रानडे— ( महादेव गोविंद रानडे : १८४२–१९०१ ). महाराष्ट्रातील सुधारणावादी पक्षाचे पुढारी. स्वतंत्र विचार, अखंड व्यासंग यांमुळे अर्थकारण, राजकारण, समाजकारण व वाङ्मय इत्यादी क्षेत्रांत मौलिक विचारसरणी व्यक्त करणारे द्रष्टे पुरुष. महाराष्ट्रातील सर्वांगीण विचार-प्रवर्तनाचे आद्य स्फूर्तिस्थान. यू ए. सँग—( ६०६–६६४ ). चिनी प्रवासी. ह्याने लहानपणीच बौद्ध धर्म स्वीकारून चीनभर प्रवास केला. अनेक अडचणींवर मात करून तो हिंदुस्थानात आला. हिंदुस्थानात त्याने १५ वर्षे पर्यटन केले. येथून त्याने मोठा ग्रंथसंग्रह, मूर्ती इत्यादी वस्तू आपल्याबरोबर नेल्या. त्याने चीनच्या बादशहाच्या आज्ञेवरून आपले प्रवासवृत्त लिहून ठेविले. राजा राममोहन रॉय —( १७७२–१८३३ ). अव्वल इंग्रजीतील पहिले समाजसुधारक. ब्राह्मो समाजाचे संस्थापक, राजकारणी मुत्सद्दी. आधुनिक बंगाली गद्याचे आद्य प्रवर्तक. बंगालमध्ये हिंदू कॉलेज व वेदान्त कॉलेज यांची स्थापना करून नवयुग-प्रवर्तकत्वाचा मान मिळविला. सती जाण्याच्या चालीविरुद्ध चळवळ करून ती बंद करावयास लाविली. न्यूटन — सर ऐझॅक ( १६४२–१७१७ ) गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणारा प्रख्यात इंग्रज संशोधक. स्मृतिकार — मनू याज्ञवल्क्य, नारद. पराशर इत्यादी.

: ६ :

## दत्तो वामन पोतदार ( १८९० )

इतिहास व प्राचीन मराठी वाङ्मय यांचे मुरब्बी व दर्दी अभ्यासक व संशोधक. उत्तम वक्ते व शिक्षणज्ञ. ओघवती भाषा व तर्कशुद्ध प्रतिपादन ही त्यांच्या लेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये. श्री. सहस्रबुद्धे यांनी लिहिलेल्या ' माधवराव पेशवे ' या ग्रंथास पुरस्कार लिहिण्याच्या निमित्ताने हा लेख लिहिला गेला आहे.

सखारामबापू—( सखाराम भगवंत बोकील : १७१६–१७८१ ). पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक श्रेष्ठ मुत्सद्दी. नारो शंकर,. . .चंद्रचूड—पेशवाईतील काही प्रमुख सरदार. रियासतकार—गोविंद सखाराम ( १८६५–१९५९ ). सरदेसाई बडोदे येथे सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या पदरी असता

राजपुत्र फत्तेसिंगराव गायकवाड यांस शिकविण्याकरिता त्यांनी ऐतिहासिक टिपणे काढली. पुढे त्यांतूनच मराठी, मुसलमानी व ब्रिटिश रियासती त्यांनी लिहून काढल्या. त्यामुळे त्यांना 'रियासतकार' म्हणतात. **एल्फिन्स्टन, माउंट स्टुअर्ट** (१७७९–१८५९). स्कॉटलंडमध्ये जन्म. कंपनी सरकारची नोकरी धरून निरनिराळ्या हुद्द्यांवर कामे करीत १८१० मध्ये पुण्याला इंग्रजांचा रेसिडेंट म्हणून आला. १८१९ ते १८२७ मध्ये मुंबईचा पहिला गव्हर्नर म्हणून त्याने मोठी लोकप्रियता मिळविली. देशी भाषेत शिक्षण देण्याच्या धोरणानुसार याने तत्कालीन विद्वानांना प्रोत्साहन देऊन अनेक ग्रंथ लिहून घेतले व इंग्रजीतील ग्रंथांची मराठीत भाषांतरे करविली. **रानडे–केळकर**—न्या. रानडे यांनी लिहिलेल्या 'Rise of the Maratha Power' व वाड यानी संपादित केलेल्या पेशवे दप्तरातील उताऱ्यास लिहिलेल्या प्रस्तावनेतील भाग, किंवा न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या 'मराठे व इंग्रज' इत्यादीसारख्या पुस्तकातील विचार. **परशुरामभाऊ व पुनर्विवाह** — (१६३९–१७९९). परशुरामभाऊ पटवर्धन हे सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत मराठ्यांचे सेनापती होते. त्यांना बयाबाई नावाची मुलगी होती. तिच्या पुनर्विवाहासंबंधी त्यांनी खटपट केली. **बाजीराव व समशेरमुंज**—पहिल्या बाजीरावाला मस्तानीपासून समशेर-बहादुर नावाचा मुलगा झाला. त्याची मुंज करण्याचा हट्ट बाजीरावाने धरला.

: ७ :

## श्री. ना. बनहट्टी (१९०१)

नागपूर-विदर्भातील मराठीचे व्यासंगी प्राध्यापक. प्राचीन मराठीतील संत-वाङ्मय व पंडिती काव्य, तसेच अर्वाचीन मराठीतील नाट्यवाङ्मय यांचे अभ्यासक. चिंतनशीलता व आपल्या विचारांची परिश्रमपूर्वक मांडणी, ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. त्यामध्ये सत्यजिज्ञासा आणि चिकित्सक दृष्टिकोणातून एखाद्या विषयाचे केलेले विश्लेषण यांचे दर्शन होते. शैलीपेक्षा विचारांची छाननी व चिकित्सा यांना ते अधिक महत्त्व देताना आढळतात.

'ज्ञानोपासना आणि भारतीयांचे कर्तव्य', 'मयूरकाव्यविवेचन' 'मराठी

रंगभूमीचा इतिहास, भाग १ ', 'चिंतन आणि चर्चा ', ' एकावळी ', ' टिळक आणि आगरकर ' इत्यादी त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

या संग्रहातील लेख ' चिंतन आणि चर्चा ' या संग्रहातील आहे.

**आंबेडकर**—भीमराव रामजी ( बाबासाहेब ) ( १८९३–१९५६ ). महाडला एक सामान्य हरिजनाच्या कुटुंबात जन्म पावलेल्या या पुरुषाने आपल्या विद्वत्तेने मोठी कीर्ती मिळविली. अनेक हालअपेष्टांतून ते ' बॅरिस्टर ' झाले. ' रुपयाचा प्रश्न ' या ग्रंथाला लंडन विद्यापीठाने पीएच्. डी. ही पदवी दिली. हरिजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी जे प्रचंड आंदोलन उभारले, त्यामुळे त्यांच्या समाजात त्यांना ' देवपद ' प्राप्त झाले. अतिशय हुशार, उद्योगी व मानी पुरुष. भारताच्या घटनेचे संयोजक व शिल्पकार. **महात्मा फुले** —ज्योतिबा गोविंद ( १८२७–१८९० ). महाराष्ट्रातील आद्य कर्ते समाजसुधारक. **टाटा**— जमशेटजी नसरवानजी ( १८३९–१९०४ ). मध्यम स्थितीतील पारशी घराण्यात जन्म पावून यांनी प्रचंड प्रमाणाने हिंदी उद्योगधंद्यांचा पाया घातला. मोठमोठ्या गिरण्या, विद्युदुत्पादन केंद्रे व जमशेटपूरचा लोखंडाचा कारखाना इ. उद्योगधंदे त्यांनी सुरू केले, व कोट्यावधी रुपये मिळविले. कल्पकता धडाडी, उद्योगप्रियता व दानशूर वृत्ती यामुळे त्यांनी हिंदुस्थानचा ऐहिक दृष्ट्या कायापालट घडवून आणला.

: ८ :

## न. वि. ( काकासाहेब ) गाडगीळ ( १८९६–१९६६ )

महाराष्ट्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ पुढारी. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मध्यवर्ती मंत्रिमंडळातील खाणी व वीज या खात्याचे मंत्री, पंजाबचे राज्यपाल इत्यादी बहुविध नात्यांनी त्यांचे राजकीय कार्य विख्यात आहे. राज्यशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी विषयांवर व्यासंगपूर्ण परंतु आकर्षक पद्धतीने त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. बहुश्रुतता, काहीसा गोष्टीवेल्हाळपणा, प्रवासाची मनमुराद आवड इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात आढळतात.

हा लेख ‘ पाव आणि मिसळ ’ त्या त्यांच्या संग्रहातून घेतला आहे.

**युवतीनां च लीलया** –सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया । यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः । [ सुभाषित, गायन, आणि तरुणींचे विलास यांनी ज्यांचे चित्त हेलावून येत नाही, तो मुक्त तरी होय, किंवा पशू तरी. ]

**महाराष्ट्रभाषा-चित्रमयूर**—ही पदवी शृंगेरी पीठाकडून कोचीन येथे ‘ केरळकोकिळ ’ हे मासिक चालविणारे संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये ( १८५२–१९२७ ) यांना मिळाली होती. मराठीतील एक अव्वल दर्जाचे संपादक व चित्रकार म्हणून त्यांची ख्याती होती. बडोदे दरबारासाठी चित्रे काढण्याचे काम त्यांना दिलेले होते. **राजा रविवर्मा** –( १८४८ – १९०६ ) त्रावणकोरच्या राजघराण्यातील एक नाणावलेले चित्रकार. त्यांची लक्ष्मी, सरस्वती, शकुंतला-जन्म, जटायुवध, कृष्णशिष्टाई, इत्यादी चित्रे अजूनही ठिकठिकाणी दिसतात. ब्राह्म मुहूर्त– रात्रीचा शेवटचा प्रहर. **चिमणराव**–कै. चिंतामणराव विनायक जोशी यांच्या विनोद-लेखनातील एक महत्त्वाचे सुंदर व्यक्तिचित्र. ‘ सरकारी पाहुणे ’ म्हणून चिंतामणरावांना आलेले अनुभव चिं. वि. जोशी यांनी ‘ चिमणरावांचे चऱ्हाट ’ या पुस्तकात वर्णिलेले आहेत.

: ९ :

## प्र. के. अत्रे ( १८९८–१९६९ )

मराठी साहित्यिकांमध्ये अमाप लोकप्रियता मिळविणारे साहित्यिक. जीवनामध्ये येणारा कोणताही अनुभव अत्र्यांच्या लेखणीतून बाहेर पडतो, तेव्हा त्याला कमालीची रोचकता प्राप्त होते. अव्वल दर्जाचे शिक्षक, उत्कृष्ट वक्ते विडंबनकार, कवी, नाटककार, वृत्तपत्रकार, राजकीय पुढारी इत्यादी अनेक नात्यांनी त्यांचे जीवन समृद्ध झाले आहे. ते ज्या ज्या व्यवसायात गेले, त्या-त्या ठिकाणी त्यांनी आत्मविश्वासाने यशःश्री आपल्याकडे खेचून आणली आहे. प्रासादिक परंतु ढंगदार, सहजसाधी परंतु आवेशयुक्त व जीवनातील विसंगतीचा कधी खेळकरपणाने तर कधी विनोदी चष्म्यातून वेध घेणारी भाषा हा त्यांच्या साऱ्या लेखनाचा प्राण.

‘ पस्तीस वर्षांपूर्वीचे पुणे ’ हा वेचा त्यांच्या ‘ मी कसा झालो ? ’ या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून घेतला आहे.

**नायगाराचा धबधबा**–अमेरिकेतील संयुक्त संस्थाने आणि कॅनडा यांच्या सरहद्दीवर १६७ फूट उंचीवरून पडणारा जगप्रसिद्ध धबधबा. **लक्ष्मण झूला**– हरिद्वारहून हृषिकेशकडे जाताना लागणारा गंगेवरचा एक झुलता पूल. **चतुःशृंगी** पुण्याजवळचे टेकडीवरचे देवीचे एक सुप्रसिद्ध देवस्थान. **रे मार्केट** – आजचे ' महात्मा फुले मार्केट. ' **राजापुरची गंगा**–रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर या गावी काही कालावधीने अकस्मात ही गंगा वाहू लागते व काही दिवस वाहात राहून परत नाहीशी होते. **राघो भरारी**–रघुनाथ बाजीराव उर्फ राघोबा–दादा पेशवे ( १७३४-१७८३ ). अहमदशहा अब्दालीवर स्वारी करण्यासाठी उत्तरेत जाऊन याने अटकेपार मराठ्यांचा झेंडा लावला. त्याच्या तडफदार आणि लांब-लांबच्या स्वाऱ्या, मुक्कामांमुळे त्यास ' राघो भरारी ' म्हणत. **कात्रजचे पाणी**– पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीत ( १७२०-१७४० ) शनिवारवाडा बांधला गेला. त्या वेळी प्यावयास चांगले पाणी नाही, हे लक्षात घेऊन सातारा-रस्त्यावरील पुण्यापासून काही मैलांच्या अंतरावरील कात्रज येथील तळ्याचे पाणी प्रथम खापरी नळ बांधून पुण्यास आणण्यात आले. पुढे नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत हा नळ दगडी केला.

: १० :

## ग. त्र्यं. माडखोलकर ( १८९९ )

नागपूर येथील ' तरुण भारत ' या दैनिकाचे माजी विद्वान संपादक. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झालेले असले, तरी संस्कृत, मराठी व इंग्रजी या भाषांमध्ये व्यासंगाने त्यांनी चांगलेच प्रावीण्य संपादन केले आहे. विशेषतः संस्कृत वाङ्मयाच्या सखोल व्यासंगामुळे प्रौढ, संस्कृतनिष्ठ व प्रवाही गद्याचे आकर्षक रूप त्यांच्या लेखनात आढळते. वाङ्मयीन टीकाकार व अव्वल दर्जाचे कादंबरी-कार म्हणून त्यांचा लौकिक आहे. हा लेख ' स्वैर विचार ' या त्यांच्या लेखसंग्रहातून घेतला आहे.

**विकासवाद**- चार्लस डार्विन ( १८०९-१८८२ ) याने आपल्या Origin of Species या ग्रंथात मांडलेले उत्क्रांतिवादाचे तत्त्व. या तत्त्वानुसार जगातील पशुपक्षी, प्राणी, वनस्पती इत्यादी जीवसृष्टीमधील वस्तूंचे आजचे स्वरूप हे मुळातले नसून मूळच्या अत्यंत अविकसित अशा स्वरूपापासून क्रमाक्रमाने,

हळूहळू विकसित होत-होत त्यांना आजचे रूप प्राप्त झाले आहे. **निराशेचा गाव**-संत तुकाराम-महाराजांच्या अभंगातील एक ओळ. माया, मोह यांपासून संत अलिप्त असतात, हा त्यातला मथितार्थ. **जॉन्सन**—डॉ. सॅम्युएल ( १७०९–१७८४ ). प्रसिद्ध इंग्रज कोशकार व निबंधकार. मोठा पंडित म्हणून प्रसिद्ध. **रामदास**-मराठीतील शिवाजीकालीन संतकवी. **मोरोपंत**– ( १७२९-१७९४ ). मराठीतील सर्वश्रेष्ठ पंडितकवी. 'आर्याभारत'कार. **लॉक**–जॉन ( १६३२–१७०४ ). इंग्रज तत्त्वज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ. **मिल**–जॉन स्टुअर्ट-( १८०६–१८७३ ). इंग्रज तत्त्ववेत्ता व अर्थशास्त्रज्ञ. उपयुक्ततावादाचा जोरदार पुरस्कर्ता व प्रगमनशील सुधारक. **सॉक्रेटिज**–( इ. स. पूर्व ४६९–३९९ ) प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ. याच्या अभिनव व क्रांतिकारक विचारांमुळे त्याला पाखंडी ठरवून तत्कालीन अधिकाऱ्यांनी त्याला विषप्राशन करावयास लावले. **माझिनी**–जोसेफ ( १८०५–१८७२ ). इटालीचा स्वातंत्र्यवीर. याने आपल्या चळवळीने रोमला स्वातंत्र्य मिळवून दिले. **सीझरच्या रुत्तेविरुद्ध**–ख्रिस्ती धर्मसंस्थापक येशू ख्रिस्त याचा जन्म यहुदी जातीमध्ये झाला; आणि ज्या यहुदी लोकांना धर्मोपदेश करून त्यांना सन्मार्गावर आणण्याचा त्याने प्रयत्न केला, त्या यहुदी लोकांच्या आग्रहामुळेच त्याला क्रूसावर लटकावून ठार मारण्यात आले. त्या वेळी यहुदी राष्ट्र रोमच्या आधिपत्याखाली होती आणि जूलियस सीझर ( ख्रि. पू. १०२-४४ ) हा रोमचा हुकूमशहा होता. लोकांची साहजिकच सीझरविरुद्ध बंड करण्याची इच्छा होती. त्या इच्छेस येशूने मान दिला नाही. म्हणून लोकांनी चिडून जाऊन त्यास रोमच्या गव्हर्नराच्या ताब्यात दिले. चौकशीत येशू निर्दोषी ठरला, परंतु लोकांच्या रोषामुळे त्याला ठार मारण्यात आले. **गॅरिबाल्डी**–गिऊसेप ( जोसेफ ) ( १८०७–१८८२ ). इटालियन देशभक्त. तरुणपणीच माझिनीचा सहकारी व भक्त बनला व रोमला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याने मोठी चळवळ उभारली. **जॉर्ज बर्नार्ड शॉ**–( १८५६–१९५० ). सुप्रसिद्ध इंग्रज नाटककार व प्रगतीपर विचारवंत. **गटे**–योहान वूल्फगांग ( १७४९–१८३२ ) जर्मन महाकवी, नाटककार, टीकाकार, कादंबरीकार व शास्त्रज्ञ. ख्रिस्तीन व्हल्पीयस नावाच्या स्त्रीशी १८१६ मध्ये त्याने विवाह केला. परंतु त्यापूर्वी १७ वर्षे त्या दोघांचा विवाहबाह्य संबंध होता. **ऑस्कर वाइल्ड**–( १८५४–१९०० ) इंग्रज नाटककार. त्याच्यावर वैषयिक विकृततेचा आरोप ठेवून त्याला शिक्षा करण्यात आली होती. **शेली**–पर्सी बिशी ( १७९२–१८२२ ) प्रसिद्ध इंग्रज रोमँटिक कवी.

: ११ :

## पु. ग. सहस्रबुद्धे ( १९०४ )

ऐहिकता, विज्ञाननिष्ठा व लोकशाही समाजवाद यांचे पुरस्कर्ते. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयामध्ये शिक्षक व सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक होते. निबंधरचना व राष्ट्ररचना यांचा अन्योन्य संबंध आहे, ही त्यांची महत्त्वाची विचारसरणी. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास व वाङ्मय यांच्या चिंतनातून अनेक विषयांचे व्यासंगपूर्ण विवेचन त्यांनी 'विज्ञानप्रणीत समाजरचना', 'माझे चिंतन', 'राजविद्या', 'भारतीय लोकसत्ता', 'पराधीन सरस्वती' इत्यादी ग्रंथांत केले आहे. 'जीवनातील करार' हा लेख त्यांच्या 'राजविद्या' या लेखसंग्रहातून घेतला आहे.

: १२ :

## अरविंद गंगाधर मंगरूळकर ( १९१० )

पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातील संस्कृत भाषेचे प्रमुख प्राध्यापक. सध्या निवृत्त. साहित्य, संगीत, शिल्पकला, व्याकरण, काव्यशास्त्र या विषयांवर त्यांनी मराठीत चिकित्सक व रसोद्ग्राही विवेचन केले आहे. प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांच्या सहकार्याने त्यांनी संपादित केलेला 'काव्यप्रकाश' हा १५०० पृष्ठांचा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची खात्री पटविणारा व 'मराठी व्याकरणाचा पुनर्विचार' हा त्यांचा ग्रंथ मराठी व्याकरणाबद्दल नवी दृष्टी देणारा आहे. या लेखात रघुवंशाच्या आधारे सीतेचे व्यक्तिचित्रण मर्मज्ञतेने आणि भावपूर्ण रीतीने केलेले दिसेल.

: १३ :

## पु. ल. देशपांडे ( १९१९ )

मराठी साहित्यातील अष्टपैलू साहित्यिक. विनोदी लेखक, नट, नाटककार, चित्रपटकथालेखक, संगीतदिग्दर्शक, विनोदी वक्ते, आकाशवाणीवरील यशस्वी अधिकारी इत्यादी अनेक वैशिष्ट्यांनी ते महाराष्ट्राला परिचित आहेत.

मुंबईतील मध्यमवर्गीयांच्या जीवनाची वैशिष्ट्ये आपल्या अभिजात विनोदपूर्ण लेखणीने त्यांनी 'बटाट्याची चाळ' या पुस्तकात वर्णिलेली आहेत. त्या पुस्तकातील शेवटचा भाग येथे घेतला आहे.

**ब्लॅक-आउट**—युद्धप्रसंगी रात्रीच्या वेळी शत्रूच्या विमानांना शहरभाग दिसू नये, म्हणून शहरातील दिवे रात्री मालवून संपूर्ण अंधार करण्याची पद्धत. **कर्झन-लॉर्ड** (१८५९ – १९२५) १८९८ ते १९०५ या काळातील हिंदुस्थानचा व्हाइसरॉय. जुलमी अधिकारी व हुकूमशहा म्हणून त्याची कारकीर्द प्रसिद्ध आहे. **खजुरावची चित्रकला**—मध्यप्रदेश छत्तरपूर संस्थानात खजुराव हे एक गाव आहे. या ठिकाणी बरीच मध्ययुगीन देवळे असून त्यांमध्ये काही उत्तान चित्रे आहेत. **नैनं छिंदन्ति**—ह्याला शस्त्रे छेदू शकत नाहीत,—ह्याला अग्नी जाळू शकत नाही. **मेकॉले**...थॉमस बॅबिंग्टन (१८००–१८५९). इंग्रज कायदेपंडित, इतिहासकार व निबंधकार. **स्पेन्सर**–हर्बर्ट (१८२०–१९०३) प्रसिद्ध इंग्रज प्रगमनशील तत्त्ववेत्ता. **एडिसन**–टॉमस अल्वा–(१८४७–१९३१) अमेरिकेत विजेच्या पुरवठ्याची व्यवस्था करणारा पहिला अमेरिकन शास्त्रज्ञ.

: १४ :

## सखाराम गंगाधर मालशे (१९२१)

नाथीबाई टाकरसी महिला विद्यापीठातील मराठीचे प्रमुख प्राध्यापक. त्यापूर्वी मुंबई मराठी संशोधन मंडळाचे प्रमुख व कीर्ती कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक. 'आवड-निवड' हा टीकालेखसंग्रह प्रसिद्ध आहे. शालेय आणि विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी त्यांनी कित्येक पुस्तके संपादन केली आहेत. फादर स्टीफन्सनच्या ख्रिस्तपुराणावर संशोधन करून त्यांनी पीएच्. डी. ही पदवी मिळविली आहे. प्रस्तुत लेख त्यांच्या 'आवड-निवड' या संग्रहातून घेतला आहे. सावरकरांच्या वक्तृत्वाचे डोळस निरीक्षण केल्याखेरीज इतका सर्वांगसुंदर लेख लिहिता येणार नाही, हे त्यांचा निबंध वाचून वाचकांच्या लक्षात आल्याखेरीज राहणार नाही.

**मार्सेलिसचे वीरोड्डाण**—स्वातंत्र्यवीर सावरकर (१८८३–१९६६). सावरकर लंडन येथे बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी होते. तेथे १८५७ सालच्या स्वातंत्र्य-वीरांचे वर्णन करणारा ग्रंथ लिहिल्याबद्दल त्यांना राजद्रोही ठरवून अटक करण्यात आली. त्याची चौकशी करण्याकरिता १९०९ मध्ये त्यांना बोटीतून हिंदुस्थानास

आणले जात होते. त्या वेळी मार्सेलिस ( उच्चार : मार्सेय्य ) नावाच्या बंदरामध्ये बोट उभी असता बोटीच्या पोर्ट होलमधून उडी मारून त्यांनी फ्रान्सचा किनारा गाठला. फ्रान्सच्या पोलिसांनी विश्वासघाताने त्यांना इंग्रजांच्या ताब्यात दिले. **कमला**—सावरकरांनी अंदमानच्या तुरुंगात जन्मठेपेची खडतर शिक्षा भोगीत असता कोळशांनी भिंतीवर लिहून पूर्ण केलेले खंडकाव्य. **मेहता**—जम्नादास माधवदास. पुढारी, मुंबई प्रांतिक असेंब्लीचे व प्रांतिक मंत्रिमंडळाचे मंत्री, मध्यवर्ती असेंब्लीचे सभासद, 'प्रतिसहकार पक्ष' व 'लोकशाही स्वराज्य पक्ष' यांचे अध्यक्ष. हिंदुमहासभेचे एक नेते. **रँ. परांजपे**—सर रघुनाथ पुरुषोत्तम ( १८७६–१९६६ ). १८९९ साली इंग्लंडमध्ये सीनीयर रँग्लर परीक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९०२ ते १९२६ मध्ये पुण्याच्या फर्गसन कॉलेजचे प्राचार्य व गणिताचे प्राध्यापक होते. सावरकर १९०१ ते १९०५ मध्ये फर्गसनमध्ये विद्यार्थी होते. १९०५ मध्ये विलायती मालाची होळी केली. म्हणून परांजपे यांनी सावरकरांस कॉलेजच्या वसतिगृहातून काढून टाकले होते. **नौयुद्धात... आंग्र्यांच्या**–मराठेशाहीमध्ये नौकानयनात व आरमारात प्रसिद्ध असलेले कुलाब्याचे आंग्रे हे सरदार. मूळ पुरुष तुकोजी संकपाळ हा आपला मुलगा कान्होजी आंग्रे यासह शिवाजीच्या आरमारात नोकरीला होता. आंग्रे घराणे दर्यावर्दीपणात धाडसी आणि पराक्रमी म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. १८४० पर्यंत आंग्रे यांची अरबी समुद्रावर सत्ता चालू होती, **ग्रंथसाहेब**-शिखांचा धर्मग्रंथ. **आर्यसमाज** स्वामी दयानंदसरस्वती ( १८२४–१८८३ ) यांनी वैदिक धर्माचा प्रसार करण्यासाठी स्थापिलेली संघटित, लढाऊ वृत्तीची संघटना. **नालंदा**–विहारमधील राजगीरच्या उत्तरेस सात मैलांवर असलेले प्राचीन भारतातील एक महत्त्वाचे प्रसिद्ध विद्यापीठ. हर्षाच्या कारकीर्दीत हे विद्यापीठ अतिशय भरभराटीस आलेले होते. **तक्षशिला** – हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील रावळपिंडीजवळचे एक ऐतिहासिक स्थान. प्राचीन काळचे मोठे विद्यापीठ. **डॉ. पट्टाभि सीतारामय्या**–आंध्र प्रांतातील कॉंग्रेसचे पुढारी. १९४८ साली जयपूर येथे भरलेल्या कॉंग्रेसचे अध्यक्ष. **कै. लाला हरदयाळ**--हिंदुस्थानातून परागंदा झालेले आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी आमरण परदेशात चळवळ करणारे एक दिवंगत क्रांतिकारक. **फजलुल हक**–मुस्लिम लीगचे एक पुढारी. **पं. गोविंद वल्लभ पंत**—संयुक्त प्रांताचे मुख्यमंत्री व कॉंग्रेसचे पुढारी. कॉंग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर असताना

मुंबईतील मध्यमवर्गीयांच्या जीवनाची वैशिष्ट्ये आपल्या अभिजात विनोदपूर्ण लेखणीने त्यांनी 'बटाट्याची चाळ' या पुस्तकात वर्णिलेली आहेत. त्या पुस्तकातील शेवटचा भाग येथे घेतला आहे.

**ब्लॅक-आउट**—युद्धप्रसंगी रात्रीच्या वेळी शत्रूच्या विमानांना शहरभाग दिसू नये, म्हणून शहरातील दिवे रात्री मालवून संपूर्ण अंधार करण्याची पद्धत. **कर्झन-लॉर्ड** (१८५९ – १९२५) १८९८ ते १९०५ या काळातील हिंदुस्थानचा व्हाइसरॉय. जुलमी अधिकारी व हुकूमशहा म्हणून त्याची कारकीर्द प्रसिद्ध आहे. **खजुरावची चित्रकला**—मध्यप्रदेश छत्तरपूर संस्थानात खजुराव हे एक गाव आहे. या ठिकाणी बरीच मध्ययुगीन देवळे असून त्यांमध्ये काही उत्तान चित्रे आहेत. **नैनं छिंदन्ति**—ह्याला शस्त्रे छेदू शकत नाहीत,—ह्याला अग्नी जाळू शकत नाही. **मेकॉले**...थॉमस बॅबिंग्टन (१८००–१८५९). इंग्रज कायदेपंडित, इतिहासकार व निबंधकार. **स्पेन्सर**—हर्बर्ट (१८२०–१९०३) प्रसिद्ध इंग्रज प्रगमनशील तत्त्ववेत्ता. **एडिसन**—टॉमस अल्वा—(१८४७–१९३१) अमेरिकेत विजेच्या पुरवठ्याची व्यवस्था करणारा पहिला अमेरिकन शास्त्रज्ञ.

## : १४ :

## सखाराम गंगाधर मालशे ( १९२१ )

नाथीबाई टाकरसी महिला विद्यापीठातील मराठीचे प्रमुख प्राध्यापक. त्यापूर्वी मुंबई मराठी संशोधन मंडळाचे प्रमुख व कीर्ती कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक. 'आवड-निवड' हा टीकालेखसंग्रह प्रसिद्ध आहे. शालेय आणि विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी त्यांनी कित्येक पुस्तके संपादन केली आहेत. फादर स्टीफन्सनच्या ख्रिस्तपुराणावर संशोधन करून त्यांनी पीएच्. डी. ही पदवी मिळविली आहे. प्रस्तुत लेख त्यांच्या 'आवड-निवड' या संग्रहातून घेतला आहे. सावरकरांच्या वक्तृत्वाचे डोळस निरीक्षण केल्याखेरीज इतका सर्वांगसुंदर लेख लिहिता येणार नाही, हे त्यांचा निबंध वाचून वाचकांच्या लक्षात आल्याखेरीज राहणार नाही.

**मार्सेलिसचे वीरोड्डाण**—स्वातंत्र्यवीर सावरकर (१८८३–१९६६). सावरकर लंडन येथे बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी होते. तेथे १८५७ सालच्या स्वातंत्र्य-वीरांचे वर्णन करणारा ग्रंथ लिहिल्याबद्दल त्यांना राजद्रोही ठरवून अटक करण्यात आली. त्याची चौकशी करण्याकरिता १९०९ मध्ये त्यांना बोटीतून हिंदुस्थानास

आणले जात होते. त्या वेळी मार्सेलिस ( उच्चार : मार्सेय्य ) नावाच्या बंदरामध्ये बोट उभी असता बोटीच्या पोर्ट होलमधून उडी मारून त्यांनी फ्रान्सचा किनारा गाठला. फ्रान्सच्या पोलिसांनी विश्वासघाताने त्यांना इंग्रजांच्या ताब्यात दिले. **कमला**—सावरकरांनी अंदमानच्या तुरुंगात जन्मठेपेची खडतर शिक्षा भोगीत असता कोळशांनी भिंतीवर लिहून पूर्ण केलेले खंडकाव्य. **मेहता**—जम्नादास माधवदास. पुढारी, मुंबई प्रांतिक असेंब्लीचे व प्रांतिक मंत्रिमंडळाचे मंत्री, मध्यवर्ती असेंब्लीचे सभासद, ' प्रतिसहकार पक्ष ' व ' लोकशाही स्वराज्य पक्ष ' यांचे अध्यक्ष. हिंदुमहासभेचे एक नेते. **रँ. परांजपे**—सर रघुनाथ पुरुषोत्तम ( १८७६–१९६६ ). १८९९ साली इंग्लंडमध्ये सीनीयर रँग्लर परीक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९०२ ते १९२६ मध्ये पुण्याच्या फर्गसन कॉलेजचे प्राचार्य व गणिताचे प्राध्यापक होते. सावरकर १९०१ ते १९०५ मध्ये फर्गसनमध्ये विद्यार्थी होते. १९०५ मध्ये विलायती मालाची होळी केली. म्हणून परांजपे यांनी सावरकरांस कॉलेजच्या वसतिगृहातून काढून टाकले होते. **नौयुद्धात... आंग्र्यांच्या**–मराठेशाहीमध्ये नौकानयनात व आरमारात प्रसिद्ध असलेले कुलाब्याचे आंग्रे हे सरदार. मूळ पुरुष तुकोजी संकपाळ हा आपला मुलगा कान्होजी आंग्रे यासह शिवाजीच्या आरमारात नोकरीला होता. आंग्रे घराणे दर्यावर्दीपणात धाडसी आणि पराक्रमी म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. १८४० पर्यंत आंग्रे यांची अरबी समुद्रावर सत्ता चालू होती, **ग्रंथसाहेब**-शिखांचा धर्मग्रंथ. **आर्यसमाज** स्वामी दयानंदसरस्वती ( १८२४–१८८३ ) यांनी वैदिक धर्माचा प्रसार करण्यासाठी स्थापिलेली संघटित, लढाऊ वृत्तीची संघटना. **नालंदा**–विहारमधील राजगीरच्या उत्तरेस सात मैलांवर असलेले प्राचीन भारतातील एक महत्त्वाचे प्रसिद्ध विद्यापीठ. हर्षाच्या कारकीर्दीत हे विद्यापीठ अतिशय भरभराटीस आलेले होते. **तक्षशिला** – हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील रावळपिंडीजवळचे एक ऐतिहासिक स्थान. प्राचीन काळचे मोठे विद्यापीठ. **डॉ. पट्टाभि सीतारामय्या**– आंध्र प्रांतातील काँग्रेसचे पुढारी. १९४८ साली जयपूर येथे भरलेल्या काँग्रेसचे अध्यक्ष. **कै. लाला हरदयाळ**--हिंदुस्थानातून परागंदा झालेले आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी आमरण परदेशात चळवळ करणारे एक दिवंगत क्रांतिकारक. **फजलुल हक**–मुस्लिम लीगचे एक पुढारी. **पं. गोविंद वल्लभ पंत**—संयुक्त प्रांताचे मुख्यमंत्री व काँग्रेसचे पुढारी. काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर असताना

ते संयुक्त प्रांताचे मुख्य मंत्री होते. वल्लभभाई पटेल यांच्या मृत्यूनंतर ते भारत सरकारचे आपल्या मृत्यूपर्यंत गृहमंत्री होते. **कै. वा. म. जोशी**— ( १८८२--१९४३ ). मराठीचे प्राध्यापक व तत्त्वज्ञ कादंबरीकार. **साहाजे तरी मतीवरी**—ज्ञानदेवींतील या ओव्यांचा अर्थ—' सहजीचा तर ( असे ) लक्षात घ्या की, वक्तृत्वाला ( जेव्हा ) अवधानाचे खाद्य असते, तेव्हाच अक्षरांना प्रतिपाद्य विषयांची दोंदे ( विस्तार ) झेपतात. ( मग ) अर्थ शब्दाची वाट पाहात ( बसत ) नाही; तेथे ( एक ) आशयच ( दुसऱ्या ) आशयाला जन्म देतो; ( आणि ) बुद्धीच्या वर ( पलीकडे ) भावांचा बहर येत जातो.' **हिटलर-अॅडॉल्फ** ( १८८९--१९४५ ). जर्मनीचा हुकूमशहा. १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर तो सैन्यात एक सामान्य शिपाई म्हणून भरती झाला. पुढे जर्मन मजूरपक्षात दाखल झाल्यामुळे त्याला पाच वर्षांची शिक्षा झाली. १९३० साली जर्मनीची आर्थिक स्थिती बिघडली आहे, हे पाहून जोराचा प्रचार करून त्याने स्वतःच्या पक्षाचे १०६ सभासद निवडून आणले व १९३३ साली तो जर्मनीचा हुकूमशहा झाला. व्हर्सायचा तह रद्द करणे, ज्यू जातीचा व मार्क्सवादाचा नायनाट करणे हा त्याचा प्रमुख उद्देश होता. त्याने सक्तीची लष्करभरती करून शेजारचे प्रांत बळकावले. १९४० साली जर्मनीने इंग्लंड-फ्रान्सविरुद्ध युद्ध जुंपले. पाच वर्षे लढाई करून १९४५ मध्ये जर्मन सैन्य दोस्तांना शरण गेले. हिटलरने शेवटी आत्महत्त्या केली.

: १५ :

## ना. सी. फडके ( १८९४ )

कोल्हापूरच्या राजाराम कालेजातील तत्त्वज्ञानाचे माजी प्राध्यापक. मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार व टीकाकार. मराठीतील लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराचे आद्य प्रवर्तक ( १ ) वाचकांशी मनमोकळ्या संभाषणाच्या आविर्भावाने लिहिण्याची रीत; ( २ ) रचनेच्या दृष्टीने वरवरून अधिकाधिक विस्कळीत वाटावा, परंतु सहजतेने युक्त असल्याने तो मनोज्ञ व्हावा; ( ३ ) ताजेपणा व मुग्धपणा या लघुनिबंधाच्या प्राणभूत गुणांमुळे एखाद्या काव्यमय उद्गाराचे स्वरूप त्यास प्राप्त व्हावे,-ही लघुनिबंधाची त्यांनीच सांगितलेली वैशिष्ट्ये.

हीं वैशिष्ट्ये तर त्यांच्या ' रविवार ' या लघुनिबंधात आहेतच पण साधेपणा, सोपेपणा, लाघवीपणा, विचारांना कलाटणी देण्याचा गुण व प्रसन्नता हेही गुण त्यात दिसतील. त्यात एक प्रकारचा बंदिस्तपणाही आहे.

: १६ :

## वि. स. खांडेकर ( १८९८ )

कल्पकता, काव्यमयता, ध्येयवादित्व आणि चिंतनशीलता हा खांडेकरांचा प्रकृतिधर्म. लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराला हा प्रकृतिधर्म अतिशय उपकारक. म्हणून एखादा विषय उपमा-उत्प्रेक्षा-कोट्या यांनी फुलवीत-फुलवीत तो चमत्कृतिपूर्ण रीत्या मांडण्यामध्ये खांडेकरांनी चांगले यश मिळविले आहे त्यामुळे बऱ्याच वेळेस लघुनिबंधातील लघुत्वास बाध येतो, ही गोष्ट खरी असली, तरी त्यामुळेच ' लघुनिबंध ' हा लघू असलाच पाहिजे असे नाही असे प्रतिपादण्याची पाळी समीक्षकांवर येते.

: १७ :

## अनंत काणेकर ( १९०४ )

लघुनिबंधामध्ये लघुत्वाला महत्त्व आहे असे मानले, तर काणेकरांचे निबंध त्या दृष्टीने अधिक अन्वर्थक ठरतील. गोष्टीवेल्हाळपणा हा काणेकरांचा महत्त्वाचा विशेष असला तरी त्यांच्या निबंधांत मात्र पाल्हाळ चुकूनसुद्धा शिरत नाही. सनातनी विचारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि निबंधांमध्ये नाट्यमयता निर्माण करण्यासाठी त्यांनी निर्माण केलेला मानसपुत्र ' गणूकाका ' त्यांच्या निबंधांत फार महत्त्वाची कामगिरी करून जातो. गणूकाकांशी गप्पा मारीत-मारीत, एखादा गवयी समेवर यावा, त्याप्रमाणे काणेकर एखाद्या महत्त्वाच्या तत्त्वविचारावर येतात, आणि त्याची चर्चा अतिशय परिणामकारकतेने करून वाचकाला विचारमग्न ठेवून निबंध संपवितात.

**विश्वामित्राची प्रतिसृष्टी**—आपला शिष्य ' त्रिशंकू ' ह्याला देवांनी सदेह स्वर्गात येण्यास प्रतिबंध केला, तेव्हा विश्वामित्राने नवीन वेगळी सृष्टी निर्माण करण्याचा उद्योग आरंभिला. डेमॉस्थिनिस — ( खि. पू. ३८५–३२२ ) प्राचीन ग्रीसमधील नामांकित वक्ता व योद्धा. याला वक्तृत्वकला अनुकूल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


नव्हती, परंतु दीर्घ प्रयत्नाने याने वक्तृत्वकलेत इतकी प्रगती केली की, आज जगातल्या सर्वश्रेष्ठ वक्त्यांत त्याची गणना करण्यात येते. सिसेरो—( ख्रिस्तपूर्व १०६–४७ ). रोमचा वक्ता, राजकारणी मुत्सद्दी, तत्त्ववेत्ता.

: १८ :

## शकुंतला परांजपे ( १९०६ )

रँ. परांजपे यांच्या कन्या. विधान-परिषदेच्या सभासद. विचारवंत समाज सुधारक. काही फ्रेंच नाटकांची रूपांतरे केली आहेत, आणि काही उत्तम कथा व ललितनिबंध लिहिले आहेत.

‘ माझी प्रेतयात्रा ’ या त्यांच्या संग्रहातून हा लेख घेण्यात आला आहे.

: १९ :

## इरावती कर्वे ( १९०५ )

पुणे येथील डेक्कन कॉलेजमधील समाजशास्त्र व मानवशास्त्र या विषयांच्या प्राध्यापिका. या विषयांच्या सखोल व्यासंगामुळे त्यांच्या ललित निबंधांतून मानवी स्वभावाचे मर्म सहजगत्या उलगडले जाते. त्यांच्या निबंधांतून वैचारिकता व संवेदनशीलता यांचा नमुनेदार संगम आढळतो.

परिपूर्ति, मराठी लोकांची संस्कृति, आमची संस्कृति, युगान्त इ. ग्रंथ प्रसिद्ध.

: २० :

## भगवंत देशमुख ( १९२२ )

औरंगाबाद येथील सरकारी महाविद्यालयामध्ये मराठीचे प्रमुख प्राध्यापक.

लघुनिबंध या रूढ वाङ्मयप्रकाराला ओळख झाल्यानंतर प्रा. भगवंत देशमुखांनी काही आकर्षक व परिणामकारक लघुनिबंध लिहिले आहेत त्यांचा लघुनिबंधांचा ‘ आलोक ’ या नावाचा संग्रह प्रसिद्ध आहे. साध्या विषयांतून अगदी सहजगत्या, रमत-गमत तत्त्वविमर्श घडविण्यात ‘ आलोक मधील निबंधांना यश आले आहे.

REFBK-0017741